जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, रविवार २३ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०+४

12 कोटी भाविकांच्या स्वागताची तयारी, सिंहस्थासाठी 35 हजार कोटींची विकासकामे

नाशिक /प्रतिनिधी- नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणा-या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू आहे. या कुंभमेळ्यात तब्बल १२ कोटी भाविक सहभागी होण्याचा अंदाज असून, त्यांच्या सोयीसाठी सुमारे ३५ हजार कोटी रु पयांची विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांपैकी तब्बल ८५ टक्के कामे कायमस्वरू पी, तर केवळ १५ टक्के कामे कुंभमेळ्यापुरती तात्पुरत्या स्वरू पाची असणार आहेत. त्यामुळे कुंभमेळ्यासाठी उभारण्यात येणा-या पायाभूत सुविधा पुढील अनेक वर्षे नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या विकासासाठी उपयुक्त ठरणार आहेत. कुंभमेळ्याच्या तयारीसाठी एकाचवेळी मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असल्याने नागरिकांना सध्या काही अडचणींचा सामना करावा लागत आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणा-या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी एकाचवेळी हाती घेण्यात आलेल्या या विविध कामांमुळे खड्डेमय रस्ते, नाशिक व त्र्यंबकेश्वरमधील खोदकामे, त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रु ग्णालयाचे स्थलांतर आदी विविध कारणांवरू न सामान्य नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येतआहे. या पार्श्वभूमीवर, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी या कामांमुळे नागरिकांना सध्या त्रास सहन करावा लागत असल्याचे मान्य करीत ही कामे कुंभमेळ्यापुरतीच मर्यादित न राहता ती नाशिक जिल्ह्याच्या पुढील दीड ते दोन दशकांच्या विकासाचा पाया ठरणार असल्याचे नमूद केले. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणामार्फत २२ हजार ४२५ कोटी ३९ लाख रु पयांची कामे केली जात आहेत. यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग, त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्र विकास, महापारेषण आणि जिल्हा परिषद यांच्या विविध प्रकल्पांचा समावेश आहे. याशिवाय केंद्र सरकारच्या माध्यमातूनही ८ हजार ७६१ कोटी ५४ लाख रु पयांची कामे केली जात आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे, महापालिका आणि एमएसआयडीसीच्या माध्यमातून रस्ते, वाहतूक, रेल्वे, पाणी, आरोग्य आणि इतर पायाभूत सुविधांशी संबंधित प्रकल्प राबवले जात आहेत.

कुंभमेळ्यानंतरही सुविधांचा फायदाच होणार- धार्मिक परंपरा, आधुनिक तंत्रज्ञान आणि दीर्घकालीन पायाभूत सुविधांचा समन्वय साधून नाशिक-त्र्यंबकेश्वरला देशाची प्रमुख आध्यात्मिक राजधानी म्हणून विकसित करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे, असे कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले. कुंभमेळ्यानंतरही या सुविधा नागरिक आणि पर्यटकांसाठी उपयोगी ठरतील, असा दावा कुंभमेळा प्राधिकरणाकडून करण्यात आला आहे.

महिला ही देशाची सर्वात मोठी ताकद

खा.राहुल गांधींचे पुण्यातील कार्यक्रमात भाष्य

पुणे/प्रतिनिधी : काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा छात्रों की गुंज हा कार्यक्रम आज (२२ ऑगस्ट २०२६) पुण्यात पार पडला आहे. या कार्यक्रमासाठी काँग्रेसकडून मागील काही दिवसांपासून मोठी तयारी सुरू होती. या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील काँग्रेसचे दिग्गज नेते पुण्यात ठाण मांडून होते. राहुल गांधी यांचा छात्रों की गुंज हा चौथा कार्यक्रम होता. या कार्यक्रमाच्या माध्यमातून राहुल गांधी यांनी जेन झीशी संवाद साधत विविध विषयांवर भाष्य केलं आहे.दिल्लीतील जेन झीच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांचा हा कार्यक्रम महत्वाचा मानला जात होता. छात्रों की गुंज या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रभरातून पुण्यात विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली होती. या कार्यक्रमाच्या माध्यमातून राहुल गांधी यांनी जेन झीशी संवाद साधत महत्वाचं भाष्य केलं आहे. महिला ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे, असं म्हणत राहुल गांधी यांनी मनुस्मृतीवरू न जोरदार टीका केली.

CHHATRON KI GOONJ



मी आज या ठिकाणी राजकारणावर बोलण्यासाठी आलेलो नाही. तरु णांची संख्या ही भारताची मोठी ताकद आहे. मला अनेकदा विचारलं जातं की भारताची ताकद काय आहे? हा प्रश्न विचारल्यावर अनेक उत्तरे मिळतात. कोणी म्हणतं की आपली अर्थव्यवस्था, कोणी म्हणतं की आपलं सैन्य, कोणी म्हणतं की आपली आरोग्य व्यवस्था, तर कोणी कदाचित आपली लोक संख्या असंही म्हणतं. पण भारताची सर्वात मोठी ताकद काय आहे, याबद्दल माझी भूमिका अगदी स्पष्ट आहे. ७० कोटी भारतीय महिला ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. महिला शक्ती हीच देशाची ताकद आहे, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

महिला या पुरुषांच्या तुलनेत स्वभावात अधिक संवेदनशील, सौम्य, दयाळू असतात. म्हणून माझा ठाम विश्वास आहे की, भारतातील महिला हीच देशाची सर्वात मोठी ताकद आहे. जेव्हा मी पुरु षांशी बोलतो, तेव्हा महिला प्रामुख्याने तीन चौकटींमध्ये पाहिलं जातं. मुलगी, पत्नी किंवा आई म्हणून पाहिलं जातं. आता, पत्नी, मुलगी किंवा आई म्हणून ओळखलं जाण्यात काही गैर नाही. परंतु ही महिलांची एकमेव ओळख असू शकत नाही, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

मनुस्मृतीबाबत राहुल गांधी यांचं मोठं वक्तव्य- मनुस्मृतीने महिलांना तीन चौकटीत बसवलं. महिल स्वतंत्र नाही, असा मनुस्मृतीचा विचार आहे. महिला कधीच स्वतंत्र राहू नये हा मनस्मृतीचा डाव आहे. मात्र, तुम्ही तुमच्या स्वतःच्या शिवाय दुस-या कोणालाही बांधिल नाही, अशी टीका राहुल गांधी यांनी केली आहे. अनेक विद्यार्थीनींनी व्यासपीठावर जाउन राहुल गांधी यांच्याशी संवाद साधत आपल्या व्यथा मांडल्या आहेत. काही विद्यार्थीनींनी त्यांना आलेले काही धक्कादायक अनुभव देखील सांगितले आहेत. यावेळी राहुल गांधी यांनी एक आकडेवारी सांगत देशातील हिंसाचार, बलात्कार, विनयभंग अशा घटनांची धक्कादायक आकडेवारी सांगितली आहे.

साखरेनंतर आता गुळानेही खाल्ला भाव; सामान्य नागरिकांच्या खिशावर भार

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी- सध्या राज्यातील बाजारपेठेत साखरेच्या दरात मोठी वाढ झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अशातच आता साखरेनंतर गुळाच्या किमतीही वाढल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये गुळाच्या एक किलोला ८० ते ८५ रु पये मोजावे लागत आहेत. पंधरा दिवसांपूर्वी गुळाचे भाव ६० रु पये किलो होते. दहा किलोची भेली घ्यायची असेल तर ७० ते ७५ रु पये किलोने गूळ मिळतो आहे.

साखरेच्या दरवाढीनंतर आता गुळाच्या किमतीमध्येही मोठी वाढ झाली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये किरकोळ बाजारात गुळासाठी आता ग्राहकांना किलोमागे ८० ते ८५ रु पये मोजावे लागत आहेत. विशेष म्हणजे अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी हाच गूळ ६० रु पये किलो दराने मिळत होता. म्हणजेच पंधरा दिवसांत गुळाच्या दरात तब्बल २० ते २५ रु पयांची वाढ झाली आहे. दहा किलोची भेली घेतल्यास होलसेल बाजारात ग्राहकांना ७० ते ७५ रु पये किलो मोजावे लागत आहेत. अचानक गुळाच्या दरात एवढी वाढ का झाली? बाजारात गुळाचा पुरवठा कमी झाला आहे का? की उत्पादन आणि मागणीतील बदलाचा हा परिणाम आहे? ऐन सणासुदीच्या तोंडावरती दरवाढ झाल्याने सामान्य नागरिकांच्या खिशावर याचा परिणाम होणार आहे.

साखरेच्या इतिहासात सर्वांत मोठी वाढ- सध्या राज्यातील बाजारपेठेत साखरेने मोठी उसळी घेतल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या साखरेच्या वाढत्या दराचा ग्राहकांना मोठा फटका बसत आहे. सध्या साखरेच्या इतिहासात सर्वांत मोठी वाढ झाली आहे. साखर ७ हजार ५०० प्रति क्विंटलवर गेली आहे. तर वाशिम जिल्ह्यात किरकोळ बाजारात साखरेचे दर ८० रु पयांवर गेले आहेत. याचा ग्राहकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.

महाराष्ट्रातील 16 शहरांत हलका गॅस सिलिंडर

भारत गॅसची 'लाइट झिप' सेवा

नागपूर/प्रतिनिधी : गॅस सिलिंडर हाताळताना होणारा त्रास कमी करण्यासाठी भारत पेट्रोलियम क?पोरेशन लिमिटेडने (बीपीसीएल) नागपूरसह महाराष्ट्रातील १६ शहरांमध्ये भारतगॅस लाइट झिप ही सेवा सुरू केली आहे. या सेवेत हलक्या वजनाचा कंपोझिट सिलिंडर, नवीन जोडणीसाठी तात्काळ सेवा आणि सिलिंडरची जलद घरपोच सेवा देण्यात येणार आहे. देशभरातील १०० शहरांमध्ये या सुविधेचा विस्तार करण्यात आला असून, महाराष्ट्रातील १६ शहरांचा त्यात समावेश आहे. या सिलिंडरसह कोणत्या शहरात सोय सुरू केली गेली, त्याबाबत आपण जाणून गेउ या.ग्राहकांच्या सोयीला प्राधान्य देउन भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने ही सेवा विकसित करण्यात आली आहे. पारंपरिक धातूच्या सिलिंडरऐवजी हलका, गंजरोधक आणि पारदर्शक कंपोझिट सिलिंडर या सेवेत दिला जाणार आहे. त्यामुळे सिलिंडर उचलणे, हलवणे आणि ठेवणे अधिक सोपे होणार आहे.



कंपोझिट सिलिंडर पारदर्शक असल्याने त्यामध्ये किती गॅस शिल्लक आहे, हे ग्राहकांना बाहेरून पाहता येणार आहे. त्यामुळे गॅस कधी संपण्याची शक्यता आहे, याचा अंदाज घेणे सोपे होईल. हलक्या वजनामुळे विशेषत? महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना सिलिंडर हाताळताना अधिक सुविधा मिळणार आहे. एक्सप्रेस डिलिव्हरीच्या माध्यमातून सिलिंडरची जलद घरपोच सेवा उपलब्ध होणार आहे. गॅसची गरज निर्माण झाल्यानंतर ग्राहकांना अधिक वेगाने सिलिंडर मिळावा, यासाठी ही सुविधा सुरू करण्यात आली आहे.

बंगालच्या उपसागरात विदेशी मालवाहू जहाज बुडाले; 24 जण बेपत्ता

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : ओडिशातील पारादीप बंदरातून लोखंडी खनिज घेउन निघालेले एक विदेशी मालवाहू जहाज बंगालच्या उपसागरात अचानक बुडाल्याची धक्कादायक माहिती समोर आली. 'पीटीआय' या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, ओडिशाच्या किनारपट्टीपासून सुमारे २४० नाटिकल मैल दूर ही घटना घडली असून, पनामाचा ध्वज असलेले हे जहाज समुद्रात गायब झाले आहे. या घटनेनंतर जहाजातील २४ जणांच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता व्यक्तकेली जात आहे.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, या जहाजावर एकूण २४ जण होते. यामध्ये २० चीनी नागरिक, २ म्यानमारचे नागरिक आणि १ बांगलादेशी नागरिक असल्याचे स्पष्ट झाले आहे,

कांदा, तेल, साखर, आणि डाळी महागल्या

मुंबई/प्रतिनिधी : देशभरात खाद्यपदार्थ महाग झाल्याने स्वयंपाकघरातील खर्च वाढणार आहे. साखरेच्या किमतींबरोबरच कांदे, टोमॅटो आणि तेलाच्या किमतीही वाढल्या आहेत. इतकेच नाही तर, डाळींच्या किमतीही वाढल्या असून त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले आहे. देशभरात वाढत्या महागाईची चिंता कायम आहे. गेल्या आठवड्यात साखरेच्या दरात ७ रु पयांनी आणि एका महिन्यात १७ रु पये प्रति किलोने वाढ झाली आहे. परिणामी साखर आता ७० रु पये प्रति किलो दराने विकली जात आहे. याशिवाय, कांद्याच्या दरात ४ ते ५ रु पये प्रति किलोने वाढ झाली आहे. साखरेच्या किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकार तीन स्तरांवर काम करत आहे. बाजारात पुरवठा वाढवण्यासाठी, सरकारने ३१ ऑक्टोबरपर्यंत १० लाख टन साखरेच्या शुल्कमुक्त आयातीला मंजुरी दिली आहे. याव्यतिरिक्त, साठेबाजी रोखण्यासाठी साठ्यावर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. तिसरे म्हणजे, देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी साखर कारखान्यांना १५ ऑक्टोबरपासून लवकर गाळप सुरू करण्यास सांगितले आहे, जेणेकरू न नवीन पीक आल्यानंतर सणासुदीच्या हंगामासाठी

पुरेशी साखर उपलब्ध असेल. सरकारी आकडेवारीनुसार, २१ ऑगस्ट रोजी सरासरी किरकोळ भाव ४०.७९/किलो होता. एका आठवड्यापूर्वी तो ३६.५६ आणि एका महिन्यापूर्वी तो ३४.८७ होता. याचा अर्थ कांद्याचे भाव ४ ते ५ प्रति किलोने वाढले आहेत. काही ठिकाणी भावात २५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. या दरवाढीचे मुख्य कारण म्हणजे नवीन खरीप कांद्याच्या पिकाच्या आगमनास झालेला विलंब आहे. दक्षिण भारतातून खरीप कांद्याच्या आगमनास विलंब होत आहे आणि मान्सूनला झालेल्या विलंबामुळे महाराष्ट्रातील नाशिक भागातील खरीप कांद्याच्या पेरणीवरही परिणाम झाला आहे. तथापि, भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकार आपल्या बफर स्टाकमधून कांद्याची विक्री करत आहे.

पेरण्या ३५ हजार हेक्टरने घटल्या

गेल्या महिन्याभरात तूर, मूग, उडीद आणि हरभरा यांसारख्या कडधान्यांच्या दरात १ ते २ रु पयांनी वाढ झाली आहे. या दरवाढीमागे मान्सून हे कारण असल्याचे मानले जात आहे.

सर्पदंश प्रकरणी अखेर दोन अधिका-यांवर निलंबनाची कारवाई

गडचिरोली/प्रतिनिधी : जपतलाई येथील खाजगी अनुदानित आश्रमशाळेतील सर्पदंशाच्या घटनेत तीन आदिवासी विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्यानंतर अखेर वरिष्ठ अधिका-यांवरही कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. आश्रमशाळेच्या व्यवस्थेवर देखरेखीची जबाबदारी असलेले सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) पी. पी. सादमवार आणि कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी कन्नाके यांना आदिवासी विकास विभागाने सेवेतून निलंबित केले आहे. अपर आयुक्तआयुषी सिंह यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार ही कारवाई केली.जपतलाई आश्रमशाळेत सर्पदंशाच्या घटनेत सुष्मिता मंडल (१४), दीपिका लकडा (१२) आणि अनु कोरेटी (८) या तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला होता. सहा विद्यार्थिनींना सर्पदंश झाला होता. घटनेनंतर चौकशी समितीने आश्रमशाळेतील सुरक्षितता, स्वच्छता, विद्यार्थिनींची निवासव्यवस्था आणि आपत्कालीन उपाययोजनांमधील गंभीर त्रु टी अधोरेखित केल्या होत्या. या प्रकरणात संस्था अध्यक्ष माजी खासदार मारोतराव कोवासे आणि सचिव काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विश्वजीत कोवासे यांच्यासह मुख्याध्यापक प्रशांत विलासराव ताटपल्लीवार, महिला अधीक्षिका भाग्यश्री ज्ञानेश्वार चिल्लमवार आणि अधीक्षक भास्कर रामचंद्र भोयर यांच्याविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या दुर्घटनेची जबाबदारी केवळ शाळा प्रशासनापुरती मर्यादित न ठेवता देखरेख करणा-या अधिका-यांपर्यंत पोहोचली आहे. विभागाच्या आदेशानुसार सादमवार यांनी १० फेब्रुवारी आणि १ एप्रिल २०२६ रोजी आश्रमशाळेची पाहणी केली होती. मात्र, या पाहणीदरम्यान आढळलेल्या गंभीर त्रु टींवर प्रभावी उपाययोजना न करता केवळ औपचारिकता पूर्ण केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

राहुल गांधी विरुद्ध देवेंद्र फडणवीस!

जेन-झीवर भुरळ पाडण्याची राजकीय नेत्यांमध्ये स्पर्धा

नागपूर : देशात सध्या जेन-झीवर भुरळ पाडण्याची राजकीय नेत्यांमध्ये स्पर्धा

लागली आहे. केंद्र सरकारने तर प्रत्येक मंर्त्यांना एक दिवस एक विद्यापीठ हा कार्यक्रम दिला आहे, तर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी छात्रो की गुंज या कार्यक्रमातून तरु णांशी संवाद साधत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही उद्या, रविवारी नागपुरात तरु णांशी संवादाचा कार्यक्रम आहे. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांना भाजपकडून युवकांचे नेते म्हणून प्रोजेक्ट केले जात असल्याची चर्चा रंगली आहे. त्यातच महसूलमंत्री बावनकुळेंच्या वक्तव्याने या चर्चेला आणखी बळ मिळाले आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी नागपुरात प्रसार माध्यमांशी संवाद साधला. नागपुरात होणा-या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जेन-झी संवाद कार्यक्रमाबाबत बावनकुळे म्हणाले, देवेंद्र फडणवीस हे नेहमीच युवकांचे युथ आयकान राहिले आहेत. महाराष्ट्रातील युवकांचा त्यांच्यावर विश्वास असून त्यांच्या भूमिकेशी युवक सहमत आहेत. नागपुरात होणा-या या कार्यक्रमाच्या धर्तीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रभर अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातील.

आयफोनचे हप्ते भरण्यासाठी मागितले पैसे अन् संपूर्ण कुटुंबाचे गेले प्राण

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी- आयफोनचे हप्ते बाउन्स झाल्याने त्यासाठी पैसे पाहिजेत, या मागणीसाठी हट्ट करू न आई- वडिलांना वेठीस धरून आत्महत्या करण्यासाठी युवक तिसगाव शिवारातील खवल्या डोंगरावर गेला. तिथं त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. आई-वडील विनवणी करत होते. त्यात वडिलांनी त्याला अलीकडे ओढण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मुलाने हात मागे घेण्यासाठी तो ओढला. तोल जाउन दोघेही डोंगरावरू न खाली पडले आणि काही सेकंदात त्यांचा मृत्यू झाला. आईनं देखील दहा सेकंदात तिथूनच उडी घेउन आत्महत्या केली. एका आयफोनसाठी तीन जणांचे प्राण गेले. एक संपूर्ण कुटुंब काही सेकंदात संपले. कुणाल छानगुडे (वय १९) असे सदरील मुलाचे नाव असून, मुरलीधर (वय -४८) आणि संगीता छानबुडे (वय - ४२) अशी मृतांची नावं आहेत.

तिसगाव येथील खवल्या डोंगर हा जणू आत्महत्या करण्याचं केंद्र झाला आहे, शुक्रवारी असाच एक प्रकार परिसरात घडला. कुणाल छानगुडे नावाचा युवक घरातून वाद

घालून या डोंगरावर आला. तेथील गावक-यांनी त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला.

आयफोनचा हप्ता बाउन्स झाला- मिळालेल्या माहितीनुसार, त्याचे वडील मुरलीधर हे ट्रक चालक आहेत. दोन दिवसांपूर्वी ते घरी परत आले होते. त्यावेळी कुणाल याने आयफोनचा हप्ता बाउन्स झाला असे म्हणत वाद घातला. वडील चालक असल्याने आर्थिक गणित जुळले नसावे. मात्र, वडील त्याला समजून सांगत असताना कुणाल ऐकत नव्हता. दोघांमध्ये वाद झाला आणि त्यातूनच कुणाल या खवल्या डोंगरावर आत्महत्या करण्यासाठी आला होता, अशी माहिती पोलिसांनी दिली.

सकाळी दहा वाजता तो तिथे आल्यावर ग्रामस्थांनी त्याला समजून सांगायचा प्रयत्न केला. पोलिसांनी तो बाजूला यावा याकरिता प्रयत्न केले. मात्र, वडील तिथे आले आणि त्यांनी त्याला बाजूला ओढण्याचा प्रयत्न केला असता तोल जाउन दोघे खाली पडले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. ही घटना पाहून आई संगीताने देखील डोंगरावरू न उडी घेतली आणि आपले प्राण दिले.

कुणाल हा हुशार विद्यार्थी होता. त्याला दहावीत ९२ टक्के गुण मिळाले होते. तो सध्या नीटची तयारी करत होता. अभ्यासात हुशार असला तरी आजकालच्या झगमगाट असलेल्या जगात त्याची समज कमी पडत होती. घरची परिस्थिती इतकी चांगली नाही. त्याने मागील वर्षी असाच आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी त्याला आयफोन हवा होता म्हणून तो याच खवल्या डोंगरावर आला होता. आत्महत्या करतो असे सांगत त्याने आई-वडिलांना वेठीस धरू न आयफोन मिळवला होता. मात्र, यावेळी त्याच आयफोनचे हप्ते थकल्याने पुन्हा त्याने पैसे मिळवण्यासाठी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. डोंगरावर चढल्यावर त्याने आई-वडिलांना फोन करू न तशी माहिती दिली.

तू मला सोडून जाउ नको : आईची शेवटी हाक-आई-वडील तिथे पोहोचले. त्याच्या आईने भरपूर विनवणी करून त्याला आत्महत्या करू नको, असे सांगितले. इतकेच नाही तर वेळ पडली तर वडिलांना सोडेल मात्र तू मला सोडून जाउ नको अशी विनवणी देखील केली. त्यातच हा सर्व प्रकार घडला, अशी माहिती पोलिस निरीक्षक रामेश्वर पाटील यांनी दिली.

मोठ्या भावाचा देखील झाला मृत्यू

कुणाल छानगुडे हा १९ वर्षीय युवक होता. त्याचे वडील मुरलीधर हे ट्रक चालक तर आई गृहिणी होती. त्याला एक मोठा भाउ देखील होता. मात्र, आजारपणात त्याचेही काही वर्षांपूर्वी निधन झाले होते. त्यामुळे कुटुंबीय प्रचंड तणावात जगत होते. वडील ट्रक चालक असल्याने ते सहसा प्रवासात शहराच्या बाहेरच असायचे. त्यात ते दोन दिवसांपूर्वी घरी आल्यावर पैशासाठी कुणालने हट्ट धरला. त्यांच्यात भांडण झालं आणि त्यातूनच सदरील प्रकार घडला.



लढाः विद्वानांच्या संघटनेच्या लेखणीचा!

**हज़ार बर्क़ बिजलीयां गिरे,
लाख आँधियाँ उट्ठें,
वो फूल खिल के रहेंगे जो
खिलने वाले हैं.
-----साहिर लुधियानवी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ प्राध्यापक संघटनेच्या 'नुटा बुलेटीन' चा स्वर्ण जयंती महोत्सव गेल्या २१जूनला होणार होता.मात्र या बुलेटीनचे आधारस्तंभ , विधान परिषदेचे माजी आमदार, प्रा.बीटी देशमुख यांचे दोन दिवस आधी , १९जूनला शुक्रवारीच देहावसान झाल्याने कार्यक्रम रद्द करण्यात आला होता.आता हा 'नुटा बुलेटीन' स्वर्ण जयंती महोत्सव आणि प्रा बीटी देशमुख स्मृती विशेषांक प्रकाशन समारंभ रविवार दिनांक २३ ऑगस्टला अमरावती विद्यापीठाच्या डॉक्टर केजी देशमुख सभागृहात सकाळी अकरा वाजता होत आहे.

या बुलेटीनचा संघर्षमय रोमहर्षक प्रेरणादायी इतिहास बीटी देशमुखांनी आपल्या मृत्यूच्या आठ दिवस आधी अत्यंत परिश्रमाने स्वहस्ते लिहिला होता. तो बुलेटीनच्या सुवर्ण महोत्सवी विशेषांकात प्रसिद्ध होणार आहे. नुटाचे अध्यक्ष डॉ.प्रवीण रघुवंशी आणि सचिव डॉ. नितीन कोंगरे यांनी कळविले आहे की महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे महासचिव प्रा. अशोक बर्मन ख्यातनाम विधिज्ञ फिरदोस मिर्झा, कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अर्थात 'एम फुक्टो' चे माजी अध्यक्ष प्रा.एस.पी.लवांदे यांच्या अध्यक्षतेखाली हा सुवर्ण महोत्सव होणार होता.मी प्रथम बीटी देशमुख यांच्या स्मृतींना साश्रू नयनांनी विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो.

या महोत्सवाच्या निमित्ताने काही गोष्टींना उजाळा देण्याची संधी मिळत आहे.

आज नव्या पिढीतील प्राध्यापकांना भूतकाळातील प्राध्यापकांच्या स्थितीची कल्पनाही येणार नाही. व्यवस्थापनाच्या 'जी हुजूर' मर्जीत आयुष्य घालवण्याचा, पूर्ण पगाराची अपेक्षा नसलेला, सहा सहा महिने पगार नसलेला ,सेवेची शाश्वती नसलेला तो कालखंड होता. आपल्या आधीच्या पिढीने उपसलेल्या अपार कष्टांमुळे आणि खाल्लेल्या हेलपाट्यांमुळे आपल्याला आज सुगीचे दिवस आलेले आहेत हे या पिढीतील प्राध्यापकांनी कधीही विसरू नये.

सत्तरच्या अर्ध दशकापूर्वी प्राध्यापकांना आपल्या सेवाशर्ती, नोकरीची शाश्वती,सुरक्षा,पूर्ण आणि नियमित वेतन,निवृत्तीवेतन इत्यादीसाठी जो प्रदीर्घ संघर्ष करावा लागला त्याची गाथा अभ्यासल्यास अंगावर काटा उभा राहतो. प्राध्यापकी प्रतिष्ठेचा विषय होता . पण

प्राध्यापकांसारखी वाईट अवस्था कोणाचीच नव्हती.

दौलत सिंह कोठारी आयोगाच्या शिफारशी स्वीकारून १९७५मध्ये महाराष्ट्र शासनाने 'दहा दोन तीन' चा पॅटर्न लागू केला. या पॅटर्नने अनेक प्राध्यापकांचे संसार उध्वस्त केले. मीही त्याचा बळी होतो. पण कठोर संघर्षानंतर मला न्याय मिळाला. प्राध्यापकांचे सुस्थितीतील संपन्न आजचे जे चित्र दिसत आहे त्याचे कारण प्राध्यापकांची नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन अर्थात 'नुटा' ही संघटना आहे.

अर्थात सत्ता संघर्ष हा कोणत्याही संघटनेला जो शाप आहे तो 'नुटा'च्याही नशिबात आहे.

संघटनेची इमारत पक्की मजबूत झाली की इमारतीतील दालनांवर कब्जा करण्यासाठी लढाई सुरू होते तिला 'नुटा'ही अपवाद राहिली नाही . नुटाचेही विभाजन झाले. प्राचार्य एस बी ठाकरे यांच्या नेतृत्वात ग्रामीण महाविद्यालयीन शिक्षक मंच ही संघटना निर्माण झाली. त्यामुळे विद्यापीठ प्राधिकरणांच्या निवडणुकीत 'नुटा' पॅनेलच्या 'मंच' पॅनेल शिवाय 'नुटा' अंतर्गत

विरोध राजकारण सुरू झाले होते. विद्यापीठ प्राधिकरण निवडणुकांच्या काळात हे रंगीत सामने साऱ्या विदर्भभर गाजायचे.

'नुटा'च्या आमसभा सुद्धा गाजवणारे तेव्हाचे काही सभासद , 'नुटा बुलेटीन'च्या संपादक आणि प्रकाशनाची जबाबदारी घेणारेही काही जण आपापल्या वैचारिक भूमिकांमुळे आज दूर गेले असले तरी त्यांनी खाल्लेल्या खस्ता दुर्लक्षित करता येत नाहीत. असहमतीचे आवाज हा लोकशाहीचा जसा आत्मा आहे तसा तो संघटनेचाही आत्मा असतो आणि विशेषत:प्राध्यापकांच्या सेवा शाश्वती आणि वेतन अनिश्चिततेच्या काळात,

तो टिकवून ठेवणे, फार कठीण काम असते.

पुढे प्राचार्य एस बी ठाकरे यांनी आपली संघटना 'नुटा' मध्ये विलीन करून टाकली. प्रसंगी 'नुटा' ला काही प्रसंगी अत्यंत कठोर आणि अप्रिय निर्णय सुद्धा नाईलाजास्तव घ्यावे लागले.

१९९८ च्या विधान परिषदेच्या अमरावती विभाग पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत नुटाचे अधिकृत उमेदवार प्रा. बीटी देशमुख विरोधात भाजपच्या महापौर किरण महल्ले उभ्या होत्या. नुटाचे सक्रिय सभासद, 'काया मातीत मातीत तिफन चालते..', 'सारं कसं सामसूम, तरंग नाही तलावात, वड कलंडती असे कुठे गेले झंजावात' अशा व-हाडी कवितांमुळे महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले कवी प्राचार्य विठ्ठल वाघ यांनी बीटी देशमुख यांच्या विरोधात काम केले होते. प्रकरण इतके तापले होते की नुटाच्या इतिहासात कधी नव्हे ती एकमेव अशी घटना घडली ती म्हणजे प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ यांचे नुटाचे आजीवन सभासदत्वच नुटाने रद्द केले. 'नुटा'ने असे अनेक कटू अनुभव पचवले. वसंतराव खोटरे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अमरावती विभागाचे अध्यक्ष होते. नुटाच्या शंभर टक्के पाठिंब्यामुळे शिक्षक मतदार संघातून ते विधान परिषदेवर आमदार म्हणून निवडून आले होते. त्यांना पाठिंबा देताना 'नुटा बुलेटिन' मध्ये तत्कालीन नुटा सचिव प्रा एकनाथ कंठाळे यांनी 'आम्हाला वसंतराव खोटरे यांचा अभिमान वाटतो आणि पाठिंबा देताना कमालीचा हर्ष होत असल्याचे' निवेदन छापले होते. आश्चर्य म्हणजे पुढे वसंतराव खोटरे यांनी चक्क भाजपात प्रवेश करून बीटी देशमुख यांच्या विरोधात काम केले. भाजपाचे डॉ. रणजीत पाटील यांनी बीटींचा

**न .मा.जोशी
८८०५९४८९५१**

पराभव केला होता. भारतीय संस्कृतीत एक बरे आहे.

: मरणान्तानि वैराणि निवृत्तं नः प्रयोजनम् ही एक प्रसिद्ध महनीय उक्ती आहे.

याचा अर्थ मृत्यू बरोबरच वैर संपते,

मृत्यूनंतर वैर चालू ठेवण्यात काहीही प्रयोजन अर्थ उरत नाही.' आणि याचा अनुभव प्रा. बीटी देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी अमरावतीच्या पंजाबराव देशमुख सभागृहात सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात आला. पदवीधर मतदार संघातील बीटी देशमुख यांच्या पराभवाबद्दल

या श्रद्धांजली सभेत काही वक्त्यांनी हळहळ व्यक्त केली, तर काहीजणांनी बीटींच्या पराभवाला कोण आणि कसे जबाबदार आहेत याचाही उलगडा करून टाकला होता.

नुटा संघटनेच्या कार्याचा लेखाजोखा व प्राध्यापकांच्या प्रश्नांचा बुलंद आवाज सर्वदूर कानावर आदळत राहावा या हेतूने 'नुटा बुलेटीन' दरमहा काढण्याचा निर्णय अखंडपणे अमलात आला त्या रोमहर्षक इतिहासाला आता पन्नास वर्षे झाली आहेत.

एखाद्या संघटनेचे मुखपत्र अव्याहतपणे खंड न पडता सलग पन्नास वर्ष प्रकाशित होते ही निश्चितच त्या संघटनेसाठी आणि समाजासाठी सुद्धा भूषणावह बाब आहे.

प्रा. बीटी देशमुख 'नुटा' चे अध्यक्ष झाल्यानंतरच 'नुटा' संघटना तळपत्या तलवारी सारखी 'युद्धाय कृतनिश्चय:' सिद्ध झाली. त्यातूनच नुटा बुलेटीनचे स्वरूपही दिवसेंदिवस पालटत गेले. बुलेटीनचा हा रोमहर्षक प्रवास कोणत्याही संघटनेसाठी प्रेरणादायी ठरावा असा आहे.

इथे एका गोष्टीची आवर्जून नोंद करावीशी वाटते ती म्हणजे विद्यापीठाच्या ज्या स्टॅच्यूट अर्थात परिनियमन-५३ने अनेक प्राध्यापकांना 'जीवनदान' दिले त्याचा मसुदा तयार करण्यासाठी प्रा बी टी देशमुखांनी अनेक खस्ता खाल्ल्या होत्या.

. डॉ भाऊ मांडवकर, बाबासाहेब घारफळकर, सुधाकरराव नाईक, जस्टिस अभ्यंकर आदींची साथ बीटींना मिळाली. 'स्टॅच्यूट-५३'

एक तरतूद अशी की प्राध्यापकांचा प्रोबेशन कालावधी दोन वर्षांचा केला. दुसरी सर्वात महत्त्वाची तरतूद म्हणजे कोणत्याही कायम (कन्फर्म) प्राध्यापकाला विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या पूर्व परवानगी शिवाय सेवामुक्त करता येणार नाही ही होती.

अनेक प्राध्यापकांचे उध्वस्त होणारे संसार स्टॅच्यूट-५३ मुळे वाचले. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सुद्धा स्टॅच्यूट-५३च्या संदर्भात अनेक विद्वान वकिलांचे युक्तिवाद ऐकून सविस्तर व्याख्या केली आहे .

, 'नुटा बुलेटीन' काढताना अपार मेहनत घ्यावी लागते, त्यातील मजकुराचा प्राध्यापकांनी अभ्यास केला पाहिजे अशी अपेक्षा असते, मात्र पुर्वीइतकी दखल घेतली जात नाही याचे वाईट वाटते.

'नुटा बुलेटीन' ने केवळ प्राध्यापकांसाठीच नव्हे तर विदर्भाच्या विकासात सुद्धा फार मोठे योगदान दिलेले आहे.

'नुटा बुलेटीन' म्हणजे

विद्वानांच्या संघटनेची एक 'संघर्ष गाथा'च आहे. 'नुटा'ची धुरा आता डॉ. प्रवीण रघुवंशी यांच्या खांद्यावर आली आहे.

'नुटा बुलेटीन'च्या सुवर्ण महोत्सवाला शुभेच्छा!

१ व १० वरिल उर्वरित

मोर्शीत तणावः नातेवाईकांचा पोलीस

इसमांनी घटनास्थळावरून पलायन केले. त्यावेळी मात्र अटक केलेल्या आरोपींना मोर्शी पोलिसांनी घटनास्थळावरून पळून गेलेल्या इसमाबद्दल विचारपूस केली असता त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती देण्यास नकार दिल्याचे सांगण्यात येते.दरम्यान जुगार सुरू असतांना डोंगरयावली येथील सुरज अशोकराव चढोकर हा ३३ वर्षीय युवक घटनास्थळावर उपस्थित असतांना पोलिसांची धाड पडताच घाबरून पळून जाऊन दोनशे ते तीनशे मीटर अंतरावर असलेल्या एका शेतातील विहिरीत जाऊन पडल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. शेवटी आज दि.२२ ऑगस्ट रोजी मृतक सुरजचे प्रेत शेतातील विहिरीत तरंगताना आढळून आले. मृतकाचे प्रेत विहिरीतून बाहेर काढून शवविच्छेदनाकरिता उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे हलविण्यात आले. त्यामुळे संपूर्ण डोंगरयावली गावात पोलिसांविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केल्या जात असतांना मृतकाच्या कुटुंबासह गावातील २५० ते ३०० महिलासह नागरिकांनी मोर्शी पोलीस स्टेशनवर मोर्चा नेऊन संबंधित पोलीस पथकावर कार्यवाही व मृतकाच्या कुटुंबांना आर्थिक मदत देण्यात यावी.अन्यथा शवविच्छेदन होऊ देणार नाही व प्रेत सुद्धा उचलणार नाही अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली.यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी उमेश पाटील व प्रभारी ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक वाघमारे यांनी आंदोलनकर्त्यांची भूमिका जाणून घेतली व त्यांना आर्थिक मदत देता येणार नाही.परंतु याप्रकरणी सखोल चौकशी करून दोशी असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर सुद्धा वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले. तरीसुद्धा जोपर्यंत आर्थिक मदत मिळणार नाही तोपर्यंत येथून हलणार नाही अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली. रात्री ६ वाजेपर्यंत कोणत्याही प्रकारचा तोडगा निघाला नसल्यामुळे बातमी लिहीपर्यंत आंदोलनकरते आपल्या भूमिकेवर ठाम राहून पोलीस स्टेशनमध्ये ठिय्या मांडून बसलेले होते.

डिसेंबर अखेर पर्यंत अमरावतीकरांची

प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे. मात्र स्थापत्य संदर्भातील कामे पूर्ण झाली असतांना नवीन पाईप लाईन अंथरविण्याचे काम गतीने होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. या संदर्भात मजीप्रा प्रशासनाने बैठकीमध्ये अवगत केले कि, पाईप लाईन जागेचे हस्तांतरण, राष्ट्रीय महामार्गावर खोदकाम परवानगी, वन विभागाची एनओसी, तसेच महावितरणचे पोल शिफ्टिंग तसेच मनपाचे ले-आऊट अशा स्वरूपाच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या असल्याने प्रकल्पाचे काम प्रभावित होत असल्याची माहिती दिली.

यावर आमदार सुलभा खोडके यांनी सांगितले कि, शासनाने योजना मंजूर केली असून शासन निर्णयानुसार संबंधित विभागांनीही ना हरकत प्रमाणपत्रे व परवानगी बाबत समन्वय निर्माण करणे अपेक्षित आहे. सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली जागा ताब्यात घेण्याबाबत मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या आहेत.

त्यामुळे सदर प्रकल्पाच्या संदर्भातील तांत्रिक अडचणीचे निराकरण करण्यासाठी पाणी पुरवठा विभाग, वन विभाग, नगर विकास, महावितरण, एनएचएआय, एनएचपीडब्लूडी, अशा सर्व यंत्रणांनी समन्वय साधून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाला आवश्यक व वेळोवेळी सहकार्य करण्याची सुचना सुद्धा आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आली. तसेच ज्या ठिकाणी अडचणी उद्भवत असेल, त्या ठिकाणी संयुक्त पाहणी करून पुढील कामास गती देण्याची सूचना सुद्धा करण्यात आली. सिंभोरा येथे विद्युत पुरवठा खंडित होण्याच्या कारणाने पाणी पुरवठ्यात अडचणी उद्भवत असल्याने आता त्या ठिकाणी ३३ केव्ही विद्युत पुरवठा युनिट उभे करण्यात आले आहे.अशी माहिती सुद्धा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रशासनाच्या वतीने बैठकीत देण्यात आली. अमृत -२ योजनेअंतर्गत अमरावती शहरात साकारण्यात येणाऱ्या जलकुंभ व पाणी पुरवठा योजना कामांनाही गती देण्यासंदर्भात बैठकीतून खल देण्यात आला.

बैठकीला विधान परिषद आमदार संजय खोडके यांच्या समवेत मजीप्राचे कार्यकारी अभियंता विवेक सोळंके, उपवन संरक्षक अधिकारी अर्जुना के.आर, मजीप्रा उपविभागीय अभियंता संजय लेवरकर, नॅशनल हाय-वे ऑथॉरिटी ऑफ इंडिया प्रकल्प व्यवस्थापक राकेश जवादे, एनएचपीडब्लूडीचे कथलकर, यश खोडके,महावितरणचे अधीक्षक अभियंता दीपक देवहाते, महापारेषणचे अधीक्षक अभियंता प्रमोद पखाले, सहायक वन संरक्षक ज्ञानेश्वर देसाई, मयूर बैलूमे , मजीप्रा उपअभियंता मनोज वाकेकर, महावितरण शहर विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुधीर वानखडे, आदींसह मजीप्रा व संबधित यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

शिक्षणाधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी

मुख्याध्यापकाकडून खुलासा मागविण्यात आला. त्यावेळी आदेशामध्ये शाळेचे तसेच मुख्याध्यापकाचे नाव चुकीचे नमूद असल्याने देयक मंजुरीला विलंब होऊ नये, यासाठी आपणच त्यात दुरुस्ती केल्याचे त्यांनी सांगितल्याची माहिती तक्रारीत नमूद आहे.

या प्रकाराची गंभीर दखल घेत माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी गाडगेनगर पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी मुख्याध्यापक हारूण शहा बाबा शहा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, बनावट स्वाक्षरी, कागदपत्रातील फेरफार आणि वैद्यकीय देयक मंजुरीच्या प्रयत्नामागील संपूर्ण प्रकाराचा तपास सुरू केला आहे.

मार्डी-राजुरा परिसरात बिबट्या

प्रतीक्षा कायम राहिली.

पहिल्या दिवशी नागरिकांची मोठी गर्दी झाल्याने रेस्क्यू पथकाला तब्बल तीन तास प्रयत्न करूनही बिबट्याला पकडता आले नाही. दुसऱ्या दिवशी वनपाल तथा शूटर अमोल गावनेर यांनी तब्बल सहा तास पिंजऱ्यात बसून बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवले. मात्र, त्या दिवशीही बिबट्या हुलकावणी देऊन निघून गेला. तिसऱ्या दिवशीही पथकाने संयम कायम ठेवत बिबट्याच्या हालचालींवर लक्ष केंद्रित केले. सुमारे तीन तासांच्या प्रतीक्षेनंतर अखेर बिबट्या बकरीच्या दिशेने सरकला. हीच संधी साधत वनपाल अमोल गावनेर यांनी पिंजऱ्यातून ट्रँक्विलायझर गनच्या सहाय्याने अचूक डार्ट मारला. काही वेळातच बिबट्या बेशुद्ध झाला आणि पथकाने त्याला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. तीन दिवसांच्या मोहिमेत अमोल गावनेर यांनी एकूण ११ तास पिंजऱ्यात बसून बिबट्यावर नजर ठेवली.

बिबट्याला पकडण्यात यश आल्याची माहिती मिळताच मार्डी, राजुरा तसेच परिसरातील ग्रामस्थ आणि वाहनचालकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. वनविभागानेही बिबट्याची वैद्यकीय तपासणी व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून त्याला मेलघाटच्या कोअर क्षेत्रात सुरक्षित अधिवासात सोडले. ही मोहीम मुख्य वनसंरक्षक ज्योती बॅनर्जी आणि उपवनसंरक्षक के. आर. अर्जुना यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. सहायक वनसंरक्षक ज्ञानेश्वर देसाई, महेश दंदर, क्षेत्र प्रभारी अधिकारी पूजा धांडे, वनपाल बाबुराव खैरकर, वनपाल तथा शूटर अमोल गावनेर यांच्यासह वनविभागाच्या पथकाने या रेस्क्यू ऑपरेशनमध्ये सहभाग घेतला.

नो-एन्ट्रीचा पेच सोडवण्यासाठी

रोडवरील ट्रान्सपोर्ट नगर, नवसारी, एपीएमसी, रहाटगाव टॉवर लाइन, विलासनगर, मोरबाग आदी भागांचीही त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी अनाज, किराणा, तेल, कृषी साहित्याचे व्यापारी तसेच ट्रान्सपोर्ट व्यावसायिक उपस्थित होते.

व्यापाऱ्यांनी आवश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना दुपारी ४ ते ६ या वेळेतही नो-एन्ट्रीतून सवलत देण्याची मागणी पोलीस आयुक्तांकडे केली. बाजारपेठेतील गर्दी या वेळेत तुलनेने कमी असते. त्यामुळे माल उतरवून वाहने पुढील वाहतुकीसाठी रवाना करता येतील, असा युक्तिवाद व्यापाऱ्यांनी केला. वाहने येण्याच्या वेळेत माल उतरविणे, बाजारपेठेतील वाहतूक आणि व्यवसायावर होणारा परिणाम याबाबतही त्यांनी आपली भूमिका मांडली. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी व्यापारी व ट्रान्सपोर्टरांच्या समस्या केवळ कार्यालयात न ऐकता प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून परिस्थितीचा आढावा घेतला.

दुपारच्या वेळेत बाजारपेठेत असलेली गर्दी, रस्त्यांची स्थिती आणि मालवाहू वाहनांच्या वाहतुकीचा परिणाम त्यांनी जाणून घेतला. सर्वांच्या सूचना आणि अडचणींचा विचार करून नो-एन्ट्रीबाबत योग्य निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी डीसीपी श्याम घुगे, डीसीपी यशवंत सोळंके, एसीपी संजय खताडे, सिटी कोतवाली व गाडगेनगरचे ठाणेदार तसेच विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

नो-एन्ट्रीच्या निर्णयामुळे व्यापारी आणि ट्रक मालकांना भेडसावणाऱ्या अडचणींबाबत आमदार संजय खोडके आणि आमदार सुलभा खोडके यांनीही पोलीस प्रशासनाशी चर्चा केली आहे. ट्रान्सपोर्टर व व्यापाऱ्यांची बैठक घेऊन प्रतिबंधित मार्गांची प्रत्यक्ष पाहणी करण्याची मागणी त्यांनी पोलीस आयुक्तांकडे केली होती. त्यानुसार सीपींनी शुक्रवारी विविध मार्गांची पाहणी केली. सध्या आवश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० या वेळेत नो-एन्ट्रीतून सवलत आहे. कृषी साहित्याची वाहतूक करणाऱ्या वाहनांना सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत सवलत असल्याची माहिती देण्यात आली. मात्र व्यापाऱ्यांनी दुपारी ४ ते ६ या वेळेत आणखी दोन तासांची सवलत देण्याची मागणी केली आहे.

या मार्गांवर कायमस्वरूपी बंदी- दाट वस्ती आणि वाहतुकीची समस्या लक्षात घेता गांधी चौक, अंबापेठ, राजापेठ, रवी नगर, बजरंग टेकडी, विलासनगर, मोरबाग, मसानगंज, पटवा चौक तसेच गर्ल्स हायस्कूल ते इर्विन चौक या मार्गांवर जड वाहनांना कायमस्वरूपी बंदी असल्याची माहिती पोलीस आयुक्तांनी दिली. नो-एन्ट्रीच्या वेळेत बदल करण्याबाबत व्यापारी व ट्रान्सपोर्टरांच्या मागण्यांचा विचार करून लवकरच योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

२१४ ग्रॅम एमडी प्रकरणातील कथित

रोजी गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक दशरथ आडे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), २१(क), २२(क) आणि २९ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तपासाची सुरुवात करताना पोलिसांनी सईद खान वल्द शरीफ खान (४१) याला २३ जुलै रोजी अटक केली. त्यानंतर मिळालेल्या माहितीच्या आधारे मध्यप्रदेशातील खजराणा येथून युनूस मोहम्मद रमजान (४३) याला २८ जुलै रोजी २०.५ ग्रॅम एमडीसह अटक करण्यात आली.

या दोन्ही आरोपींच्या चौकशीतून अमली पदार्थांच्या पुरवठ्याचे धागेदोरे मध्यप्रदेशापर्यंत पोहोचले. तपासादरम्यान तौसिफ मल्काचे नाव समोर आले. त्याच्या हालचालींवर तांत्रिक माहितीच्या आधारे लक्ष ठेवण्यात आले. तौसिफचा माग काढत गुन्हे शाखेचे पथक १९ ऑगस्ट रोजी मंदसौरला रवाना झाले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने आरोपीच्या परिसराची माहिती घेण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी वेषांतर करून त्याच्यावर पाळत ठेवली आणि योग्य संधी साधत २० ऑगस्ट रोजी मुलतानपूरा येथून त्याला ताब्यात घेतले.तौसिफच्या अटकेमुळे अमरावतीत एमडीचा पुरवठा करणाऱ्या साखळीतील महत्त्वाचा दुवा पोलिसांच्या हाती लागला आहे. त्याच्या चौकशीतून एमडीचा स्रोत, पुरवठ्याचे मार्ग आणि या रॅकेटमध्ये सहभागी अन्य व्यक्तींची माहिती पुढे येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपआयुक्त प्रांजली सोनावणे आणि सहायक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्हे शाखेचे वरिष्ठ अधिकारी व अंमलदार तसेच सायबर पोलिसांनी कारवाईत सहभाग आहे.

विधीसंघर्षित बालकाकडून

सुरू असताना परतवाडा पोलिसांच्या डीबी पथकाला या चोरीमागे एका विधीसंघर्षित बालकाचा सहभाग असल्याची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलिसांनी त्याला त्याच्या घरी पालकांच्या उपस्थितीत ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने मंदिराच्या दानपेटीतून पाच हजार रुपये, पोटे यांच्या घरासमोरून एक दुचाकी तसेच यापूर्वी आणखी एक दुचाकी चोरल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

त्यानंतर पोलिसांनी त्याच्या ताब्यातून दोन्ही दुचाकी आणि मंदिरातील चोरीची रोकड जप्त केली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी माधवराव गरुड आणि ठाणेदार अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने केली. पुढील तपास पोलीस हवालदार सुधीर राऊत करीत आहेत.

बसप्रवासात महिलेच्या पर्समधून

ग्रॅम वजनाची सोन्याची चैन (४८ हजार), दोन ग्रॅम सोन्याचे कानातले (१४ हजार), चार ग्रॅम वजनाची १०० मण्यांची पोथ (८ हजार) आणि ३ हजार ५०० रुपये रोख असा मुद्देमाल चोरीला गेला. याप्रकरणी दर्यापूर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

शेतातील विहिरींवरील

निलेश भोजणे यांच्या विहिरीवरील अनुक्रमे ७०, ६० आणि ६० फूट केबलही चोरीला गेली. या सर्व केबलची एकूण किंमत सुमारे १५ हजार रुपये आहे. ही चोरी ७ ऑगस्टच्या सायंकाळपासून १५ ऑगस्टच्या सकाळदरम्यान झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. पोलिसांनी गुन्हा बीएनएस कलम ३०३(२), ३(५) नुसार गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

महर्षी पब्लिक स्कूलची मान्यता

याच दरम्यान चिखलदरा तालुक्यातील कारंजखेडा येथील इयत्ता १२ वीचा विद्यार्थी राजेश बेठेकर याची प्रकृती गंभीर झाली आणि नंतर त्याचा मृत्यू झाला. तर इतर पाच विद्यार्थ्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात आले. या घटनेनंतर पालक, आदिवासी संघटना आणि विविध राजकीय पक्षांनी आक्रोश व्यक्त केला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अपर आयुक्त संदीप गोलाईत यांनी स्वतः शाळेला भेट देऊन पाहणी केली.

तपासणीत छत्रावास, भोजन व्यवस्था, आरोग्य सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या देखभालीशी संबंधित अनेक गंभीर अनियमितता समोर आल्या आहेत. प्रशासनाने शाळा व्यवस्थापनाला 'कारणे दाखवा' नोटीस बजावून उत्तर मागवले आहे. अपर आयुक्तांनी तयार केलेला सविस्तर चौकशी अहवाल आदिवासी विकास आयुक्त कार्यालयाला पाठवण्यात आला आहे. विभागीय सूत्रांच्या माहितीनुसार अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर शाळा संचालक आणि व्यवस्थापना विरोधात गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो.

आदिवासी संघटनांचे आंदोलन-

दुसरीकडे, विविध आदिवासी संघटनांनीही महर्षी पब्लिक स्कूलची मान्यता तात्काळ रद्द करावी आणि विद्यार्थी राजेश बेठेकरच्या मृत्यूसाठी जबाबदार व्यवस्थापनावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे. राजेश बेठेकरचे वडील बाबू साबूलाल बेठेकर यांनी गाडगेनगर पोलीस ठाण्यात जाऊन महर्षी पब्लिक स्कूलचे संचालक मंडळ आणि आदिवासी प्रकल्प अधिकारी कार्यालया विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचे निवेदन दिले आहे.

'मयूर' नमकीनमध्ये निघाले

दिसून आले. त्यानंतर संपूर्ण पाकीट तपासल्यावर त्यात अनेक जिवंत किडे रेंगाळत असल्याचे दिसले. त्यामुळे कुटुंबातील सदस्य हादरून गेले.राजगुरु शिंदे यांनी दावा केला आहे की, त्यांनी या संपूर्ण प्रकरणाचे फोटो आणि व्हिडिओ पुरावे देखील सुरक्षित ठेवले आहेत. ते एफडीए अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देणार आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, हा केवळ एका पाकीटाचा प्रश्न नसून ग्राहकांच्या आरोग्याशी निगडित गंभीर विषय आहे.

राजगुरु शिंदे यांनी आरोप केला की, संबंधित दुकानावर या पूर्वी ही एक्सपायरी खाद्यपदार्थ विकल्याच्या तक्रारी आल्या होत्या आणि त्यावर कारवाईही झाली होती. असे असून ही जर खराब आणि असुरक्षित खाद्य पदार्थ उघडपणे विकले जात असतील, तर प्रशासकीय यंत्रणेच्या देखरेखी वरच प्रश्नचिन्ह उभे राहते, असे ते म्हणाले.

तक्रारदार राजगुरु शिंदे यांच्या म्हणण्यानुसार, दुकानदाराने खरेदीचे कोणतेही बिल दिले नाही. पैसेही डिजिटल पद्धतीने न घेता रोखीने घेतले, त्यामुळे त्यांच्याकडे व्यवहाराचा कोणताही कागदोपत्री पुरावा नाही.

मात्र त्यांनी एफडीएकडे मागणी केली आहे की, ८ जून रोजी संध्याकाळी ६ ते ९ च्या दरम्यानचे सीसीटीव्ही फुटेज तपासून खरेदीची खात्री करावी.शिंदे यांनी एफडीएकडे संबंधित दुकान आणि उत्पादनाचा नमुना तातडीने जप्त करून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्याची मागणी केली आहे. तसेच दोषी आढळल्यास दुकानाविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करून गरज भासल्यास ते सील करावे, अशी मागणीही केली आहे.

या प्रकरणावरून तक्रारदाराने एफडीएला ७ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. त्यांनी इशारा दिला आहे की, जर निश्चित मुदतीत दोषींवर ठोस कारवाई झाली नाही, तर ते जिल्हा एफडीए कार्यालया समोर तीव्र आंदोलन करतील. या घटनेमुळे पुन्हा एकदा खाद्यपदार्थांच्या दर्जाबत आणि बाजारातील पॅकिंग मालाच्या तपासणी यंत्रणेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहेत. आता एफडीए या ग्राहकांच्या आरोग्याशी निगडित प्रकरणात किती तत्परता आणि कडकपणा दाखवते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ऑपरेशन कवच अंतर्गत विविध

देऊन विद्यार्थ्यांना अमली पदार्थामुळे होणारे दुष्परिणाम याबद्दल मार्गदर्शन केले. या स्पर्धेला शाळा, महाविद्यालयाकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.विद्यार्थी वर्ग या स्पर्धेत उत्साहाने सहभागी होत आहेत.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, २३ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

घरफोडी व दुकानफोडी प्रकरणाचा मालेगाव पोलिसांकडून छडा; १२ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव तालुक्यातील पांगरी कुटे बसस्थानक परिसरात झालेल्या घरफोडी व दुकानफोडी प्रकरणाचा मालेगाव पोलिसांनी छडा लावला असून या प्रकरणात दोन संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली इनोव्हा कार तसेच चोरी करण्यासाठी लागणारे साहित्य आणि इतर मुद्देमाल असा एकूण १२ लाख २० हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे

दि २१ ऑगस्ट २०२६ रोजी पांगरी कुटे येथील महाराज मोटर वॉशिंग सेंटरचे मालक हरिभाऊ कुटे वय ४६ यांच्या दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने दुकानातील सुमारे ३५८ रुपयांचा माल चोरून नेला होता

या प्रकरणी मालेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजि नं ५३१ २०२६ कलम ३०५ ३ व ३३१ ४ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याच्या तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे गतिमान केली तपासात रामनारायण डिगंबर चव्हाण रा खापरखेडा ता लोणार जि बुलढाणा तसेच हमीद खान शेख वय ४२ रा सावळी गली डोणगाव बु जि बुलढाणा यांचा सहभाग निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली इनोव्हा कार सीसीटीव्ही कॅमेरे डीव्हीआर चोरी करण्यासाठी लागणारे साहित्य हॉटेल व्यवसायातील भांडी कॉपर वायर खुरप्या मोटर पंप बॅटरी आदी मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे जप्त मुद्देमालाची एकूण किंमत १२ लाख २० हजार ७७० रुपये असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे , श्रीमती लता फड अपर पोलीस अधीक्षक वाशिम रामकृष्ण पवार उपविभागीय पोलीस अधिकारी सा वाशिम यांच्या मार्गदर्शनाखाली मालेगाव पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

तपास पथकात पोलीस निरीक्षक राजेश खेरडे , सुनील पवार ,शिवाजी काळे ,जयशंकर पाटील ,पोलीस कॉन्स्टेबल अमोल पवार वैभव झरकर गणेश मेटांगळे योगेश इंगळे यांचा सहभाग होता.

ग्रामीण रुग्णालयात सुविधा होती, मग उपजिल्हा रुग्णालयात सोनोग्राफीची सुविधा का नाही?

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा येथील ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा वाढवून त्याचे उपजिल्हा रुग्णालयात रूपांतर झाले; मात्र दर्जा वाढल्यानंतर रुग्णांना मिळणाऱ्या सुविधांमध्ये वाढ होण्याऐवजी सोनोग्राफीसारखी अत्यावश्यक सुविधा रात्रीच्या वेळी उपलब्ध नसल्याने रुग्णांची मोठी गैरसोय होत असल्याचे समोर आले आहे. विशेषतः गर्भवती महिलांना रात्रीच्या वेळी सोनोग्राफीची गरज भासल्यास त्यांना इतरत्र जाण्याची वेळ येत असल्याने रुग्ण कल्याण समितीचे सदस्य संतोष धोंगडे व श्याम सवाई यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

रात्री गर्भवती महिलांची होतेय मोठी गैरसोय रुग्ण कल्याण समिती सदस्यांची थेट पाहणी

'ग्रामीण रुग्णालय असताना सोनोग्राफीची सुविधा होती, मग उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळाल्यानंतर ही सुविधा कमी का झाली?' असा थेट सवाल रुग्ण कल्याण समितीच्या सदस्यांनी उपस्थित केला आहे.

ग्रामीण भागातून आशा सेविकेसोबत १५ ते २० किलोमीटर अंतरावरून गर्भवती महिला रात्रीच्या वेळी उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात येतात. अशा वेळी डॉक्टरांनी सोनोग्राफीची आवश्यकता सांगितल्यास रुग्णालयातच सुविधा उपलब्ध नसल्याने संबंधित महिलेला पुन्हा दुसऱ्या ठिकाणी जाण्याची वेळ येते. गर्भवती महिलेच्या आरोग्याशी संबंधित अशा संवेदनशील परिस्थितीत ही गैरसोय अत्यंत गंभीर असल्याचे समिती सदस्यांनी सांगितले.

रात्री साडेदहा वाजता समिती सदस्यांची रुग्णालयात धडक

रुग्णांकडून सोनोग्राफी सुविधेबाबत तक्रारी मिळाल्यानंतर रुग्ण कल्याण समितीचे सदस्य संतोष धोंगडे व श्याम सवाई यांनी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास उपजिल्हा रुग्णालयाला प्रत्यक्ष भेट देत परिस्थितीची पाहणी केली. यावेळी रात्रीच्या वेळेस रुग्णालयात सोनोग्राफीची सुविधा उपलब्ध नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

दिवसाच्या वेळेत सोनोग्राफी सेवा देण्यासाठी एका खासगी रुग्णालयाला कंत्राट देण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. मात्र, रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांना गरज वेळ पाहून भासत नाही. त्यामुळे दिवसापुरती सुविधा देण्याऐवजी आपत्कालीन परिस्थितीत रात्रीही सोनोग्राफी उपलब्ध होणे आवश्यक असल्याचा मुद्दा समिती सदस्यांनी उपस्थित केला.

ध्यानातून ऊर्जावान, संतुलित आणि निरोगी जीवनाची वाटचाल - ब्रह्मर्षी प्रेमनाथ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

ध्यान, शाकाहार, स्वाध्याय आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटी मूव्हमेंटच्या वतीने वाशिम शहरात 'ध्यानमय वाशिम' हा संकल्प राबविण्यात येत आहे. या संकल्पांतर्गत शहरवासीयांसाठी पाटणी कमर्शियल कॉम्प्लेक्स येथे निःशुल्क ध्यान केंद्र सुरू करण्यात आले असून, या केंद्राचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात ब्रह्मर्षी प्रेमनाथ सर आणि विवेक पाटणी यांच्या हस्ते करण्यात आले.

पाटणी कमर्शियल कॉम्प्लेक्समध्ये रुपेश लढ्ढा यांच्या कार्यालयाच्या वरील मजल्यावर हे ध्यान केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रासाठी स्व. आमदार राजेंद्र पाटणी परिवाराने निःशुल्क जागा उपलब्ध करून दिली. त्यांच्या या सहकार्याबद्दल उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमास पतंजली योग समितीचे श्री. भगवान मामा वानखेडे, श्री. शंकरजी उगले यांच्यासह 'ध्यानमय वाशिम' परिवारातील अनेक सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक दीपप्रज्वलनाऐवजी झाडाला पाणी घालून करण्यात आली. पर्यावरण संवर्धनासोबतच सकारात्मकता आणि नवचैतन्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी ब्रह्मर्षी प्रेमनाथ सर यांनी ध्यान व स्वाध्यायाचे महत्त्व स्पष्ट केले. ध्यानाशी जोडले गेल्याने अंतर्गत ऊर्जेला योग्य दिशा मिळते. नियमित ध्यानामुळे शारीरिक, मानसिक आणि भावनिक संतुलन साधण्यास मदत होते. त्यामुळे निरोगी, आनंदी आणि सकारात्मक जीवनाकडे वाटचाल करता येते, असे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी २३ ते २७ ऑक्टोबरदरम्यान ऋषिकेश येथे आयोजित करण्यात येणाऱ्या महायोग ध्यानकुंभाची माहितीही दिली. दरवर्षी कोजागिरी पौर्णिमेच्या पर्वावर होणाऱ्या या ध्यानमहासंगमात देशभरातील साधक सहभागी होत असतात. सामूहिक ध्यान, स्वाध्याय आणि आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेण्यासाठी साधक सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली.

स्वत:च्या अभ्यासातून गणेश वाघ यांची एमपीएससीत भरारी; महाराष्ट्रात २९ वी रँक

वाशीम : आडगाव हजारे येथील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील गणेश भाऊराव वाघ यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत महाराष्ट्रातून २९ वी रँक मिळवत श्रेणी-१च्या पदाला गवसणी घातली. विशेष म्हणजे कोणतेही महागडे क्लासेस किंवा खासगी शिकवणी न लावता वाशीम येथे राहून सेल्फ स्टडीच्या माध्यमातून त्यांनी हे यश संपादन केले.

गणेश वाघ यांचे आठवीपर्यंतचे शिक्षण आडगाव येथील जिल्हा परिषद शाळेत, तर बारावीपर्यंतचे शिक्षण स्वामी विवेकानंद विद्यालय, कोकलगाव येथे झाले. त्यानंतर त्यांनी सरस्वती समाजकार्य महाविद्यालयातून समाजकार्य विषयात पदवी घेतली. पदवीच्या काळातच त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. ग्रामीण भागातील अनेक अडचणींवर मात करत त्यांनी अभ्यासाची सातत्यपूर्ण वाटचाल सुरू ठेवली. नोकरी मिळाल्यानंतरही श्रेणी-१चे पद मिळविण्याचे स्वप्न त्यांनी सोडले नाही. नोकरीसोबत अभ्यास सुरू ठेवत मे २०२६ मध्ये एमपीएससी मुख्य परीक्षा दिली. १४ ऑगस्ट रोजी जाहीर झालेल्या निकालात त्यांनी महाराष्ट्रातून २९ वी रँक मिळवली. त्यांची दुय्यम निबंधक/मुद्रांक निरीक्षक (श्रेणी-१) तसेच राज्यकर निरीक्षक या पदांसाठी पात्रता झाली आहे.

या यशाचे श्रेय गणेश वाघ यांनी आई-वडील, शिक्षक, मार्गदर्शक व मित्रपरिवाराला दिले. ग्रामीण भागातून, कोणत्याही महागड्या क्लासेसशिवाय केवळ जिद्द, चिकाटी आणि स्वअभ्यासाच्या जोरावर मिळविलेल्या या यशाबद्दल गणेश वाघ यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

नांदूरकर परिवारावरील हल्ल्याच्या निषेधार्थ पोलिसांना निवेदन

आरोपींना अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

मोखड पिंप्री येथील दत्ताराम नांदूरकर परिवारावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य परीट धोबी समाज मंडळ, शाखा कारंजा (लाड) यांच्या वतीने कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले. हल्ल्यातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदनानुसार, मोखड पिंप्री येथे दत्ताराम नांदूरकर यांच्या परिवारावर गावातीलच संबंधित व्यक्तींनी गंभीर स्वरूपाचा हल्ला केल्याची घटना घडली. या घटनेमुळे नांदूरकर परिवारामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, समाजाच्या दृष्टीनेही ही घटना अत्यंत गंभीर व चिंताजनक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणातील आरोपी मोकाट राहिल्यास पीडित परिवारावर पुन्हा दबाव, धमकी किंवा हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कोणत्याही राजकीय, सामाजिक अथवा इतर दबावाला बळी न पडता प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी समाज मंडळाच्या वतीने करण्यात आली. निवेदनात दत्ताराम नांदूरकर परिवारावर हल्ला करणाऱ्या सर्व आरोपींना तात्काळ अटक करावी, घटनेची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच पीडित कुटुंबावर कोणत्याही प्रकारचा दबाव किंवा धमकी येणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. दरम्यान,

ग्रामीण पोलिस निरीक्षकांचे आश्वासन

निवेदन स्वीकारताना कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी समाज बांधवांना आश्वस्त केले की, या प्रकरणात जो कोणी दोषी अथवा गुन्हेगार आढळून येईल, त्याच्यावर कायद्यानुसार नक्कीच कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल. प्रकरणाची चौकशी निष्पक्षपणे करण्यात येईल.

'वंदे मातरम्'च्या कथित अवमानाविरोधात भाजयुमोचा एल्गार

तहसीलदारांना निवेदन देत कारंज्यात जाहीर निषेध

■ प्रतिनिधी | कारंजा ■

दिल्ली येथील काँग्रेस मुख्यालयात दि. १५ ऑगस्ट रोजी झालेल्या स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमादरम्यान 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताचा कथित अवमान झाल्याच्या घटनेविरोधात भारतीय जनता युवा मोर्चाने आक्रमक भूमिका घेत कारंज्यात जाहीर निषेध नोंदविला. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.

भारतीय जनता युवा मोर्चा कारंजा शहर, कारंजा ग्रामीण मंडळ आणि कामरगाव मंडळाच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट रोजी कारंजा तहसील कार्यालयात हे निवेदन सादर करण्यात आले. 'वंदे मातरम्'च्या सन्मानासाठी भाजयुमोचा आवाज बुलंद, करत कार्यकर्त्यांनी कथित अवमानाच्या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला.

'वंदे मातरम' हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात कोट्यवधी भारतीयांच्या मनात राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित करणारे ऐतिहासिक राष्ट्रीय गीत आहे. त्यामुळे देशाच्या अस्मितेशी आणि राष्ट्रभावनेशी निगडित असलेल्या या गीताचा कोणत्याही प्रकारे अवमान होणे ही गंभीर बाब आहे. राष्ट्रीय प्रतीकांचा सन्मान राखणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी असून, कथित घटनेची योग्य ती दखल घेऊन सत्य परिस्थिती समोर आणावी व दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

या निषेध कार्यक्रमास युवा नेते कौस्तुभ डहाके यांच्या प्रमुख उपस्थितीसह कारंजा नगरपरिषदेच्या भाजपा गटनेत्या, नगरसेवक-नगरसेविका, भारतीय जनता पार्टी कारंजा शहर, कारंजा ग्रामीण व कामरगाव मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच भारतीय जनता युवा मोर्चाच्या तिन्ही मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी 'वंदे मातरम्'चा सन्मान अबाधित राहिलाच पाहिजे, अशी ठाम भूमिका मांडत कथित अवमानाच्या घटनेचा निषेध केला. तहसीलदारांना निवेदन देऊन या प्रकरणाची गांभीर्याने चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणण्याची मागणी करण्यात आली. या निषेधामुळे कारंज्यात राष्ट्राभिमान आणि देशभक्तीचा आवाज बुलंद झाला. 'वंदे मातरम'च्या सन्मानाच्या मुद्द्यावर भाजयुमोने एकजूट दाखवत राष्ट्रीय भावना आणि राष्ट्रप्रतीकांच्या सन्मानासाठी भूमिका ठामपणे स्पष्ट केली.

कोंडेश्वर संस्थान येथे बेलवृक्षाचे वृक्षारोपण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

श्रावण मासानिमित्त लाखाळा परिसरातील प्राचीन व प्रसिद्ध असलेल्या कोंडेश्वर संस्थान परिसरात राष्ट्रीय हरित सेना व निसर्ग इको क्लब आणि सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने बेल वृक्षांचे रोपण करण्यात आले. अलीकडच्या काळात बेलवृक्ष विस्मृतीत जाऊ लागला आहे सोबतच श्रावण महिन्यात बिलांच्या पानांची आणि वृक्षांची होणारी तोड व ऱ्हास थांबविण्याचा दृष्टिकोनातून जनजागृती व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. सदर उपक्रम प्राचार्य मीना उबगडे, राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा

मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय विभागीय वन अधिकारी अशोक पऱ्हाड, सहायक वनसंरक्षक पदमाकर मोगरे ,वनपरिक्षेत्र अधिकारी अंशुल शिर्के यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आला. यावेळी राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांनी बेलवृक्षांच्या लागवडीचा व संवर्धनाचा संदेश दिला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक वनीकरणपरिक्षेत्र विभाग वाशीमचे वनपाल बेले ,रवी कामडी,हरणे तसेच वनरक्षक बी एस वानखडे ,संतोष जुमडे आणि मनश्री खंडेलवाल आदींनी सहकार्य केले.

अपघाती मृत्युमुखी पडलेल्या तरुणांच्या स्मृति पित्यर्थ रक्तदान

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

चार वर्षांपूर्वी रस्ता अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तीन तरुणांच्या स्मृती जपण्यासाठी संत सेवालाल महाराज युवा प्रतिष्ठान मंगरूळपीर यांच्या वतीने सेवालाल महाराज मंदिरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात २२ दात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले.

२० ऑगस्ट २०२२ रोजी रायगड जिल्ह्यातील ताम्हिणी घाटात झालेल्या भीषण अपघातात शहरातील कृष्णा पंडित राठोड, कृषभ किशोर चव्हाण आणि रिसोड शहरातील सौरभ भिंगे या तीन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. तर याच अपघातात तीन तरुण सुदैवाने बचावले होते.

स्मृती जपण्यासाठी दरवर्षी आरोग्य शिबि

मृत्युमुखी पडलेल्या तरुणांच्या नातेवाईक व मित्रपरिवाराच्या वतीने दरवर्षी त्यांच्या स्मरणार्थ आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते. यावर्षी रक्तदान शिबिर घेऊन इतरांना जीवनदान देण्याचा संकल्प करण्यात आला.

शिबिराच्या माध्यमातून आयोजकांनी नागरिकांना वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचा संदेश दिला. वेगावर नियंत्रण ठेवा, हेल्मेट व सीट बेल्टचा वापर करा, मद्यपान करून वाहन चालवू नका, अशा सूचना देऊन रस्ता अपघात टाळण्याचे आवाहन करण्यात आले.

चिमुकलीच्या वेदना पाहून नगरसेवकाचा जीव हेलावला

मोकाट कुत्र्याच्या भीतीने दोन वर्षांच्या चिमुकलीचा हात फ्रॅक्चर

■ प्रतिनिधी | अकोला ■

एका बाजूला दोन वर्षांची चिमुकली... हाताला फ्रॅक्चर... दुसऱ्या बाजूला ऑटोरिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या वडिलांची आर्थिक विवंचना... आणि उपचाराच्या खर्चाचे वाढते ओझे. या परिस्थितीत मदतीची अपेक्षा कुणाकडून करावी, हा प्रश्न त्या कुटुंबासमोर उभा होता. अशा वेळी लोकप्रतिनिधी म्हणून नव्हे, तर माणूस म्हणून वंचितचे नगरसेवक सुनील इन्नाणी या कुटुंबाच्या मदतीला धावून गेले.

खदान परिसरातील अलीम चौक, हैदरपुरा भागातील नावेदभाई यांच्या अवघ्या दोन वर्षांच्या चिमुकलीवर मोकाट कुत्रा धावून आला. कुत्र्याच्या भीतीने घाबरलेली चिमुकली खाली पडली आणि तिच्या उजव्या हाताला गंभीर दुखापत होऊन तो फ्रॅक्चर झाला. घटनेला सात दिवस उलटून गेले होते. मात्र, अत्यल्प उत्पन्न असलेल्या या कुटुंबासाठी चिमुकलीच्या उपचारांचा खर्च मोठे संकट बनला होता. नावेदभाई ऑटोरिक्षा चालवून कुटुंबाचा गाडा हाकतात. भाड्याच्या घरात राहणाऱ्या या कुटुंबाकडे उत्पन्नाचा दुसरा कोणताही मोठा स्त्रोत नाही. त्यामुळे चिमुकलीच्या वेदना पाहताना असहाय्यतेची

सात दिवसांपासून विवंचनेत असलेल्या कुटुंबाला सुनील इन्नाणी चा मदतीचा हात

भावना त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती.

ही बाब वंचित चे नगरसेवक सुनील इन्नाणी यांना समजताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता कुटुंबाची भेट घेतली. चिमुकलीची अवस्था पाहताच त्यांचेही मन हेलावून गेले. 'या वयात या लेकराच्या हाताला प्लास्टर पाहणेच मनाला चटका लावणारे आहे; त्यात आई-वडिलांची आर्थिक परिस्थिती पाहून आपण काहीतरी केले पाहिजे,' या भावनेतून त्यांनी कुटुंबाला आपल्या परीने आर्थिक मदत केली. या भेटीत कुटुंबीयांनी केवळ आपली आर्थिक अडचणच सांगितली नाही, तर परिसरातील मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रवही त्यांच्या निदर्शनास आणून दिला. रात्री-अपरात्री नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असून, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी सुनिल इन्नाणी यांनी कुटुंबाला धीर देत 'तुम्ही एकटे नाहीत. तुमची अडचण माझीही अडचण आहे,' अशी भावना व्यक्त केली. मोकाट कुत्र्यांचा प्रश्न संपूर्ण अकोला शहराच्या सुरक्षेशी निगडित असून, हा मुद्दा महापालिका प्रशासनासमोर ठामपणे मांडून तातडीने उपाययोजना करण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

'नगरसेवक' पदापेक्षा माणुसकी मोठी

लोकप्रतिनिधी हा केवळ सभागृहात प्रश्न मांडणारा नसतो, तर सामान्य माणसाच्या सुख-दुःखात त्याच्या दारापर्यंत पोहोचणारा असतो, अशी भावना या भेटीतून दिसून आली. चिमुकलीच्या वेदना पाहून मदतीचा हात पुढे करणाऱ्या सुनील इन्नाणी यांच्या या कृतीतून 'सामान्यांचा नगरसेवक, हीच माझी ओळख' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून अधोरेखित झाला. दरम्यान, एका चिमुकलीला मोकाट कुत्र्यामुळे झालेली ही दुखापत ही केवळ एका कुटुंबाची वेदना नसून शहरातील मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज अधोरेखित करणारी घटना ठरली आहे. आता तरी महापालिका प्रशासन जागे होऊन ठोस उपाययोजना करणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २६६ ■ रविवार, २३ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

श्रेयलाटपाचा राजकीय खेळ पुलगावच्या रेल्वे ओव्हरब्रिजवर आमदारांचा दावा कितपत खरा

९० कोटींच्या मंजुरीचे श्रेय घेण्यासाठी धडपड, खा.अमर काळेंच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष

वर्धा जनमाध्यम : पुलगावच्या रेल्वे गेट क्रमांक ८० येथील रेल्वे ओव्हरब्रिज आणि अंडरपाससाठी सुमारे ९० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याच्या वृत्ताने पुलगावकरांना नर्शिचतच दिलासा मिळाला आहे. मात्र, या निधी मंजुरीचे श्रेय घेण्यासाठी सुरू झालेल्या राजकीय श्रेयवादाने आता वेगळेच वळण घेतले आहे. रेल्वेचा विषय हा केंद्र सरकारच्या अखत्यारित येत असताना आणि या प्रश्नासाठी खासदार अमर काळे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला असताना आमदार राजेश बकाने यांनी या मंजुरीचे श्रेय स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप होत आहे.

रेल्वे गेट क्रमांक ८० हा पुलगावच्या दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. गेट बंद झाल्यापासून नागरिक, विद्यार्थी, व्यापारी, कामगार तसेच वाहनधारकांना मोठा वळसा घालून जावे लागत आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी पुलगावचे नगराध्यक्ष तसेच स्थानिक नागरिकांनी वारंवार रेल्वे प्रशासनाकडे निवेदने देत रेल्वे व्यवस्थापकांकडे मागणी रेटली. मात्र, आता या सामूहिक प्रयत्नांवर पाणी फेरत केवळ आपल्या पाठपुराव्यामुळे निधी मिळाल्याचा दावा केला जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे रेल्वे विभाग केंद्र सरकारच्या अखत्यारित येतो. त्यामुळे केंद्रीय रेल्वे प्रकल्पांसाठी स्थानिक खासदारांचा पाठपुरावा महत्त्वाचा ठरतो. खासदार अमर काळे यांनी पुलगावच्या रेल्वे गेट क्रमांक ८० चा प्रश्न गांभीर्याने घेत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. विविध स्तरांवर निवेदने देत या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी सातत्याने लावून धरली. त्याच पाठपुराव्याला आता यश मिळाल्याचे स्थानिक पातळीवर बोलले जात आहे.

नागरिकांच्या लढ्याला श्रेय कुणाचे

गेल्या अनेक वर्षांपासून पुलगावकर या रेल्वे गेटच्या समस्येशी झुंज देत आहेत. नगराध्यक्ष आणि नागरिकांनी रेल्वे प्रशासनाकडे वारंवार धाव घेतली. खासदारांनी केंद्राच्या पातळीवर पाठपुरावा केला. अनेक वर्षांच्या या सामूहिक प्रयत्नांनंतर निधी मंजूर झाला असताना अचानक एका लोकप्रतिनिधीने संपूर्ण प्रकल्पाचे श्रेय स्वतःच्या नावावर घेणे कितपत योग्य, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

९० कोटींचा निधी स्वागतार्ह; पण श्रेयवाद नको- ओव्हरब्रिज आणि अंडरपाससाठी मंजूर झालेला निधी हा पुलगावकरांसाठी निश्चितच महत्त्वाचा निर्णय आहे. मात्र, विकासकामांचे श्रेय घेण्यापेक्षा ते प्रत्यक्षात वेळेत पूर्ण होणे महत्त्वाचे आहे. गेल्या १५ वर्षांपासून रखडलेल्या या कामाला आता तरी गती मिळावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत. पुलगावकरांचा प्रश्न कोणाच्या श्रेयामुळे सुटला यापेक्षा तो कायमस्वरूपी सुटणे महत्त्वाचे आहे. मात्र, जनतेच्या मागणीसाठी ज्यांनी प्रत्यक्ष निवेदने दिली, रेल्वे अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला आणि केंद्र सरकारच्या पातळीवर प्रश्न मांडला, त्यांच्या प्रयत्नांना डावलून राजकीय श्रेय लाटण्याचा प्रयत्न होत असेल तर त्यावर नागरिकांनीच प्रश्न उपस्थित करणे स्वाभाविक आहे.

रेल्वेचा प्रकल्प केंद्राचा, लढा जनतेचा; मग श्रेय एकट्याचे कसे? हा प्रश्न आता पुलगावच्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

भाविकांच्या ट्रॅव्हलरची टिप्परला धडक; रमणा फाट्यावर १२ जखमी

सेलू पोलिसांसह रेस्क्यू टीमचे शर्थीचे मदतकार्य

सेलू जनमाध्यम : माहूर येथे दर्शनासाठी गुजरातमधून निघालेल्या भाविकांच्या ट्रॅव्हलरचा सेलूजवळील रमणा फाट्याजवळ शनिवारी दुपारी भीषण अपघात झाला. ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात ट्रॅव्हलरची टिप्परला जोरदार धडक बसल्याने ट्रॅव्हलरमधील सुमारे १२ भाविक जखमी झाले. अपघातामुळे घटनास्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. माहिती मिळताच सेलू पोलीस, महामार्ग पोलीस, रेस्क्यू टीम आणि स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तातडीने बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले.

गुजरात येथील भाविकांचा समूह माहूर येथे दर्शनासाठी निघाला होता. या समूहामध्ये एकूण २४ भाविक आणि दोन लहान मुलांचा समावेश असल्याची माहिती आहे. डीडी ०३ डब्ल्यू ९६६६ क्रमांकाच्या ट्रॅव्हलरमधून हे भाविक १७ ऑगस्ट रोजी गुजरातमधून रवाना झाले होते. शनिवारी दुपारी सुमारे २.१५ वाजण्याच्या सुमारास त्यांचे वाहन नागपूरमार्गे माहूरच्या दिशेने जात होते.

सेलूजवळील रमणा फाट्याच्या परिसरात ट्रॅव्हलरसमोर जेएच ०५ टीसी १८५१ क्रमांकाचा टिप्पर होता. टिप्परला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न सुरू असतानाच दोन्ही वाहनांची धडक झाली. धडक जोरदार असल्याने ट्रॅव्हलरमधील प्रवाशांना मोठा हादरा बसला. वाहनातील अनेक प्रवासी जखमी झाले. काही प्रवाशांना दुखापत झाल्याने घटनास्थळी मदतीसाठी आरडाओरड सुरू झाली.

अपघाताची माहिती मिळताच सेलू पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिक आणि रेस्क्यू टीमच्या मदतीने ट्रॅव्हलरमधील जखमी प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. तीन रुग्णवाहिकांच्या सहाय्याने जखमींना सेवाग्राम आणि वर्धा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले. अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी परिस्थिती नियंत्रणात आणत वाहतूक सुरळीत केली.

या अपघातात जमशु रतन घालनायक वय ४७, हर्षदा ईश्वर कानात वय २७, गंगाबेन ईश्वर कानात वय ५०, सुमित्राबेन पल्लूभाई गोरखना वय ४०, प्रकाश गुना भोंडवा वय ३७, प्रवीण जानू कानात वय ४१, दलू सुरजी रडिया वय ४८, लीला मोगजी गौंड वय २५, वल्लुभाई चैताबाई गोरखना वय ५०, मेरुबेन सुरेशभाई टेंबरे वय ४८, सीताबाई रामजी भानी कानात वय ५२ आणि सीताबेन हॅप्पी भोंडवा वय ६० हे जखमी झाले आहेत.

यातील बहुतांश भाविक करचोंद आणि गाढवी, तालुका कपराडा, जिल्हा वलसाड, गुजरात येथील रहिवासी आहेत. जम्मू रामजी रावते वय ४५, गजू सोमा गुरव वय ३५ आणि सायरेश जम्मू रावते वय ३५ हे देखील प्रवासात होते. तेजल रशीद बारात वय १८ ही सुकल बारी, तालुका कपराडा, जिल्हा वलसाड येथील आहे. मधुसूदन नरेंद्र मुनी अंकुर नेरकर वय ४५ हे महानुभाव आश्रम, जाधववाडी, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे येथील असून प्रभू सोमा गवळी वय ६० हे पाटी, तालुका जिल्हा सिलवासा, दादरा नगर हवेली व दमण दीव येथील रहिवासी आहेत. ट्रॅव्हलर चालक शहानवाज इम्तियाज चारियावाला वय ४२ हा वलसाड गुजरात येथील रहिवासी असल्याची माहिती आहे.

अपघाताची माहिती मिळताच सेलू पोलीस ठाण्याचे ठाणेदार पंकज वाघोडे, उपनिरीक्षक निरंजन वरभे, प्रवीण भोयर, उमेश उगले, जावेद धामिया, मंगेश राऊत आणि सुनील चावरे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना बाहेर काढण्याचे काम केले. महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठीही पोलिसांनी प्रयत्न केले. अपघातातील जखमींची प्रकृती आणि त्यांना झालेल्या दुखापतींची तीव्रता वैद्यकीय तपासणीनंतर स्पष्ट होणार आहे. दरम्यान, ओव्हरटेक करताना हा अपघात नेमका कसा घडला, वाहनांचा वेग किती होता आणि चालकाकडून काही निष्काळजीपणा झाला का, याचा तपास सेलू पोलीस करीत आहेत.

हिंगणघाटच्या दुर्घटनेनंतर विद्यार्थ्यांना आयुष्याचे धडे

वयाआधी वाहन चालवू नका; अमूल्य आयुष्य गमावू नका

वर्धा जनमाध्यम : हिंगणघाट येथे स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी झालेल्या भीषण अपघातात तीन विद्यार्थिनींचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच वर्धा वाहतूक नियंत्रण शाखेने विद्यार्थ्यांमध्ये रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती सुरू केली आहे. जेएसएम अकॅडमी येथे वाहतूक नियम, रस्ते सुरक्षा आणि अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती कार्यशाळा घेण्यात आली.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय घुले यांच्या आदेशाने कार्यशाळा घेण्यात आली. सहाय्यक फौजदार रियाज खान यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

१८ वर्षांखालील मुलांना दुचाकी किंवा चारचाकी वाहन चालवू देऊ नये. विना परवाना वाहन चालवू नये. अतिवेग, स्टंटबाजी, मोबाईलवर बोलत वाहन चालविणे आणि रस्त्यावर चुकीच्या पद्धतीने वाहन उभे करणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले. पालकांनीही मुलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे आवाहन पोलिसांनी केले.

तंबाखू, सिगारेट, गांजा आणि एमडीसारख्या अमली पदार्थांपासून दूर राहण्याचा सल्लाही विद्यार्थ्यांना देण्यात आला. व्यसनामुळे मानसिक, शारीरिक आणि आर्थिक नुकसान होऊन गुन्हेगारी वाढण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले.

कार्यशाळेला जेएसएम अकॅडमीचे संचालक मनोज परघन यांच्यासह ८० ते १०० विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी ११२, १०९८, १०८ आणि महामार्ग हेल्पलाइन १०३३ क्रमांकांची माहिती देण्यात आली. हिंगणघाटच्या दुर्घटनेनंतर वाहतूक पोलिसांनी विद्यार्थ्यांना दिलेला हा संदेश म्हणजे केवळ नियमांची माहिती नसून, आयुष्य सुरक्षित ठेवण्याचा धडा ठरला आहे.

अवैध दारू वाहतुकीवर रामनगर पोलिसांची धडक कारवाई

वर्धा जनमाध्यम : रामनगर पोलिसांनी अवैध गावठी दारू वाहतुकीवर धडक कारवाई करत १० लिटर मोहाची दारू आणि दुचाकीसह एकूण ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई २१ ऑगस्ट रोजी गजाननगर परिसरातील आयटीआय रोडवर करण्यात आली.

रामनगर पोलिसांचे पथक हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना एका खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की, पांढरकवडा पारधी बेडा येथून लाल-काळ्या रंगाच्या दुचाकीवरून गावठी मोहाची दारू घेऊन एक व्यक्ती गजाननगरच्या दिशेने येत आहे. माहितीच्या आधारे पोलिसांनी आयटीआयजवळ नाकाबंदी केली.

दरम्यान, माहितीतील वर्णनाशी मिळतीजुळती दुचाकी येताना दिसताच पोलिसांनी ती थांबवली. चालकाची चौकशी केली असता त्याने आपले नाव रेशमीलाल सखाराम फुलमाळी वय ३५ वर्षे रा. पांढरकवडा पारधी बेडा वर्धा असे सांगितले. पंचांसमक्ष दुचाकीची तपासणी केली असता मागील बाजूस लटकवलेल्या नायलॉनच्या पिशवीत प्लास्टिक पिशवीमध्ये १० लिटर गावठी मोहाची दारू आढळून आली. या दारूची किंमत दोन हजार रुपये असून दारू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली हिरो कंपनीची लाल-काळ्या रंगाची पॅशन प्रो दुचाकी क्रमांक एमएच ३२ एएफ १४४८ अंदाजे ६० हजार रुपये किमतीची आहे. पोलिसांनी दारूसह दुचाकी असा एकूण ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरुद्ध रामनगर पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ८०२/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (अ), (ई) तसेच मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार अजहर खान करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक पौर्णिमा राखोंडे यांच्या निर्देशानुसार करण्यात आली. कारवाईत पोलीस हवालदार गजानन इवनाथे, योगेश चन्ने, अजहर खान तसेच पोलीस अंमलदार सचिन पवार, राहुल भोयर आणि रुपेश उगेमुगे सहभागी होते.

अवैध दारूविक्रेत्यांवर पोलिसांचा वॉशआऊट

वर्धा जनमाध्यम : जिल्ह्यातील अवैध दारूविक्री आणि निर्मितीच्या साखळीला आळा घालण्यासाठी वर्धा पोलिसांनी २० ते २१ ऑगस्टदरम्यान धडक 'वॉशआऊट' मोहीम राबविली. या कारवाईत तब्बल १४८ गुन्हे दाखल करून १५७ आरोपींवर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी एक कोटी नऊ लाख ३६ हजार ३१० रुपयांचा दारूसाठा व संबंधित मुद्देमाल जप्त करून नष्ट केला.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली. जिल्ह्यातील चार उपविभागीय पोलीस अधिकारी, ४३ अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेसह एकूण २८१ पोलीस अंमलदार मोहिमेत सहभागी झाले होते.

गोपनीय माहितीच्या आधारे शहरालगतचे परिसर, गावाबाहेरील भाग, जंगल शिवार तसेच दुर्गम ठिकाणी सुरू असलेल्या गावठी दारूभट्ट्यांवर पोलिसांनी लक्ष केंद्रित केले. बाहेरील जिल्ह्यांतून चोरट्या मार्गाने आणल्या जाणाऱ्या देशी-विदेशी दारूच्या विक्री केंद्रांवरही छापे टाकण्यात आले. यात ३७ देशी-विदेशी दारू विक्रीचे आणि १११ गावठी दारू विक्रीचे गुन्हे दाखल झाले.

या अचानक झालेल्या कारवाईमुळे अवैध दारू तयार करणारे, पुरवठादार आणि विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. जिल्ह्यात अवैध दारूचा व्यवसाय खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा पोलीस अधीक्षकांनी दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये संदीप झाडे यांचा पक्षप्रवेश

हिंगणघाट जनमाध्यम : तालुक्यातील दारोडा येथील ग्रामपंचायत सदस्य संदीप झाडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. हिंगणघाट येथे खासदार अमर काळे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. खासदार काळे यांनी झाडे यांच्या गळ्यात पक्षाचा दुपट्टा टाकून त्यांचे स्वागत केले. यावेळी जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले, दशरथ ठाकरे, शहराध्यक्ष बाळू वानखेडे, श्री. डोंगरे, वडनेरचे सरपंच विनोद वानखेडे, दारोडा येथील कार्यकर्ते श्री. घवघवे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पक्षाच्या विचारधारा आणि ध्येयधोरणांचा प्रसार करून संघटन बळकट करण्यासाठी निष्ठेने काम करणार असल्याचे संदीप झाडे यांनी सांगितले. त्यांच्या प्रवेशामुळे दारोडा परिसरात पक्षाला संघटनात्मक बळ मिळणार असल्याचा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना परदेश अभ्यास दौऱ्याची संधी

लक्षांकानुसार शेतकरी निवडीसाठी २४ ऑगस्ट रोजी सोडत

वर्धा जनमाध्यम : शेतकऱ्यांना आधुनिक व जागतिक स्तरावरील कृषि तंत्रज्ञानाची माहिती व प्रत्यक्ष अनुभव मिळावा, तसेच शेतीमालाची गुणवत्ता व उत्पन्न वाढीसाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करता यावा, यासाठी परदेश अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी अर्ज मागविण्यात आले असून प्राप्त अर्जांमधून शेतकऱ्यांची निवड करण्यासाठी दि.२४ ऑगस्ट रोजी दुपारी ३.३० वाजता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात सोडतीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर योजनेंतर्गत युरोप व चीनमधील संभाव्य देशांचा समावेश करण्यात आला आहे. या अभ्यास दौऱ्यामध्ये तेथील आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अभ्यास, शेतकरी व शास्त्रज्ञांशी संवाद, क्षेत्रीय भेटी तसेच विविध कृषि संस्थांना भेटी देण्यात येणार आहेत. या अभ्यास दौऱ्यासाठी जिल्ह्यातील इच्छुक शेतकऱ्यांकडून अर्ज मागविण्यात आले होते. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २० ऑगस्ट होती. प्राप्त अर्जाची छाननी करून २१ ऑगस्ट रोजी तालुका कृषि अधिकारी कार्यालयामार्फत जिल्हा स्तरावर अर्ज सादर करण्यात आले आहेत. जिल्ह्यास भौतिक ५ शेतकरी लक्षांक असून एकूण ४३ अर्ज प्राप्त झालेले आहे. करिता शेतकऱ्यांची निवड सोडत पद्धतीने करण्यात येणार आहे.

सोडत (लॉटरी) दिनांक २४ ऑगस्ट सोमवार रोजी दुपारी ३.३० वाजता जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयात काढण्यात येणार आहे. सदर सोडतीसाठी अर्ज केलेल्या जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, वर्धा येथे उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी अरविंद उपरीकर यांनी केले आहे.

जमीन महसूल थकबाकीसाठी मालमत्तेचा लिलाव

वर्धा जनमाध्यम : अमरावती जिल्ह्यातील दर्यापुर येथील न्यायालयाच्या निर्देशानुसार जमीन महसूलाची वसुली करण्यासाठी विजयगोपाल येथील जमीनीची लिलावाद्वारे विक्री करावयाची आहे. त्यासाठी दि.२ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता ग्रामपंचायत कार्यालय, विजयगोपाल येथे जाहीर लिलाव आयोजित करण्यात आला आहे. खरेदीदारांनी लिलावापूर्वी अनामत रक्कम भरून लिलावात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. फौजदारी किरकोळ अर्ज ०४/२०२३ प्रियंका विरुध्द योगेश कलम १२५ (३) मध्ये दर्यापूर न्यायालयाचच्या निर्देशानुसार योगेश नारायण डगवार यांच्याकडील जमिन महसूलाची थकबाकी म्हणुन ९ लाख ५१ हजार रुपये इतकी भरपाई म्हणुन देणे अनिवार्य आहे.

वाघाच्या हल्ल्यात ठार झालेल्या भोयर कुटुंबाला दहा लाखांची मदत

वनपरीक्षेत्र अधिकारी लांबाडे यांच्या प्रयत्नांना यश; आमदार सुमित वानखडे यांच्या हस्ते धनादेश सुपूर्द

आष्टी शहीद जनमाध्यम : नरसिंगपूर शेतशिवारात वाघाच्या हल्ल्यात ठार झालेल्या आष्टी येथील कवठीपुरा परिसरातील शेतकरी भोयर यांच्या कुटुंबाला वनविभागाकडून दहा लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. शनिवार, २२ ऑगस्ट रोजी आमदार सुमित वानखडे यांच्या हस्ते मृतकाच्या पत्नीला ९ लाख ७५ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. नागपंचमीच्या दिवशी भोयर हे शेतात पूजा करण्यासाठी गेले असताना नरसिंगपूर शेतशिवारात दबा धरून बसलेल्या वाघाने त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर आष्टी शहरासह परिसरात वाघाची दहशत निर्माण झाली आहे.

घटनेची माहिती मिळताच वनपरीक्षेत्र अधिकारी लांबाडे यांनी तातडीने कार्यवाही करत मृतकाच्या कुटुंबीयांना २५ हजार रुपयांची रोख मदत दिली. त्यानंतर अंत्यसंस्काराची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाच्या नियमानुसार आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आर्थिक मदतीचा धनादेश देण्याची कार्यवाही करण्यात आली.

वनपरीक्षेत्र अधिकारी लांबाडे यांच्या प्रयत्नातून शनिवारी झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात आमदार सुमित वानखडे यांच्या हस्ते मृतकाच्या पत्नीला ९ लाख ७५ हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. उर्वरित २५ हजार रुपयांची मदत यापूर्वीच देण्यात आली होती. तसेच उर्वरित रक्कम मृतकाच्या वारसांच्या व पत्नीच्या नावाने ठेव स्वरूपात जमा करण्यात येणार असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले.

यावेळी भाजपचे कार्यकर्ते तसेच वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याने भोयर कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे. अशा परिस्थितीत शासन आणि वनविभागाकडून मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे कुटुंबाला काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

नावात बदल

माझे पूर्वी MOHD FAREED KHAN असे नाव होते. माझ्या आधार व पासपोर्ट वरील FARID KHAN नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- वॉर्ड नं ४ मुंजावार लेआऊट साठोडा वर्धा ४४२००१

paper www.janmadhyam.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

२५ ऑगस्ट रोजी 'डिनर डिप्लोमसी'; महायुतीची मोठी खेळी

मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्राच्या राजकारणातून एक मोठी बातमी समोर येत आहे. महायुतीने अंतर्गत समन्वय साधण्यासाठी मोठी रणनीती आखली आहे. येत्या २५ ऑगस्ट रोजी संध्याकाळी महायुतीचे सर्व मंत्री, आमदार आणि प्रमुख नेते एकत्र येणार असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत एका भव्य स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. २५ ऑगस्टच्या या डिनर डिप्लोमसी नंतर महाराष्ट्राच्या राजकारणाला एक वेगळी दिशा मिळेल.

सूत्रांच्या माहितीनुसार, या स्नेहभोजनादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः आमदारांना आगामी राजकीय आव्हानांचा सामना करण्यासाठी आणि युती धर्म पाळण्यासाठी विशेष मार्गदर्शन करण्याची दाट शक्यता आहे.

आमदारांमधील समन्वय आणि क्रेडिट वार संपवण्याचा प्रयत्न

गेल्या काही महिन्यांत महायुतीमधील तीनही प्रमुख पक्षांच्या नेत्यांमध्ये आणि स्थानिक आमदारांमध्ये विविध शासकीय योजनांच्या श्रेयवादावरून आणि जागावाटपाच्या मुद्यावरून जाहीर वक्तव्ये पाहायला मिळाली होती. काही ठिकाणी स्थानिक पातळीवरील नेत्यांनी एकमेकांवर उघडपणे टीका केल्यामुळे महायुतीच्या प्रतिमेला फटका बसत असल्याची जाणीव वरिष्ठ नेतृत्वाला झाली आहे. याच पार्श्वभूमीवर, तिन्ही पक्षांच्या आमदारांमध्ये अधिक जास्त समन्वय असावा, विकासाच्या दृष्टीने एकत्रित काम व्हावे आणि सार्वजनिकदृष्ट्या होणारे मतभेद पूर्णपणे थांबवले जावेत, यासाठी हे स्नेहभोजन आयोजित करण्यात आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देणार यशाचा गुरु मंत्र- २५ ऑगस्टच्या या ऐतिहासिक बैठकीत केवळ स्नेहभोजन होणार नसून, आगामी राजकीय आव्हानांचा सामना करण्यासाठी एक ठोस कृती आराखडा तयार केला जाणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या बैठकीदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः उपस्थित सर्व मंत्री आणि आमदारांना विशेष मार्गदर्शन करणार आहेत. फडणवीस तिन्ही पक्षांच्या लोकप्रतिनिधींना कडक निर्देश देण्याची दाट शक्यता आहे. महायुतीचे सरकार टिकवून ठेवण्यासाठी अंतर्गत बंडखोरी कशी रोखायची, यावरही या मार्गदर्शनात भर दिला जाईल.

महायुतीत ऑल इज वेल

एकाच व्यासपीठावर तिन्ही पक्षांचे सर्व आमदार आणि ज्येष्ठ नेते एकत्र येउन जेवण करणार असल्यामुळे, महायुतीत कोणताही बिघाड नसून ऑल इज वेल आहे, असा मोठा राजकीय संदेश यातून विरोधकांना आणि जनतेला दिला जाणार आहे.

साखरेच्या वाढत्या दरांवरून मल्लिकार्जुन खर्गेचा मोठा दावा

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : युपीए-२ च्या काळातही म्हणजेच २००९ ते २०१४ या काळात, इथेनालचे E20 धोरण नसताना मोठ्या प्रमाणात साखरेची आयात झाली होती, असा दाखला देत भाजप नेते अमित मालवीय यांनी इथेन?ल धोरणाचा या दरवाढीशी थेट संबंध नसल्याचे स्पष्ट केले.देशात सणासुदीचे दिवस जवळ येत असतानाच साखरेच्या दरांवरून राजकारण तापताना दिसत

आहे. गेल्या ३ महिन्यांत साखरेचे दर तब्बल ४० टक्क्यांनी वधारले असल्याचा आरोप करत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सरकारवर टीका केली आहे. देशात साखरेचा साठा गेल्या ९ वर्षांतील सर्वात खालच्या पातळीवर का? एथेनालच्या निर्मितीसाठी उस अन् धान्य वळवण्याच्या धोरणाचा पुनर्विचार सरकार का करत नाही? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले.गेल्या नउ वर्षांतील सर्वात कमी साठा आणि १० लाख टन आयातीचा संदर्भ देत खर्गे म्हणाले, आयात ही साखरेच्या संतुलनावर अवलंबून असते, उत्पादन, वापर, साठा, किमती किंवा E20 वर नाही. ते म्हणाले, २०२५-२६ साठी सुरु वातीचे उत्पादन अंदाजे ३४९ लाख टन होते, जे आता अंदाजे २८० लाख टनांवर आला आहे.

भाजपकडून खर्गेच्या आरोपांना प्रत्युत्तर -काँग्रेसच्या या आरोपांना भारतीय जनता पक्षाचे नेते अमित मालवीय यांनी सोशल मीडियावरून प्रत्युत्तर दिले. साखरेचे दर आणि आयात यांचा संबंध E20 धोरणाशी जोडणे, ही केवळ राजकीय सोय असल्याचे मालवीय यांनी म्हटले आहे.

काय म्हणाले अमित मालवीय - वर्ष २०२५-२६ मध्ये साखरेचे सुरु वातीचे उत्पादन ३४९ लाख टन होते, जे प्रत्यक्षात घटून सुमारे २८० लाख टन राहिले आहे. साखरेच्या उत्पादनात झालेली मोठी घट आणि स्थिर खपा मुळे क्लोजिंग स्टाकवर ताण आला आहे. यामुळे दरावर दबाव निर्माण झाला आहे. देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता आणि दर नियंत्रणात ठेवण्यासाठी आयात करणे ही एक संतुलित धोरणात्मक प्रक्रिया आहे. याला E20 शी जोडणे आकड्यांच्या विरोधात आहे. युपीए-२ च्या काळातही म्हणजेच २००९ ते २०१४ या काळात, इथेनालचे क२० धोरण नसताना मोठ्या प्रमाणात साखरेची आयात झाली होती, असा दाखला देत भाजप नेते अमित मालवीय यांनी इथेनाल धोरणाचा या दरवाढीशी थेट संबंध नसल्याचे स्पष्ट केले.

१३ जणांची आत्महत्या, एकाने बहिणीला ढकलून दिले

छत्रपती संभाजीनगर- छत्रपती संभाजीनगरातील चांदगुडे कुटुबाच्या मृत्युनंतर खवड्या डोंगर पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मुलाला वाचवण्याच्या प्रयत्नात वडीलांचा दरीत पडून मृत्यू झाला. यानंतर आईनेही दरीत उडी मारून मारली आणि क्षणातच हसतेखेळते कुटुंब क्षणात उद्ध्वस्त झाले. मात्र, तिसगाव

परिसरातील धुळे-सोलापूर महामार्गालगत असलेला खवड्या पर्वत अशा प्रकारच्या जीवघेण्या घटनांचे केंद्र बनत असून, आता तो सुसाइड पाइंट म्हणून ओळखला जाउ लागला आहे.स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, खावड्या पर्वतावरून उडी मारून आतापर्यंत १३ जणांनी आत्महत्या केली आहे.

खवड्या डोंगराचा भयानक इतिहास

एवढेच नाही तर या ठिकाणी हत्येचा एक गुन्हाही घडला आहे. गेल्या वर्षी एका व्यक्तीने स्वतःच्याच बहिणीला या कड्यावरून खाली ढकलून दिल्याची घटना घडली. वारंवार घडणा-या या घटनांमुळे आसपासच्या रहिवाशांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे. सगळ्यात धक्कादायक बाब म्हणजे, एवढा धोकादायक परिसर असूनही येथे सुरक्षेच्या कोणत्याही उपाययोजना नाहीत. कड्यावर जाण्यापासून रोखण्यासाठी कोणतीही तटबंदी किंवा जाळी बसवण्यात आलेली नाही. हा क्षेत्र धोकादायक असल्याचे सांगणारा किंवा प्रवेशास मनाई करणारा एकही बोर्ड तिथे लावण्यात आलेला नाही. सुरक्षेची कोणतीही व्यवस्था नसल्याने कोणताही नागरिक सहजपणे या कड्यावर जाउ शकतो.

संरक्षक जाळी अन् सुरक्षेची मागणी- या पर्वतावर वेगाने वाहणारे वारे आणि कड्याची प्रचंड उंची यामुळे केवळ खाली पाहिल्यानेही तोल जाण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे चंदगुडे कुटुंबाच्या दुर्घटनेनंतर आता तरी प्रशासनाने जागे व्हावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. या परिसरात तत्काळ प्रवेशबंदी करण्यात यावी आणि कड्याच्या सभोवताली भक्कम संरक्षक जाळी उभारण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

भव्य देशभक्तीपर गीत स्पर्धेत हिमांशी शिष्टे प्रथम

अमरावती/प्रतिनिधी : भारतीय अंधजन विकास व पुनर्वसन संस्था, अमरावतीच्या वतीने भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त तसेच स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मरणार्थ १५ ऑगस्ट २०२६ रोजी संस्थेच्या प्रांगणात भव्य देशभक्तीपर गीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. खुल्या गटासाठी आयोजित या स्पर्धेत अमरावती शहरासह शहराबाहेरील एकूण ५४ स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.स्पर्धेच्या दोन फे-या घेण्यात आल्या. प्राथमिक फेरीनंतर अंतिम फेरीसाठी १० स्पर्धकांची निवड करण्यात आली. अंतिम फेरीत स्पर्धकांनी देशभक्तीपर गीतांचे सुरेल व प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळविली. परीक्षकांनी केलेल्या गुणांकनानुसार हिमांशी शिष्ठे यांनी प्रथम, पवन मोहेकर यांनी द्वितीय, तर कोमल ढोके यांनी तृतीय क्रमांक पटकावला. तसेच उत्तेजनार्थ पारितोषिके देउन अन्य स्पर्धकांचाही गौरव करण्यात आला. स्पर्धेचे परीक्षण अमरावतीतील प्रख्यात संगीतकार तथा वादक ललित उफाडे आणि बुलंद व सुस्वर आवाजाचे गायक व प्रबोधनकार रविंद्र गवई यांनी केले. विजेत्यांसह सर्व सहभागी स्पर्धकांचे परीक्षक, संस्थेचे पदाधिकारी आणि उपस्थित मान्यवरांनी कौतुक व अभिनंदन केले.

संस्थेच्या वतीने स्पर्धक व उपस्थितांसाठी उत्कृष्ट बैठक व्यवस्था करण्यात आली होती. तसेच सकाळपासून दुपारपर्यंत चहा, नाश्ता व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली. संस्थेच्या या उपक्रमाचे आणि नियोजनबद्ध व्यवस्थेचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शहरातील अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. भविष्यातही अशाच प्रकारचे सामाजिक, सांस्कृतिक व देशभक्तीपर उपक्रम राबविण्याचा मानस संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे महासचिव शाकीर नायक यांनी केले.

अपात्र लाभार्थ्यांना तब्बल 9,605 कोटींचे वाटप; लाडकी बहीण योजनेत मोठी गडबड?

मुंबई/प्रतिनिधी : राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत पात्र नसलेल्या तब्बल ९२ लाख लाभार्थ्यांना आतापर्यंत ९,६०५ कोटी रुपये वितरित करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या माहितीनुसार, जून २०२६ पर्यंत या अपात्र लाभार्थ्यांच्या खात्यांमध्ये योजनेची ही रक्कम जमा झाली आहे.आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना दरमहा १,५०० रु पयांचे अर्थसाहाय्य देण्यासाठी जुलै २०२४ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या विजयात या योजनेची महत्त्वाची भूमिका असल्याचे मानले जाते. मात्र, योजनेच्या माध्यमातून राज्याच्या तिजोरीवर मोठा आर्थिक भार पडत असल्याची टीका सुरु वातीपासूनच होत आहे.योजनेतील लाभार्थ्यांची यादी गेल्या दोन वर्षांत अनेकदा तपासण्यात आणि अद्ययावत करण्यात आली. मात्र, त्यानंतरही मोठ्या संख्येने अपात्र लाभार्थी योजनेचा लाभ घेत असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. माहितीच्या अधिकारांतर्गत मिळालेल्या माहितीनुसार, सरकारने ९२ लाख अपात्र लाभार्थ्यांवर तब्बल ९,६०५ कोटी रुपये रु खर्च केले.

ई-केवायसी पूर्ण न केल्यामुळे ६२ लाख लाभार्थी वगळले- कौटुंबिक उत्पन्न वार्षिक २.५ लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा जास्त असल्यामुळे १६ लाख लाभार्थ्यांना यादीतून काढण्यात आले; ३.६ लाख लाभार्थी संजय गांधी निराधार अनुदान योजनेचा लाभ घेत होते; कुटुंबातील



दुस-या सदस्याने योजनेसाठी नोंदणी केल्यामुळे २.५ लाख लाभार्थ्यांना वगळण्यात आले; १.८ लाख लाभार्थी ६५ वर्षांच्या वयोमर्यादेपेक्षा अधिक वयाचे होते; आणि ४.५ लाख लाभार्थी सरकारी कर्मचारी होते. तसेच, जिल्हा स्तरावर पडताळणी केल्यानंतर आणखी १.७ लाख लाभार्थ्यांना वगळण्यात आले.

२४ महिन्यांत ७६ हजार कोटींचा खर्च- राज्य सरकारने गेल्या २४ महिन्यांत लाडकी बहीण योजनेवर ७६,२६१ कोटी रुपये खर्च केले आहेत. या कालावधीत पात्र लाभार्थ्यांच्या खात्यांमध्ये ३९.७५ कोटी इतक्या पेमेंट नोंदी होणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात ४६.१ कोटी पेमेंट नोंदी झाल्याचे आरटीआयमधून समोर आले आहे. यातील ६.४ कोटी अतिरिक्त पेमेंट नोंदींमधून सुमारे ९,६०५ कोटी रुपये अपात्र लाभार्थ्यांच्या खात्यांमध्ये जमा झाले.

सरकार पैसे वसूल करणार का?विशेष म्हणजे, सरकार बहुतांश अपात्र लाभार्थ्यांना दिलेली रक्कम वसूल करणार नाही. ज्या सरकारी कर्मचारी आणि अधिका-यांना मासिक रक्कम मिळाली होती, केवळ त्यांच्याकडूनच ही रक्कम वसूल केली जाईल. लाडकी बहीण योजनेचे कामकाज पाहणा-या राज्य महिला व बालविकास विभागाच्या एका अधिका-याने सांगितले की, जूनमध्ये राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी मुख्यमंत्र्यांनी या निर्णयाची घोषणा केली होती.

सध्या किती महिला योजनेसाठी पात्र?- सध्या पात्र लाभार्थ्यांची संख्या १.६५ कोटी इतकी आहे. मात्र, नोव्हेंबर २०२५ पर्यंतच्या १७ महिन्यांच्या कालावधीत २.१ कोटींहून अधिक महिलांना या योजनेचे पैसे मिळाले. फेब्रु वारी ते मे २०२५ या काळात लाभार्थ्यांची संख्या २.४७ कोटी इतकी उच्चांकी होती. त्यामुळे सरकारकडून दरमहा ३,६४० कोटी रु पयांहून अधिक रक्कम वितरित करण्यात आली. प्रत्यक्षात पात्र लाभार्थ्यांसाठी दरमहा सुमारे २,४५० कोटी रुपये वितरित होणे अपेक्षित होते.

शिक्षकांना हराम का खाते है...

म्हणणा-या सीजेपी अध्यक्ष अभिजीत दिपकेंसह ५ जणांविरोधात गुन्हा

औसा (जि. लातूर) : जिल्हा परिषद प्रशाळा विभाग (उर्दू), जावळी येथे वर्गात विनापरवाना प्रवेश करत शासकीय कामामध्ये अडथळा आणत शिक्षकांना अपशब्द वापरल्याच्या आरोपावरून औसा

पोलिस ठाण्यात शनिवारी काक्रोच जनता पार्टीचे अध्यक्ष अभिजीत दिपके, अजिंक्य शिंदे यांच्यासह इतर चार ते पाच अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, गुरु वार, दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १.१० वाजण्याच्या सुमारास सीजेपीचे अध्यक्ष अभिजीत दिपके यांच्यासह इतरांनी औसा येथील उर्दू शाळेत विनापरवाना प्रवेश केला. वर्गामध्ये बसून विद्यार्थ्यांना वेगवेगळे प्रश्न विचारत अध्यापनाच्या कामामध्ये व्यत्यय आणला. शाळेचे चित्रीकरण करून ते सोशल मीडियावर व्हायरल केले. त्याचबरोबर शाळेत दुस-याच शाळेचे विद्यार्थी आणून बसवले आहेत असा खोटा आरोप करत शाळेची बदनामी केली. एवढ्यावरच न थांबता, तेथील शिक्षकांकडे पाहून ये हराम का खाते है, इनको शरम नहीं है, तुम्हाला निलंबित करायला लावतो अशी भाषा वापरत शासकीय कामामध्ये अडथळा आणला, असा आरोप तक्रारीत केला आहे.याबाबत औसा पोलिस ठाण्यात शिक्षिका सय्यद समशादबानो खैरातअली (वय ५३) यांनी दिलेल्या तक्रारीवरून शनिवारी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १३२, ३२९(३), ३५१(२), ३५६(२) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक महेश गायकवाड करत आहेत.

माझ्या पतीला बळीचा बकरा बनवले

रशियाच्या जहाजावरून भारतीय कॅप्टनला अटक, पत्नी भावुक

मुंबई/प्रतिनिधी : 'माझे पती पूर्णपणे निर्दोष आहेत. त्यांना बळीचा बकरा बनवलं जात आहे. चुकीच्या वेळी, चुकीच्या ठिकाणी ते होते.' ब्रिटनमध्ये अटकेत असलेल्या भारतीय कॅप्टन अजय पंत यांच्या पत्नी रितू पंत यांनी हा दावा केला. रशियावर लादलेल्या निर्बंधांचं उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली अजय पंत

यांच्यावर ब्रिटनमध्ये कारवाई सुरू आहे. त्यांच्यावर १५ डिसेंबरपासून कोर्टात खटला चालणार असून, दोषी ठरल्यास त्यांना तब्बल १० वर्षांपर्यंत तुरुंगवास होउ शकतो.

रितू पंत यांनी शनिवारी सांगितले की, माझ्या पतीला फक्त बळीचा बकरा बनवलं जात आहे. ते चुकीच्या वेळी चुकीच्या ठिकाणी होते. अजय पंत हे भारतीय कॅप्टन असून, जूनमध्ये ब्रिटिश अधिका-यांनी त्यांना इंग्लिश चॅनेलमध्ये अटक केली. त्यांच्यावर जहाजातून ब्रिटनने निर्बंध घातलेलं रशियन कच्चं तेल वाहून नेलं जात असल्याचा आरोप आहे.

फोनवर फक्त रडत होते...पतीच्या अटकेनंतरची पहिल्यांदा फोन केल्यानंतर काय घडलं याची माहिती रितू यांनी दिली. त्या म्हणाल्या की, 'ते पूर्णपणे खचले होते आणि फक्त रडत होते. त्यांना नेमकं काय झालं आहे, हेच कळत नव्हतं. त्यांनी फक्त एवढंच सांगितलं की, मी तुरुंगात आहे, प्लीज मला बाहेर काढा.' अजय पंत हे जामिनावर बाहेर येउ शकलेले नाहीत. त्यामुळे त्यांचे तुरुंगात हाल होत असल्याचा दावा त्यांच्या पत्नीने केला आहे. १४ जून रोजी ब्रिटिश कमांडोंनी हेलिकाप्टरच्या मदतीने स्मर्टोस नावाच्या तेलवाहू जहाजावर कारवाई केली. कमांडो हेलिकाप्टरमधून दोरीच्या सहाय्याने जहाजावर उतरले आणि टँकर ताब्यात घेतला. या जहाजाचे कॅप्टन अजय पंत होते.ब्रिटनच्या म्हणण्यानुसार, स्मर्टोस हे रशियाच्या शॅडो फ्लीटचा भाग आहे. रशियाने युक्रेनवर केलेल्या हल्ल्यानंतर त्याच्यावर तेलासह विविध निर्बंध लादण्यात आले. हे निर्बंध टाळण्यासाठी रशिया अशा जहाजांच्या नेटवर्कचा वापर करत असल्याचा ब्रिटनचा आरोप आहे.

रशियातून निघालं, इंग्लिश चॅनेलमध्ये अडवलं- मरीन ट्रॅफिकच्या माहितीनुसार, स्मर्टोसने ५ जून रोजी रशियातील उस्त-लुगा बंदरातून प्रवास सुरू केला होता. बाल्टिक समुद्रातून प्रवास करत हे जहाज इजिप्तमधील पोर्ट सईदकडे निघालं होतं. इंग्लिश चॅनेलमधून हे जहाज जात असताना ब्रिटिश कमांडोंनी कारवाई केली. अजय पंत यांच्यावर जहाजाच्या कार्गोबाबत माहिती असूनही रशियन तेलाची वाहतूक केल्याचा आरोप आहे. मात्र, त्यांच्या वकिलांनी कोर्टात वेगळी बाजू मांडली आहे. कॅप्टन हे जहाजाच्या मालकाच्या कंपनीचे कर्मचारी असून, ते केवळ आदेश पाळत होते, असा युक्तिवाद त्यांच्या वकिलांनी केला.

शीख कुटुंबांचे राहुल गांधींच्या घराबाहेर आंदोलन

पुतळा जाळला, शीख दंगलीतील दोषी सज्जन यांना हिरो म्हटल्याने नाराजी

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : शीख नेते आणि १९८४ च्या शीखविरोधी दंगलींनी प्रभावित झालेल्या कुटुंबातील सदस्यांनी शनिवारी राहुल गांधींच्या घराबाहेर निदर्शने केली. निदर्शकांनी घोषणाबाजी करत पुतळाही जाळला. काही काँग्रेस नेत्यांनी माजी पक्षनेते सज्जन कुमार यांना नायक आणि आदर्श संबोधणा-या विधानावर त्यांनी माफीची मागणी केली.निदर्शक ५, सुनहरी बाग रोड येथील राहुल गांधींच्या घराबाहेर जमले होते. तिथे पोलिसांनी मोठी बॅरिकेडिंग केली होती.सज्जन कुमार यांना १९८४ च्या शीखविरोधी दंगलींशी संबंधित एका प्रकरणात दोषी ठरवण्यात आले होते. दिल्लीच्या तिहार तुरुंगात गुरुवारी ८० वर्षांच्या वयात त्यांचे निधन झाले होते.

काँग्रेस नेते दीपेंद्र सिंह हुड्डा यांनी विधान केले होते- काँग्रेस नेते दीपेंद्र हुड्डा यांनी सज्जन कुमार यांचे निधन कधीही भरून न येणारी हानी असल्याचे म्हटले होते. दरम्यान, काँग्रेस नेते उदित राज यांनी सज्जन कुमार यांचे निधन पक्षासाठी मोठी

हानी म्हटले आणि ते म्हणाले की, त्यांनी विशेषतः गरिबांसाठी खूप काम केले होते. या विधानांनंतर शीख समाजात नाराजी आहे. या आंदोलनाचे नेतृत्व दिल्ली शीख गुरु द्वारा प्रबंधक समितीचे अध्यक्ष हरमीत सिंग कालका आणि सरचिटणीस जगदीप सिंग कहलोन यांनी केले.

डीएसजीएमसीच्या नेत्याने काँग्रेसला स्पष्टीकरण देण्यास सांगितले की, दंगलीशी संबंधित प्रकरणांमध्ये दोषी ठरलेल्या सज्जन कुमार यांना नायक मानले जात आहे का?

त्यांनी सांगितले की, सज्जन कुमार यांच्या मृत्यूनंतर काँग्रेस नेत्यांनी ज्या प्रकारचे विधान केले आणि त्यांना आपला नायक म्हटले, ते आक्षेपार्ह आहे. राहुल गांधींना आज स्पष्ट करावे लागेल की सज्जन कुमार त्यांचे नायक आहेत का? ते म्हणाले, ४२ वर्षांनंतर आमच्या कुटुंबांच्या जखमा पुन्हा ताज्या झाल्या आहेत. आमच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. राहुल गांधी आणि काँग्रेस नेत्यांनी हे स्वीकारून माफी मागितली पाहिजे.

जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेले सज्जन कुमार यांचे गुरु वारी तिहारमध्ये निधन

तिहार तुरुंगात कैद असलेले काँग्रेसचे माजी खासदार सज्जन कुमार यांचे गुरु वारी ८० व्या वर्षी निधन झाले होते. सज्जन डिसेंबर २०१८ पासून तुरुंगात होते. ते ७ वर्षे ८ महिने तुरुंगात राहिले. त्यांना १९८४ च्या शीखविरोधी दंगलींच्या दोन प्रकरणांमध्ये जन्मठेपेची शिक्षा झाली होती, तर दंगलींशी संबंधित दोन प्रकरणांमध्ये त्यांची निर्दोष मुक्तता झाली होती.

काशीचे सर्व घाट पाण्यात; छतांवर आरती, अंत्यसंस्कार

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : उत्तर प्रदेशात होणा-या सलग पावसामुळे गंगा आणि घाघरा यांसारख्या सहा नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. १३ जिल्ह्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. लखनउ आणि बाराबंकीसह पाच शहरांमध्ये शनिवार सकाळपासून अधूनमधून पाउस पडत आहे. वाराणसीमध्ये सर्व ८४ घाट पाण्याखाली गेले आहेत. मणिकर्णिका घाटावर अंत्यसंस्काराचे विधी छतावर केले जात आहेत, तसेच दशाश्वमेध घाटावरील गंगा आरतीही छतावरच आयोजित केली जात आहे. दिल्लीत शुक्रवार रात्रीपासून अधूनमधून पाउस पडत आहे. ऑगस्ट

महिना संपण्यापूर्वीच येथे सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. सफदरजंग हवामान केंद्राने १ ते २१ ऑगस्ट दरम्यान २३५.३ मिमी पावसाची नोंद केली, जी महिन्याची सामान्य सरासरी असलेल्या २३३.१ मिमीपेक्षा अधिक आहे. हवामान विभागाच्या मते, दिल्लीत शनिवार-रविवारीही पावसाची शक्यता आहे. दुसरीकडे, राजस्थानमध्ये मान्सूनची तीव्रता कमी झाली आहे. शुक्रवारी १५ जिल्ह्यांसाठी पावसाचा इशारा देण्यात आला होता, तरीही ११ जिल्ह्यांत कडक उन पडले आणि उर्वरित चार जिल्ह्यांत १० मिमीपेक्षा कमी पाउस झाला. यामुळे उष्णता आणि दमटपणा वाढला आहे; शुक्रवारी श्री गंगानगरमध्ये ३९.९स्ब आणि चुरूमध्ये ३९स्ब तापमानाची नोंद झाली.

मुसळधार पावसामुळे मध्य प्रदेशातील सतना येथील प्रसिद्ध शबरी धबधबा सध्या रौद्र रूपात दिसत आहे. वाराणसीमध्ये घाटांवर असलेली विविध १०० मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. आता इमारतींच्या छतांवर अंत्यसंस्कार केले जात आहेत.

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

साखरीचा उलटफेर

गोड पदार्थांची रेलचेल असणारा सणासुदीचा काळ सुरू झाला की, महागाईचा कडवटपणा लगोलग येतो, हा जणू भारतीय अर्थव्यवस्थेचा अलिखित नियमच बनला आहे. यंदा सणासुदीचा गोडवा वाढवणारी साखर याची मानकरी ठरली आहे. गणेशोत्सव, दसरा आणि दिवाळी या काळात मिठाई, बेकरी पदार्थ आणि शीतपेयांची मागणी शिगेला पोहोचते; पण नेमक्या याच काळात साखरेचे दर विक्रमी पातळी गाठत आहेत. अवघ्या काही दिवसांतच साखरेच्या प्रतिक्विंटल दरात १३०० ते १४०० रुपयांनी वाढून थेट आठ हजारांच्या घरात जाणे, हे बाजारातील मागणी-पुरवठ्याच्या सर्वसाधारण गणिताला छेद देणारे आहे. याची दखल घेत तत्काळ केंद्र सरकारने साठेबाजीवर बंधने घालण्याचा निर्णय घेतला. तिची दखल घेतानाच शासनाने तब्बल दशकभरानंतर साखर आयातीचे दारही किलकिले केले आहे. यावरून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येते. तथापि, गेल्याच आर्थिक वर्षात भारताने २० लाख टन साखर निर्यात करण्याचा निर्णय घेतला होता आणि आता अवघ्या काही महिन्यांत त्याच देशाला १० लाख मेट्रिक टन कच्ची साखर शून्य शुल्क आकारून आयात करण्याची वेळ यावी, हा उलटफेर अनेक प्रश्न उपस्थित करणारा आहे. जगातील दुसऱ्या क्रमांकाचा साखर उत्पादक आणि सर्वांत मोठा ग्राहक असलेल्या देशाने अशा तऱ्हेने आयातीकडे वळावे, यातून धोरणात्मक नियोजनातील त्रुटी स्पष्टपणे समोर येतात. सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीकडे पाहिल्यास परिस्थिती इतकी विदारक वाटत नाही. चालू हंगामात इथेनॉलसाठी वापरलेली साखर वजा जाता निव्वळ उत्पादन जवळपास २७.७५ दशलक्ष टन राहण्याचा अंदाज आहे, तर देशांतर्गत खप सुमारे २८ दशलक्ष टन आहे. शिवाय शिल्लक साठा गृहीत धरला, तर एकूण उपलब्धता ३२.५ दशलक्ष टनांच्या घरात जाते. म्हणजे कागदावर तरी उत्पादन आणि मागणीचा ताळमेळ फारसा बिघडलेला दिसत नाही. मग, तरीही दर का भडकले, याचे उत्तर उत्पादनाच्या आकडेवारीत नसून, साठवणूक आणि सट्टेबाजारातील उलाढालींमध्ये दडलेले आहे. गेल्या दोन-तीन दिवसांत काही मोठ्या साखर कारखान्यांनी वायदे बाजारात मोठ्या प्रमाणावर सट्टा खेळल्याचा आणि त्यामुळे बाजारपेठेत कृत्रिम तेजी निर्माण झाल्याचा आरोप होत आहे. वायदे बाजारपेठेतील दर प्रतिक्विंटल ७००० वरून दोन दिवसांतच ८००० रुपयांवर पोहोचले आणि याच काळात प्रत्यक्ष बाजारातही दर ६२-६३ रुपयांवरून ७२-७३ रुपये किलोपर्यंत झेपावले. हा एक प्रकारचा उच्चांकच आहे. मागील १० वर्षांचा आढावा घेतला असता केंद्राने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे आणि साखरेचे पर्याप्त उत्पादन राहिल्यामुळे देशात साखरेचे किरकोळ दर साधारणपणे ४० ते ४५ रुपये प्रतिकिलोच्या दरम्यान स्थिर राहिले होते. त्या तुलनेत आताचे दर जवळपास दुप्पट झाले आहेत. हे दर नियंत्रणात आणण्यासाठी सरकारने १० लाख टन साखर आयातीचा निर्णय घेत घाऊक साठ्यावर मर्यादा (स्टॉक लिमिट) घातल्या आहेत. साठा असूनही तो बाजारात न आणता कृत्रिम तुटवडा निर्माण करणे आणि त्याचा फायदा उचलणे, हा प्रकार खरोखर घडत असेल, तर तो केवळ ग्राहकांच्या खिशाला कात्री लावणारा नसून बाजारातील पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. आयातीचा निर्णयही या पार्श्वभूमीवर समजून घ्यायला हवा. मिठाई व शीतपेय उत्पादक, अन्न प्रक्रिया उद्योग, मिठाई विक्रेते आणि इतर संस्थात्मक खरेदीदार यांना या आयातीचा लाभ मिळणार आहे. मोठ्या ग्राहकांना १५ दिवसांपेक्षा अधिक काळ साठा करून ठेवता येणार नाही, अशी अटही यात घालण्यात आली आहे. साखर कारखान्यांनाही विक्री झाल्यानंतर आपल्या आवारात सात दिवसांपेक्षा जास्त काळ साखरेचा साठा रोखून ठेवता येणार नाही. थोडक्यात, सणासुदीच्या काळात मिठाई उत्पादकांपासून सर्वसामान्य ग्राहकांपर्यंत सर्वांना परवडणाऱ्या दरात साखर उपलब्ध व्हावी, हा या दोन्ही निर्णयांमागचा उद्देश स्पष्ट दिसतो; मात्र यातून काही प्रश्नही उपस्थित होतात. विशेषतः उत्तरेकडील खासगी साखर लॉबीच्या रेट्यामुळे उत्पादनाचे आकडे प्रत्यक्षापेक्षा फुगवून दाखवले गेल्याची चर्चा खरी असेल, तर त्याचा अर्थ धोरणकर्त्यांपर्यंत वेळेवर, अचूक आकडेवारी पोहोचतच नव्हती, असा होतो. एकाच वर्षात निर्यातीचा निर्णय घेणे आणि काही महिन्यांतच आयातीकडे वळणे, हा गोंधळ मूळ उत्पादन अंदाजातील त्रुटींमधून निर्माण झाला असल्यास ती अधिक चिंताजनक बाब आहे. दुसरा मुद्दा उसाच्या उत्पादनाशी आणि इथेनॉल धोरणाशी संबंधित आहे. यंदा कमी पावसामुळे प्रमुख ऊस उत्पादक राज्यांमध्ये उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशा स्थितीत उसापासून इथेनॉलनिर्मितीवर निर्बंध आणण्याची सरकारची भूमिका समजण्याजोगी आहे. अन्नसुरक्षेला प्राधान्य देणे आणि चलनवाढीला आळा घालणे हे सरकारसाठी क्रमप्राप्त ठरते; मात्र यामुळे जैवइंधन धोरणाच्या उद्दिष्टांना धक्का बसू शकतो. हे लक्षात घेता साखर, ऊस आणि इथेनॉल या तिन्ही घटकांचा एकत्रित विचार करूनच दीर्घकालीन धोरण आखणे आवश्यक आहे; मात्र तात्पुरत्या उपाययोजनांनी प्रश्न सुटणार नाहीत. दरवाढ रोखण्यासाठीचे तात्कालिक उपाय म्हणून आताचे निर्णय योग्य असले, तरी त्यांना कायमस्वरूपी उत्तर मानता येणार नाही. वायदे बाजारातील सट्टेबाजीवर नियंत्रण ठेवणारी सक्षम यंत्रणा उभी करणे, उत्पादनाच्या आकडेवारीचे विश्वासार्ह सर्वेक्षण करणे, कारखानदार व व्यापारी यांच्यातील साखळीत पारदर्शकता आणणे, या दिशेने ठोस पावले वेळीच उचलली गेली नाहीत, तर दरवर्षी सणासुदीच्या तोंडावर हाच खेळ पुन्हा पुन्हा घडत राहील. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे साखरेचा बाजारभाव वाढला म्हणून ऊस उत्पादकाला आपोआप अधिक ऊस दर मिळत नाही. कारखानदारांनी एफआरपी अदा केली की, उसाच्या दराबाबतची त्यांची प्राथमिक जबाबदारी पूर्ण होते. ही विसंगती दूर केल्याशिवाय ऊस उत्पादकाला साखरेच्या तेजीचा न्याय्य वाटा मिळणार नाही. सी. रंगराजन समितीने साखर आणि उपपदार्थांच्या उत्पन्नात ऊस उत्पादकाला मोठा वाटा मिळावा, अशी दिशा सुचवली होती; परंतु त्या शिफारशीची अंमलबजावणी टाळली गेली. बाजारातील दर आटोक्यात आणताना ऊस उत्पादकाच्या हक्काचा प्रश्न दुर्लक्षित राहता कामा नये. साखर कारखानदारांची बाजूही विचारात घ्यायला हवी. उसाच्या एफआरपीमध्ये अनेक वेळा वाढ झाली; मात्र साखरेच्या किमान विक्री किमतीत तितकीशी वाढ झाली नाही. त्यामुळे कारखानदारांच्या आर्थिक गणितावरही ताण आला आहे. ग्रामीण महाराष्ट्राच्या अर्थकारणाचा कणा असणाऱ्या या उद्योगाचे अर्थकारण कोलमडणे परवडणारे नाही.

‘ग्रेट ग्रीन वॉल’ हा जगासाठी आशेचा किरण

गेल्या काही वर्षापासून जगभरात उष्णतेच्या लाटा, अतिवृष्टी, दीर्घकालीन दुष्काळ, वणवे, हिमनद्यांचे वितळणे आदी संकटांचे गांभीर्य प्रकर्षाने समोर आले आहे. भारतही याला अपवाद नाही. अवेळी पाऊस, विक्रमी उष्णता, वाढते वायुप्रदूषण आणि भूजलाचा झपाट्याने होणारा ऱ्हास यामुळे पर्यावरणीय समतोल बिघडत चालला आहे. अशा वेळी आफ्रिकेने उभारलेली ‘ग्रेट ग्रीन वॉल’ ही संकल्पना जगासाठी आशेचा किरण ठरते.

हवामानबदल हा आता वैज्ञानिकांच्या परिषदांमधील चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेला, अन्नसुरक्षेला, जलसंपत्तीला आणि मानवी जीवनाला थेट आव्हान देणारे वास्तव बनला आहे. विकसनशील आणि आर्थिकदृष्ट्या अनेक अडचणींना सामोरे जाणारा आफ्रिका खंड आज पर्यावरण पुनर्स्थापनेच्या क्षेत्रात जगाला मार्ग दाखवत आहे, ही बाब विशेष महत्त्वाची आहे. हवामानबदलावर आंतरराष्ट्रीय परिषदांची मालिका, कार्बन उत्सर्जनावरून विकसित आणि विकसनशील देशांमधील वाद, निधीच्या घोषणा आणि राजकीय आरोप-प्रत्यारोप यामध्ये जग गुंतले असताना आफ्रिकन देशांनी कृतीची वाट निवडली. याच कृतीचे रूप म्हणजे २००७ मध्ये आफ्रिकन युनियनने सुरू केलेली ‘ग्रेट ग्रीन वॉल’ ही महत्त्वाकांक्षी योजना. या योजनेची सुरुवात सहारा वाळवंटाचा वाढता विस्तार रोखण्यासाठी करण्यात आली. सेनेगलपासून जिबूतीपर्यंत सुमारे आठ हजार किलोमीटर लांबीची आणि पंधरा किलोमीटर रुंदीची वृक्षपट्टी उभारण्याची मूळ कल्पना होती; मात्र कालांतराने पर्यावरणतज्ज्ञांनी निदर्शनास आणून दिले, की प्रत्येक प्रदेशाची भौगोलिक, हवामानविषयक आणि पर्यावरणीय वैशिष्ट्ये वेगवेगळी असल्याने सर्वत्र एकाच प्रकारची वृक्षलागवड उपयुक्त ठरणार नाही. त्यानंतर या प्रकल्पाचा दृष्टिकोन बदलण्यात आला आणि स्थानिक परिसंस्थांच्या पुनरुज्जीवनाला प्राधान्य देण्यात आले. आज ‘ग्रेट ग्रीन वॉल’ म्हणजे केवळ झाडे लावण्याची मोहीम नाही. जंगलांचे पुनरुज्जीवन, गवताळ प्रदेशांचे संवर्धन, जलसंधारण, मृदसंवर्धन, दलदलीच्या क्षेत्रांचे संरक्षण, शाश्वत शेती आणि स्थानिक जैवविविधतेचे जतन यांचा एकात्मिक कार्यक्रम म्हणजे ही योजना होय.

‘ग्रेट ग्रीन वॉल’

पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण विकास यांची सांगड घालणारा ‘ग्रेट ग्रीन वॉल’ हा दृष्टिकोनच या प्रकल्पाची खरी ताकद आहे. हा आफ्रिकेतील अर्ध शुष्क प्रदेश. अनेक दशकांपासून दुष्काळ, जमिनीचा ऱ्हास, गरिबी आणि अन्नटंचाईचा सामना करत आहे. या भागातील लाखो नागरिक शेती आणि पशुपालनावर अवलंबून आहेत; मात्र हवामान बदलामुळे पर्जन्यमानातील अनिश्चितता, जमिनीची घटती सुपीकता आणि वाढते तापमान यामुळे शेतीचे गणित कोलमडले, उत्पादन घटले, रोजगार कमी झाले आणि मोठ्या प्रमाणावर स्थलांतर सुरू झाले. या पार्श्वभूमीवर ‘ग्रेट ग्रीन वॉल’ ही योजना पर्यावरणीयच नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाची चळवळ बनली. या प्रकल्पामुळे लाखो हेक्टर जमिनीचे पुनरुज्जीवन सुरू झाले आहे. जलसंधारणामुळे भूजलपातळी सुधारण्यास मदत झाली आहे. स्थानिक वृक्षप्रजाती आणि गवतांचे संवर्धन झाल्याने जैवविविधतेला नवे जीवन मिळाले आहे. शाश्वत शेतीच्या पद्धती स्वीकारल्याने उत्पादनक्षमता वाढू लागली आहे. महिलांसाठी स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. युवकांना पर्यावरणपूरक उद्योगांमध्ये रोजगार उपलब्ध होत आहे. म्हणजेच पर्यावरण संरक्षण हा आर्थिक विकासाला अडथळा नसून विकासाचे साधन ठरू शकतो, याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

लोकसहभागातून योजना टिकाऊ बनते

या प्रकल्पाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे लोकसहभाग. पर्यावरण संरक्षण ही केवळ सरकारची जवाबदारी नसून स्थानिक समुदाय, स्वयंसेवी संस्था, संशोधन संस्था आणि नागरिक यांचा सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. स्थानिक ज्ञान, पारंपरिक जलव्यवस्थापन आणि स्थानिक वनस्पतींचा वापर यामुळे प्रकल्प अधिक परिणामकारक ठरला आहे. लोकांचा सहभाग असेल तरच विकासाची कोणतीही योजना टिकाऊ बनते, हा महत्त्वाचा घडा या उपक्रमातून मिळतो. तथापि, या योजनेपुढे अनेक अडथळेही आहेत. आफ्रिकेतील काही देशांतील राजकीय अस्थिरता, अंतर्गत संघर्ष, दहशतवाद, अपुरा निधी आणि तांत्रिक मर्यादा यामुळे कामाचा वेग अपेक्षेइतका नाही. २०३० पर्यंत निश्चित करण्यात आलेली सर्व उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहाय्य, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि प्रभावी प्रशासनाची गरज आहे. आतापर्यंत सुमारे ३० दशलक्ष हेक्टर जमिनीचे पुनरुज्जीवन झाले असले, तरी संपूर्ण उद्दिष्टाच्या तुलनेत हा प्रवास अद्याप अपूर्ण आहे. तरीदेखील या योजनेचे महत्त्व तिच्या अपूर्णतेत नाही, तर विचारात आहे. हवामानबदलाशी लढण्यासाठी केवळ कार्बन उत्सर्जन कमी करणे पुरेसे नाही, तर नैसर्गिक संसाधनांचे पुनरुज्जीवन, शाश्वत शेती, जलसंधारण आणि स्थानिक अर्थव्यवस्थेचे सक्षमीकरण यांचा समन्वय आवश्यक आहे. ‘ग्रेट ग्रीन वॉल’ ही त्याच व्यापक विचाराची प्रत्यक्ष अंमलबजावणी आहे. भारतासाठीही हा अनुभव अत्यंत महत्त्वाचा आहे.

कृतीवर भर हवा

भारतात राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि दख्खन पठारातील अनेक भागांमध्ये जमिनीचा ऱ्हास आणि पाण्याची टंचाई गंभीर होत आहे. हिमालयीन प्रदेशात हिमनद्या वितळत आहेत, तर किनारपट्टीवर समुद्रपातळी वाढीचा धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत पर्यावरण संरक्षणाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवण्याची वेळ आली आहे. भारतात गुजरातपासून हरियाणापर्यंत प्रस्तावित हरित भिंत ही सकारात्मक सुरुवात मानावी लागेल; मात्र ती केवळ वृक्षलागवडीपुरती मर्यादित राहू नये. जलसंधारण, मृदसंवर्धन, स्थानिक वनस्पतींचे जतन, जैवविविधतेचे संरक्षण आणि ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग यांचा त्यात समावेश असला पाहिजे. अन्यथा, अशा योजना केवळ सरकारी अहवालांमधील आकडे बनून राहतील. आज विकसित देश हवामानबदलावर मोठमोठ्या घोषणा करतात; परंतु प्रत्यक्षात कार्बन उत्सर्जन कमी करण्याबाबत त्यांची गती अपेक्षेइतकी नाही. वित्तपुरवठ्याची आश्वासनेही अनेकदा कागदावरच राहतात. अशा परिस्थितीत तुलनेने कमी संसाधने असलेल्या आफ्रिकन देशांनी कृतीवर भर दिला, ही बाब जगासाठी प्रेरणादायी आहे. पर्यावरण संवर्धनासाठी संपत्तीपेक्षा दृढ राजकीय इच्छाशक्ती, लोकसहभाग आणि दीर्घकालीन नियोजन अधिक महत्त्वाचे असते, हे त्यांनी सिद्ध केले आहे.

वातावरणाला सीमा नसतात

हवामानबदल हा कोणत्याही एका देशाचा प्रश्न नाही. वातावरणाला सीमा नसतात. एका देशातील जंगलतोड, प्रदूषण किंवा कार्बन उत्सर्जनाचा परिणाम अखेर संपूर्ण पृथ्वीवर होतो. त्यामुळे या संकटावर उपाय शोधताना जागतिक सहकार्य अनिवार्य आहे; परंतु त्या सहकार्याची सुरुवात प्रत्येक देशाच्या स्थानिक कृतीतूनच व्हावी लागेल. ‘ग्रेट ग्रीन वॉल’ याच विचाराचे प्रतीक आहे. आज जगाला घोषणांपेक्षा कृतीची गरज आहे. परिषदांपेक्षा प्रत्यक्ष काम महत्त्वाचे आहे. हवामानबदलाशी सामना करण्यासाठी वृक्षलागवड, जलसंधारण, जैवविविधतेचे संरक्षण, शाश्वत शेती आणि लोकसहभाग या पाच आधारस्तंभांवर विकासाचे नवे मॉडेल उभे करावे लागेल. आफ्रिकेने त्या दिशेने पहिले पाऊल टाकले आहे. पर्यावरणाचा प्रश्न हा भविष्यातील नसून वर्तमानाचा आहे. पुढील पिढ्यांना राहण्यायोग्य पृथ्वी द्यायची असेल, तर निसर्गाशी संघर्ष नव्हे, तर सहजीवन स्वीकारावे लागेल. आफ्रिकेची हरित भिंत हा केवळ एक पर्यावरणीय प्रकल्प नाही, तर विकास, लोकसहभाग आणि शाश्वत भविष्यासाठीची जागतिक चळवळ आहे. तिचे अनुकरण करणे ही आज प्रत्येक देशाची, प्रत्येक समाजाची आणि प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. कारण पृथ्वी वाचली तरच विकास टिकेल आणि विकास टिकला, तरच मानवजातीचे भविष्य सुरक्षित राहील. हवामानबदलाच्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी आता घोषणांपेक्षा कृतीची गरज आहे. वृक्षलागवड, जलसंधारण, जैवविविधतेचे संरक्षण, शाश्वत शेती आणि स्थानिक समुदायांचा सहभाग या सर्व बाबी एकत्रितपणे राबवल्या तरच भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित पृथ्वी निर्माण करता येईल.

‘ग्रेट ग्रीन वॉल’ हा केवळ आफ्रिकेचा प्रकल्प नाही. या प्रकल्पाने संपूर्ण मानवजातीला संदेश दिला आहे, की निसर्गाचे पुनरुज्जीवन हेच भविष्यातील विकासाचे खरे मॉडेल आहे. आज जगासमोर उभे असलेले सर्वात मोठे आव्हान म्हणजे हवामानबदल. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी सीमा, भाषा आणि राजकीय मतभेद यापलीकडे जाऊन सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. आफ्रिकेच्या हरित भिंतीने हे सिद्ध केले आहे, की योग्य दिशा, दीर्घकालीन दृष्टी आणि लोकसहभाग यांच्या बळावर अशक्य वाटणारी उद्दिष्टेही साध्य होऊ शकतात. आता प्रश्न एवढीं५ राच आहे की, जग या प्रेरणेतून किती शिकते आणि कृतीत किती उतरवते.

- मिलिंद बेंडाळे

एक त्रस्त शेतकरी..

रोज उत्पन्न वाढेल या आशेवर कोणी काय सांगेल ते प्रयोग करून अंगावर कर्ज वाढवून ठेवायचे काम शेतकऱ्यांकडून चालू आहे. आज यश मिळेल, उद्या नफा होईल हे केले तर पान रूंद होतात, ते केले तर पांढऱ्या मुळ्या सुटतात, अमुक फवारणी केली की वजन वाढते अमुक खते घेतली की फुटवे चांगले निघतात. सगळे शेतकऱ्यांची फसवणूक करून पैसे कमावणारेच रास्तभाव, हमीभाव, एम एस पी स्वामीनाथन रंगनाथन ही मागणी केली की योग्य दर मिळेल तो आयोग लागू झाला पाहिजे. मग, उत्पन्न दिडपट मिळेल असे ऐकून दरवर्षी अनुभव घेत देत फक्त कर्ज वाढत गेले. खरंच किती वर्षे हे प्रयोग करत जायचे?

एक एक प्रयोग फेल गेला की, नशीबाला दोष देत एक एक वावर कधी विकले कळालच नाही. कर्ज काढून पाण्यासाठी पाईपलाईन केली. घरच औत असल तर नांगरट चांगली होते. ट्रॅक्टर घेतला, शेणखतासाठी जनावर केली. शेतीला जोडधंदा असावा म्हणून कोंबड्या शेळ्या कर्ज काढून घेतली. कुणी सांगितले, शेततळे काढा, कुणी सांगितले ड्रिप करा, मिरची लावा, कापूस लावा, भुईमुंग लावा, धान लावा, सोयाबिन लावा, द्राक्षे लावा, केळी लावा, डाळींब लावा, पपई लावा, वांगी लावा..सगळे उद्योग थांबले फक्त वाढले ते कर्ज!!! सरकारकडून मिळाली सवलत फसवी.

दररोज चारा घालून वाढवलेल्या बोकडावर जसे कापण्यासाठी अंगावर मांस वाढण्याची वाट पाहात सांभाळले जाते. तसे शेतकऱ्यांना बघण्याची सगळ्यांची दृष्टी खतवाला, औषधवाला, बँकवाला, सावकार, आडत्या, साखर कारखानदार, दुध संघवाला सगळे शेतकऱ्यांची कापायला येण्यापुरतीच मदत.

शेतकरी मोठा व्हावा ही कोणाचीच इच्छा नाही बोकडाला जसे मालकाची आपल्यावर मर्जी आहे, वाटून उड्या मारत जगत असते आणि शेवटी कळते याने आपल्याला का सांभाळले. तसे वेळ गेल्यावर कळते शेतकऱ्याला उत्पादन वाढवायला का सांगितले ते वर्षातून तीन तीन पीके घेऊन पाणी पाजून पाजून खत घालून घालून शेती नापीक होते तरी पण प्रयोग कांही थांबत नाहीत. ज्याला त्याला विचारलेत तर म्हणतोय घरची शेती आहे पडीक पाडायची काय? आणि पळून पळून प्रयत्न करून उत्पन्न डब्बल करायच्या नादात कर्ज डब्बल कधी होते कळतच नाही खर आहे रोज होणाऱ्या शेतकरी आत्महत्या आमचे मन सुन्न करीत नाहीत? कुणीही बोलायला तयार नाही.

शेती ही संस्कृती आहे असे ऐकून ऐकून कान पिकले आहेत शेती करणारा शेतकरी तिथेच मातीत गाडला जातो आहे. बापाच्या छातीवर हात ठेवून झोपणाऱ्या मुलांना विचारा एकदा की तू का ठेवतो छातीवर हात? तेंव्हा त्याचे उत्तर येते की बाप जिवंत आहे का? हे चेक करावे म्हणून ठेवावा लागतो हात! भयाण आहे हे सर्व आमच्या शेतीची पार वाट लावून टाकली इथल्या राजकीय सत्तेने!

शेतीवर कविता करणारे छान जगतात..शेतीवर कादंबरी लिहिणारे खुशाल जगतात..

शेतकरी आत्महत्या वर पुस्तक लिहिणारे सुद्धा मजेतच असतात..शेती कशी करावी हे सांगणारे तर अधिकच मजेत आहेत..प्रत्यक्ष शेतीत राबणारा जीव मात्र कासाविस होतो आहे..त्याला त्याच्या प्रश्नांचे उत्तर ही शोधू दिले जात नाही.

साभार व्हाट्स ॲप

भाजपचे बुडते जहाज

राजकारणात एक गंमतीशीर नियम आहे. जहाज बुडायला लागले की सर्वात आधी उंदीर पळतात; पण त्याआधी काही जण कप्तानाला सांगतात, ‘साहेब, जहाज बुडत नाहीये फक्त समुद्र थोडा वर आला आहे!’ आज भाजपच्या राजकीय परिस्थितीकडे पाहिले की टायटॅनिकची आठवण होते. काही वर्षांपूर्वी हे जहाज विकासाचा फुगा, राष्ट्रवादाचा वारा आणि मजबूत नेतृत्वाचे इंजिन घेऊन इतक्या वेगाने धावत होते की, विरोधकांनी दूरूनच हात टेकले होते. पण आता प्रश्न असा आहे. जहाज पुढे जाते की फक्त हॉर्न वाजतोय? २० जुलैच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने सरकारसमोर मोठे आव्हान उभे केले आणि शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी तीव्र झाली. त्यानंतर धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा आला. म्हणजे कप्तान माईकवरून म्हणत होता, ‘सगळे नियंत्रणात आहे,’ आणि इंजिनरूममधून आवाज आला. ‘साहेब, मी राजीनामा देतो!’ यापेक्षा राजकीय कॉमेडी काय असणार? त्यानंतर अयोध्येतील राम मंदिराच्या चढाव्याशी संबंधित कथित गैरव्यवहाराच्या प्रकरणाने भाजपच्या राजकीय प्रतिमेलाच प्रश्न विचारला. आरोप सिद्ध झाले आहेत असा निष्कर्ष काढणे योग्य नाही; तपास आणि कायदेशीर प्रक्रिया महत्त्वाची आहे. पण ज्या राम मंदिराचा राजकीय प्रवासात मोठा भावनिक आधार घेतला गेला, त्याच मंदिराशी संबंधित नकारात्मक बातमी आली की त्याचा राजकीय परिणाम होणारच.



प्रतिमा काचेसारखी असते. एकदा तडा गेला की आरसा कितीही महाग असला तरी तडा दिसतोच. त्यात सामान्य माणसाच्या आयुष्यातला सर्वात मोठा प्रश्न आहे. टीव्हीवर दिवसभर राष्ट्रवाद, हिंदुत्व, पाकिस्तान, काँग्रेस, शिवसेना आणि मोदींवर चर्चा चालते; पण सामान्य माणूस बाजारात जातो तेव्हा त्याचा प्रश्न साधा असतो ‘आज पुन्हा किती महाग झाले?’ भाजीचा भाव, किराणा, पेट्रोल-डिझेल, शिक्षण, आरोग्य आणि घरखर्च यांचे गणित जुळवताना भाषणांपेक्षा महिन्याच्या शेवटी आलेले बिल जास्त बोलते. भाजपचा मित्रपक्षांबाबतचा इतिहास पाहिला तर आणखी एक मनोरंजक प्रश्न निर्माण होतो. आजचा मित्र उद्याचा विरोधक आणि कालचा विरोधक परवा सत्तेचा सहकारी! महाराष्ट्रात तर इतके राजकीय प्रयोग झाले की मतदाराला आता जाहीरनाम्यापेक्षा ‘उद्या कोण कोणासोबत?’ याची यादी हवी! त्यामुळे जहाजातील काही प्रवासी लाइफबोट कुठे ठेवली आहे, याचा अंदाज घेत असतील तर आश्चर्य वाटायला नको. त्यात आता आणखी एक प्रश्न चर्चेत येतो. मोदींनंतर कोण? हा प्रश्न विरोधकांनी विचारला तर राजकीय आरोप; पण पक्षाच्या राजकीय वर्तुळातच उत्तराधिकारीची नावे चर्चेत आली तर त्याचा अर्थ वेगळा. जहाज अजून बुडालेले नाही; पण प्रवाशांनी ‘कॅप्टन बदलला तर?’ असा विचार सुरू केला, तर समुद्र शांत नाही हे नक्की.

८०व्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणातील ‘दिमागी नक्सल’ या शब्दप्रयोगानेही राजकीय चर्चेला नवा विषय दिला. विरोधकांनी टीका केली. समर्थकांनी बचाव केला आणि सोशल मीडियाने त्यावर मीम्सचा पाऊस पाडला. म्हणजे जहाजाला पाणी आतून येते की बाहेरून, यावर चर्चा सुरू असताना सोशल मीडिया मात्र डेकवर डान्स करत आहे! आणि या सगळ्यात काँग्रेसची अवस्था पाहिली की हसूही येते आणि वाईटही वाटते. समोरच्या जहाजाला भगदाड पडलेले दिसत असताना काँग्रेस किनाऱ्यावर उभी राहून ओरडते ‘पाहा! भाजपचे जहाज बुडतेय!’ मतदार विचारतो ‘ठीक आहे पण तुमची नाव कुठे आहे?’ कारण सत्ता फक्त विरोधकाच्या चुका मोजून मिळत नाही; त्यासाठी स्वतःची दिशा, नेतृत्व, संघटन आणि पर्याय दाखवावा लागतो.

भाजप खरंच बुडते आहे का? आजच अंतिम निकाल देणे घाईचे ठरेल. पण जहाजावर तडे गेले आहेत, प्रवाशांमध्ये कुजबुज वाढली आहे आणि पुढच्या प्रवासाबद्दल प्रश्न निर्माण झाले आहेत, हे नाकारता येणार नाही. राजकारणात जहाज बुडते ते एका दिवसात नाही पहिल्यांदा तडा जातो, नंतर पाणी शिरते, मग कप्तान परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगतो, त्यानंतर प्रवासी एकमेकांकडे पाहतात आणि शेवटी लाइफबोट कोणाकडे आहे, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. भाजपच्या जहाजाची पुढची दिशा काळ ठरवेल; पण सध्या राजकीय समुद्रात एकच चर्चा रंगली आहे ‘टायटॅनिक अजून तरंगत आहे खरे पण भगदाड बुजवायला इंजिनियर कोण आणणार?’

ॲड. धनंजय देशमुख
मो.९२८४३८२१०२

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

निवासी शाळे'च्या नावाखाली मतिमंद मुलांचा कोंडवाडा!

संजीवनी मतिमंद निवासी शाळेतील विदारक परिस्थितीचा आरोप, स्वच्छतागृह, स्वयंपाकघर, वर्गखोल्या अन् निवास व्यवस्थेचा बोजवारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २२ : सरकारकडून शंभर टक्के अनुदान घेणाऱ्या दिव्यांग निवासी शाळेतच मतिमंद विद्यार्थ्यांच्या मूलभूत सुविधांची उपेक्षा होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. पांढरकवडा बायपासलगत उड्डाणपुलाच्या परिसरात असलेल्या संजीवनी मतिमंद निवासी शाळेतील कथित गैरव्यवस्थेमुळे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता व आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

आसमा बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून चालविण्यात येत असलेल्या या शाळेवर दिव्यांग कल्याण विभागाच्या माध्यमातून शासनाकडून अनुदान दिले जाते. विद्यार्थ्यांना पोषण आहार, शिक्षण, निवास, स्वच्छता आणि आवश्यक सुविधा देणे संस्थेची जबाबदारी असताना प्रत्यक्ष परिस्थिती मात्र याच्या पूर्णपणे उलट असल्याचे आरोप आहेत. विद्यार्थ्यांच्या ताटातील पोषण आहारापासून त्यांच्या निवासापर्यंत गैरव्यवस्थेचा कळस गाठल्याची चर्चा आहे. शाळेतील स्वच्छतागृहांची अवस्था समाधानकारक नसल्याचे, स्वयंपाकघर योग्य पद्धतीने सुसज्ज नसल्याचे तसेच शिक्षणासाठी आवश्यक वर्ग खोल्यांची ही कमतरता असल्याचे सांगितले जाते. अनेक विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी अत्यंत दाटीवाटीने ठेवले जात असल्याने ही निवासी शाळा आहे की दिव्यांग विद्यार्थ्यांचा 'कोंडवाडा', असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. गडचिरोलीतील आश्रमशाळेतील गंभीर घटनेनंतर शासन यंत्रणा जागी झाली असताना, यवतमाळ शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या या निवासी शाळेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. समाजकल्याण विभागाने तातडीने शाळेची अचानक पाहणी करून विद्यार्थ्यांचा आहार, उपस्थिती, निवास व्यवस्था, स्वच्छता, शैक्षणिक सुविधा, शासन अनुदानाचा वापर आणि कर्मचारी व्यवस्था यांची सखोल तपासणी करावी. दोष आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. विद्यार्थ्यांच्या हक्काच्या सुविधांमध्ये कोणताही गैरप्रकार होत असल्यास त्याचा पर्दाफाश करण्याची गरज आहे.

तपासणीला मज्जाव 'राजकीय दबावाची चर्चा

शाळेची प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना तसेच पत्रकारांना परिसरात प्रवेश देण्यास मज्जाव केला जात असल्याचे आरोप आहेत. चित्रीकरण करू नका, परिसरात थांबू नका, अशी तंबी देण्यात येत असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, राजकीय पाठबळ असलेल्या व्यक्तींचे नाव पुढे करून अधिकारी किंवा चौकशीसाठी येणाऱ्यांवर दबाव आणला जात असल्याचीही चर्चा आहे.

डॉक्टर हल्ल्याचे आरोपी अजूनही मोकाट..! पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

सोमवारपासून बेमुदत आंदोलनाचा जनआंदोलन संघर्ष समितीचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

महागाव, दि. २२ : ग्रामीण रुग्णालयात कर्तव्य बजावत असलेल्या वैद्यकीय अधिकारी डॉ. दिक्षा किशोर मुजमुले, परिचारिका पूनम नामदेव कोकरे तसेच वॉर्ड बॉय अर्जुन राठोड व प्रशिक काळबांडे यांच्यावर झालेल्या कथित प्राणघातक हल्ल्याला ७२ तास उलटूनही आरोपी पोलिसांच्या हाती लागले नसल्याने महागाव तालुक्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोपी अद्याप मोकाट असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

रात्रीच्या वेळी रुग्णासह दहा ते बारा जणांनी ग्रामीण रुग्णालयात धुडगूस घालत तोडफोड केली आणि डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांवर हल्ला केल्याचा आरोप आहे. जीवाच्या भीतीने डॉक्टरांना टॉयलेट-बाथरूममध्ये लपावे लागल्याचे सांगितले जात असल्याने या घटनेची गंभीरता अधिक वाढली आहे. दरम्यान, 'जन आंदोलन आधार संघर्ष समिती'ने या घटनेची गंभीर दखल घेत प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. रविवारपर्यंत सर्व आरोपींना अटक न झाल्यास सोमवारपासून बेमुदत आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे यांनी दिला. शासकीय रुग्णालयात डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांनाच सुरक्षितता मिळत नसेल, तर सामान्य नागरिकांच्या सुरक्षेचे काय, असा सवाल नरवाडे यांनी उपस्थित केला. पोलिसांनी तपास युद्धपातळीवर करून आरोपींच्या मुसक्या आवळाव्यात, अन्यथा प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

बेंबळा धरणाच्या विसर्गाने ३ हजार एकर शेती बाधित..!

शेतकऱ्यांना हेक्टरी ७५ हजारांची नुकसानभरपाई द्या

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २२ : बेंबळा धरणाचे तब्बल २० दरवाजे एकाच वेळी उघडल्याने मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग झाला. त्यामुळे बाबूळगाव तालुक्यातील नांदुरा, नांदे, सावंगी, वाटखेड, हस्तापूर, वाटखेड खुर्द, वाटखेड बुद्रुक, पालोती, प्रतापपूर, कानगोवकुळ, खडकसावंगा व पिंपळशेंडा परिसरातील सुमारे ३ हजार एकर शेती बाधित होऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचा आरोप आम आदमी पक्षाने केला आहे.

पुराच्या पाण्यामुळे उभी पिके, सुपीक माती, पाणी मोटारी, पाइपलाइन तसेच अन्य शेती साहित्याचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. धरणाचे दरवाजे उघडण्यापूर्वी संभाव्य शेती नुकसानीचा विचार करण्यात आला होता का, पाण्याचा विसर्ग किती होता आणि दरवाजे किती काळ उघडे ठेवण्यात आले, याची सखोल चौकशी करण्याची मागणी पक्षाने केली आहे. बाधित सर्व गावांमध्ये तातडीने शेतनिहाय पंचनामे करून पीक, सुपीक माती, विहीर, पंप, पाइपलाइन व इतर नुकसानीची नोंद घ्यावी. सुमारे ३ हजार एकर क्षेत्राचे विशेष सर्वेक्षण करून बाधित शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ७५ हजार रुपये तातडीची नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच विसर्गाची अधिकृत माहिती सार्वजनिक करून निष्काळजीपणा आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्यात आले असून, बेंबळा प्रकल्प विभागालाही प्रत देण्यात आली. शेतकऱ्यांना तातडीने न्याय न मिळाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आपतर्फे देण्यात आला. यावेळी जिल्हा समन्वयक मोबीन शेख, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत देवकते, जिल्हा आरटीआय प्रमुख अविनाश धनेवार, शहर समन्वयक आकाश चमेडीया, गुणवंत इंदूरकर, शुभम चांदेकर, तालुका महिला अध्यक्ष उषा श्रीराम, उमरखेड शहर अध्यक्ष बल्लेश्वर टाले आदी उपस्थित होते.

एमपीडीएचा दणका,धोकादायक आरोपी गजानन डहाळेला वर्षभर कारागृहात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

उमरखेड, दि. २२ : शहरातील वारंवार गुन्हे करून कायदा-सुव्यवस्थेला बाधा निर्माण करणाऱ्या रेकॉर्डवरील धोकादायक आरोपी गजानन अशोक डहाळे (वय २६, रा. गोचरस्वामी वॉर्ड, उमरखेड) याच्याविरुद्ध उमरखेड पोलिसांनी केलेल्या एम.पी.डी.ए. प्रस्तावाला जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली आहे. त्यानंतर पोलिसांनी डहाळेला ताब्यात घेऊन पुढील एक वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहात रवाना केले.

ईद-ए-मिलाद आणि गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी उमरखेड पोलिसांनी रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती तपासून प्रतिबंधात्मक कारवाईला वेग दिला आहे. समाजासाठी धोकादायक ठरलेल्या डहाळेविरुद्ध एम.पी.डी.ए. कायद्यान्वये प्रस्ताव तयार करून आवश्यक कागदपत्रे व पुरावे जिल्हा दंडाधिकाऱ्यांसमोर सादर करण्यात आले. प्रस्तावाला मंजुरी मिळताच डी.बी. पथकाने कारवाई केली. या कारवाईमुळे 'भाई' किंवा 'डॉन' बनण्याच्या नावाखाली वारंवार गुन्हे करणाऱ्यांना पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे. भविष्यातही सराईत व समाजकंटकांविरुद्ध एम.पी.डी.ए., मोक्का तसेच तडीपारीसारख्या कठोर कारवाया सुरू राहणार असल्याचे ठाणेदार पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांनी स्पष्ट केले. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ व डी.बी. पथकाने केली.

थोडक्यात

जलसंधारणाच्या कार्यक्रमात ठिकाणी घाण कचरा; नागरिकांमध्ये संताप.!

पुसद : माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीचे अवचित्त साधून महाराष्ट्र शासनाने २१ ऑगस्ट हा जलसंधारण दिन म्हणून घोषित केला आहे. व संपुर्ण महाराष्ट्रातील शासकीय व निमशासकीय कार्यालयाने चांगला करण्याचा निर्णय घेतल्यामुळे सगळीकडे स्व. सुधाकरराव नाईक यांची जयंती ही जलसंधारण दिन म्हणून चांगला करण्यात आली आहे. यास पार्श्वभूमीवर आज २१ ऑगस्ट उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोरील यशवंत स्टेडियम येथे स्व. माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांची जयंतीनिमित्त जलसंधारण दिन हा विविध शासकीय कार्यालय व शाळा,कॉलेज मार्फत चांगला करण्यात आला, परंतु या ठिकाणी सर्व विद्यार्थी व कर्मचारी यांना काही बिस्कीट पुडे व इतर चायनीजचे पुढे वाटण्यात आले होते. ते कर्मचारी व अधिकारी तसेच सुज्ञ लोकांनी हे पुढे खाऊन यशवंत स्टेडियम येथे सर्वत्र कचरा टाकून घाण करण्यात आली,आणि तो कचरा कोणीही पुढाकार घेऊन साफ केलेला नाही.त्यामुळे या स्टेडियम मध्ये येणाऱ्या क्रीडाप्रेमी व पाई फिरणाऱ्या जेष्ठ नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे. स्वच्छ व निर्मळ शहर ठेवणे हे प्रत्येक सुज्ञ नागरिकांची जबाबदारी आहे,त्यामुळे हा केलेला कचरा साफ करण्याची जबाबदारी नेमकी कुणाकडे आहे असा प्रश्न काही सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे.

कवितांच्या बहुरंगी मैफलीने यवतमाळकर रसिक मंत्रमुग्ध

यवतमाळ : देशभक्तीपासून विरहापर्यंत, नात्यांच्या भावबंधांपासून सामाजिक वास्तवापर्यंत आणि निसर्गापासून पर्यावरण संवर्धनापर्यंत विविध विषयांवरील प्रभावी कवितांनी यवतमाळकर रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. विदर्भ साहित्य संघ, शाखा यवतमाळच्या वतीने आयोजित पहिल्या कविसंमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देवेंद्र जोशी यांच्या 'ने पवनाने...' या कवितेने संमेलनाची सुरुवात झाली. विद्या खडसे, कविता शिरभाते, कल्याणी मादेश्वार, श्रेया पाटील, जयंत चावरे, महेश अडगुलवार, डॉ. ललिता घोडे, स्मिता भोईटे, हितेश राठोड, बाबा देशपांडे, हितेश शृंगारे आदी कवींनी विविध सामाजिक व भावनिक आशयाच्या कविता सादर केल्या. अर्चना वासेकर यांच्या 'जीवनगाणे'ने भावविश्वाला स्पर्श केला. संतोष इसनकर यांच्या मृत्यूविषयक कवितेने रसिकांना अंतर्मुख केले, तर डॉ. स्वप्नील मानकर यांच्या वऱ्हाडी शैलीतील कवितांनी हास्याची उधळण केली. नीलकृष्ण देशपांडे यांच्या स्त्रीजन्माच्या व्यथेवरील कवितेने संमेलनाचा भावपूर्ण समारोप झाला.

कार्यक्रमात डॉ. रमाकांत कोलते, विवेक कवठेकर यांच्यासह साहित्यिकांची उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. सतपाल सोवळे, सूत्रसंचालन चंद्रशेखर तिखे यांनी केले. रसिकांचा प्रतिसाद यवतमाळच्या साहित्यविश्वातील नव्या पर्वाची आश्वासक नांदी ठरला.

झरी ते माथार्जुन रस्त्याच्या दोन्ही बाजूंना जीवघेणे खड्डे..! अपघाताचा धोका

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

झरी, दि. २२ : झरीपासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर झरी ते माथार्जुन मार्गाच्या दोन्ही बाजूंना मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. रस्ता अरुंद असून दोन्ही बाजूंना पडलेल्या खड्ड्यांमुळे चारचाकी तसेच दुचाकी वाहनांना अपघाताचा धोका वाढला आहे. या समस्येबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला माहिती देण्यात आली असता, झरी ते पांढरकवडा हा रस्ता पुसद सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येत असल्याचे सांगण्यात आले.

संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. मात्र, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पडलेले खड्डे तातडीने बुजवून तसेच खड्डे बुजेपर्यंत वाहनचालकांना धोक्याची सूचना मिळावी यासाठी मोठ्या खड्ड्यांच्या ठिकाणी धोक्याचे सूचना फलक अथवा रेडियम पट्ट्या लावण्यात याव्यात, अशी मागणी तालुका काँग्रेस कमिटीचे सचिव सुरेंद्र महादेवराव गेडाम यांनी केली आहे. यावेळी आदिवासी टायगर सेनेचे पवन कुळसंगे उपस्थित होते. संबंधित विभागाने या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

पुस नदीवरील अपूर्ण पूल बनला जीवघेणा..!

कंत्राटदारासह अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. २२ : पुसद-दिग्रस-यवतमाळ राज्य महामार्गावरील पुस नदीवर उभारण्यात येत असलेल्या अपूर्ण पुलावरील सुरक्षेचा अभाव आणि पुलाला जोडणाऱ्या रस्त्यातील सुमारे एक फुटाची जीवघेणी तफावत एका तरुणाच्या जीवावर बेतण्याची वेळ आली आहे. या गंभीर प्रकाराला सार्वजनिक बांधकाम विभागाचा निष्काळजी कारभार जबाबदार असल्याचा आरोप करत संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

शिवाजी वॉर्ड, पुसद येथील प्रीतम दीपक पवार (वय २८) हे १९ ऑगस्ट रोजी रात्री साडेअकरा ते मध्यरात्रीच्या सुमारास होंडा ॲक्टिव्हा (एमएच-२९, १६९०) वरून घरी परतत होते. यावेळी पुस नदीवरील अपूर्ण पुलावर पुलाची उंची आणि जोडरस्त्यातील सुमारे एक फुटाची तफावत त्यांच्या लक्षात आली नाही. दुचाकी जोराने त्या तफावतीवर आदळल्याने पुढील चाकाची रिंग मोडून वाकली आणि प्रीतम पुलावर फेकले गेले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांच्यावर उपचार सुरू असून ते मृत्यूशी झुंज देत आहेत. विशेष म्हणजे, या ठिकाणी रात्रीच्या वेळी प्रकाश व्यवस्था, रेडियम ब्लिंकर, धोक्याचा इशारा देणारे फलक अथवा वाहनांना अडविण्यासाठी आवश्यक सुरक्षा बॅरिकेड्स नसल्याचा आरोप आहे. त्यामुळे बांधकाम स्थळी मूलभूत सुरक्षा उपायांचा अभाव स्पष्ट होत असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. नगरसेवक राजेश मल्हारी साळुंके आणि जखमी प्रीतम यांच्या आई योगिता दीपक पवार यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे पत्र देऊन संबंधित कंत्राटदार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जबाबदार अभियंत्यांवर तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. बांधकामातील हलगर्जीपणामुळे आणखी किती जीव धोक्यात गेल्यानंतर प्रशासन जागे होणार?, असा संतप्त सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

गाडीवर लिफ्ट मागून रात्रीला लुटणारा चोरटा अटक.!

जीवे मारण्याची धमकी देत नगदी १० हजाराच्या मुद्देमालाची लुटमार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. २२ : येथिल बसस्थानकावरून मध्यरात्रीच्या सुमारास राहत्या घरी जाण्यासाठी निघालेल्या एका प्रवाशाला लिफ्ट देण्याच्या बहाण्याने दुचाकीवर बसवून बेदम मारहाण करून लुटल्याची गंभीर घटना घडली आहे. जिवाने मारण्याची धमकी देत १० हजार रुपयांचा मुद्देमाल हिसकावून पसार झाला होता.

त्या दरोडेखोराचा वसंतनगर पोलिसांनी अवघ्या काही तासांत शोध घेत त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत. सुमित दामोदर चव्हाण (वय २०, रा. बालाजी पार्क, कवडीपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. वसंतनगर पोलिस ठाण्याच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रकाश हे अमरावती येथून पुसदला बसने आले होते. त्यानंतर बसस्थानकातून बाहेर येऊन ते त्यांच्या राहत्या घरी, अश्वीनपूर तांडा येथे जाण्यासाठी वाहन शोधत होते. अशावेळी सुरेश हॉटेलसमोर एका अनोळखी स्कुटीचालकाने अश्वीनपूर तांडा येथे सोडण्याचे सांगितले होते. त्यानंतर स्कुटीवर बसून विठाळा वार्ड येथील जिओ पेट्रोल पंपावर प्रकाशकडून शंभर रुपयांचे पेट्रोल भरून मागितले होते. प्रकाशने शंभर रुपयांचे पेट्रोल भरून दिले होते. पेट्रोल भरून अश्वीनपूर तांडा येथे जात असताना आरोपीने स्कुटी थांबवली. त्यानंतर प्रकाशला खाली पाडून लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच, 'तुझ्याजवळील सर्व पैसे दे. नाहीतर तुला जिवाने मारून टाकीन,' अशी धमकी दिली होती. घाबरलेल्या प्रकाशने खिशातील हजार रुपये व नऊ हजार रुपये किंमतीचा मोबाइलही दिला. आरोपीला अटक करून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन वर्षांपासून प्रलंबित गोठा अनुदानासाठी तातडीने कार्यवाहीचे निर्देश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

झरी, दि. २२ : तालुक्यातील मुकुटबन येथील दिव्यांग लाभार्थी संभा गोविंदा पारशिवे आणि विजय पिंपळखेडे यांना गोठा बांधकामाचे प्रलंबित अनुदान तातडीने अदा करण्याचे निर्देश विधान परिषद सदस्य तथा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी दिले आहेत.

याबाबत कडू यांनी झरी जामणी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना पत्र दिले आहे. पत्रानुसार, संबंधित दोन्ही लाभार्थी सुमारे दोन वर्षांपूर्वी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत गोठा बांधकामासाठी मंजूर अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. अनुदान मिळण्यापूर्वी लाभार्थ्यांनी कर्जरूपाने पैशांची व्यवस्था करून गोठ्यांचे बांधकाम पूर्ण केले. मात्र, बांधकाम पूर्ण होऊन दोन वर्षांचा कालावधी उलटूनही त्यांना अद्याप अनुदान मिळालेले नाही. दोन्ही अर्जदार आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून, त्यापैकी संभा पारशिवे हे दिव्यांग असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. उसनवार घेतलेल्या पैशांची परतफेड कशी करावी, हा गंभीर प्रश्न लाभार्थ्यांसमोर निर्माण झाला असल्याने या प्रकरणात तातडीने कार्यवाही करण्याची मागणी कडू यांनी केली आहे. प्रलंबित अनुदान अदा करून कार्यवाहीचा अहवाल सादर करावा, असे निर्देश त्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत.

टाकळीच्या माजी विद्यार्थ्याचा शाळेत गौरव

झरी, दि. २२ : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरलेल्या टाकळी जि.प. वरिष्ठ प्राथमिक शाळेचे माजी विद्यार्थी तेजस मोहन बुर्रेवार यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तेजस हे सध्या रशियात वैद्यकीय शिक्षण घेत असून, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा गौरव शाळेने केला. सत्काराला उत्तर देताना त्यांनी कठोर परिश्रम, जिद्द, सातत्य आणि गुरुजनांसह आई-वडिलांच्या आशीर्वादामुळे हे यश मिळाल्याचे सांगितले. मुख्याध्यापक अनिल चिंतकुंटलावार यांनी जिद्द, चिकाटी, सातत्य व संस्कार हे यशाचे खरे आधार असल्याचे प्रतिपादन केले. तेजस यांना शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रविण चौधरी यांनी, तर आभार माधव भिडकर यांनी मानले. यानंतर तेजस यांच्या वतीने विद्यार्थ्यांना पेन व खाऊचे वाटप करण्यात आले.

मातोश्री शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. पुसद र.नं. १३५
रजि. नं.वाय. एम. एल. (वाय.एम.एल.) आर.एम. आर. (सी. आर.) १३५/२०१८-१९
कार्यालय प्लॉट नं. २५ दत्तमंदिरासमोर, मोतीनगर पुसद जि.यवतमाळ -४४५२०४

जा.क्र.५/२६ दिनांक - २०/०८/२०२६

*** वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ***

मातोश्री शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारीपतसंस्था मर्या, पुसद, रनं. १३५ या पतसंस्थेच्यासभासदांची **८वी वार्षिक सर्वसाधारण** सभा **शनिवार** दि. **०५/०९/२०२६** रोजी स्थळ पतसंस्थेचे कार्यालय,मोतीनगर, पुसद येथे वेळ **सकाळी ११.३० वाजता** खालील विषयांवर विचार विनिमय आणि ठराव संमत करण्यासाठी आयोजीत केली आहे. तरी संस्थेच्या सन्माननिय सभासदांनी कृपया वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

-: सभे पुढील विषय :-

१) मागील दि. २८/०९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा अहवाल, जमाखर्च, नफातोटा व ताळेबंदास मंजूरात देणे.
३) सन २०२५-२६ चे ऑडीट वाचन करणे व दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
४) सन २०२६-२७ चे खर्चाचे अंदाजपत्रकास आणि मागील मंजूरीपेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरात देणे.
५) संचालक मंडळाचे शिफारशी नुसार २०२५-२६ चे नफा विभागणीस मंजूरात देणे.
६) संस्थेच्या उपविधीमधील प्रस्तावित पोटनियम दुरुस्तीस मंजुरात मिळणेबाबत.
७) सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे,
८) मा. अध्यक्ष महोदयांच्या पूर्व परवानगीने वेळेवर येणारे विषय.

गजानन दळवी
सचिव

टिप: १) सभासदांना संस्थेच्या कामकाजाविषयी व सभेतील विषयांचे अनुषंगाने काही माहिती विचारावयाची असल्यास सभेच्या तारखेच्या पाच दिवस अगोदर लेखी स्वरुपात कार्यालयास कळवावे म्हणजे त्यानुसार माहिती काढून सभेत सादर करणे शक्य होईल.
२) गणपुर्तीच्या (कोरम) अभावी सभा स्थगीत झाल्यास स्थगीत सभा त्याच ठिकाणी एक तासांनंतर घेण्यात येईल, व सभेत विषय सुचीवरील विषयावर चर्चा होईल, अशा सभेस गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.

दि. २०/०८/२०२६
स्थळ- पुसद

अमरावती विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधांचा विकास व्हावा

दीपक तळवलकर याची राज्यसभा सदस्य डॉ.अनिल बोंडे यांच्याकडे मागणी

अमरावती/का.प्र.

सर्वच बाबतीत मागासलेला विभाग असलेल्या अमरावती विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागपूरच्या तुलनेत पायाभूत सुविधांमधील तफावत दूर करण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे.यासाठी प्रमुख विकास कामें,आपल्या कार्यकाळात अमरावतीसाठीच्या विशेष कृती आराखड्यात समावेश करून पूर्णत्वास नेण्यात यावीत अशी मागणी खापर्डे बगीचा येथील दीपक तळवलकर यांनी राज्यसभा सदस्य डॉ.अनिल बोंडे यांच्याकडे केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सहा महसुली विभागीय मुख्यालयांपैकी एक आणि पूर्व महाराष्ट्रातील विदर्भ क्षेत्रातील केवळ दोन महसुली विभागीय मुख्यालयांपैकी एक असूनही,अमरावतीसाठी आजमितीस केवळ एकुलता एकच प्रमुख चार-पदरी महामार्ग उपलब्ध आहे.नागपूर आणि अमरावती महसुली विभागांमधील पायाभूत सुविधांच्या विकासामध्ये फार मोठी दखलपात्र तफावत निश्चितच आहे आणि त्यामुळेच त्याचा प्रतिकूल परिणाम अत्यंत मागासलेल्या अमरावती विभागाच्या विकासावर होत आहे.त्यामुळे नागपूर ऐवजी अमरावतीमध्ये प्रस्तावित 'ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर' आणि 'फायनान्शियल हब' विकसित करणे आवश्यक आहे; कारण नागपूरमध्ये आधीच 'मिहान', मध्य व दक्षिण-पूर्व रेल्वेचे दोन मंडळ कार्यालये आणि अनेक सरकारी व खाजगी कंपन्यांची विभागीय व विभागीय-क्षेत्रीय कार्यालये अस्तित्वात आहेत.भुसावळ आणि नागपूरच्या अगदी मध्यभागी असल्याने अमरावती (बडनेरा) येथे नवीन 'मध्य रेल्वे मंडळ'स्थापन केले जाऊ शकते; तसेच येथे बडनेरा रेल्वे वॅगन दुरुस्ती कारखाना आणि अमरावती-नरखेड रेल्वे मार्गही उपलब्ध आहे.अमरावती शहरातून समृद्धी आणि प्रस्तावित नागपूर गोवा शक्तीपीठ महामार्गांवर जलद गतीने पोहचण्यासाठी अमरावती-नांदेड चार-पदरी महामार्ग प्रस्तावित आहे, जो कारंजा लाड येथील समृद्धी महामार्ग 'इंटरचेंज-८'वर जोडला जाईल आणि पुढे नांदेडजवळ 'नागपूर-गोवा शक्तीपीठ एक्सप्रेसवे'ला जोडला जाईल.

अमरावती-यवतमाळ चार-पदरी महामार्ग करणे अती आवश्यक आहे, जो समृद्धी महामार्ग 'इंटरचेंज-७' वर जोडला जाईल व पुढे यवतमाळ-हैदराबाद पर्यन्त विस्तारित होईल.बडनेरा विधानसभा सदस्य आ.रवी राणा यांनी मंजूर करून आणलेला अमरावती येथून दस्तूर नगर-हनुमानगढी-भानखेड मार्गे समृद्धी महामार्गाला जोडणारा जोड-रस्ता अत्यंत चुकीचा व निरर्थक आहे.किंबहुना त्यांच्या सर्वच्या सर्व योजना जसे अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची अमरावती शहरापासून १२-१५ किमी दूर जागा व हनुमानगढी, पूर्णपणे तुघलकी असून जनतेच्या पैशाचा चुराडा करणाऱ्या आहेत,त्याला स्थगित करून आळा घालणे अती आवश्यक आहे.अमरावती-अचलपूर-धारणी राज्य महामार्गाचे रुंदीकरण लवकरात लवकर करणे अती आवश्यक आहे.अमरावती-मोर्शी-वरूड-पांढुर्णा राज्य महामार्ग चार-पदरी करणे आवश्यक आहे. नियोजन स्तरावर असलेल्या प्रस्तावित नागपूर-मुंबई बुलेट ट्रेन मार्गावर बडनेरा (अमरावती) स्थानकाचा समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे.

हे निवेदन अमरावती (बडनेरा) येथे नवीन रेल्वे मंडळ कार्यालय स्थापन करण्याच्या प्रस्तावाच्या संदर्भात आहे.अमरावती, बडनेरा आणि नवी अमरावती,अमरावती रेल्वे स्थानकावरून मुंबई, पुणे, सुरत, जबलपूर, नागपूर आणि तिरुपती यांसारख्या ठिकाणांसाठी गाड्यांची वाहतूक होत आहे,बडनेरा जंक्शन रेल्वे स्थानकावरून दररोज ५० हून अधिक मेल-एक्सप्रेस गाड्या विविध ठिकाणांसाठी जातात आणि तिथे थांबतात,याव्यतिरिक्त, नवी अमरावती रेल्वे स्थानक हे अमरावती-नरखेड रेल्वे मार्गावर स्थित आहे. इंदूर-यशवंतपूर, नरखेड-काचीगुडा आणि जयपूर-कुर्नूल यांसारख्या गाड्या या मार्गावरून जातात आणि नवी अमरावती स्थानकावर थांबतात; सध्या या मार्गाचा पूर्ण क्षमतेने वापर होत नाही, बडनेरा येथे रेल्वे वॅगन दुरुस्तीचे कार्यशाळा (वर्कशॉप) देखील उपलब्ध आहे.भुसावळ-ह. निजामुद्दीन (१२४०५/१२४०६) ही गाडी अमरावती-नरखेड मार्गावरून अधिक वारंवारतेने किंवा दररोज चालवता येऊ शकते, ही रेल्वे गाडी अमरावती-नरखेड मार्गे चालवली गेल्यास प्रवाशांचा दीड ते अडीच तासांचा वेळ वाचू शकेल. ही गाडी नागपूर मार्गे चालवण्याची गरज नाही कारण आजमितीस अनेक रेल्वेगाड्या सेवाग्राम-नागपूर मार्गे दिल्लीस जात आहेत. वर नमूद केलेले महत्त्वाचे मुद्दे अमरावती येथे नवीन रेल्वे मंडळ कार्यालय स्थापन करण्याच्या दृष्टीने अत्यंत पूरक असून त्यासाठीच्या प्रस्तावाचे समर्थन करतात. त्यामुळे, लवकरात लवकर अमरावती रेल्वे मंडळ कार्यालयाला मंजुरी घेऊन ते कार्यान्वित करावे, ही नम्र विनंती खापर्डे बगीचा येथील दीपक तळवलकर यांनी केली आहे.

२५ पासून आठवड्यातून चार दिवस उड्डाण भरणार मुंबईचे विमान

विमानसेवेच्या वेळापत्रकात पुन्हा मोठा बदल

अमरावती/का.प्र.

अमरावतीच्या बेलोरा विमानतळावरून मुंबईसाठी विमानसेवेच्या वेळापत्रकात पुन्हा एकदा मोठा बदल करण्यात आला आहे. २५ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत आता आठवड्यातून केवळ चार दिवस अमरावती-मुंबई विमान उड्डाण करणार असल्याची अधिकृत घोषणा महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे केली आहे. एअरलाइन्सच्या अंतर्गत तांत्रिक कारणांमुळे हा बदल करण्यात आला. आता सोमवार, बुधवार, शुक्रवार आणि रविवार या चार दिवशी विमानसेवा उपलब्ध असेल.

नवे वेळापत्रक २५ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधी साठी लागू असणार आहे. ऑक्टोबर महिन्यापासून सणासुदीच्या पार्श्वभूमीवर विमानसेवा पुन्हा पूर्ण क्षमतेने आठवड्यातून ५ ते ६ दिवस सुरू होणार का, याकडे लक्ष लागले आहे.अमरावती आणि परिसरातून मुंबईसाठी विमान प्रवाशांची संख्या सातत्याने भरपूर आणि समाधानकारक राहिली आहे. बेलोरा विमानतळा वरून मिळणारा महसूल आणि प्रवाशांचा प्रचंड प्रतिसाद उत्तम असतानाही केवळ विमान कंपनीच्या तांत्रिक कारणांमुळे सेवा मर्यादित करावी लागत असल्याचे दीपक कपूर यांनी आपल्या ट्विटमध्ये स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता २५ तारखेपासून आठवड्यातून चारच दिवस अमरावतीतून मुंबईसाठी विमान उड्डाण भरणार. प्रवाशांना याकडे लक्ष देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मेळघाटातील जंगल कामगार सोसायट्यांमध्ये नियमभंगाचे आरोप

स्थानिक मजूर सभासद रोजगारापासून वंचित?

मेळघाट/वार्ताहर

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरात आदिवासी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने अनेक वर्षांपूर्वी जंगल कामगार सोसायट्यांची स्थापना करण्यात आली होती. धारणी आणि चिखलदरा या दोन्ही तालुक्यांमध्ये अशा अनेक सोसायट्या कार्यरत असून वन विभागामार्फत वृक्षारोपण, वृक्षतोड, जंगल स्वच्छता आणि इतर वनसंबंधित कामे या सोसायट्यांना दिली जातात. या व्यवस्थेमागील मुख्य उद्देश स्थानिक मजूर सभासदांना नियमित रोजगार उपलब्ध करून देणे हा होता.

सोसायटीमध्ये नोंदणीकृत असलेले मजूर हे त्या संस्थेचे सभासद मानले जातात. शासनाकडून मंजूर होणाऱ्या कामांचा निधी संबंधित सोसायटीकडे वर्ग करण्यात येतो. या निधीतून सचिवांचा मानधन खर्च वजा करून उर्वरित रक्कम मजूर सभासदांमध्ये वाटप केली जाते. तसेच वन विभागाकडून कामाचे आदेश मिळाल्यानंतर संबंधित सोसायटीचे सचिव आणि अध्यक्ष यांनी आपल्या सोसायटीतील सभासदांनाच प्राधान्याने कामावर लावणे अपेक्षित असते.

मात्र, सध्या मेळघाटातील काही जंगल कामगार सोसायट्यांमध्ये नियमांचे उल्लंघन होत असल्याचे आरोप स्थानिक स्तरावरून पुढे येत आहेत. मजूर सभासदांच्या म्हणण्यानुसार, शासनाकडून सोसायटीला काम मंजूर होत असले तरी प्रत्यक्ष कामावर संबंधित सोसायटीतील मजूर अत्यल्प प्रमाणात दिसून येतात. त्याऐवजी बाहेरील मजुरांकडून कामे करून घेतली जात असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

स्थानिकांच्या मते, काही सचिवांकडून स्वतःच्या मर्जीप्रमाणे कामकाज चालवले जात असून अनेक सभासदांना कामापासून दूर ठेवले जात आहे. काही भागांमध्ये वृक्षतोडीसाठी मशिनरीचा वापर केला जात असल्याचेही आरोप आहेत. लाकूड कापण्यासाठी यंत्रांचा वापर तसेच जेसीबीच्या सहाय्याने लाकूड वाहनांमध्ये भरण्याची कामे होत असल्याने स्थानिक मजुरांच्या हाताला मिळणारे रोजगार कमी होत असल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे.

मेळघाटासारख्या आदिवासीबहुल व दुर्गम भागात जंगल कामगार सोसायट्या या केवळ संस्था नसून अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आधार मानल्या जातात. वर्षभर रोजगार मिळेल या अपेक्षेने अनेक मजूर सभासद या सोसायट्यांशी जोडले गेले आहेत. मात्र प्रत्यक्षात कामे बाहेरील मजुरांकडून किंवा यंत्रांच्या माध्यमातून होत असतील तर स्थानिक मजूर त्यांच्या हक्काच्या रोजगारापासून वंचित राहत असल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. संबंधित कामांवर प्रत्यक्षात कोण काम करत आहे, निधीचे वाटप कशा पद्धतीने होत आहे आणि शासनाच्या नियमांचे पालन केले जात आहे का, याची तपासणी करावी अशी मागणी स्थानिक मजूर सभासदांकडून करण्यात येत आहे.शासनाने जंगल कामगार सोसायट्यांची स्थापना स्थानिक आदिवासी व गरजू मजुरांच्या रोजगारासाठी केली होती. त्यामुळे शासनाच्या मूळ उद्देशाला हरताळ फासला जाणार नाही याची जबाबदारी प्रशासनाने घेणे आवश्यक असल्याची भावना मेळघाट परिसरात व्यक्त होत आहे.

सृष्टी क्षीरसागरची जिल्हास्तरीय वक्तृत्वस्पर्धेसाठी निवड

लेहेगाव/वार्ताहर

तालुका स्तरीय वर्क्तृत्व स्पर्धेत श्री विवेकानंद कन्या विद्यालय नेर पिंगळायची सृष्टी क्षीरसागर हिने 'भारतीय ऊर्जा क्षेत्र : २०४७ भवितव्य आणि आव्हाने ' या विषयावर अत्यंत प्रभावी मांडणी करीत द्वितीय क्रमांक प्राप्त करीत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरली. तिच्या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

भारताच्या उर्जा क्षेत्राचा ऐतिहासिक प्रवास, वाढती उर्जा मागणी 'सौर' पवन ऊर्जा 'अणुऊर्जा' हरित हायड्रोजन, ऊर्जा सुरक्षा आणि विकसित भारत २०४७ या संकल्पनेशी ऊर्जाक्षेत्राचे संबंध अशा विविध पैलूंवर अभ्यासपूर्ण 'तर्कशुद्ध आणि प्रभावी भाषेत तिने आपले विचार मांडलेत.विषयानुसार आशयाची मांडणी 'संदर्भाचे संकलन,उत्कृष्ट भाषाशैली' वर्क्तृत्वातील चढ-उतार आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण याबाबत सरांचे मार्गदर्शक सृष्टीच्या स्पर्धा जिंकण्यासाठी निर्णायक ठरलेत.स्पर्धेकरिता परीक्षक म्हणून मन्सूरी सर, पोटे यांनी अत्यंत निष्पक्षपणे चिकित्सक आणि निर्णायक पद्धतीने पार पाडली.ती आपल्या यशाचे श्रेय आईवडील संस्थेचे अध्यक्ष डॉ. धनंजय तट्टे, पदाधिकारी आणि मार्गदर्शक योगेंद्र तट्टे यांना देते. यशाबद्दल मुख्याध्यापिका मंजुषा देशमुख, शिक्षक पी. बी. आडे,पंकज कडू,प्रीती सावरकर, अजय तट्टे, सीताराम कुरवाड, जगदिश देशमुख, लांडे,संजया गोरडे, अमोल तट्टे, विलास मडावी, नितीन जाणे,केचे, झाकर्डे, इखे, अतुल गावंडे, पातुरकर,पुष्पा दुगाणे, कळसकर आदिंनी अभिनंदन केले.

आमदार बच्चू कडूंचा मोठा निर्णय

प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या राज्य संपर्कप्रमुख पदी गौरव मालक

अमरावती/का.प्र.

प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी संघटनेच्या राज्यस्तरीय बळकटीकरणासाठी मोठा निर्णय घेतला आहे. दिव्यांग हक्कांच्या लढ्यातील सक्रिय कार्यकर्ते गौरव मालक यांची संघटनेच्या राज्य संपर्कप्रमुख (अंध विभाग) पदी अधिकृत निवड करण्यात आली आहे.

गौरव मालक यांनी आजवर दिव्यांग आणि विशेषतः अंध बांधवांच्या प्रश्नांवर सातत्याने मैदानी संघर्ष केला आहे. त्यांच्या कार्यतत्परतेची, प्रशासकीय पाठपुराव्याची आणि उत्कृष्ट संघटन कौशल्याची दखल घेत आमदार बच्चू कडू यांनी ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली आहे. या नियुक्तीमुळे राज्यातील अंध बांधवांच्या प्रश्नांना अधिक तीव्रतेने वाचा फोडली जाईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.नियुक्तीनंतर बोलताना गौरव मालक यांनी आमदार बच्चू कडू आणि संघटनेचे आभार मानले. 'राज्यातील अंध बांधवांचे शिक्षण, रोजगार, पुनर्वसन आणि शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रहार संघटनेच्या माध्यमातून लढा अधिक तीव्र केला जाईल,' असा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

संक्षिप्त

पालकमंत्र्यांनी दाखविली नवीन वाहनांना हिरवी झेंडी

अमरावती - जिल्हा प्रशासनाच्या वतीने खरेदी करण्यात आलेल्या तीन नविन वाहनांना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज हिरवी झेंडी दाखविली. यावेळी आमदार प्रविण पोटे, प्रविण तायडे, महापौर श्रीचंद तेजवानी, विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, पोलिस आयुक्त राकेश ओला आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी कार्यालयाने अधिकाऱ्यांसाठी नवीन वाहने खरेदी केली आहेत. ही वाहने आज तहसिलदार आणि उपविभागीय अधिकारी यांना वितरीत करण्यात आली आहे. पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी विश्रामगृह येथे वाहनांना हिरवी झेंडी दाखविली. तसेच संबंधितांना वाहने सुपूर्द केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात स्व. सुधाकरराव नाईक यांची जयंती

अमरावती-जलक्रांतीचे जनक तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री

स्व. सुधाकरराव नाईक यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी स्व. सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

शहरात प्रतिबंधात्मक कलम ३७ (१) व (३) लागू

अमरावती-ईद-ए-मिलाद,नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळ अष्टमी, दहीहंडी, कावड यात्रा व इतर विविध धार्मिक कार्यक्रम आयोजनाच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी महाराष्ट्र पोलीस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.प्रतिबंधात्मक आदेश पोलीस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला असून सदर आदेश दि. २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या कालावधीत मेळावे, मिरवणुका आयोजित करण्यामुळे सार्वजनिक सुरक्षिततेसाठी धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन लेखी परवानगीशिवाय कार्यक्रम आयोजित करण्यास बंदी करण्यात आली आहे. शासकीय-निमशासकीय कर्मचारी, लग्न, नाटक, अंत्ययात्रा, शासकीय कार्यक्रम, आठवडी बाजार यांना हे आदेश लागू राहणार नाहीत. या आदेशाचा भंग करणाऱ्यां विरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्तालयाने कळविले आहे.

महेंद्र कॉलनीत गणेशोत्सव होणार साजरा

अमरावती-महेंद्र कॉलनी येथे श्री शिव गणेशोत्सव मंडळ वर्ष ३४ वे दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा गणेशोत्सव साजरा करणार आहे तसेच नगरातील जेष्ठ नागरिक व तरुण मुले मुली मोठ्या संख्येने उपस्थित राहतील. यावर्षी भव्य दिव्य आकर्षक व भव्य गुलालाचा आनंद व ढोल ताशांच्या गजरात श्री गणपती बाप्पाचे आगमन सध्याकाळी ६ वाजता महेंद्र कॉलनी येथे होणार आहे मंडळांचे अध्यक्ष चंद्रकांत भुयार, सचिन सगणे, अक्षय चरहाटे, सुरज खवले,आयुष खेडकर, प्रशांत महल्ले, विक्की पवाळ, ओम बरडे, राहुल कोंडे, आदेश टेकाडे, ओम वाळणकर, हनी सिंग राजपूत, अजय वानखडे, सार्थक मोहोरे, अंकूश जवजाळ, गजानन तायडे,नीलेश महल्ले, राहुल खंडारे, वेदांत खेडकर, प्रवेश बनकर, दर्शन मानकर, आर्यन मोहोळ, रोशन इंदलकर आणि सर्व मंडळाचे कार्यकर्ते यांनी मिळून गणेशोत्सव साजरा करणार आहे.

तहसीलदार सुदर्शन शहारे यांचा सन्मान

अचलपूर-तहसील कार्यालयाचे तहसीलदार सुदर्शन शहारे यांनी प्रशासनाच्या विविध क्षेत्रांत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची जिल्हा

प्रशासनाने दखल घेत त्यांचा सन्मान केला आहे. महसूल व वन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांच्या वतीने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात प्रशासनांतर्गत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल शहारे यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या वतीने प्रदान करण्यात आलेल्या सन्मानचिन्हावर तहसीलदार सुदर्शन शहारे यांच्या नावाचा उल्लेख असून, त्यांच्या प्रशासकीय कार्याची विशेष दखल घेतल्याचे स्पष्ट होते.जिल्हा प्रशासनाकडून मिळालेला हा सन्मान केवळ तहसीलदार सुदर्शन शहारे यांचाच गौरव नसून अचलपूर तहसील कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सामूहिक कार्याचीही पावती मानली जात आहे. या गौरवामुळे महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना अधिक जोमाने आणि जबाबदारीने काम करण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे.

विधवा,घटस्फोटीत व परित्यक्ता महिलांना आर्थिक मदत देण्याबाबत प्रसारित होणारा अर्जाचा नमुना अनधिकृत

नागरिकांनी सावध राहावे;समाज कल्याण विभागाचे आवाहन

अमरावती/का.प्र.

समाज कल्याण विभागीय आयुक्तालय, अमरावती यांच्या नावाने विधवा, घटस्फोटीत व परितक्ता महिलांना आर्थिक मदत मिळविण्यासाठीचा अर्ज'या आशयाचा एक अर्जाचा नमुना सध्या काही ठिकाणी प्रसारित होत असल्याचे निदर्शनास आले आहे.सदर अर्जामध्ये विधवा, घटस्फोटीत व परित्यक्ता महिलांना आर्थिक मदत/अनुदान मिळणार असल्याचे नमूद करून अर्जदारांकडून विविध कागदपत्रांची मागणी करण्यात आलेली आहे. मात्र, असा कोणताही अर्जाचा नमुना प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण विभाग,अमरावती किंवा त्यांचे अधिनस्त सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, यांच्यामार्फत निर्गमित करण्यात आलेला नाही.

सदर स्वरूपाची कोणतीही आर्थिक मदतीच्या (अनुदानाची) योजना समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येत नाही.त्यामुळे नागरिकांनी सदर अर्ज अथवा त्यामध्ये नमूद केलेल्या आर्थिक मदतीच्या (अनुदानाची) आश्वासनावर विश्वास ठेवू नये. कोणत्याही व्यक्ती, संस्था अथवा मध्यस्थ हे अर्जाच्या नावाखाली पैश्याची मागणी करीत असले तर, कोणताही आर्थिक व्यवहार करु नये. तसेच आधारकार्ड, बँक पासबुक, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, जात प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र किंवा इतर वैयक्तिक कागदपत्रे देऊ नयेत.समाज कल्याण विभागाच्या विविध योजना व त्यासंबंधीची अधिकृत माहिती केवळ शासनाच्या अधिकृत माध्यमांद्वारेच प्रसिद्ध केली जाते. त्यामुळे नागरिकांना कोणतीही योजना अथवा आर्थिक



मदतीबाबत माहिती मिळाल्यास तिची सत्यता संबंधित समाज कल्याण विभागाच्या कार्यालयाकडून खात्री करूनच पुढील कार्यवाही करावी.नागरिकांची फसवणूक, दिशाभूल अथवा वैयक्तिक माहितीचा गैरवापर होऊ नये यासाठी ही सूचना देण्यात येत आहे. सदर बनावट / अनधिकृत अर्जाचा नमुना कोणी प्रसारित करत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी त्याबाबत संबंधित कार्यालयाच्या निदर्शनास आणून द्यावे.पुनश्च कळविण्यात येते की,अशा प्रकारची कोणतीही योजना समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येत नाही.ङतेव्हा सर्व संबधित नागरीकांनी अशा प्रकारच्या बनावट योजनापासून फसवणूक होणार नाही याची दक्षता घ्यावी,असे जाहिर आवाहन ङश्रीम.माया केदार,प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण विभाग,अमरावती हया करीत आहे.

अवैध दारू वाहतूक करणाऱ्यावर पोलिसांची कारवाई

७३ हजारांचा मुद्देमाल जप्त

चांदूर रेल्वे/वार्ताहर

स्थानिक आठवडी बाजार परिसरातून अवैधरित्या देशी दारूची वाहतूक करून विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगणाऱ्या एका इसमावर चांदूर रेल्वे पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत दुचाकीसह एकूण ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजता आठवडी बाजार परिसरात करण्यात आली.

पोलिसांनी राहुल मारोतराव वाघमारे (रा. मांजरखेड, ता. चांदूर रेल्वे) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून एमएच २७ डी क्यू ७०५९ क्रमांकाची अंदाजे ७० हजार रुपये किमतीची दुचाकी जप्त करण्यात आली. तसेच नायलॉनच्या थैलीत देशी दारूच्या बाटल्या आढळून आल्या. यामध्ये 'गोल्डन संत्रा' ९० एमएलच्या ४० प्लास्टिक पावट्या प्रत्येकी ५० रुपये किमतीच्या अशा एकूण २ हजार रुपये किमतीची दारू, तसेच 'टॅंगो पंच' ९० एमएलच्या २० प्लास्टिक पावट्या प्रत्येकी ५० रुपये किमतीच्या अशा एकूण १ हजार रुपये किमतीची दारू जप्त करण्यात आली. अशाप्रकारे दुचाकीसह एकूण ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. संबंधित इसम हा दारूचा कोणताही परवाना नसताना विक्रीच्या उद्देशाने देशी दारू बाळगत असल्याचे पोलिसांच्या कारवाईत निष्पन्न झाले. ही कारवाई चांदूर रेल्वे पोलीस ठाण्याचे एपीआय राजीव हाके यांच्या मार्गदर्शनात पीएसआय नंदलाल लिंगोट आणि पोलीस कॉन्स्टेबल भागवत कासार यांनी केली.

ई-कॉमर्स : निर्णय चांगला, पण..

देशात उत्पादित वस्तूंच्या निर्यातीसाठी ई-कॉमर्सच्या इन्व्हेंटरी-आधारित मॉडेलमध्ये प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीला (एफडीआय) केंद्राने नुकतीच परवानगी दिली आहे. अमेरिकेने लादलेल्या शुल्कांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय भारताच्या सुमारे चार ते पाच अब्ज डॉलरच्या वार्षिक ई-कॉमर्स निर्यातीला चालना देण्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरू शकतो. ख-या अर्थाने भारताच्या ई-कॉमर्स क्षेत्राला २५० अब्ज डॉलरच्या संभाव्य उद्दिष्टापर्यंत पोहोचवायचे असेल तर सरकारला निर्यात आणि देशांतर्गत विक्री या दोन्हीसाठी एकत्रित, सुसंगत आणि सुलभ धोरण आखावे लागेल.

केंद्र सरकारने गेल्या आठवडय़ात एक महत्त्वाचा निर्णय घेत देशात उत्पादित वस्तूंच्या निर्यातीसाठी ई-कॉमर्सच्या इन्व्हेंटरी-आधारित मॉडेलमध्ये प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीला (एफडीआय) परवानगी दिली आहे. हे पाऊल निश्चितच स्वागतार्ह आहे.यामुळे भारताच्या निर्यातीला चालना मिळेल आणि विशेषतः लघू व मध्यम उत्पादन उद्योगांना (एमएसएमई) जागतिक बाजारपेठांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळेल. भारताच्या निर्यातीला गती देण्याची अपेक्षा असलेल्या या निर्णयावर प्रत्यक्षात २०२५ पासूनच काम सुरू होते, जेव्हा अमेरिकेने भारतीय वस्तूंवर उच्च आयात शुल्क लागू केले होते. या पार्श्वभूमीवर घेतलेला हा निर्णय भारताच्या सुमारे चार ते पाच अब्ज डॉलरच्या वार्षिक ई-कॉमर्स निर्यातीला चालना देण्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरू शकतो. मात्र संपूर्ण ई-कॉमर्स क्षेत्रातील नियमांमध्ये व्यापक सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने हा निर्णय पुरेसा नाही, हे लक्षात घ्यावेच लागेल.

इन्व्हेंटरी आधारित ई-कॉमर्स मॉडेलमध्ये एफडीआयला दिलेली परवानगी केवळ निर्यातीपुरती मर्यादित राहू नये, तर ती संपूर्ण ई-कॉमर्स व्यवसायाला लागू व्हायला हवी.मग माल निर्यातीसाठी असो किंवा देशांतर्गत उपभोगासाठी. सध्या सुमारे नव्वद ते शंभर अब्ज डॉलर आकाराचे भारताचे ई-कॉमर्स क्षेत्र २०३० पर्यंत सुमारे अडीचशे अब्ज डॉलरपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. एवढय़ा मोठय़ा संभाव्य वाढीचा विचार करता या क्षेत्राला ख-या अर्थाने आणि लक्षणीयरीत्या गती देण्यासाठी अधिक व्यापक व दूरगामी सुधारणांची गरज आहे.

उद्योग आणि आंतरिक व्यापार प्रोत्साहन विभागाने (डीपीआयआयटी) तयार केलेल्या सध्याच्या ई-कॉमर्स मार्गदर्शक तत्त्वांनुसार, केवळ व्यवसाय-ते-व्यवसाय (बी२बी) आणि मार्पेटप्लेस प्रारूपांमध्येच थेट एफडीआयला परवानगी आहे. व्यवसाय-ते-ग्राहक (बी२सी) आणि इन्व्हेंटरी-आधारित ई-कॉमर्समध्ये मात्र एफडीआयला परवानगी नाही.दुस-या शब्दांत सांगायचे झाल्यास ॲमेझॉन आणि वॉलमार्टच्या मालकीची फ्लिपकार्टसारखी विदेशी ई-कॉमर्स कंपनी स्वतः माल साठवून तो थेट ग्राहकांना विपू शकत नाही. मात्र देशी ब्रॅण्डस् असे करू शकतात. या असमतोलामुळे स्पर्धेच्या समान संधीबाबत (लेव्हल प्लेइंग फील्ड) प्रश्न उपस्थित होतो. हे नियम भारतीय किरकोळ विक्रेते आणि किराणा दुकानदारांचे संरक्षण करण्याच्या हेतूने तयार करण्यात आले असावेत, यात शंका नाही. मात्र अशा प्रकारच्या धोरणामुळे सर्वांसाठी समान संधी निर्माण होण्याच्या मार्गात अडथळे येतात. याशिवाय, ई-कॉमर्स कंपन्यांना वेगवेगळ्या कामांसाठी आठ ते नऊ वेगवेगळ्या मंत्रालयांचे उंबरठे झिजवावे लागतात,जी गुंतवणूकदारांसाठी एक मोठी अडचण मानली जाते. एवढय़ा विखुरलेल्या नियामक चौकटीमुळे नवीन गुंतवणूकदारांना भारतीय बाजारपेठेत प्रवेश करणे किचकट वाटते आणि यातूनच धोरणात्मक अनिश्चितताही वाढते.

निर्यातीसाठी खास बदल करण्यात आलेला हा एफडीआय नियम काही विशिष्ट श्रेणीतील उद्योगांसाठी कागदावर फायदेशीर वाटू शकतो. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक अडचणी येऊ शकतात. सुधारित नियमांनुसार काम करताना पायाभूत सुविधांची उभारणी आणि पुरवठा साखळीच्या यंत्रणेत अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे.

उदाहरणार्थ, जर एखाद्या विदेशी मालकीच्या ई-कॉमर्स कंपनीला सुधारित नियमांचा लाभ घ्यायचा असेल तर तिला दोन प्रकारची गोदामे उभारावी लागतील आणि त्या दोन्हीमध्ये वेगवेगळा माल साठवावा लागेल. निर्यातीसाठी वेगळे गोदाम उभारावे लागेल, तर मार्पेटप्लेसच्या माध्यमातून देशांतर्गत ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी वेगळे गोदाम आणि केवळ ऑनलाइन ऑर्डरसाठीची डार्प स्टोअर्स स्वतंत्रपणे उभारावी लागतील.

देशी व्यापारी आणि वितरक आधीच नियम उल्लंघनाच्या मुद्दय़ावरून विदेशी कंपन्यांसोबत कायदेशीर व व्यावसायिक संघर्षात गुंतलेले आहेत. अशा परिस्थितीत जर श्रेण्या आणि नियम आणखी वाढवले गेले तर उद्योगक्षेत्रात कटुता वाढू शकते आणि प्रचंड संभावना असलेल्या ई-कॉमर्स उद्योगाच्या वाढीच्या शक्यतांना धक्का पोहोचू शकतो. पुढे काय करता येईल? या संपूर्ण परिस्थितीचा विचार करता

काही महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित होतात, जे भारत सरकारने विचारात घ्यायला हवेत. या क्षेत्रात सर्वांसाठी एकसमान नियम असणे, हाच खरा योग्य मार्ग आहे. निर्यातीसाठी वेगळे नियम आणि देशांतर्गत विक्रीसाठी वेगळे नियम अशी दुहेरी रचना दीर्घकाळ टिकाऊ ठरणार नाही. त्याऐवजी विचारपूर्वक आणि सर्वसमावेशक ई-कॉमर्स धोरण तयार करण्याची गरज आहे, जे निर्यातदार आणि देशांतर्गत विक्रेते या दोघांनाही एकाच चौकटीत सामावून घेईल. आठ-नऊ मंत्रालयांचे उंबरठे झिजवण्याऐवजी एकाच खिडकीतून (सिंगल विंडो) मंजुरी मिळण्याची व्यवस्था निर्माण केल्यास गुंतवणूकदारांचा विश्वास वाढेल आणि प्रक्रिया अधिक सुलभ होईल. यामुळे नवीन गुंतवणूकदारांना भारतीय बाजारपेठेत प्रवेश करणे सोपे जाईल आणि विद्यमान कंपन्यांनाही विस्तार करणे सुकर होईल.

दुहेरी गोदाम व्यवस्थेसारख्या व्यावहारिक अडचणी टाळण्यासाठी पुरवठा साखळी आणि गोदाम व्यवस्थापनाबाबतचे नियम अधिक लवचिक आणि व्यवहार्य असायला हवेत. यामुळे कंपन्यांना अनावश्यक खर्च आणि गुंतागुंत टाळता येईल, तसेच कार्यक्षमताही वाढेल. लघू व मध्यम उद्योगांना जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्याचे मूळ उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या उद्योगांना विशेष सहाय्य आणि मार्गदर्शन देणे आवश्यक आहे. केवळ धोरणात्मक परवानगी पुरेशी नाही. त्यासोबत प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य आणि तांत्रिक मदतही उपलब्ध करून द्यावी लागेल, जेणेकरून हे उद्योग प्रत्यक्षात या संधीचा लाभ घेऊ शकतील.

निर्यातीसाठी ई-कॉमर्समध्ये एफडीआयला परवानगी देण्याचा सरकारचा निर्णय दिशादर्शक आणि स्वागतार्ह आहे, यात शंका नाही. विशेषतः अमेरिकेच्या उच्च आयात शुल्काच्या पार्श्वभूमीवर, भारतीय एमएसएमईंना पर्यायी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे ठरू शकते. मात्र हा निर्णय केवळ एका मर्यादित क्षेत्रापुरता ठेवल्यास आणि त्याचबरोबर इन्व्हेंटरी व मार्पेटप्लेस मॉडेलमधील मूलभूत असमतोल कायम राहिल्यास अपेक्षित परिणाम साध्य होणे कठीण ठरेल.

ख-या अर्थाने भारताच्या ई-कॉमर्स क्षेत्राला अडीचशे अब्ज डॉलरच्या संभाव्य उद्दिष्टापर्यंत पोहोचवायचे असेल तर सरकारला निर्यात आणि देशांतर्गत विक्री या दोन्हीसाठी एकत्रित, सुसंगत आणि सुलभ धोरण आखावे लागेल. दुहेरी गोदाम व्यवस्थेसारख्या व्यावहारिक अडचणी दूर कराव्या लागतील, मंत्रालयीन गुंतागुंत कमी करावी लागेल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे देशी व विदेशी गुंतवणूकदार यांच्यातील स्पर्धेच्या समान संधीबाबतचा प्रश्न सोडवावा लागेल. असे झाले तरच हे धोरण केवळ कागदावरील स्वागतार्ह पाऊल न राहता प्रत्यक्षात भारताच्या ई-कॉमर्स क्षेत्राला नवी दिशा देणारे ठरू शकेल.

■ **रवींद्र सावंत**

सोशल मीडिया कंपन्यांचा 'टोबॅको' क्षण!

बातमी अमेरिकेतील असली तरी ती आपल्या देशासाठी तेवढीच महत्वाची आहे कारण अमेरिके खालोखाल भारतात सोशल मीडियाचे वापरकर्ते,(खरे सांगायचे ad-dicted) आहेत ; विशेषतः तरुण पिढी. आणि कोवळ्या वयातील मुले!इंटरनेट वर फक्त आकडेवारी शोधली आणि आपल्या आजूबाजूला बघितले तरी प्रश्नाचे गांभिर्य लक्षात येईल.

सोशल मीडियाचे व्यक्तिगत, मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परिणाम नक्की काय होत आहेत यावर बरेच संशोधन जगभर सुरू आहे. त्या सर्वात प्राधान्यक्रमावर आहे तो कोवळ्या किंवा उमलत्या वयातील विद्यार्थी दशेतील मुला मुलींवर होऊ शकणाऱ्या दुष्परिणामाबद्दल चिंता!

सोशल मीडियाच्या अनिर्बंध वापरामुळे लहान वयातील मुलांना त्याचे व्यसन लागते, त्यांचे मानसिक आरोग्य बिघडते यावर आता एकमत होत आहे. उदा. अती वापरामुळे मुलांमध्ये निरुत्साह, चिंता वाढीस लागतो. अमेरिकेत काही आत्महत्या देखील झाल्या आहेत.

काही देशांनी शालेय वयातील विद्यार्थ्यांच्या सोशल मिडिया वापरावर बंदी घातली आहे. इतर देशांच्या हा प्रस्ताव विचाराधीन आहे.या पॉल्टफॉर्म्सचा सर्वात जास्त वापर अर्थातच अमेरिकेत होतो. त्या

देशात बरेच काही घडत आहे. २०२१ सालापासून नागरिक, शाळा, म्युनिस्पॉलिटिज, राज्ये यांनी अमेरिकेतील विविध कोर्टांमध्ये जवळपास ३,००० केसेस फाइल केल्या आहेत.

अलीकडेच कॅलिफोर्निया फेडरल कोर्टात २९ राज्यातर्फे मेटा प्लॅटफॉर्म, फेसबुक आणि इंस्टाग्राम, विरुद्ध केस फाइल केली गेली. मागणी आहे की या कंपन्यांनी वापरकर्त्यांच्या वयावर निर्बंध घालावेत, अमर्याद स्क्रोलिंगची सुविधा काढून टाकावी. केसची सुनावणी सुरू असताना मेटा कंपनीचे मुख्याधिकारी मार्क झुकेरबर्ग यांची देखील साक्ष काढण्यात येईल असे सांगितले जात आहे.

रॉयटर्सने केलेल्या एका सर्वेक्षणात अमेरिकेतील ८५ टक्के नागरिकांना असे वाटते की शासनाने या सोशल मीडिया कंपन्यांवर या संदर्भात अंकुश ठेवावयास हवा.अमेरिकेतील कंपन्यात काम केलेले पॆत्दौ पुढे आले आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आपल्या विशिष्ट प्रोग्रामिंग मुळे लहान वयातील मुलांमध्ये व्यसनाधिनता वाढत आहे हे या कंपन्यांना पूर्णपणे माहित आहे. किंबहुना प्रोग्रामिंग त्याच उद्देशाने केले गेलेले असते. पण आपली दर्शक संख्या, त्यांनी स्क्रीनवर घालवलेला वेळ आणि म्हणून आपले उत्पन्न व नफा कमी होईल म्हणून या कंपन्यांनी त्यावर काहीही उपाययोजना केलेल्या नाहीत.

गेली अनेक वर्षे सोशल मीडिया कंपन्यानी 'आम्ही स्वतः कन्टेन्ट तयार करत नाही, आम्ही फक्त कन्टेन्ट साठी प्लॅटफॉर्म ऊपलब्ध करून देतो' अशी भूमिका घेतली आहे. पण या प्लॅटफॉर्ममध्ये असणाऱ्या अल्गोरिदम आणि तत्सम आज्ञा प्रणालीमुळे लहान वयातील वापरकर्ते तासनतास स्क्रीनवर खिळून राहतात हे आता सर्वांना माहित झाले आहे.सोशल मीडियावर फक्त निर्बंध घालण्याची मागणी नाही तर त्यांच्याकडून ज्या मुलांना मानसिक इजा झाली आहे त्यांना या कंपन्यांनी नुकसानभरपाई द्यावी अशी देखील मागणी आहे. ती मान्य झाली तर ती रक्कम काही लाख डॉलर्स असू शकते.

याला 'टोबॅको मोमेन्ट' म्हणतात

सिगरेटच्या अतिरेकी वापरामुळे धूम्रपान करणाऱ्यांना अनेक प्रकारचे गंभीर आजार होत आहेत असा आरोप सिगरेट उत्पादक कंपन्यांवर १९५० पासून केले जात होते. पण सिगारेट कंपन्यांनी सतत त्यात काही तथ्य नसल्याचे सांगितले. चार दशकानंतर अमेरिकेतील ४६ राज्य एकत्र आली,बरीच कोर्टबाजी झाली. आणि १९९८ मध्ये सिगरेट उत्पादक आणि ही राज्ये यांच्यामध्ये मास्टर सेटलमेंट अग्रीमेंट झाले.

त्यानुसर सिगरेट कंपन्यांनी या राज्यांना सिगारेट पिणाऱ्यांवर होणाऱ्या वैद्यकीय उपचारांसाठी काही लाख डॉलर्स द्यायचे मान्य केले. सिगारेट पाकिटावर वैधानिक इशारा छापण्यात येऊ लागला. १६ वर्षाखालील मुलांना सिगरेट विकण्यास बंदी घातली गेली. सिगरेट वर मोठा अप्रत्यक्ष कर sin tax लावण्यात येऊ लागला.

सोशल मीडियावर अमेरिकेत बंधने आली.आणि यायची तातडीची गरज देखील आहे, तर त्याचा फायदा भारतासारख्या अनेक देशांना निश्चितच होईल.केल्याने होत आहे रे ....महाबलाढ्य मोठी कॉर्पोरेट असूदेत नाहीतर एकाधिकारशहा राज्यकर्ते, त्यांना ताळ्यावर आणायचे असेल तर संघटित ॲक्टीव्हीजमला पर्याय नाही हे पुन्हा पुन्हा सिद्ध होत आहे. एकेकटे राहू नका. एकत्र या. संघटित व्हा..

■ **संजीव चांदोरकर**

त-ड-का

साखरेची गोडी?

सणासुदीच्या दिवसात
साखरेची गोडी झाली महाग
शुगर लॉबी झाली सक्रीय
अंदाज वर्तवून भाव
वाढवून देताहेत महाभाग..

शासन म्हणवून घेते
आमआदमीचे रखवाले
साखरेचे अज्ञात स्टॉक
शोधून तोडावेत ताले..

वास्तव नसतांना जनतेचे
बजेट कोसळते
गंभीर दखल घेतल्यास
भाववाढ नियंत्रणात राहते..!

अशोक सारडा,
मेहकर
मो.९४२१३९४३३९

कड्यावरून कोसळणारे बालक आणि पालकत्व

आय फोन चे हट्टासाठी झालेला तरुण व त्याच्या आईवडिलांचा मृत्यू सर्वांनाच हळहळ व्यक्त करायला लावत आहे..यात त्या मुलाला किंवा पालकांना दोषी न ठरवता एकूणच पालकत्व आणि प्रश्न यावर बोलायला हवे

यात पुढील काही मुद्दे आहेत..

१) ओशो रजनीश म्हणतात की मुलांना एकदा नाही म्हणालात तर त्यावर काहीही झाले तरी ठाम राहा..त्यांनी आग्रह धरल्यावर जर तुम्ही वाकलात तर पुढील वेळी ते तुम्हाला पुन्हा वाकवतात. तुम्ही वाकू शकता हे त्यांना त्यातून लक्षात येते.त्यामुळे लहानपणी अशी मानसिकता मुलांची तयार करा..अन्यथा ते टोकाला जाऊन तुम्हाला वाकवत राहतील..या तरुणाने मागील वर्षीही आत्महत्या करण्याचा याच ठिकाणी प्रयत्न केला होता..हे लक्षणीय आहे. त्याला पालकांचा अंदाज यातून आला.

२) या कुटुंबात एका मुलगा अपघातात गेला..त्यामुळे नकळत या मुलांबाबत पालक हळवे झाले.एकच मूल असलेले

कुटुंब या एक वेगळ्या समस्या झाल्या आहेत. आपण लहानपणी एकत्र कुटुंबात होतो.एका घरात जास्त मुले मुली असायचे. त्यामुळे मुलांना स्वतंत्र वागणूक नसायची. बिस्कीट पुडा आणला तरी प्रत्येकाला एक दोन बिस्कीट यायचे. दिवाळीत फटाका लड सोडून ४/५ फटाके वाटले जायचे. फळे आणली तरी कापून. स्वतंत्र बेड रूम नसायची.एका रांगेत झोपायचे. एकच मूल या व्यवस्थेत ते मूल व्यक्तिवादी अहंकारी होते. हे जग आपल्या भोगासाठी निर्माण झाले आहे अशी त्याची मानसिकता होते..या कुटुंबाच्या समस्या यातून दिसत आहे.ती समस्या तुमच्या माझ्या घरातही आहे.

३) नवीन जीवनशैलीचे प्रश्न फक्त श्रीमंत किंवा शहरापुरते नाहीत हे ही यातून दिसते आहे. खालचा आर्थिक स्तर वरच्या आर्थिक स्तराचे अनुकरण करतो. त्यातून मान्यतेच्या या फूट पट्ट्या पूर्ण करण्याचे हा वर्ग अनुकरण करतो.आय फोन हे त्याचे इथे फक्त प्रतिक आहे. त्यामुळे या मुलाला गुन्हेगार ठरवण्यात अर्थनाही.. हा प्रश्न गरीब ड्रायव्हर असलेल्या कुटुंबातही दिसतो आहे..त्यामुळे हे प्रश्न गरीब श्रीमंत असे नाही तर सर्व समूहाचे आहेत..त्या दृष्टीने प्रबोधनाची दिशा ठरवायला हवी.

४) पालकांना कोणतेच पालकत्वाचे प्रशिक्षण नाही हा ही मुद्दा लक्षात घ्यायला हवा..आपल्या देशात पालक होण्यासाठी कोणतीच पदवी लागत नाहीत. साधी गाडी चालवायला लायसन लागते पण पालक होण्यासाठी कोणतीच अट नाही. पालकत्व हे काही शहरी फॅड नाही .. तो अगदी गरीब कुटुंबालाही लागू आहे

■ **हेरंब कुलकर्णी**

जेन-झी ला समजावून सांगणे कठीण... पण गरजेचे!

परवा संभाजी नगरातील खवड्या डोंगरावर थरार घडला.वडिलांसोबत मोबाइलचे हफ्ते थकले म्हणून झालेला वाद असह्य झाल्याने १९ वर्षीय युवकांने थेट आत्महतेसाठी डोंगर गाठला व काही क्षणात एका कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी अंत झाला. ही बातमी खुप धक्कादायक व अत्यंत वेदनादायी आहे.ही घटना नेमकी का घडली ? याला जबाबदार कोण? दोष कुणाचा? या प्रश्नांवर चर्चा होणे स्वाभाविक आहे. मात्र केवळ दोषारोप आणि चर्चेत वेळ घालवण्यापेक्षा यापुढे अशा घटना घडू नयेत, यासाठी समाज म्हणून आपण काय करू शकतो, याचा विचार करणे अधिक महत्त्वाचे आहे.

आजच्या पिढीसमोर अनेक आव्हाने आहेत. त्यापैकी एक महत्त्वाचे आव्हान म्हणजे तंत्रज्ञान आणि सोशल मीडियाचा वाढता अतिरेक.आजची Gen Z पिढी तंत्रज्ञानाच्या बाबतीत अत्यंत पुढे आहे; मात्र तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर आणि त्याचा अतिरेक यातील फरक समजावून सांगणे ही आजची मोठी गरज बनली आहे कारण या कुटुंबाच्या अंताला कारणीभूत ठरला तो मोबाइल व त्यामुळे वाढलेला कुटुंबातील कलह.आज हातात ५G मोबाइल आहे, इंटरनेटचा वेग प्रचंड आहे; पण प्रश्न असा आहे की या वेगाचा उपयोग आपण भविष्य घडवण्यासाठी करतोय की फक्त २ GB डेटा संपवण्यासाठी?

WhatsApp, Instagram, Facebook, YouTube आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर तासनतास वेळ घालवणे ही अनेक तरुणांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनली आहे. एक रील पाहताना दुसरी, दुसरी पाहताना तिसरी आणि असे करता करता तास कधी निघून जातात, हे स्वतः त्या तरुणांनाही कळत नाही.याचा परिणाम केवळ वेळ वाया जाण्यापुरता मर्यादित नाही.कुटुंबातील संवाद कमी होत आहे.पूर्वी संयुक्त कुटुंब पद्धतीत एकत्र बसून जेवण करताना चर्चा व्हायच्या त्यातून अडचणी लक्षात यायच्या त्यावर उपाय व्हायचे पण आज एकमेकांसोबत बसण्याची सवय कमी होत आहे.विभक्त कुटुंब पद्धती वाढली आहे,छोट्या-छोट्या गोष्टींवर चिडचिड आणि वाद वाढत आहेत.आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वतःच्या भविष्याचा विचार करण्यासाठी वेळ कमी पडत आहे.मोबाइलवर जगाशी संपर्क वाढला; पण अनेक घरांमध्ये घरातील माणसांमधील संवाद मात्र कमी झाला आहे. एका घरात चार माणसं असतात, पण प्रत्येकाच्या हातात वेगळा मोबाइल असतो. एकमेकांसमोर बसूनही प्रत्येकजण दुसऱ्याच जगात रमलेला असतो.म्हणून महत्वाचे म्हणजे आपण Gen Z ला दोष देणार की त्यांच्याशी संवाद साधणार?

आजची तरुणाई लगेच कोणाचे ऐकून घेईलच असे नाही. उपदेश केला तर ते स्वीकारतीलच असेही नाही. त्यामुळे पालक, शिक्षक आणि समाजाने त्यांच्यावर केवळ टीका करण्यापेक्षा त्यांच्याशी संवाद साधण्याची गरज आहे. इंटरनेटच्या माध्यमातून एखादा तरुण नवीन कौशल्य शिकू शकतो, ऑनलाइन शिक्षण घेऊ शकतो, व्यवसायाची माहिती मिळवू शकतो, स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतो, जगभरातील ज्ञान मिळवू शकतो आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करू शकतो.मात्र त्याच इंटरनेटवर तासनतास केवळ मनोरंजन करण्यात वेळ घालवला, तर काही वर्षांनी त्याच्याकडे पाहण्यासाठी कदाचित मोठा डेटा पॅक असेल; पण भविष्य घडवण्यासाठी आवश्यक कौशल्य नसेल.

येणारा काळ तरुणांसाठी अधिक कठीण असणार आहे ग्रामीण भागातील अनेक तरुणांना रोजगाराच्या शोधात शहरांकडे धाव घ्यावी लागते. पण शहरात पोहोचल्यानंतर केवळ नोकरी हवी आहे, एवढ्याने नोकरी मिळणार नाही.शिक्षण, कौशल्य आणि अनुभव यांना भविष्यात अधिक महत्त्व असणार आहे.आजच जर तरुणांनी आपल्या वेळेचे नियोजन केले नाही, नवीन कौशल्ये आत्मसात केली नाहीत आणि तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर केला नाही, तर भविष्यात रोजगाराच्या स्पर्धेत टिकणे आणखी कठीण होईल.

■ **अमोल भारसाकळे,**
अमरावती
मो. ८४४६५७९१८२

नगराध्यक्षांच्या घरावर अतिक्रमणाचा संशय

मुख्याधिका-यांची नोटीस भूमी फाउंडेशनच्या तक्रारीची दखल; माया धुळे यांना १५ दिवसांत कागदपत्रे सादर करण्याचे आदेश

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट नगर परिषदेच्या नगराध्यक्षा माया विवेक धुळे यांच्या यशोदा नगर, रामटेकपुरा येथील निवासी घराच्या जागेच्या मालकी हक्कासह बांधकामाच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भूमी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष चंचल पितांबरवाले यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेत नगर परिषदेचे मुख्याधिकारी शशिकांत बावर यांनी नगराध्यक्षांना नोटीस बजावली आहे. संबंधित घराबाबतची आवश्यक कागदपत्रे १५ दिवसांच्या आत सादर करण्याचे आदेश देण्यात आले असून, विहित मुदतीत कागदपत्रे न सादर केल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

नगराध्यक्ष माया धुळे यांनी २०२५ मधील नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी सादर केलेल्या नामनिर्देशन अर्जात यशोदा नगर, रामटेकपुरा येथील पत्ता नमूद केल्याचा उल्लेख तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित घर ज्या जागेवर उभे आहे, त्या जागेची मालकी, ताबा, सीमारेषा आणि बांधकामाची वैधता तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. सदर जागा नगर परिषद, शासन अथवा सार्वजनिक मालकीची आहे का? बांधकामासाठी मंजूर नकाशा, बांधकाम परवानगी, विकास परवानगी आणि इतर आवश्यक वैधानिक मंजुरी घेण्यात आल्या आहेत का? याची अधिकृत पडताळणी करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. तसेच आवश्यक असल्यास महसूल अथवा भूमी अभिलेख विभागामार्फत जागेची अधिकृत मोजणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. सदर प्रकरणी नगराध्यक्ष यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

दरम्यान, ही तक्रार वैयक्तिक द्वेष किंवा राजकीय आकसातून नसून सार्वजनिक हित आणि प्रशासनातील पारदर्शकतेच्या उद्देशाने केल्याचा दावा तक्रारदार चंचल पितांबरवाले यांनी केला आहे. त्यामुळे केवळ कागदोपत्री चौकशी न करता प्रत्यक्ष स्थळपाहणी, मोजणी आणि संबंधित अभिलेखांची काटेकोर तपासणी करावी, अशी मागणी आहे. आता १५ दिवसांत नगराध्यक्षांकडून सादर होणाऱ्या कागदपत्रांतून घराच्या जागेची मालकी आणि बांधकामाची वैधता स्पष्ट होणार का, याकडे अकोटच्या राजकीय वर्तुळासह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

❝ कायद्याच्या समान अंमलबजावणीची मागणी

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ४४(१)(I) तसेच अन्य लागू तरतुदींचा संदर्भ देत तक्रारदाराने कायद्याचे निकष सामान्य नागरिकांप्रमाणेच लोकप्रतिनिधींनाही समान असावेत, अशी भूमिका मांडली आहे. चौकशीत अतिक्रमण किंवा अनधिकृत बांधकाम आढळल्यास संबंधितांना कायदेशीर नोटीस व सुनावणीची संधी देऊन नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

❝ नोटीसने वाढविली उत्सुकता

या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्याधिकारी बावर यांनी बजावलेल्या नोटीसमुळे प्रकरणाला आता प्रशासकीय स्वरूप प्राप्त झाले आहे. नगराध्यक्षांनी विहित १५ दिवसांच्या मुदतीत कोणती कागदपत्रे सादर केली जातात, याकडे अकोटकरांचे लक्ष लागले आहे. कागदपत्रांच्या पडताळणीत नेमके काय निष्पन्न होते, यावर पुढील कारवाईची दिशा ठरणार आहे.

१८ वर्षे पूर्ण झालेल्या युवकांनी मतदार यादीत नाव नोंदवावे

१ ते ३० सप्टेंबरदरम्यान विशेष मतदार नोंदणी मोहीम; तहसीलदार महेश राम गुंडे यांचे आवाहन

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

१८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक पात्र भारतीय नागरिकाने मतदार यादीत आपले नाव नोंदवून मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन तहसीलदार महेश राम गुंडे यांनी केले आहे. नवीन मतदार नोंदणीसाठी १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेत १८ वर्षे पूर्ण झालेल्या आणि अद्याप मतदार यादीत नाव समाविष्ट नसलेल्या युवक-युवतींना मतदार म्हणून नोंदणी करता येणार आहे. तसेच मतदार यादीतील नाव, पत्ता किंवा अन्य तपशिलांमध्ये दुरुस्ती आवश्यक असल्यास त्यासाठीही अर्ज करता येणार आहे.

मतदार नोंदणीसाठी नागरिकांना ऱ्याड्ड या अधिकृत माध्यमातून तसेच Voter Helpline Appद्वारे ऑनलाइन अर्ज करता येईल. ऑनलाइन अर्ज करणे शक्य नसलेल्या नागरिकांनी जवळच्या मतदार नोंदणी केंद्रावर जाऊन ऑफलाइन अर्ज सादर करावा. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे आणि अचूक माहिती सादर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

मतदान हा लोकशाहीतील नागरिकांच्या सहभागाचा महत्त्वाचा अधिकार आहे. त्यामुळे 'माझ्या एका मताने काय फरक पडणार?' असा विचार न करता पात्र युवकांनी मतदार यादीत नाव नोंदवावे, असे तहसीलदार गुंडे यांनी सांगितले. '१८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक पात्र युवक-युवतीने मतदार म्हणून नोंदणी करून घ्यावी. मतदानाच्या वेळी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता निर्भयपणे आणि जबाबदारीने मतदान करावे. युवकांचा सक्रिय सहभाग वाढल्यास लोकशाही अधिक सक्षम होईल,' असे तहसीलदार महेश राम गुंडे यांनी स्पष्ट केले.

तेल्हारा शहरासह संपूर्ण तालुक्यातील पात्र नागरिकांनी विशेष मोहिमेचा लाभ घेऊन मतदार नोंदणी पूर्ण करावी. तसेच आपल्या कुटुंबातील आणि परिसरातील पात्र युवकांचे नाव मतदार यादीत आहे की नाही, याची खात्री करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे गणेश मोतीराम निकामे रा. यशवंत नगर, वाशीम रोड बायपास, ता. जी. अकोला यांचे मालकीचे प्लॉट चे साखळी चे मूळ रजी. खरेदी खत क्र. ३०५० दिनांक २५/०५/१९७१ या क्रमांकाचे मूळ रजी. खरेदी खत दिनांक १९/०८/२०२६ रोजी वाशीम बायपास चौक, जुने शहर, अकोला या परिसरात गेले असता तेथील परिसरात हरवले आहे त्याबाबत गणेश मोतीराम निकामे यांनी दि. २१/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन जुने शहर येथे online तक्रार दाखल केली आहे, त्याचे तक्रार क्र. ११३७३०२१०७२६००१५३ असा आहे.

तरी सदरहू वरील क्रमांकाचे मूळ खरेदी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, वहीवाट, अधिकार संबंध, तसेच न्यायालयीन प्रकरणे अथवा इतर अधिकार इत्यादी असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहित मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहू वरील वर्णनाचे मूळ खरेदी खत कोणासही मिळाल्यास खालील नमूद पत्त्यावर ७ दिवसाचे आत आणून देण्यात यावे याची नोंद घ्यावी. तरी सदरहू वृत्तपत्रामध्ये संबंधीत जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात यावी, ही विनंती. करीता ही जाहीर नोटीस.

ठिकाण :-
दिनांक :- २२/०८/२०२६

ॲड. अजय वा. गोडे
ऑफीस - शॉप क्र. २३ - ए, दुसरा माळा, शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला ता. जि. अकोला, मो. क्र.९१७५९ ३८२४२

जाहीर सूचना

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे सौ. अश्विनी प्रशांत रूपनारायण आणि श्री. प्रशांत शालीग्राम रूपनारायण यांच्या वतीने सदर जाहीर सूचना देतो ती येणेप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन : मौजे - शिवनी, शेत सर्वे क्र. १०४/१ मधील ले-आऊट प्लॉट क्र. ४७ याचे एकूण क्षेत्रफळ ८०० चौ. फुट आणि प्लॉट क्र. ४८ याचे एकूण क्षेत्रफळ ८०० चौ. फुट आहे. ता. आणि जिल्हा. अकोला.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे सौ. अश्विनी प्रशांत रूपनारायण आणि श्री. प्रशांत शालीग्राम रूपनारायण यांच्या मालकीची आहे. तदनंतर, त्यांनी Piramal Finance Limited. येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे प्लॉट क्र. ४७ मधील पूर्वीचे मूळ खरेदीखत ज्याचे दि. १३/०९/१९९१ रोजीचे दस्त क्र. ५९६५ आणि प्लॉट क्र. ४८ मधील पूर्वीचे मूळ खरेदीखत ज्याचे दि. २५/०३/१९८० रोजीचे दस्त क्र. २९४५ हे दोन्ही मूळ दस्त गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण /राष्ट्रीयकृत/ खाजगी/ /पतसंस्था/ सहकारी/ इतर बँक कोणा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही आणि सदर दोन्ही मालमत्ता या Piramal Finance Limited. येथे गहाण करण्यात येईल करीता ही जाहीर सूचना देत आहे.

ठिकाण- तालुका- अकोला आणि जिल्हा अकोला
दि. २२/०८/२०२६

आपला
ॲड. रवींद्र क. वाटाणे
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती,
मो. नं. ९८२३६९८७४५

चौकशीची जाहिर नोटीस

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

अर्ज क्रमांक :- ८४/२०२६ कलम १९

सार्वजनिक न्यासाचे नाव - श्री. दादाजी धुनिवाले शैक्षण संस्था, अकोला, ता. जि. अकोला

अर्जदार :- श्री.डॉ. सागर रवींद्र इंगोळे रा.रामकुंज रजनीगंधा अपार्टमेंट जवळ, एलआयसी नगर अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- ७०००/- रुपये श्री डॉ. सागर रवींद्र इंगोळे यांचे जवळ जमा.
आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१, अकोला यांच्या शिक्क्यानीशी आज दिनांक-२१/०८/२०२६ रोजी दिली.

(शिक्का)
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

जाहीर नोटीस

वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १२८८/२०२६ — पोसंस नं. १०५४७/२०२६
पो.ता. ०१/१०/२०२६ — दिनांक : २१/०८/२०२६

अर्जदार : राजु दत्तुलाल खत्री रा. पार्वती नगर, कॅनाल रस्ता, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.

मयताचा पत्ता :- मयत : १. दत्तुलाल मोतीलाल खत्री २. कांताबाई दत्तुलाल खत्री / खत्री
पत्ता :- रा. पार्वती नगर, कॅनाल रस्ता, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्जाद्वारे अर्जदार यांनी मुंबई विनियम अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दत्तुलाल मोतीलाल खत्री यांचे दि. ०२/०४/२०२६ रोजी राहते घरी डाबकी रोड, अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत कांताबाई दत्तुलाल खत्री / खत्री यांचे दि. २७/०४/२०२४ रोजी राहते घरी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०१/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्देश केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होऊन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. ह्याची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क-स्तर), अकोला

Karmayogi Appasaheb Pratishthan
Saraswati Arts College, Dahihanda, Tq.& Dist. Akola
Affiliated to S.G.B. Amravati University, Amravati.

WANTED
(WALK IN INTERVIEW)

Applications are Invited for appointments of candidates for teaching in the college on Contributory (CHB) basis under.
Vacancies for Grant-in-aid Course / Programmes
(As per Regulation No. 2/2020, and its para-11]G.R. Dated 17/10/2022)

Sr.No.	Subject	Total No. of Contributory Post
1.	English	03

Eligbility :- Academic qualification shall be as per U.G.C. Regulation. 2018 (University Direction No. 08/2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No. संकीर्ण-2018/(185/18)/ मशि -3, dt. 14-11-2018. The other conditions and Remuneration shall be as fixed by Govt. in the said GR. Interested and qualified candidates should appear for interview **on dated 27/08/2026 at 11.00 A.M.** in the Principal Office at their own cost along with application on plain paper with Two Photo Copies of Educational Qualifications Caste Certificate if any, Two Passport Size Photograph and Adhar Card.

President Secretary Principal
Saraswati Arts College, Dahihanda, Tq.Dist.Akola

Shri Sant Gajanan Maharaj Education Society's
Shri Sant Gajanan Maharaj Arts College, Borgaon Manju
Affiliated to S.G.B. Amravati University, Amravati.

WANTED
(WALK IN INTERVIEW)

Applications are Invited for appointments of candidates for teaching in the college on Contributory (CHB) basis under.
Vacancies for Grant-in-aid Course / Programmes
(As per Regulation No. 2/2020, and its para-11]G.R. Dated 17/10/2022)

Sr.No.	Subject	Total No. of Contributory Post
1.	Political Science	02

Eligbility :- Academic qualification shall be as per U.G.C. Regulation. 2018 (University Direction No. 08/2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No. संकीर्ण-2018/(185/18)/ मशि -3, dt. 14-11-2018. The other conditions and Remuneration shall be as fixed by Govt. in the said GR. Interested and qualified candidates should appear for interview **on dated 27/08/2026 at 11.00 A.M.** in the Principal Office at their own cost along with application on plain paper with Two Photo Copies of Educational Qualifications Caste Certificate if any, Two Passport Size Photograph and Adhar Card.

President Secretary Principal
Shri Sant Gajanan Maharaj Arts College, Borgaon Manju

अग्रवाल समितीच्या शासकीय प्रमाणपत्र नोंदणीस प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक सेवेत सक्रिय अग्रवाल समितीच्या वतीने स्थानिक अग्रसेन भवनात आयोजित एसटी स्मार्ट कार्ड, आधार कार्ड, मतदार कार्ड, ईडब्लू एस प्रमाणपत्र इत्यादी शासनातील दस्तऐवजांच्या नोंदणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अग्रवाल समितीचे अध्यक्ष महेंद्र खेतान यांच्या अध्यक्षतेत आयोजित या शिबिराचे उद्घाटन भवन ट्रस्टचे पदाधिकारी नवलकिशोर भरतिया यांनी केले. राजस्थानी समाजासाठी आयोजित या शिबिरात शेकडो महिला-पुरुषांनी आवश्यक सरकारी दस्तऐवजांची नोंदणी करून लाभ घेतला. अनेक लाभार्थींना शासनाच्या प्रमाणपत्रांबाबत मार्गदर्शन करून कागदपत्रे दुरुस्त करण्यात मदत करण्यात आली. नोंदणीचे काम विजय घरडे, संतोष गवळी, आनंद चौधरी, आमीर खान आदींनी पाहिले.

जय बजरंग विद्यालय चान्नी येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

■ प्रतिनिधी | अकोला ■

जय बजरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चान्नी येथे ८० वा स्वातंत्र्य दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम जय बजरंग युवक मंडळाचे संचालक डॉ. विनायकराव ईंगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर पोलीस स्टेशन चान्नी येथे ध्वजारोहण करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांची गावातून भारत मातेचा व तिरंगा झेंड्याचा जयघोष करत प्रभातफेरी काढण्यात आली. त्यानंतर शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे संस्थापक सचिव मा. गजाननभाऊ ईंगळे यांनी स्वीकारले. यावेळी चान्नी पो.स्टे.चे ठाणेदार गंगाधर दराडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मंचावर संचालक मधुकरराव गाडगे, प्रकाश बंड, प्राचार्य संग्राम ईंगळे, प्राचार्य निवृत्ती वरखेडे उपस्थित होते.

मुख्याध्यापक संघ, क्रीडाशिक्षक महासंघाची सहविचार सभा

• नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार; • शैक्षणिक व क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | बार्शिटाकळी ■

अकोला जिल्हा मुख्याध्यापक संघ तथा महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाच्या वतीने बार्शीटाकळी येथील क्रीडा संकुल, दगडपारवा येथे सहविचार सभा उत्साहात पार पडली. महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष शत्रुघ्न बिरकड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुभाष भालेराव, जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी विदर्भ मुख्याध्यापक संघाचे सचिव दिनेश तायडे, कोषाध्यक्ष माधव विखे, मार्गदर्शक बळीराम झामरे, संघटक नीलिमा वैराळे, विदर्भ प्रतिनिधी कुसुम हरणे, अकोला जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष विलास खुमकर, जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र काळे, जिल्हा सचिव राजेंद्र जळमकर, विदर्भ अध्यक्ष प्रमोद वानखडे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नवनियुक्त जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव दिनकर गायकवाड, सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक अनिस खान साहेब खान, शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे स्वीकृत सदस्य विजय ठोकळ यांचा सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हा उपाध्यक्षपदी राजेश पातोडे, बाळकृष्ण गावंडे व नितीन नानोटे, जिल्हा संघटकपदी निरंजन बंड, जिल्हा सहसचिवपदी नितीन मानके, बार्शीटाकळी तालुका सचिवपदी डॉ. सुभाष चव्हाण, उपाध्यक्षपदी अनिल धोत्रे आणि कौन्सिलरपदी नरेंद्र धर्मे यांची नियुक्ती झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी शत्रुघ्न बिरकड, सुभाष भालेराव, सतीशचंद्र भट, आनंद साबू, दिनकर गायकवाड, अनिस खान साहेब खान व विजय ठोकळ यांनी मनोगत व्यक्त केले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना आगामी कार्यासाठी शुभेच्छा देत शैक्षणिक क्षेत्रासोबतच विद्यार्थ्यांच्या क्रीडा विकासासाठी संघटनात्मक पातळीवर प्रभावीपणे काम करण्याचे आवाहन करण्यात आले.

सभेला अकोला शहर, अकोला ग्रामीण, अकोट, बाळापूर, मूर्तिजापूर, तेल्हारा, पातूर आणि बार्शीटाकळी तालुक्यांतील मुख्याध्यापक संघ व क्रीडा शिक्षकांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजेंद्र काळे यांनी केले. सूत्रसंचालन नरेंद्र धर्मे यांनी, तर आभार प्रदर्शन नितीन मानके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक संघ तथा महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

तेल्हारा नगर परिषदेत ४८२ एकल महिलांची नोंदणी

शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्याचे प्रशासनासमोर आव्हान

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

महिला व बाल विकास विभागाच्या २२ मे २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार तेल्हारा नगर परिषदेतर्फे १९ ते २९ ऑगस्टदरम्यान राबविण्यात आलेल्या एकल महिलांच्या विशेष नोंदणी मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या मोहिमेत तब्बल ४८२ एकल महिलांची नोंदणी करण्यात आली. नोंदणी झालेल्या महिलांमध्ये ३८७ विधवा, ५५ परित्यक्ता, २४ घटस्फोटित आणि १६ अविवाहित महिलांचा समावेश आहे. या माध्यमातून महिलांची सामाजिक, आर्थिक, कायदेविषयक, शैक्षणिक व आरोग्यविषयक माहिती संकलित करण्यात आली असून, ही माहिती शासनाकडे सादर करण्यात येणार आहे. शासनाच्या पुढील आदेशानंतर पात्र महिलांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळणार आहे.

ही मोहीम दीनदयाळ अंत्योदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कक्षामार्फत राबविण्यात आली. सहायक प्रकल्प अधिकारी शांतनु वर्ते, सहायक कर निरीक्षक चैतन्य देशमुख, सुरेश नागोलकर व संदीप बायड यांनी मोहिमेसाठी विशेष परिश्रम घेतले.

नगराध्यक्ष वैशाली पालीवाल, उपनगराध्यक्ष, नगरसेवक-नगरसेविका तसेच मुख्याधिकारी सतीश गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम यशस्वी झाली.

विशेष मोहिमेला महिलांचा प्रतिसाद

उपाध्यक्ष सचिन पाटील यांनी सांगितले की, एकल महिलांची नोंदणी करणे हा केवळ पहिला टप्पा आहे. नोंदणी झालेल्या प्रत्येक पात्र महिलेला शासनाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. नोंदणीपुरते काम मर्यादित न ठेवता आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या महिलांना सक्षम करण्यासाठी योजनांचा लाभ थेट पात्र लाभार्थींपर्यंत पोहोचला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, ४८२ महिलांची नोंदणी झाल्याने आता या महिलांना प्रत्यक्ष योजनांचा लाभ कधी आणि कितपत मिळतो, याकडे लक्ष लागले आहे. त्यामुळे नोंदणी मोहिमेनंतर लाभ वितरणाची प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्याचे आव्हान नगर परिषद प्रशासनासमोर आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला-४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २६६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2024

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

वाघाच्या दर्शनाने हिंगणी-माळेगाव हादरले

वन्यप्राण्यांचे नैसर्गिक मार्ग झाले बंद, पर्यायी वाट म्हणून रस्त्यांचा आधार, मानव-वन्यजीव संघर्षाची टांगती तलवार



सेलू/ जनमाध्यम

हिंगणी-माळेगाव ठेका मार्गावर वाघाचे दर्शन होत असल्याने जंगलालगतच्या शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गोहदा कला, धामणगाव आणि सालई पेवट परिसरात मोठ्या प्रमाणात जंगल असून डोंगरगाव तलाव व त्याच्या सभोवतालचे राखीव जंगल वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक भ्रमणासाठी महत्त्वाचे क्षेत्र मानले जाते. मात्र, या परिसरातील वन्यप्राण्यांच्या पारंपरिक भ्रमणमार्गात मानवी हस्तक्षेपामुळे अडथळे निर्माण होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे.

कुंपणामुळे वाट बंद, रस्त्यावर वन्यप्राण्यांची वाटचाल

धामणगाव परिसरात उभारण्यात आलेल्या रासायनिक कंपनीच्या परिसराला सुमारे १२ फूट उंच तारेचे कुंपण तसेच काही ठिकाणी प्रीकास्ट भिंती उभारण्यात आल्याने वन्यप्राण्यांच्या पारंपरिक मार्गावर परिणाम झाल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. नैसर्गिक वाटा अडवल्या गेल्याने वन्यप्राणी पर्यायी मार्ग शोधत असून डांबरी रस्त्यांचा वापर करीत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास येत आहे.यामुळे हिंगणी-माळेगाव ठेका मार्गासह जंगलालगतच्या शेतरस्त्यांवर वन्यप्राण्यांचा वावर वाढण्याची शक्यता आहे. वाघासारखा मोठा शिकारी प्राणी मानवी वस्ती आणि शेतशिवाराच्या जवळ येत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे.

बफर क्षेत्रामुळे संवेदनशील परिसर

गोहदा कला आणि सालई पेवट परिसर बोर व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्राशी संबंधित असल्याने हा संपूर्ण पट्टा वन्यजीवांच्या दृष्टीने संवेदनशील आहे. त्यामुळे वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासात आणि भ्रमणमार्गात कोणत्याही प्रकारचे अडथळे निर्माण होणार नाहीत, याची दक्षता घेणे गरजेचे आहे. वन्यप्राण्यांना त्यांच्या नैसर्गिक मार्गावरून मुक्तपणे भ्रमण करता आले नाही तर ते मानवी वापराच्या मार्गाकडे वळण्याची शक्यता असते. परिणामी शेतकरी, मजूर, वाहनचालक आणि वन्यप्राणी यांच्यात अचानक सामना होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे भविष्यात मानव-वन्यजीव संघर्षाची गंभीर परिस्थिती निर्माण होण्यापूर्वीच उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

कॅमेरा ट्रॅप लावा, भ्रमणमार्ग शोधा

वनविभागाने हिंगणी-माळेगाव ठेका मार्गासह गोहदा कला, धामणगाव, सालई पेवट आणि डोंगरगाव तलाव परिसरात वन्यप्राण्यांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवावे. कॅमेरा ट्रॅपच्या माध्यमातून वाघासह इतर वन्यप्राण्यांच्या हालचाली आणि भ्रमणमार्गाचा अभ्यास करावा. तसेच जंगलालगतच्या गावांमध्ये जनजागृती करून शेतकऱ्यांना सुरक्षिततेच्या उपाययोजनांची माहिती द्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

दत्तपूर चौकाला 'भारतरत्न आचार्य विनोबा भावे' यांचे नाव

विनोबांच्या पदस्पर्शाने पावन भूमीला नवा सन्मान

वर्धा/ जनमाध्यम

वर्धा शहराचे मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दत्तपूर चौकाला भारतरत्न आचार्य विनोबा भावे यांचे नाव देण्यात आले. या नामकरणामुळे विनोबांच्या कार्याचा समृद्ध वारसा लाभलेल्या दत्तपूर परिसराला नवी ओळख मिळाली आहे. नामकरणाच्या निमित्ताने परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.

दत्तपूरचा आणि आचार्य विनोबा भावे यांचा संबंध केवळ वास्तव्यापुरता मर्यादित नव्हता. कुष्ठरोगी आश्रमात राहून कुष्ठरुग्णांची सेवा करताना त्यांनी केवळ उपचार नव्हे, तर सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्याचे कार्य केले. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर लोटल्या गेलेल्या व्यक्तींमध्ये आत्मविश्वास

निर्माण करण्याचे मोठे काम त्यांनी केले.

दत्तपूरलगतच्या नालवाडी येथील हरिजन वस्तीत त्या काळात स्वच्छतेसाठी जाण्यासही अनेकजण कचरायचे. मात्र विनोबांनी सामाजिक भेदाभेद झुगारून स्वतः तेथे जाऊन नियमित साफसफाई केली. स्वच्छता, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक समतेचा संदेश त्यांनी कृतीतून समाजासमोर ठेवला. याच भूमीतून पुढे त्यांच्या भूदान चळवळीच्या व्यापक कार्याला दिशा मिळाली. भूमिहीन, दलित आणि मागासवर्गीय कुटुंबांना जगण्यासाठी शेतजमीन उपलब्ध व्हावी, या मानवतावादी विचारातून देशभर भूदान चळवळ उभी राहिली. पवनार येथील विनोबांच्या आश्रमाच्या कार्याची सुरुवातही या परिसराशी जोडलेली आहे.

पवनार,नालवाडी,साटोडा,आलोडी आणि मसाळा परिसरातील नागरिकांच्या अनेक दिवसांपासूनच्या जनभावनेचा सन्मान करत दत्तपूर चौकाला विनोबांचे नाव देण्यात आले. त्यामुळे या चौकातून जाणाऱ्या प्रत्येकाला विनोबांच्या विचारांची आणि कार्याची आठवण व्हावी, हा या नामकरणामागील भाव आहे.

भारतरत्न आचार्य विनोबा भावे यांच्या नावाच्या फलकाचे उद्घाटन माजी सैनिक अभिमन्यू पवार, प्राध्यापक उमाकांती डुकरे आणि तंटामुक्ती अध्यक्ष पंकज काचोळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य वैभव सूर्यवंशी, बंटी खडसे, प्रवीण बुराडे, नितीन निमकर, नागेश वानखेडे, प्रतीक मांडले, संजय जिन्नेवार, सुनील कामडी, रवी मडावी, विक्रांत चौधरी, अमोल पेटकर,सचिन साठे, विजय भोयर, ज्ञानेश्वर राऊत, हरिष खडसे यांच्यासह अनेक विनोबा भावे प्रेमी उपस्थित होते.

गांजाच्या नशेत झिंगलेल्या चौघांवर पोलिसांची कारवाई

पुलगाव-गांजा ओढून नशेत असल्याचे आढळून आलेल्या चौघांवर पुलगाव पोलिसांनी कारवाई केली. ही कारवाई सुभाषनगर परिसरात करण्यात आली.पुलगाव येथील सुभाषनगर परिसरात चार जण गांजा ओढताना आढळून आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी कारवाई करीत पंकज रामटेके, दुर्गेश इंगळे, आकाश सहारे आणि मनोज गाढवे यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी केलेल्या तपासणीदरम्यान त्यांच्याजवळ अमलीपदार्थ सेवनासाठी वापरण्यात येणारे साहित्य आढळून आले. त्यामध्ये चिलीम, कापड, माचीस आदी साहित्याचा समावेश आहे. संबंधित साहित्य पोलिसांनी जप्त केले. चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमली पदार्थांचे विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

आष्टीतील नरभक्षक वाघाचा तातडीने बंदोबस्त करा-खा.काळे

आष्टी शहीद/ जनमाध्यम

नरसिंगपूर शिवारात वाघाच्या हल्ल्यात शेतकरी रामभाऊ उदेभान भोयर यांचा बळी गेल्यानंतर आष्टी तालुक्यात भीतीचे सावट पसरले आहे. या घटनेची गंभीर दखल घेत खासदार अमर शरदराव काळे यांनी वनविभागाला धारेवर धरत नरभक्षक वाघाचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. नागपंचमीच्या दिवशी शेतात पूजा करण्यासाठी गेलेल्या रामभाऊ भोयर यांच्यावर वाघाने हल्ला केला. यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे शेतकरी शेतात जाण्यासही घाबरत असून, वनविभागाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

खासदार काळे यांनी १९ ऑगस्ट रोजी उपवनसंरक्षक, वर्धा यांना पत्र देऊन नागरिक आणि शेतकऱ्यांच्या जीविताची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली. वाघाचा तातडीने बंदोबस्त करून केलेल्या कार्यवाहीची माहिती ग्रामस्थांना द्यावी, अशी सूचनाही त्यांनी केली. दरम्यान, वाघाला जेरबंद करण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी वनविभाग कार्यालयावर मोर्चा काढला. वाघाचा बंदोबस्त होईपर्यंत परिसरात २४ तास गस्त ठेवण्याची मागणीही जोर धरत आहे. आता आश्वासन नव्हे, तर वाघाच्या बंदोबस्ताची ठोस कारवाई कधी होणार, हा प्रश्न आष्टीकर विचारत आहेत.

संक्षिप्त

जाम येथे दुचाकी चोरा

समुद्रपूर-जाम येथील बसस्थानकापुढील हॉटेल परिसरातून अज्ञात चोरट्याने दुचाकी लंपास केल्याची घटना घडली. या प्रकरणी समुद्रपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.वाणाडोंगरी येथील जितेंद्र मेश्राम हे कामानिमित्त जाम येथे आले होते. त्यांनी त्यांची एमएच ४० बीटी ९३५९ क्रमांकाची दुचाकी जाम चौरस्ता येथील बसस्थानकापुढे उभी केली होती. काही वेळाने ते परत आले असता दुचाकी दिसून आली नाही. परिसरात शोध घेऊनही दुचाकीचा ठावठिकाणा लागला नाही. अज्ञात व्यक्तीने संधी साधून दुचाकी चोरून नेल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर मेश्राम यांनी समुद्रपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

प्रशासकीय कामकाजात अडथळा

वर्धा-महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या प्रशासकीय भवनातील दारांना अनधिकृतपणे कुलूप लावून अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आवागमनासह प्रशासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध रामनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.राजेश कुमार यादव, रामचंद्र, निरंजन कुमार, राकेश अहिरवार, राहुल कुमार आणि शिव पूजन अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. काही विद्यार्थी मागील काही दिवसांपासून प्रशासकीय भवनासमोर गोंधळ करीत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. संबंधितांनी प्रशासकीय भवनाच्या दारांना कुलूप लावून अधिकारी व कर्मचाऱ्यांना अडविले. तसेच कुलपती निवड समितीच्या ऑनलाइन बैठकीत नारेबाजी करून व्यत्यय निर्माण केला. कुलपतींचे वाहन अडविल्याचा आरोपही करण्यात आला आहे. याशिवाय वर्गातील कुंडी तोडून अध्ययनात अडथळा आणण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पोलिस तपास सुरू आहे.

४६ हजारांचा ऐवज असलेली पर्स लंपास

हिंगणघाट-जाम ते नंदोरीदरम्यान प्रवास करणाऱ्या महिलेची ४६ हजार रुपयांचा ऐवज असलेली पर्स अज्ञात चोरट्याने लंपास केली. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.हिंगणघाट येथील मीना माणुसमारे या वरोरा येथे लग्न सोहळ्यासाठी राजुरा बसने प्रवास करीत होत्या. जाम ते नंदोरीदरम्यान त्यांना आपली पर्स उघडी असल्याचे दिसून आले. त्यांनी पर्सची पाहणी केली असता त्यातील छोटी पर्स गायब असल्याचे निदर्शनास आले. अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत पर्स लंपास केल्याचा संशय आहे. चोरी गेलेल्या पर्समध्ये सहा हजार रुपये रोख आणि ४० हजार रुपये किमतीची सोन्याची पोत असा एकूण ४६ हजार रुपयांचा ऐवज होता. याप्रकरणी माणुसमारे यांनी समुद्रपूर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

विषारी औषध प्राशन केल्याने इसमाचा मृत्यू

समुद्रपूर: विषारी औषध प्राशन केल्याने ५० वर्षीय इसमाचा



उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना समुद्रपूर तालुक्यातील शिवणी येथे घडली. गणेश अर्जुनराव बावणे असे मृताचे नाव आहे.गणेश बावणे यांनी विषारी औषध प्राशन केल्याचे निदर्शनास आल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने समुद्रपूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार सुरू केले. मात्र तपासणीदरम्यान डॉक्टरांनी त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी आवश्यक नोंद केली. विषारी औषध प्राशन करण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू केला आहे. पोलिसांकडून घटनाक्रमाची माहिती घेतली जात आहे. या घटनेमुळे शिवणी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कॅमेऱ्याने टिपले क्षण; वृक्षारोपणातून पर्यावरणाचा संदेश

आर्वी/ जनमाध्यम

जागतिक छायाचित्र दिन आर्वी येथे उत्साहात साजरा करण्यात आला. सहकार भवन येथे छायाचित्रकार व फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या उपस्थितीत कॅमेरा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली.

छायाचित्र म्हणजे केवळ एका क्षणाचे चित्र नसून त्या क्षणातील भावना, आठवणी आणि इतिहासाची नोंद असते. डिजिटल युगात प्रत्येकाच्या हातात मोबाईल कॅमेरा आला असला, तरी योग्य क्षण अचूकपणे टिपणाऱ्या व्यावसायिक छायाचित्रकारांचे योगदान आजही मोलाचे आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमानंतर विविध ठिकाणी

जागतिक छायाचित्र दिन उत्साहात

वृक्षारोपण करण्यात आले. छायाचित्रणासोबतच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही जपली पाहिजे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश सहारे, पंकज गोडबोले, सचिन श्रीराव, जय खोपे, अमर बडघरे, ललित पखाले, यश शिरपुरे, वैभव सव्वालाखे, अमोल अहिव, शुभम लोखंडे, आशिष करडे, शुभम शिरभाते, सचिन पाटणी, बंडू शिरभाते, वैशाली शिरभाते, महेंद्र सिडामे, प्रमोद हरणे, अभिषेक ढोले, मंगेश कसारे, निलेश अमृतकर यांच्यासह छायाचित्रकारांनी परिश्रम घेतले.

सोमवारी डॉ. ओमप्रकाश शेटे यांचा दौरा

वर्धा/ जनमाध्यम

आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांचा २४ ऑगस्ट रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.२४ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत कार्ड वितरण बाबत आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी ११.३० वाजता पत्रकार परिषदेस उपस्थिती. दुपारी १२ वाजता आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी मेघे येथे भेट देतील. दुपारी १ वाजता वर्धा येथून नागपूरकडे प्रयाण करतील.

अपघातात २८ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

वर्धा-रस्त्याच्या कडेला गंभीर जखमी अवस्थेत आढळलेल्या दुचाकीस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना कर्माबाद परिसरात घडली. उमेश ज्ञानेश्वर सोनवाणे वय २८ वर्षे असे मृताचे नाव आहे.उमेश सोनवाणे हे एमएच ३१ एक्स ८०१८ क्रमांकाच्या दुचाकीसह रस्त्याच्या कडेला गंभीर जखमी अवस्थेत आढळून आले होते. घटनेची माहिती मिळाल्यानंतर त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. अपघात नेमका कशामुळे झाला, याबाबत स्पष्ट माहिती मिळालेली नाही. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आल्यानंतर आर्वी पोलिसांनी आवश्यक नोंद केली आहे. अपघाताच्या कारणांचा तपास सुरू असून घटनास्थळ आणि उपलब्ध माहितीच्या आधारे पोलिसांकडून पुढील कार्यवाही केली जात आहे.

सजग रहा, सुरक्षित रहा'चा विद्यार्थ्यांना कानमंत्र

दामिनी पथकाकडून स्वसंरक्षणासह सायबर सुरक्षेचे धडे

नशेपासून दूर राहा, संकटात घाबरू नका; पोलिसांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

वर्धा/ जनमाध्यम

मोबाईलच्या एका चुकीच्या क्लिकमुळे सायबर गुन्ह्याचे बळी पडण्याची शक्यता असताना, वाढत्या व्यसनांच्या विळख्यात तरुणाई अडकण्याचा धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासात नव्हे, तर स्वतःच्या सुरक्षिततेबाबतही सजग राहणे गरजेचे आहे. याच उद्देशाने दामिनी पथक,वर्धा यांच्या वतीने नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.



या कार्यक्रमात एपीआय माधुरी वाघाडे यांच्यासह नीलिमा कोहळे, ममता निकोडे, रंजना पेटकर आणि रवीना जाधव यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत स्वसंरक्षण, सायबर सुरक्षा आणि नशामुक्ती या विषयांवर मार्गदर्शन केले.

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया आणि मोबाईलचा वापर करताना विद्यार्थ्यांनी अधिक सतर्क राहावे, अनोळखी व्यक्तींशी वैयक्तिक माहिती शेअर करू नये तसेच संशयास्पद लिंक, संदेश किंवा ऑनलाइन व्यवहारांपासून सावध राहावे, असे मार्गदर्शन करण्यात आले. सायबर गुन्ह्यांना बळी पडण्यापेक्षा वेळीच सावधगिरी बाळगणे अधिक महत्त्वाचे असल्याचा संदेशही यावेळी देण्यात आला.

यासोबतच विद्यार्थ्यांनी संकटाच्या प्रसंगी घाबरून न जाता प्रसंगावधान राखावे आणि आवश्यकतेनुसार मदत घ्यावी.स्वतःच्या सुरक्षेसाठी मूलभूत स्वसंरक्षणाचे ज्ञान आत्मसात करावे, असेही सांगण्यात आले.

तरुणाईला नशेच्या आहारी नेणाऱ्या विविध प्रकारांपासून विद्यार्थ्यांनी दूर राहावे. नशा ही केवळ व्यक्तीचे आरोग्यच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाचे आणि समाजाचे भविष्य उद्ध्वस्त करू शकते. त्यामुळे नशेला नकार देत शिक्षण, संस्कार आणि सकारात्मक विचारांची कास धरावी, असे आवाहन दामिनी पथकाने केले.विद्यार्थ्यांनीही या मार्गदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सुरक्षितता,सायबर गुन्हे आणि नशामुक्तीविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.यावेळी नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य गवारकर, पृथ्वीराज सिंह धांदोरिया, डंभारे, शिखा, नहाटा, निखिल, सागर, सातघरे, प्रशांत काळे,सातपुते तसेच विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते.

आक्षेपार्ह वक्तव्याप्रकरणी नितेश कराळेंवर गुन्हा

वर्धा- सोशल मीडियावरील व्हिडीओमध्ये समाजाबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या तक्रारीवरून नितेश कराळे यांच्याविरोधात वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीसह काही व्यक्ती युट्युबवर नितेश कराळे यांचे व्हिडीओ पाहत होते. त्यावेळी एका व्हिडीओमध्ये समाजाबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. संबंधित वक्तव्यामुळे समाजाच्या भावना दुखावल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यानंतर वर्धा शहर पोलिसांनी नितेश कराळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. सोशल मीडियावर कोणतेही वक्तव्य किंवा व्हिडीओ प्रसारित करताना सामाजिक सलोखा आणि कायद्याचे भान ठेवण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करीत असून संबंधित व्हिडीओचीही पडताळणी केली जात आहे.

स्वयंसहायता गटांसाठी आहार पुरवठा कृतीसंगम कार्यशाळा

वर्धा/ जनमाध्यम

जिल्हा रुग्णालयाच्या अधिनस्त २०० पेक्षा कमी खाटा क्षमतेचे उपजिल्हा रुग्णालय हिंगणघाट, आर्वी व ग्रामिण रुग्णालय पुलगांव, भिडी, कारंजा, आष्टी, समुद्रपुर, देवळी, वडनेर, सेलू येथे आंतरुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णांसाठी स्वयंसहाय्यता बचतगटांकडून आहार पुरवठा करण्यात येणार आहे.

कार्यशाळेला मार्गदर्शन करण्याकरिता जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाच्या प्रकल्प संचालक वैशाली रसाळ, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजसिंह पवार, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.विद्या पवार, डॉ.प्रवीण धमाणे, अधीक्षक प्रशांत गावंडे, आहार तज्ञ शिल्पा आंबेकर,जिल्हा अभियान व्यवस्थापक नीरज नखाते, मनीष कावडे उपस्थित होते. रुग्णांना स्वच्छ, सुरक्षित, पौष्टिक, संतुलित व वेळेवर आहार पुरविण्याकरीता महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत स्थापन व कार्यरत असलेल्या तालुक्यातील स्थानिक महिला स्वयंम सहाय्यता गटांमार्फत सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये निर्धारित अटी व शर्तीनुसार आहार सेवा उपलब्ध करुन घ्यावयाची आहे. त्यानुसार आहार पुरवठा माहिती कार्यशाळा तसेच इतर योजनेची माहिती मागदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता उमेदचे वर्धा तालुका कर्मचारी व इतर तालुका कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. उपजिल्हा, ग्रामिण रुग्णालयांमध्ये आहार सेवा घेण्याकरीता तालुक्यातील स्थानिक महिला स्वयंम सहाय्यता गटांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. ईच्छूक महिला स्वयंम सहाय्यता गटांनी अर्ज जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, वर्धा येथे ३१ ऑगस्ट पर्यंत सादर करावे, असे उमेदच्या जिल्हा अभियान व्यवस्थापकांनी कळविले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २६६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरातील कायदा-सुव्यवस्था कायम ठेवा

अचलपूर/प्रतिनिधीः- आगामी सन,उत्सव उत्साहात साजरा करून अचलपूर- परतवाडा जुळ्या शहरातील शांतता, कायदा, सुव्यवस्था यापुढेही अशीच कायम ठेवण्याचे आवाहन अमरावती जिल्हा ग्रामीण पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांचे अचलपूर पो. स्टे मध्ये संपन्न झालेल्या शांतता समितीच्या बैठकीत केले.

आगामी सन ,उत्सव निमित्त अचलपूर ,परतवाडा व सरमसपुरा या तिन्ही पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांच्याकडून संपूर्ण आढावा सुद्धा त्यांनी घेतला.यावेळी अचलपूर पोलिस स्टेशन येथील सभागृहात संपन्न झालेल्या शांतता समितीच्या बैठकीत अमरावती जिल्हा ग्रामीण पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी उपस्थितीत मंडळींशी संवाद ही साधला.आगामी ईद ,गणेशोत्सव हे सण साजरा करताना समाजातील शांतता आणि सलोखा बिघडणार नाही याची काळजी घेणे महत्त्वाचे असून त्याबाबत आवश्यक त्या सूचना देऊन जुळ्या शहरातील कायदा आणि सुव्यवस्था शांततेत राहण्यासाठी नागरिकांनी तसेच गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी शांतता समितीच्या सभेत बोलताना केले.यावेळी त्यांनी सोशल पासून सावधान राहण्याचे आवाहन ही केले.

सध्या स्थितीत सोशल मीडियावर येणारी प्रत्येक माहिती सत्य नसते .तर त्याची पडताळणी करणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.यावेळी त्यांनी ऑपरेशन कवच संदर्भात सुद्धा माहिती दिली .शांतता ,कायदा ,सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी जुळ्या शहरातील नागरिकांच्या सहकार्याने आगामी सन ,उत्सव शांततेत व उत्साहात साजरा होईल असा विश्वास पोलीस अधीक्षकांनी याप्रसंगी व्यक्त केला. यावेळी मंचावर अचलपूर पोलिस स्टेशनचे ठाणेदार शेषराव नीतनवरे,माजी नगराध्यक्ष रफिक सेठ ,सामाजिक कार्यकर्ते प्रल्हाद अग्रवाल, कचरू पटवारी ,माजी नगरसेवक बंटी ककरानिया,नितीन आखुड,नगरसेवक फिरोज खान,दिलावर खान,गजानन बीजागरे, अजिज खान, मस्तान कुरेशी ,सय्यद मौलाना,अक्षय बुंदेले आदी उपस्थितीत होते. याप्रसंगी मान्यवरांनी आपआपली मनोगत व्यक्त केले. मान्यवरांनी आवश्यक त्या सूचना भाषणादरम्यान दिल्यात. आभार प्रदर्शन अचलपूर पोलीस स्टेशन चे ठाणेदार शेषराव नीतनवरे यांनी केले.

पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांचे शांतता समितीच्या बैठकीत आवाहन

या बैठकीच्या माध्यमातून आगामी सन,उत्सवाच्या निमित्ताने अनेक नागरिकांनी अचलपूर शहरातील अचलपूर नगर परिषद हद्दीतील मुख्य रस्त्याची दुरावस्था बाबत प्रश्न निर्माण केले.मात्र अचलपूर नगर परिषद आणि महावितरण विभागाचे अधिकारी या बैठकीत अनुपस्थितीत असल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली.

प्राणघातक हल्ल्याप्रकरणी चार विधीसंघर्षित बालक ताब्यात

-फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई; जुन्या वादातून हल्ला

अमरावती/प्रतिनिधीः- पंचशीलनगर परिसरात घरात घुसून दोघांवर चाकू व लाकडी रापटरने प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी चार विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेतले. सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली. हल्ल्याचे नेमके कारण तसेच अन्य साथीदारांचा सहभाग याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ ऑगस्ट रोजी पंचशीलनगर येथील लता धनराज गडलिंग (वय ५०) यांनी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. रात्री कुटुंबीयांसह जेवण झाल्यानंतर त्यांचा मुलगा व भाचा मागील खोलीत झोपले होते. रात्री सुमारे २.३० वाजता मोठमोठ्याने ओरडण्याचा आवाज आल्याने लता गडलिंग जाग्या झाल्या. आवाजाच्या दिशेने गेल्यानंतर काही मुले त्यांना धक्का देऊन हातातील चाकू व लाकडी रापटर घेऊन घराबाहेर पळून गेल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले. त्यानंतर खोलीत जाऊन पाहिले असता मुलगा व भाचा रक्तबंबाळ अवस्थेत जमिनीवर पडलेले दिसले. दोघांवर पाठीवर व पोटावर चाकूने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी गुन्हा क्रमांक ७५५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१), ११८(२), १८९(४), १९०, १९१(३), ३३३ नुसार गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यासोबतच गोपनीय बातमीदारांकडून माहिती घेण्यात आली. या तपासातून हल्ल्यात सहभागी असलेल्या चार विधीसंघर्षित बालकांची ओळख पटली.

त्यानंतर अमरावती शहर तसेच जिल्ह्यात त्यांचा शोध घेण्यात आला. शोधमोहीम राबवत असताना चारही विधीसंघर्षित बालकांना राजापेठ येथील गोंड बाबा मंदिर परिसरातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्यांनी अन्य साथीदारांसह जुन्या वादातून हा प्रकार केल्याची प्राथमिक माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, हल्ल्यामागील नेमके कारण काय आणि वापरण्यात आलेले शस्त्र कोठून आणण्यात आले, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त तथा परिमंडळ-१चे यशवंत सोळंके आणि सहायक पोलीस आयुक्त, फ्रेजरपुरा विभाग नयन आलुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. फ्रेजरपुरा वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र राजुलवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) समाधान वाठोरे, डीबी पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक राहुल महाजन, पोलीस उपनिरीक्षक अर्जुन राजरपल्लू यांच्यासह पोलिस पथकाने कारवाईत सहभाग घेतला.

'नो एन्ट्री' लावून चालणार नाही, सार्वजनिक माल वाहतूक सुरळीत करण्यासाठी उपाययोजना करा- आ. सुलभा खोडके

अमरावती/प्रतिनिधी :- अमरावती शहराची सतत वाढणारी लोकसंख्या, वाहनांची झपाट्याने वाढणारी संख्या, बाहेरील जिल्ह्यांतून येणाऱ्या मालवाहू ट्रकची वाढती वर्दळ आणि शहरातील प्रमुख रस्त्यांवरील रोजची वाहतूक कोंडी या संदर्भात अमरावती पोलीस प्रशासनाने एक कठोर पाऊल उचलत अवजड वाहनांसाठी नवीन 'नो-एंट्री' अधिसूचना लागू केली आहे. या अधिसूचनेमुळे सार्वजनिक माल वाहतूक सेवा विस्कळीत झाली असून अर्थचक्राची चाके थांबली आहे. शहरातील अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा विस्कळीत होऊ नये यासाठी, काही विशिष्ट श्रेणींना प्रवेशबंदीच्या नियमातून सूट देण्यात यावी. शहरातील वाहतूक व्यवस्था सुव्यवस्थित करण्यासाठी आणि अपघात कमी करण्यासाठी केवळ ' नो एन्ट्री ' लावून चालणार नाही., तर प्रभावी उपाययोजना व आवश्यक सुधारणा करणे गरजेचे आहे. याबाबत पोलीस प्रशासनाचे सर्व प्रकारच्या शक्यता तपासून ' नो एन्ट्रीच्या ' अधिनियमात फेररचना करण्यासंदर्भात चाचपणी करण्याची सुचना अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी केली.

शुक्रवार दिनांक २१ ऑगस्ट २०२६ रोजी अमरावती शहर पोलीस आयुक्त - राकेश ओला यांच्या दालनामध्ये शहरातील ट्रान्सपोर्टधारक संघटना व पोलीस विभागाची महत्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीमध्ये ' नो एन्ट्री च्या ' अधिनियमामध्ये थोडी शिथिलता मिळण्यासह प्रतिबंधित मार्गावर नो-एंट्री' कालावधीतून जीवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना सूट देण्यासंदर्भात विचार मंथन करण्यात आले.

यावेळी पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी माहिती दिली कि, शहरातून जाणाऱ्या जुन्या बायपास मार्ग , बाजारपेठा, शाळा, महाविद्यालये, रुग्णालये आणि सरकारी कार्यालयांच्या परिसरातून होणाऱ्या अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण होत होता. या पार्श्वभूमीवर, सुपर एक्सप्रेस हायवे सुरू झाला असला तरी, जुन्या मार्गाचा वापर करणाऱ्या अवजड वाहनांना आता शहरात प्रवेश करण्यापासून रोखले जात आहे.

अवजड वाहनांसाठी अधिसूचनेनुसार, २ टनांपेक्षा जास्त क्षमता असलेल्या बहुतेक व्यावसायिक मालवाहू वाहनांना

दिवसभर, सकाळी ६:३० ते रात्री ९:३० पर्यंत शहरात प्रवेश करण्यास मनाई असून अत्यावश्यक आणि महत्त्वपूर्ण सेवांच्या वाहनांना सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत 'नो-एंट्री' आदेशातून सूट देण्यात आली असल्याचे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी सांगितले. पोलीस प्रशासनाच्या वतीने बैठकीत सांगण्यात आले कि, नव्या अधिसूचनेनुसार अवजड वाहनांना परकोटा परिसरात कायमस्वरूपी बंदी घालण्यात आली असून दाट लोकवस्तीचे क्षेत्र, गांधी चौक, अंबापेठ, राजापेठ, रवीनगर, बजरंग टेकडी, विलासनगर, मोरबाग, मसानगंज, पटवा चौक आणि गर्ल्स हायस्कूल ते इर्विन चौक हा मार्ग अवजड वाहनांसाठी कायमचा बंद असल्याचे पोलीस विभागाच्या वतीने आमदार महोदयांना माहिती देण्यात आली.

बैठकीला उपस्थित विधान परिषद आमदार संजय खोडके यांनी सांगितले कि, ' नो - एन्ट्रीच्या ' अधिसूचनेमुळे शहराचा व्यापार ठप्प होत असून अत्यावश्यक सेवांची वाहतूक प्रभावित झाल्याने शहरात अर्थचक्राची चाके थांबली आहे. शहरातील प्रत्येक वाहतूकदारांची माल वाहतूक वेगवेगळ्या प्रकारची असून सर्वच वाहतूकदारांनी एकसारखी प्रवेशबंदी व कडक नियम लावणे हे थोडे विसंगत असून यातून ' नो एन्ट्रीचा ' कालावधी संपताच सर्वच जड, अवजड व हलके -मध्यम वाहनांचा लोंढा एकसाथ शहरात सुटल्याने वाहतूक सुरक्षेचा नवा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत वाहतूक व्यवस्थेचे योग्य नियोजन करून काही महत्वपूर्ण टप्प्यांवर 'नो एन्ट्रीला ' शिथिलता देण्याबाबत आमदार संजय खोडके यांनी सुचना केली.

यावेळी बैठकीला पोलीस उपायुक्त परिमंडळ १ - यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त परिमंडळ २ - श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) - प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त - ट्राफिक संजय खताळे , वाहतूक शाखा पोलीस निरीक्षक - वैभव पानसरे , यांचे सह वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच जनाब अख्तर हुसेन, संजय काकरणीया, अशोक अग्रवाल, गोविंद सोमाणी, सुरेश जैन, मेराज खान पठाण, वसीम खान, आदींसह अमरावती होलसेल ग्रेन शुगर किराणा मर्चंट असोशिएशन, सक्करसाथ रिफायनरी तेल असोशिएशन , अमरावती महानगर चेंबर ऑफ कॉमर्स , अमरावती गुड्स ट्रान्सपोर्ट असोशिएशन, अमरावती खदान व क्रशर ओनर्स असोशिएशन ,क्रेडाई अमरावती ,अमरावती जिल्हा मोटर चालक मालक माल वाहतूक असोशिएशन,अमरावती डिस्ट्रिक्ट कॉन्ट्रॅक्टर असोशिएशन, अमरावती मिनी ट्रांसपोर्ट असोशिएशन , बिल्डर असोशिएशन ऑफ इन्डिया अमरावती शाखा,रेडीमिक्स कॉंक्रीट असोशिएशन अमरावती,अमरावती चालक मालक ट्रक असोशिएशन, आदींचे पदाधिकारी व ट्रान्सपोर्टधारक प्रामुख्याने उपस्थित होते.

व्यापाऱ्याच्या खिशातून ५० हजार चोरी

अमरावती/प्रतिनिधीः- बडनेरा पोलीस ठाणे हद्दीतील जुन्या वस्ती येथे दर शुक्रवारी भरणाऱ्या बैल व साप्ताहिक बाजारात पुन्हा एकदा चोरटयांनी धुमाकूळ घातला आहे. गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने एका व्यापाऱ्याच्या खिशातून ५० हजार रुपये लंपास केले.

राहाटगाव परिसरातील प्रगती शाळेजवळ राहणारे नाझिम खान दिलावर खान हे पशू खरेदीसाठी शुक्रवारी बैल बाजारात आले होते. बाजारात प्रचंड गर्दी असताना कुणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या खिशातून रोख रक्कम काढून नेली. घडलेला प्रकार लक्षात येताच त्यांनी तातडीने बडनेरा पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदवली.दर शुक्रवारी भरणाऱ्या या साप्ताहिक बाजारात हजारो शेतकरी, व्यापारी आणि नागरिक खरेदी-विक्रीसाठी येतात. याच गर्दीचा फायदा घेत चोरटे सातत्याने रोख रक्कम, मोबाईल आणि दागिन्यांच्या चोऱ्या करत आहेत.

अट्टल घरफोडी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

-एक आरोपी अटक, दुसरा फरार -१९.६६ लाखांचा मुद्देमाल जप्त

अमरावती/प्रतिनिधीः- शहरात घरफोडीच्या घटनांचा तपास करत असताना गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत अट्टल घरफोडी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे.या कारवाईत एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडून तब्बल १९ लाख ६६ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.प्रज्वल गणेश बनसोड (वय २५, रा. मूर्तिजापूर, जि. अकोला, ह.मु. पाचबंगला, जुनी वस्ती, बडनेरा) असे अटक आरोपीचे नाव आहे. तपासा दरम्यान शहरातील एकूण सात घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. सामरा नगर, येथील प्रेमानंद रत्नाकर शिंदे यांनी राजापेठ पोलस ठाण्यात २७ जुलै रोजी तक्रार दाखल केली होती कि ते २५ जुलै रोजी कुटुंबासह चिखलदरा येथे गेले होते. दुसऱ्या दिवशी घरी परतल्यानंतर घराच्या मुख्य दरवाज्याचे ऑटोमॅटिक लॉक तुटलेले दिसले.घरात पाहणी केली असता लाकडी कपाटातील चांदीचे दागिने गायब असल्याचे निदर्शनास आले.

अज्ञात चोरट्याने घरफोडी करून चोरी केल्या प्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हे शाखा युनिट क्रमांक एकने या प्रकरणाचा समांतर तपास सुरू केला. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. त्याच बरोबर गुप्त बातमीदारांना सक्रिय करण्यात आले आणि तांत्रिक माहितीच्या आधारे तपासाला वेग देण्यात आला. तपासा दरम्यान हा गुन्हा बडनेरा परिसरातील एका व्यक्तीने केल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने २० ऑगस्ट रोजी सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले.

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयिताची कसून चौकशी केली असता त्याने साथीदाराच्या मदतीने घरफोडी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपी प्रज्वल गणेश बनसोड हा मूळचा मूर्तिजापूर, जिल्हा अकोला येथील असून मागील दोन वर्षांपासून बडनेरा परिसरात भाड्याच्या घरात राहत होता.चौकशीत त्याने शहरातील विविध भागात साथीदाराच्या मदतीने आणखी सहा ते सात घरफोड्या केल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या घरफोडीच्या गुन्ह्यांचा तपास पुढे नेला.या कारवाईत पोलिसांनी सोन्या-चांदीचे दागिने तसेच धातूच्या लगडी, रोकड आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेली ॲक्टीवा मोपेड असा एकूण १९ लाख ६६ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये ९६ ग्रॅम सोन्याची लगड, १३ ग्रॅम सोन्याची लगड, १५ ग्रॅम सोन्याची लगड तसेच विविध प्रमाणातील चांदीचा समावेश आहे. गुन्ह्यात वापरलेली एम २७ बीएम ५१८१ क्रमांकाची ॲक्टीवा मोपेड, तसेच घरफोडीत चोरी केलेली ३ हजार ३०० रुपयांची रोकडही जप्त केली आहे.फरार आरोपी निखिल बाळासाहेब तराळे,(रा. गणुवाडी) याचा शोध सुरू आहे.

या कारवाईमुळे राजापेठ, बडनेरा आणि फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील एकूण सात घरफोडीचे गुन्हे उघडकीस आल्याचे पोलिसांनी सांगितले. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल संबंधित पोलीस ठाण्यांच्या ताब्यात देण्यात आला असून, पुढील तपास राजापेठ पोलीस करीत आहेत.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त शाम घुगे, पोलीस उपायुक्त प्रांजली सोनावणे, सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे आणि सहायक पोलीस आयुक्त नयन आलुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली. तसेच सायबर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनीही तपासात सहकार्य केले.

फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.
संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६

CHANGE IN NAME

(Given name)-SK TAUSIF SK NASIR (Old name) TO SHAIKH TAUSIF SHAIKH NASIR (New Name)
I will be known by my new name SHAIKH TAUSIF SHAIKH NASIR for all purpose in future
Adress - Arkan Colony, Amravati , Dist Amravati, Maharashtra India 444601

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३४५
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

कृषिदूतांकडून अंजनगाव बारी येथे धान्यावरील किडींच्या नियंत्रणाचे प्रात्यक्षिक

नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः- पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावतीच्या ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत अंजनगाव बारी येथे कृषिदूत मोहित र. गुल्हाणे, अंश उ. देवघरे, प्रणय पा. पिने, रोहन सं. बळी व सुप्रित सु. शेगोकार यांनी शेतकऱ्यांसाठी साठवणुकीतील धान्याचे किडींपासून संरक्षण करण्याबाबत मार्गदर्शन व प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले.

या प्रात्यक्षिकादरम्यान साठवणुकीच्या काळात धान्यावर प्रादुर्भाव करणाऱ्या विविध किडींची ओळख, त्यांच्यामुळे होणारे नुकसान तसेच धान्याची सुरक्षित व दीर्घकाळ साठवणूक करण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. धान्य साठवण्यापूर्वी कोठाराची स्वच्छता, धान्य योग्य प्रकारे वाळवणे, ओलावा नियंत्रित ठेवणे आणि साठवणुकीच्या ठिकाणी स्वच्छता राखणे यांचे महत्त्व कृषिदूतांनी समजावून सांगितले.

तसेच साठवणुकीतील धान्याला किडींचा प्रादुर्भाव झाल्यास त्याचे योग्य व्यवस्थापन कसे करावे, धान्याची गुणवत्ता व पोषणमूल्य टिकवून ठेवण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. शेतकऱ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारून त्याबाबत माहिती जाणून घेतली.या उपक्रमाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना 'धान्याची योग्य साठवणूक, किडींपासून संरक्षण आणि दीर्घकाळ सुरक्षित साठा' याबाबत जागरूक करणे हा होता. कार्यक्रमास ग्रामस्थ व शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे सर, उपप्राचार्य नितेश चौधरी सर, कार्यक्रम अधिकारी श्वेता देशमुख मॅडम व अदिती रजाने मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

जाहीर सुचना

आम जनतेस या जाहीर सुचनेव्दारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार **शुभांगी आशीष सावदे, रा. नांदगाव खं.** यांच्या मालकीची मौजा-मुंडनारायण,ता.नांदगाव खं., जि.अमरावती येथील शेत सर्वे नं.१५/१-अ मधील सब-डिव्हायडेड प्लॉट नं.२०-अ, क्षेत्रफळ १३९.३६ चौ.मी.(१४९९.५१ चौ.फुट) ही मालमत्ता आहे. यासंबंधीत असलेले जूने खरेदीखत जे गौरव पुंडलिकराव कोरडे यांनी संतोष दादाराव पोच्छी यांच्याकडून दस्त क्र.३३८३/२०२३ दि.०८/११/२०२३ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय नांदगाव खंडेश्वर मध्ये नोंदलेले मुळ खरेदीखत माझे पक्षकाराजवळून हरवले आहे. त्यासंबंधी रितसर तक्रार सुध्दा माझे पक्षकार यांनी पोलिस स्टेशन नांदगाव खंडेश्वर येथे दिलेली आहे. तरी ज्या कुणाला सदर खरेदीखत सापडले असेल त्यांनी मला खाली दिलेल्या मोबाईल नंबरवर किंवा पत्यावर संपर्क साधावा.

कार्यालय - ''श्री'', भागवत नगर, यशवंत लॉनच्या मागे, साईनगर, अमरावती
मो.क्र.- ९६६५७८६६७६

अमरावती
दिनांक : २२/०८/२०२६

स्वाक्षरी/-
पंकज एन.ठाकरे
ॲडव्होकट

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.३४७/२०२६ ने.ता.११.०९.२०२६

अर्जदार :
१. **काशिनाथ महादेवराव गोहत्रे,** वय ६९ वर्षे, व्यवसाय-शेती
रा.तळेगाव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. **गोकुलदास महादेवराव गोहत्रे,(मय्यत) तर्फे वारस**
२अ) **चंद्रकला गोकुलदास गोहत्रे,** वय ६२ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.तळेगाव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२ब) **अतुल गोकुलदास गोहत्रे,** वय ४१ वर्षे, व्यवसाय- शेती
रा.तळेगाव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२क) **ज्योती सुधीर कापडे,** वय ४२ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.मोखड, ता.जि.अमरावती
२ड) **सारिका अविनाश टेकाडे,** वय ३७ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.वलगांव, ता.जि.अमरावती
२इ) **निलिम आमोल अवघड,** वय ३५ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.लाखपुरी, ता.जि.अकोला
३) **रामभाऊ महादेवराव गोहत्रे,** वय ६३ वर्षे, व्यवसाय- शेती
रा.तळेगाव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४) **अशोक महादेवराव गोहत्रे,** वय ७८ वर्षे, व्यवसाय- शेती
रा.तळेगाव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
५) **बेबीताई रामदास डहाके (मय्यत)**
५अ) **प्रकाश रामदासराव डहाके,** वय ५२ वर्षे, व्यवसाय- शेती
रा.तळेगाव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
५ब) **शेषराव रामदासराव गोहत्रे,** वय ५० वर्षे, व्यवसाय- शेती
रा.तळेगाव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
५क) **वंदना अजाबराव काळे,** वय ४८ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.धायपुर,ता.मोर्शी, जि.अमरावती
५ड) **राजाभाऊ रामदासराव डहाके,** वय ५२ वर्षे, व्यवसाय- शेती
रा.तळेगाव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार वरील ठिकाणी राहतात.**मृतक महादेवराव नथ्थुजी गोहत्रे** यांचा **मृत्यू दि.२६/०८/१९८८** रोजी रा.तळेगाव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच **अनुसया महादेवराव गोहत्रे** यांचा **मृत्यू दि.१५.१२.२०१९** रोजी झालेला आहे. तसेच **मृतक गोकुलदास महादेवराव गोहत्रे** यांचा सुध्दा **मृत्यू दि.०७/०८/२०१२** रोजी व **मृतक बेबीताई रामदास डहाके** यांचा **मृत्यू दि.०३/०६/२०२१** रोजी झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे.त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३४७/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.०६.०८.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय,चांदूर बाजार

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

प्राथमिक शाळांच्या FSSAI नोंदणीसाठी मार्गदर्शनाची मागणी

अमरावती/का.प्र.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांना अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाकडे नोंदणी व परवाना काढताना येणाऱ्या अडचणींबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शासनाकडे तातडीने मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

शाळांमध्ये सुरक्षित, पौष्टिक व संतुलित अन्न सुनिश्चित करण्यासाठी FSSAI नोंदणी व परवाना आवश्यक करण्यात आला आहे. मात्र, ग्रामीण व शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांना ऑनलाइन नोंदणी प्रक्रियेत अनेक अडचणी येत असल्याचे शिक्षक समितीने निवेदनात नमूद केले आहे.

FSSAI प्रणालीवर नोंदणी करताना शाळेच्या नावाने अर्ज करायचा की मुख्याध्यापक किंवा शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या नावाने अर्ज करायचा, याबाबत स्पष्ट सूचना नसल्याचे समितीचे म्हणणे आहे. तसेच नोंदणीसाठी PAN, आधार, भागभांडवल, शुल्क, आवश्यक कागदपत्रे तसेच नोंदणीनंतरच्या रेकॉर्ड व व्यवस्थापनाबाबतही शाळांना पुरेसे मार्गदर्शन मिळालेले नाही.

काही शाळांमध्ये नियमित शिक्षक उपलब्ध नसणे, प्रभारी मुख्याध्यापकांची नियुक्ती असणे, तसेच मुख्याध्यापकांच्या बदली किंवा सेवानिवृत्तीमुळे वैयक्तिक नावाने काढलेल्या परवान्याचे पुढे काय करायचे, याबाबतही संभ्रम निर्माण झाला आहे.

त्यामुळे जिल्हा व तालुका स्तरावर मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा घेऊन FSSAI नोंदणी व परवान्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय ग्रामीण व शहरी भागातील शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या पोषण आहारासाठी नेमकी कोणत्या प्रकारची इएऐंŸ नोंदणी आवश्यक आहे, याबाबत शासनाने स्पष्ट लेखी निर्देश जारी करावेत, अशीही शिक्षक समितीची मागणी आहे.

राज्याध्यक्ष विजय कोंबे व राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी शासनाच्या संबंधित विभागांकडे निवेदनाद्वारे ही मागणी केली असून, शाळांना आवश्यक मार्गदर्शन न करता केवळ नोंदणी व परवान्यासाठी तगादा लावल्यास भविष्यात शाळांना प्रशासकीय अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.

अधिसूचना

जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालय, जिल्हा अमरावती.

क्रमांक-प्र.अ./भुस./अका./कावि. ७५/२०२६ **दिनांक :-१४/०८/२०२६**

(भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)

प्रकरण क्रमांक :- २२/४७/२०२६-२७ **मौजा-जळू ता. नांदगांव खंडेश्वर**

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश 'उक्त अधिसूचना' असा करण्यात आला आहे) याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, अमरावती जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश 'उक्त जमीन' असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश 'उक्त सार्वजनिक प्रयोजन' असा केला आहे) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाचे **कलम ११ च्या पोट कलम (१)** च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावीत भुमी संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत); आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे,

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे, (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा);

त्याअर्थी आता, असे घोषीत करण्यात येत आहे. की, उक्त अधिनियमाच्या **कलम ११ च्या पोट कलम ४** अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही:

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश 'उक्त नियम' असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) ल.सि. कामे, अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे. भूसंपादन प्रस्तावाशी संबंधीत कलम ११ अधिसूचना, कलम १९ अधिसूचना व प्रारूप निवाडा मंजूरी इत्यादी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे न पाठविता भूसंपादन अधिकारी यांनी स्वतःचे स्तरावर कार्यवाही करून अंतिम निवाडयासह भूसंपादनाची पुर्ण प्रक्रिया पार पाडावी असे मा. जिल्हाधिकारी अमरावती यांचे कार्यालयीन परिपत्रक क्र. अ.का./प्र.अ./भूसंपादन/कावि. ३१८/२०२५, दि. ०८/०७/२०२५ अन्वये, कळविण्यात आले आहे. त्यानूसार भूसंपादन प्रकरणात कार्यवाही करण्यात येत आहे.

अनूसुची-एक

जमिनीचे वर्णन

गाव-**जळू** तालुका-**नांदगाव खंडेश्वर** जिल्हा-**अमरावती**

अ. क्र.	भूमापन किंवा गट क्रमांक	अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये)
१	३१/१	१.२७
२	३१/१अ	
३	३१/२	
४	३१/३	
५	३१/४	
६	३२/१	१.११
७	३२/१अ	
८	३२/१ब	
९	३२/३	
१०	३२/४	
११	३४/१	१.९८
१२	३४/१ अ	
१३	३४/२	
१४	३४/२अ	
१५	३४/२ब	
१६	४४/१	०.२५
१७	४४/१अ	
१८	४४/१ब	
१९	४४/२	
२०	४४/२अ	
२१	४४/३	
२२	४४/३अ	
२३	४५/१	२.३७
२४	४५/१अ	
२५	४५/१ब	
२६	४५/२	
२७	४५/३	
२८	४५/४	
२९	४५/५	
३०	४६/१	०.००३
३१	४६/२	
३२	४६/३	
३३	४९/१	३.५८
३४	४९/१अ	
३५	४९/१ब	
३६	४९/१क	
३७	४९/२	
३८	४९/२अ	
३९	४९/३	
४०	४९/४	
४१	५६/१	१.३०
४२	५६/१अ	
४३	५६/१ब	
४४	५६/२	
४५	५६/२अ	
४६	५६/२ब	
४७	५६/३	
४८	५६/४	
४९	५७/१	१.४३
५०	५७/२	
५१	५८/१	०.७५
५२	५८/२	
५३	५८/३	
५४	५८/३अ	
	एकूण	**१४.०४**

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प मुख्य जोडकालवा - २

प्रकल्प कार्याचे वर्णन:- वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द प्रकल्पात पावसाळयात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून तापणी खाऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याव्दारे वळविणे प्रस्तावित आहे.

समाजाला मिळणारे लाभ :- वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प विदर्भ वासियांसाठी महत्वाकांक्षी प्रकल्प असून या प्रकल्पामूळे विदर्भातील निर्मित सिंचन क्षमता टक्केवारी वाढण्यास मदत होणार आहे.

अनुसूची - तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :- विस्थापनाची आवश्यकता नाही.
सबब माहिती निरंक

अनुसूची - चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश. दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र.३/अ-२, नुसार उक्त अधिनियमाचे कलम १०क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.

अनुसूची - पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम :- प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

(ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक

(क) ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील :- निरंक.

टिप : उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) ल.सि. कामे, अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :- १४/०८/२०२६
ठिकाण : अमरावती

(सुषमा चौधरी)
उपजिल्हाधिकारी (भुसंपादन)
ल.सि.का. कामे अमरावती

जिमाका/अम./जाहि./८६/२०२६

पीडीएमएमसी मिल्क बँकेला महापौर यांची सदिच्छा भेट

अमरावती - अमरावती शहराचे महापौर श्रीचंद तेजवानी यांनी डॉ. पंजाबराव देशमुख मेमोरियल मेडिकल कॉलेज (पीडीएमएमसी), अमरावती येथील मानवी दूध बँकेला सदिच्छा भेट दिली. महापौर तेजवानी यांचे पीडीएमएमसीचे अधिष्ठाता डॉ.ए.टी. देशमुख यांनी स्वागत केले. यावेळी गणेशदास राठी ग्रुप ऑफ एज्युकेशन इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष वसंत मालपाणी तसेच ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ.राजेश बूब, यादवजी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.ए.टी .देशमुख अधिष्ठाता डॉ. पी.डी.एम. एम.सी. अमरावती यांच्या प्रमुख उपस्थितीत, बालरोग विभागा च्या विभागप्रमुख डॉ. प्रतिभा काळे यांनी महापौरांना मिल्क बँकेच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. मानवी दूध संकलन, तपासणी, प्रक्रिया, सुरक्षित साठवणूक तसेच गरजू नवजात बालकांना मानवी दूध उपलब्ध करून देण्याची कार्यपद्धती याबाबत माहिती देण्यात आली.

या भेटीदरम्यान महापौर श्रीचंद तेजवानी यांनी मिल्क बँकेच्या व्हिजिटर बुकमध्ये आपल्या भेटीचा अभिप्राय नोंदविला. या भेटीदरम्यान डॉ. सतीश तिवारी, डॉ.टेकाडे, डॉ. नरेश तायडे, डॉ.स्वप्निल मोहोड, डॉ. बिपिन आणि डॉ. आदित्य यांच्यासह बालरोग विभागातील डॉक्टर व मिल्क बँकेचे कर्मचारी उपस्थित होते. पीडीएमएमसी येथील मानवी दूध बँकेच्या माध्यमातून गरजू नवजात बालकांना मानवी दूध उपलब्ध करून देण्यासोबतच स्तनपानाला प्रोत्साहन आणि मातृदूधाच्या महत्त्वाबाबत जनजागृती करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले

भारतीय महाविद्यालयात जलसंधारण दिन व राखी मेकिंग उपक्रम उत्साहात

मोर्शी - भारतीय विद्या मंदिर, अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथे अर्थशास्त्र व वाणिज्य विभागाच्या वतीने उद्योजकता, जलसंधारण दिन व राखी मेकिंग उपक्रम उत्साहात झाला. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि 'जलनायक' म्हणून ओळखले जाणारे सुधाकरराव नाईक यांची जयंती दरवर्षी २१ ऑगस्ट रोजी साजरी केली जाते. याच औचित्याने या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. संतोष व्ही. आगरकर तर प्रमुख अतिथी म्हणून प्रदीप खोडस्कर, महादेवराव नवघरे आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. संतोष व्ही. आगरकर यांनी आपल्या उद्योजकता, जलसंधारण आणि विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा परस्पर संबंध स्पष्ट केला. तर प्रमुख अतिथी प्रदीप खोडसकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उद्योजकतेचे महत्त्व स्पष्ट केले. तर महादेवराव नवघरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्या जीवनात उद्योगशील रहावे तसेच आपल्या कौशल्याचा विकास करून सर्जनशीलता आणि मेहनतीच्या जोरावर रोजगार निर्मिती करणारे उद्योजक बनावे असे आवाहन केले. या कार्यक्रमास डॉ. आर. जी. बांबोळे, डॉ. दीपक काळे, डॉ.एल.आर. टेंभुर्णे, डॉ. संदीप राऊत, डॉ. भगवान साबळे, डॉ. अरविंद पाझारे, प्रा.गोपाल भलावी, प्रा.अक्षय बावणे, प्रा. मृणाक काळमेघ, प्रा. तट्टे, प्रा. सुरेंद्र पांडे, प्रा. विजय बोरवार, रुपेश मेश्राम तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत. कार्यक्रमाचे संचालन समीक्षा बढे हिने तर आभार पियुष जपूलकर याने मानलेत. उद्योजकता आणि जलसंधारण या दोन्ही विषयांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून राखी मेकिंग स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना अतिथी मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

स्फूर्ती महिला बचत गटाची भेट

लेहेगाव - मोर्शी येथील 'नाबार्ड' अंतर्गत असलेल्या स्फूर्ती महिला बचत गटाच्या पदाधिकारी व सदस्यांनी साफल्य विद्यालयाला भेट दिली. मंडळाच्या अध्यक्षा शीतल बेहरे, कोषाध्यक्षा मंगला भोजने यांनी मंडळातील सदस्यांचा परिचय करून देताना महिला सक्षमीकरणासाठी स्फूर्ती गटाने राबविलेल्या विविध उपक्रमाची माहिती यावेळी दिली. विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत आजनकर यांनी सर्वांचे स्वागत केले. महिला सक्षमीकरणासाठी ग्रामीण भागातील महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून आपला उत्कर्ष साधावा व त्यासाठी शिक्षित महिलांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. स्फूर्ती गटाच्या मेघना मडघ, डॉ. प्रतिभा घाटोळ, ग्रामगीताचार्य सविता ठाकरे, सचिव वर्षा आजनकर, कांडलकर, पूनम कांडलकर, योगिता फुटाणे, कविता पाटील, देशमुख, रेखा गोरडे, सरिता साबळे, विद्याताई गुर्जर, ईशा भोजने यांचीउपस्थिती होती.

मोर्शीत तणावः नातेवाईकांचा पोलीस ठाण्यात ठिय्या

पोलिसांच्या धाडीदरम्यान पळालेल्या युवकाचा विहिरीत आढळला मृतदेह

मोर्शी/प्रतिनिधीः-
मोर्शी येथून जवळच असलेल्या डोंगरयावली येथील शेतशिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर मोर्शी पोलिसांनी टाकलेल्या धाडीत घटनास्थळावरून पळून जाणाऱ्या एका ३३ वर्षीय युवकाचे प्रेत आज दि.२२ ऑगस्ट रोजी विहिरीत संशयास्पदरीत्या आढळून आले.

याप्रकरणी डोंगरयावली येथील मृतकाच्या कुटुंबासह २५० ते ३०० महिलासह नागरिकांचा जमाव मोर्शी पोलीस स्टेशनवर येऊन धडकला. जोपर्यंत जुगार खेळतांना धाड टाकणाऱ्या पोलीस पथकावर कार्यवाही होत नाही.तसेच मृतकाच्या कुटुंबांना आर्थिक मदत मिळत नाही.तोपर्यंत मृतकाचे प्रेत दवाखान्यातून हलविण्यात येणार नाही.अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतल्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

प्राप्त माहितीनुसार दि.२० ऑगस्ट रोजी मोर्शी पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, डोंगरयावली शेत शिवारात निलेश बोपची यांच्या शेतात काही इसम ताशाच्या पत्त्यांवर पैशाची बाजी लावून जुगार खेळत आहेत.ही माहिती वरिष्ठांना देऊन त्यांच्या आदेशाने पंचांना सोबत घेऊन पोलिसांनी सदर ठिकाणी रात्री १२ वाजताचे दरम्यान छापा टाकून ५२ ताशांच्या पत्त्यांवर पैशाची हारजीत करून एक्का बादशहा जुगार खेळतांना ९ आरोपींना रंगेहात पकडून अटक करण्यात आली. मात्र काही ☞(पान २ वर)

शिक्षणाधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी करून वैद्यकीय बिल मंजुरीचा प्रयत्न

-मुख्याध्यापकाविरुद्ध गाडगेनगर पोलिसांत गुन्हा; आदेशातही केली खोडतोड

अमरावती/प्रतिनिधीः-
आईच्या वैद्यकीय उपचाराचे ३८ हजार ८२५ रुपयांचे देयक मंजूर करून घेण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तसेच संबंधित आदेशात व्हाईटनर लावून खोडतोड केल्याचेही तपासणीत समोर आले. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी लोणी टाकळी येथील शाह अंजुमन उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेजच्या ५२ वर्षीय मुख्याध्यापकाविरुद्ध फसवणूक व बनावट कागदपत्रांशी संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हारूण शहा बाबा शहा (५२, रा. पॅराडाईज कॉलनी, अमरावती) हे लोणी टाकळी येथील शाह अंजुमन उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेजमध्ये मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या आईच्या वैद्यकीय उपचारावर झालेल्या खर्चाचे ३८ हजार ८२५ रुपयांचे बिल मंजूर करून घेण्यासाठी त्यांनी ते माध्यमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांच्याकडे सादर केले होते. मात्र, देयकाची कार्यालयीन पातळीवर पडताळणी सुरू असताना संबंधित कागदपत्रावर व्हाईटनर लावून मजकुरात फेरफार केल्याचे निदर्शनास आले. एवढेच नव्हे तर शिक्षणाधिकाऱ्यांची स्वाक्षरीही हुबेहुब करण्याचा प्रयत्न झाल्याचे समोर आले. त्यानंतर वेतन विभागाकडून संबंधित मूळ आदेशाची तपासणी करण्यात आली. या तपासणीत मूळ आदेशातही खोडतोड करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. या प्रकाराबाबत ☞(पान २ वर)

डिसेंबर अखेर पर्यंत अमरावतीकरांची एक दिवसाआड पाणी पुरवठ्यापासून मुक्तता

- आ.सुलभा खोडके

अमरावती/प्रतिनिधी: -
अमरावती शहरवासीयांना वर्ष २०५५ पर्यंत मुबलक व नियमित पाणी पुरवठ्याची सोय करण्यासाठी अमृत -२ अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना ९८५.४९ कोटींच्या प्रकल्प कार्यान्वयीत करण्यात आला आहे. ज्यामध्ये सिंभोरा हेडवर्क्स ते नेर पिंगळाई संतुलित टाकी पर्यंत १४०० मिमी व्यासाची मृदू पोलादी समांतर ऊर्ध्ववाहिनी अंथरणे, व पुढे अमरावती जलशुद्धीकरण केंद्रा पर्यंत १५०० मिमी व्यासाची मृदू पोलादी गुरुत्व वाहिनी अंथरणे असे काम युद्ध पातळीवर सुरु आहे. डिसेंबर अखेर पर्यंत हा महत्वकांक्षी प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत पूर्णत्वास आणण्यासाठी या संदर्भातील सर्व तांत्रिक अडथळे दूर करून अमरावतीकरांची एक दिवसाआड पाणी पुरवठ्यापासून मुक्तता करावी, अशी सुचना अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रशासनाला केली आहे.

शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या या बैठकीमध्ये आ. खोडके यांनी सांगितले, कि मागील २६ सप्टेंबर २०२४ मध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री नामदार - अजितदादा पवार यांच्या हस्ते प्रकल्पाचे उदघाटन झाल्यानंतर ☞(पान २ वर)

मार्डी-राजुरा परिसरात बिबट्या जेरबंद

तीन दिवसांच्या रेस्क्यू मोहिमेला यश



अमरावती/प्रतिनिधीः-
मार्डी-राजुरा परिसरात नागरिकांच्या मनात धडकी भरविणाऱ्या बिबट्याचा अखेर वनविभागाने बंदोबस्त केला. तीन दिवस, तब्बल ११ तासांची प्रतीक्षा आणि अखेर ट्रँक्विलायझरच्या डार्टने बिबट्याला बेशुद्ध करण्यात यश आले. शुक्रवारी (२१ ऑगस्ट) सायंकाळी ६.५० वाजता ही कारवाई पूर्ण झाली. सुमारे सात वर्षांच्या नर बिबट्याला ताब्यात घेतल्यानंतर आवश्यक वैद्यकीय तपासणी करून मेलघाटच्या कोअर क्षेत्रात सुरक्षित सोडण्यात आले.

मार्डी-राजुरा मार्गावर काही दिवसांपासून या बिबट्याचा मुक्त संचार सुरू होता. वाहनचालकांवर झडप घेण्याचा त्याने प्रयत्न केल्याने रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. यापूर्वी एका व्यक्तीवर हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटनाही घडली होती. त्यामुळे बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाने विशेष मोहीम आखली. राजुरा येथील जलशुद्धीकरण केंद्राजवळील मार्डी रोड परिसरात बिबट्याच्या हालचालींचा मागोवा घेत पिंजरा लावण्यात आला. बिबट्याला आकर्षित करण्यासाठी पिंजऱ्यासमोर बकरी ठेवण्यात आली. मात्र, पहिल्या दोन दिवसांत बिबट्याने पिंजऱ्याच्या परिसरात येण्याचे टाळल्याने वनकर्मचाऱ्यांची ☞(पान २ वर)

नो-एन्ट्रीचा पेच सोडवण्यासाठी सीपी रस्त्यावर -व्यापारी-ट्रान्सपोर्टरांच्या समस्या जाणून घेतल्या

-चित्रा चौक ते सक्करसाथ पायी पाहणी

अमरावती/प्रतिनिधीः-
राजापेठ उड्डाणपुलावरील भीषण अपघातात दोन महिलांचा मृत्यू झाल्यानंतर शहरात मालवाहू वाहनांसाठी लागू करण्यात आलेल्या नव्या नो-एन्ट्री वेळापत्रकावरून निर्माण झालेला पेच आता सोडविण्याच्या हालचालींना वेग आला आहे. ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर पोलीस प्रशासनाने व्यापारी आणि वाहतूकदारांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेण्यास सुरुवात केली आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी शुक्रवारी दुपारी स्वतः रस्त्यावर उतरून विविध मार्गांची पाहणी केली. दुपारच्या गर्दीच्या वेळेतच पोलीस आयुक्तांनी चित्रा चौक ते सक्करसाथ परिसराचा पायी फेरफटका मारत वाहतुकीची स्थिती जाणून घेतली. त्यानंतर वलगाव☞(पान २ वर)।

२१४ ग्रॅम एमडी प्रकरणातील कथित सूत्रधार जेरबंद

गुन्हे शाखा युनिट-१ची मध्यप्रदेशात कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः-
शहरात २१४ ग्रॅम मेफेड्रान (एमडी) जप्त झालेल्या प्रकरणाच्या तपासाला आता महत्त्वाचे वळण मिळाले आहे. या प्रकरणातील ड्रग्ज पुरवठ्याच्या साखळीतील कथित मुख्य सूत्रधार तौसिफ मल्का मंजूर मल्का याला अमरावती शहर गुन्हे शाखेच्या युनिट-१ने मध्यप्रदेशातील मंदसौर येथून अटक केली. आरोपीला पकडण्यासाठी पोलिसांनी वेषांतर करून सापळा रचला. २० ऑगस्ट रोजी मुलतानपूरा परिसरातून त्याला ताब्यात घेण्यात आले.

नागपुरी गेट पोलीस ठाण्यात २३ जुलै ☞(पान २ वर)

विधीसंघर्षित बालकाकडून ८४ हजारांचा मुद्देमाल जप्त

परतवाडा पोलिसांची कामगिरी; दोन चोरीचे गुन्हे उघड

परतवाडा/प्रतिनिधीः-
घरासमोर उभी असलेली दुचाकी चोरून नेण्यासोबतच मंदिराची दानपेटी फोडून रोकड लंपास करणाऱ्या विधीसंघर्षित बालकाचा परतवाडा पोलिसांनी शोध लावला. पोलिसांनी त्याला पालकांच्या उपस्थितीत ताब्यात घेत चौकशी केली असता दोन दुचाकी चोरीसह मंदिरातील रोकड चोरीचा प्रकार उघडकीस आला. त्याच्याकडून दोन दुचाकी आणि पाच हजार रुपये रोकड असा एकूण ८४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

केदारनगर, देवमाळी येथील श्रीकृष्ण बाबुराव पोटे यांनी १९ ऑगस्ट रोजी परतवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यांच्या तक्रारीनुसार, १८ ऑगस्टच्या रात्री त्यांनी घरासमोर दुचाकी उभी केली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी दुचाकी जागेवर नसल्याचे आढळले. याच परिसरातील गजानन महाराज मंदिराच्या दानपेटीचे कुलूपही तोडण्यात आले होते. दानपेटीतील रोकड चोरीला गेल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. गुन्ह्याचा तपास☞(पान २ वर)

बसप्रवासात महिलेच्या पर्समधून

७३ हजार ५०० रुपयांचे दागिने लंपास

दर्यापूर बसस्थानकातील घटना; अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल

दर्यापूर/प्रतिनिधीः-
बसप्रवासादरम्यान झोप लागल्याचा फायदा घेत महिलेच्या पर्समधील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ७३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने लंपास केला. ही घटना १६ ऑगस्ट रोजी दुपारी दर्यापूर बसस्थानक परिसरात घडली. वंदना अशोकराव टेंभुर्णे (५८, रा. दुर्गानगर, मोर्शी) या प्रवासादरम्यान शेजारी बसलेल्या एका अनोळखी व्यक्तीवर संशय व्यक्त केला आहे. त्यांच्या पर्समधून १५☞(पान २ वर)

'मयूर' नमकीनमध्ये निघाले जिवंत किडे!

मुलांच्या आरोग्याशी खेळ केल्याने ग्राहक संतप्त

-एफडीएकडून कडक कारवाईची मागणी

अमरावती/प्रतिनिधीः-
नांदगाव खंडेश्वर येथे खाद्य सुरक्षेबाबत गंभीर निष्काळजीपणाचा प्रकार समोर आला आहे. एका ग्राहकाने खरेदी केलेल्या 'मयूर' ब्रँडच्या चिवड्याच्या पाकीटात जिवंत किडे आढळल्याने खळबळ उडाली आहे. घटनेनंतर संबंधित ग्राहकाने अन्न व औषध प्रशासन अर्थात एफडीए कडे तक्रार दाखल करून दोषींवर कडक कारवाईची मागणी केली आहे.

माहिती नुसार, नांदगाव खंडेश्वर येथील रहिवासी राजगुरु ज्ञानेश्वर शिंदे यांनी ८ जून रोजी 'एवन कन्फेक्शनरी' मधून मयूर कंपनीचे चिवड्याचे पाकीट खरेदी केले होते. घरी आल्यानंतर मुलीला चिवडा खायला देताना त्यात किडे ☞(पान २ वर)

शेतातील विहिरींवरील १५ हजारांची केबल लंपास

दोघांविरुद्ध गुन्हा



शिरखेड : नेरपिंगळाई शेतशिवारातील विविध विहिरींवरील मोटारपंपांना जोडलेल्या तब्बल १५ हजार रुपये किमतीच्या केबलची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शिरखेड पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी देविदास दयाराम भोपळे (वय ५८, रा. इंदिरा चौक, नेरपिंगळाई) यांच्या शेतातील विहिरीवरील दोन मोटारपंपांची प्रत्येकी ६० फूट, अशी १२० फूट केबल चोरीस गेली. याची किंमत सुमारे ५ हजार ५०० रुपये आहे. याशिवाय शेजारील शेतांमधील अमित पाचघरे, प्रविण बोबडे आणि☞(पान २ वर)

महर्षी पब्लिक स्कूलची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव

आदिवासी विद्यार्थ्याच्या मृत्यू प्रकरणी कारवाईचे संकेत

-५४५ विद्यार्थ्यांचे इतर शाळांमध्ये समायोजन सुरू

अमरावती/प्रतिनिधीः-
नवसारी परिसरातील महर्षी पब्लिक स्कूलमध्ये आदिवासी विद्यार्थी राजेश बेठेकर याच्या मृत्यू आणि इतर विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी निगडित गंभीर निष्काळजीपणा समोर आल्या नंतर प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त संदीप गोलाईत यांनी शाळेच्या कार्यप्रणालीत गंभीर त्रुटी आढळल्याने शाळेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाला पाठवला आहे.

सोबतच शाळेत शिकणाऱ्या ५४५ आदिवासी विद्यार्थ्यांना इतर मान्यताप्राप्त शाळांमध्ये स्थलांतरित करण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. माहिती नुसार, मेळघाट क्षेत्रातील आदिवासी विद्यार्थ्यांना शासनाच्या 'नामांकित इंग्रजी माध्यम विद्यालय योजना' अंतर्गत महर्षी पब्लिक स्कूलमध्ये प्रवेश देण्यात आला होता. १५ ऑगस्ट रोजी शाळेत जेवण केल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना उलटी, जुलाब, चक्कर आणि मळमळ यासारखी लक्षणे दिसून आली. ☞(पान २ वर)

ऑपरेशन कवच अंतर्गत विविध शाळांमध्ये पोस्टर मेकिंग स्पर्धा

खल्लार/प्रतिनिधीः-
जिल्हा पोलिस अधिक्षक ग्रामिण निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली खल्लार हद्दीतील विविध शाळांमध्ये अमली पदार्थ विरोधात ऑपरेशन कवच अंतर्गत पोस्टर मेकिंग स्पर्धा २२ ऑगस्टला आयोजित करण्यात आली होती.खल्लार पोलीस स्टेशनचे नवनियुक्त ठाणेदार अमोल मुडे यांनी स्वतः शाळेला भेट ☞(पान २ वर)

बॉलीवूडची 'बेबी डॉल'

बॉलीवूडची प्रसिद्ध गायिका आणि 'बेबी डॉल' फेम कनिका कपूरने अनेक लोकप्रिय गाणी गायली आहेत. तिचे जगभरात लाखो चाहते आहेत. लखनऊमध्ये लहानाची मोठी झालेली कनिकाचं पहिलं लग्न ती अवघ्या १८ वर्षांची असताना झालं होतं. घटस्फोट झाल्यानंतर ती आपल्या तिन्ही मुलांना घेऊन भारतात परतली. सिंगल मदर म्हणून संघर्ष करत तिने संगीतात पुनरागमन केले आणि सुपरहिट गाणी दिली. त्यानंतर १५ वर्षांची मैत्री असलेल्या लंडनच्या एनआरआय उद्योगपतीशी तिने दुसरं लग्न केलं. कनिकाच्या वाढदिवसा निमित्त तिचा प्रवास जाणून घेऊयात.

कनिका कपूरचा जन्म २१ ऑगस्ट १९७८ साली लखनऊमध्ये झाला. एका प्रतिष्ठित कुटुंबात जन्मलेल्या कनिकाला गायनाची खूप आवड होती. कमी वयातच तिने शास्त्रीय संगीताचे धडे घेतले. बालपणी ती ऑल इंडिया रेडिओसाठी गाणी गायची. तिने अनुप जलोटा यांच्याबरोबर अनेक संगीत कार्यक्रम केले. पण १८ वर्षांच्या कनिकाने करिअर करण्यापूर्वीच तिचं लग्न ठरलं.

जीव संपवण्याचा विचार....

अभिनेत्री शिल्पा शेट्टीचा पती आणि व्यावसायिक राज कुंद्रा २०२१ मधील पॉर्नोग्राफी प्रकरणामुळे तुफान चर्चेत आला होता. या वादग्रस्त प्रकरणातील अटकेनंतर त्याच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यात मोठी उलथापालथ झाली होती. तुरुंगात घालवलेले ते दिवस, मीडियामध्ये पसरलेल्या घटस्फोटाच्या बातम्या आणि त्या काळात आलेले नैराश्य यावर राज कुंद्राने एका मुलाखतीत अत्यंत मोकळेपणाने भाष्य केले आहे. आर्थर रोड जेलमध्ये असताना मनात आत्महत्येचा विचार कसा आला होता आणि शिल्पाच्या एका फोन कॉलने त्याला कशी ताकद दिली, याचा उलगडा त्याने केला आहे.

एका मुलाखतीदरम्यान राज कुंद्राने अटकेच्या त्या दिवशीचा प्रसंग सांगताना स्पष्ट केले की, तो फक्त चौकशीसाठी पोलिसांकडे गेला होता. परंतु पोलीस ठाण्यात पोहोचताच, सोशल मीडिया (ट्विटर) वरून त्याला स्वतःच्या अटकेची बातमी समजली. पोलिसांकडे विचारणा केली असता वरिष्ठांचे असेच आदेश असल्याचे त्याला सांगण्यात आले. ही बातमी शिल्पालाही मीडियाच्या माध्यमातूनच कळाली. त्यावेळी त्याच्या कंपन्यांमध्ये तब्बल ४ हजार कर्मचारी कार्यरत होते. इतका मोठा व्यवसाय आणि कुटुंब कसे सांभाळायचे, हा प्रश्न शिल्पाला पडला होता; तर दुसरीकडे राजला दोन महिने तुरुंगात घालवावे लागले होते.

आपल्या आयुष्यात अचानक झालेल्या या बदलाची आठवण करून देताना राज म्हणाला, 'एके दिवशी मी आयपीएल टीमचा मालक होतो आणि दुऱ्याच दिवशी थेट तुरुंगाच्या कोठडीत पोहोचलो होतो. माझं डोकं पूर्णपणे सुन्न झालं होतं.' जामिनावर बाहेर आल्यानंतर त्याने नव्याने सुरुवात केली असली, तरी आर्थर रोड जेलमधील तो काळा टप्पा विसरणे अशक्य असल्याचे त्याने नमूद केले. तुरुंगातील भीषण परिस्थितीशी तो संघर्ष करत असतानाच बाहेर त्याच्या वैयक्तिक आयुष्याबाबत भलत्याच चर्चा सुरू झाल्या होत्या.

शेट्टी

धुरंधरचा रहमान डकैत शुक्राचार्यांच्या भूमिकेत

अभिनेता अक्षय खन्ना त्याच्या नवनवीन आणि आव्हानात्मक भूमिकांसाठी चर्चेत आला. 'छावा'मधील 'औरंगजेब' असेल नाहीतर 'धुरंधर'मधील 'रहमान डकैत', या भूमिका साकारून प्रेक्षकांवर छाप पाडल्यानंतर, आता अक्षय खन्ना एका मोठ्या पौराणिक भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. प्रशांत वर्मा सिनेमॅटिक युनिव्हर्सच्या 'महाकाली' या चित्रपटात तो असुरांचे गुरु 'शुक्राचार्य' यांची भूमिका साकारणार आहे.

या चित्रपटाची पहिली झलक २४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रदर्शित केली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर शुक्राचार्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दलची पौराणिक कथा सध्या सोशल मीडियावर चर्चेत आली आहे. या चित्रपटात अक्षय खन्नासोबत भूमी आणि रोहित सराफ हे दिसणार आहेत.

केवळ 'असुरांचे गुरु' एवढीच ओळख नाही

अनेकदा शुक्राचार्यांची ओळख ही केवळ 'असुरांचे गुरु' म्हणूनच करून दिली जाते, ज्यामुळे त्यांना केवळ एक खलनायक समजले जाते. मात्र, पौराणिक आणि महाभारतातील कथांनुसार शुक्राचार्य हे महर्षी भृगु व काव्यमाता यांचे पुत्र होते. त्यांना 'काव्य' आणि 'उशना' या नावांनीही ओळखले जाते. ते केवळ असुरांचे मार्गदर्शकच नव्हे, तर अत्यंत प्रखर तपस्वी, कुशल रणनीतीकार, बुद्धिवान आणि मंत्रविद्येचे महान ज्ञानी होते. देव आणि असुरांच्या युद्धात देवगुरु बृहस्पती आणि शुक्राचार्य यांच्यातील बुद्धिमत्तेची आणि रणनीतीची मोठी परीक्षा पाहायला मिळत असे.

प्रभासचा 'स्पिरिट' होणार पोस्टपोन?

प्रभासच्या आगामी चित्रपटांची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. अभिनेता सध्या हनु राघवपुडी यांच्या 'फौजी' चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. त्यानंतर प्रभास संदीप रेड्डी वांगा यांच्या 'स्पिरिट' आणि 'कल्की २८९८ एडी'च्या सीक्वलमध्ये दिसणार आहे. मात्र, प्रभासच्या व्यस्त वेळापत्रकामुळे 'स्पिरिट'च्या शूटिंगला विलंब होत असल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. त्यामुळे हा चित्रपट ठरलेल्या तारखेला प्रदर्शित होणार की पुढे ढकलला जाणार, याबाबत चाहत्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता.मात्र आता 'स्पिरिट'च्या निर्मात्यांनी या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे. टी–सीरीजच्या प्रवक्तभ्यांनी स्पष्ट केले आहे की, चित्रपटाच्या रिलीज डेटमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. 'स्पिरिट' ५ मार्च २०२७ रोजीच जगभरात प्रदर्शित होणार असल्याचे निर्मात्यांनी सांगितले आहे. टी–सीरीजच्या प्रवक्तभ्यांनी म्हटले की, ''स्पिरिट'च्या रिलीजसाठी आम्ही पूर्णपणे तयार आहोत. चित्रपट ५ मार्च २०२७ रोजी प्रदर्शित होणार आहे. यापूर्वी जाहीर करण्यात आलेल्या रिलीज डेटमध्ये कोणताही बदल झालेला नाही. आम्ही नियोजित वेळापत्रकानुसार काम करत आहोत.'स्पिरिट' ५ मार्च २०२७ रोजी प्रदर्शित होणार असल्याने बॉक्स ऑफिसवर मोठी टक्कर पाहायला मिळण्याची शक्यता आहे. याच काळात सलमान खान आणि वामसी यांच्या आगामी चित्रपटाच्या प्रदर्शनाचीही चर्चा आहे. त्यामुळे प्रभास आणि सलमान खान यांच्यात बॉक्स ऑफिसवर थेट सामना रंगण्याची शक्यता आहे. सध्या तरी निर्मात्यांनी 'स्पिरिट'ची रिलीज डेट कायम असल्याचे स्पष्ट केले असून, ५ मार्च २०२७ रोजीच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.काही दिवसांपासून 'स्पिरिट'च्या शूटिंगला उशीर होत असल्याच्या बातम्या समोर येत होत्या. एका रिपोर्टनुसार, चित्रपटाचे अद्याप सुमारे ७५ दिवसांचे शूटिंग बाकी असल्याचे सांगितले जात होते.

दुसरीकडे प्रभासच्या आगामी चित्रपटांसाठीच्या तारखा आधीच व्यस्त आहेत. त्यामुळे एवढ्या कमी कालावधीत 'स्पिरिट'चे शूटिंग आणि पोस्ट–प्रॉडक्शनचे काम पूर्ण करणे आव्हानात्मक ठरू शकते,

'द ओडिसी'ने रचला इतिहास

दिग्दर्शक ख्रिस्टोफर नोलन यांच्या 'द ओडिसी' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर नवा इतिहास रचला आहे. मॅट डेमन अभिनीत या चित्रपटाने जगभरात तब्बल १.३५२ अब्ज डॉलरची कमाई केली आहे. त्यामुळेच हा चित्रपट आतापर्यंतचा सर्वाधिक कमाई करणारा ठ–रेटेड चित्रपट ठरला आहे.

या कामगिरीसह 'द ओडिसी'ने 'डेडपूल अँड वूल्व्हरिन'चा विक्रम मागे टाकला आहे. 'द ओडिसी'ने उत्तर अमेरिका म्हणजेच अमेरिका आणि कॅनडामध्ये सुमारे ५१६ दशलक्ष डॉलरची कमाई केली आहे. तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चित्रपटाने ८०० दशलक्ष डॉलरपेक्षा अधिक कमाई केली. याआधी सर्वाधिक कमाई करणार्‍या ठ–रेटेड चित्रपटाचा विक्रम 'डेडपूल अँड वूल्व्हरिन'च्या नावावर होता. या चित्रपटाने जगभरात सुमारे १.३३८ अब्ज डॉलरची कमाई केली होती.

'द ओडिसी' १७ जुलै रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी या चित्रपटाने उत्तर अमेरिकेत तब्बल १२३ दशलक्ष डॉलरची कमाई केली होती. त्यानंतरही चित्रपटाची बॉक्स ऑफिसवरील घोडदौड कायम राहिली. जुलैमध्येच 'द ओडिसी'ने १ अब्ज डॉलरच्या कमाईचा टप्पा पार केला.

सध्या 'द ओडिसी' हा २०२६ मधील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर असल्याचे सांगितले जात आहे. चीनमधील प्रदर्शनामुळेही चित्रपटाच्या कमाईला मोठी चालना मिळाली. चित्रपटाचे प्रदर्शन पूर्ण होईपर्यंत त्याची कमाई १.५ अब्ज डॉलरचा टप्पा ओलांडू शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

'द ओडिसी'ने 'डेडपूल अँड वूल्व्हरिन'चा विक्रम मोडल्यानंतर अभिनेता रायन रेनॉल्ड्सनेही या यशाचे कौतुक केले. त्याने सोशल मीडियावर आपल्या २०२४ मधील चित्रपटाची एक क्लिप शेअर करत 'द ओडिसी'च्या संपूर्ण कलाका र आणि टीमचे अभिनंदन केले.

द्वेब

'आवारापन -२' ची दमदार कमाई

१४ ऑगस्ट रोजी प्रदर्शित झालेल्या इम्रान हाश्मीच्या 'आवारापन २' आणि सनी देओलच्या 'बंटवारा १९४७' यांच्यातील बॉक्स ऑफिसवरील लढत आता आठवड्याच्या दिवसांच्या (वीक–डेज) टप्प्यात आली आहे. वीकेंडनंतर दोन्ही चित्रपटांच्या कमाईत घट झाली असली, तरी इम्रान हाश्मीच्या चित्रपटाने आपली पकड तुलनेने मजबूत ठेवली आहे. याउलट, सनी देओलच्या चित्रपटाच्या दैनंदिन कमाईत सोमवारी मोठी घसरण दिसून आली.

'सॅकनिल्क'च्या सुरुवातीच्या आकडेवारीनुसार, 'आवारापन २'ने चौथ्या दिवशी सुमारे ९.२५ कोटी रुपयांची निव्वळ कमाई केली. या चित्रपटाने पहिल्या दिवशी २२ कोटी, दुसऱ्या दिवशी ३३.७५ कोटी आणि तिसऱ्या दिवशी २६ कोटी रुपये कमावले होते. परिणामी, चार दिवसांत देशांतर्गत निव्वळ कमाई सुमारे ९१ कोटी रुपयांवर पोहोचली आहे, तर जागतिक स्तरावरील कमाई १३०.८२ कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. नितीन कक्कर दिग्दर्शित या चित्रपटात इम्रानसोबत दिशा पटानी आणि शबाना आझमी यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत.

दुसरीकडे, राजकुमार संतोषी दिग्दर्शित 'बंटवारा १९४७'ला सोमवारी बॉक्स ऑफिसवर मोठा फटका बसला आणि त्याने केवळ २ कोटी रुपयांचा व्यवसाय केला. यापूर्वी, या चित्रपटाने पहिल्या दिवशी ५.७५ कोटी, दुसऱ्या दिवशी १३.५० कोटी आणि तिसऱ्या दिवशी ७.२५ कोटी रुपये कमावले होते. चार दिवसांत चित्रपटाची देशांतर्गत निव्वळ कमाई २८.५० कोटी रुपये झाली असून, जागतिक कमाई सुमारे ४०.२० कोटी रुपये आहे. सुमारे १२० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनलेल्या या चित्रपटात सनी देओलसोबत प्रीती झिंटा, शबाना आझमी आणि अली फजल यांच्या भूमिका आहेत.

'परफेक्ट रूटीनपेक्षा सातत्य महत्त्वाचं'

बॉलीवूड मधील मराठमोळा चेहरा म्हणून ओळखली जाणारी आणि वैविध्यपूर्ण भूमिका साकारत प्रेक्षकांची पसंती मिळवणारी अभिनेत्री म्हणजे शर्वरी वाघ. 'बंटी और बबली २' मधून पदार्पण केल्यानंतर शर्वरीने 'अल्फा', 'मुंज्या' आणि 'मैं वापस आऊंगा' यांसारख्या मोठ्या चित्रपटांतमध्ये काम केलं. अभिनयाबरोबर तिच्या स्टायलिश लूक आणि फिटनेसचीही चांगलीच चर्चा होत असते.

हल्ली अनेक सेलिब्रिटी स्क्रीनवर छान दिसण्यासाठी खूप मेहनत घेत असतात. वेगवेगळे डाएट फॉलो करत असतात. शर्वरीसुद्धा तिच्या फिटनेसची खूप काळजी घेते. अशताच आता तिने तिच्या दिवसाची सुरुवात कशी करते ते फिटनेस जपण्यासाठी काय करते, काय खाते या सगळ्याबद्दल सांगितलं आहे.

शर्वरी दिवसाची सुरुवात कशी करते?

स्क्रीनच्या वृत्तानुसार तिला ती दिवसाची सुरुवता कशी करते याबद्दल विचारल्यानंतर तिने सांगितलं की ती सकाळी कॉफी पिते आणि त्याचदरम्यान ती दिवसभर काय काय काम आहे याचा विचार करते. असं सांगितलं. पुढे तिला चित्रपटांपासून फॅशन आणि फिटनेसपर्यंत, तू अनेकांसाठी प्रेरणास्थान आहात. तुझ्या या प्रवासाकडे तू कशाप्रकारे पाहते? असं विचारल्यानंतर ती म्हणाली, 'मागे वळून पाहताना मला जाणवतं की, प्रत्येक गोष्ट आधीच ठरलेली असावी, याचा मी आता फारसा विचार करत नाही. जेव्हा तुम्ही करिअरला सुरुवात करता, तेव्हा एका ठराविक मार्गानेच पुढे जायचं असतं, असं स्वाभाविकपणे वाटतं. मात्र, आता माझा स्वत:वर विश्वास ठेवणं आणि ज्या गोष्टींची मला खरोखरच उत्सुकता वाटते, त्या निवडणं अधिक सहज वाटतं. बाहेरून त्या गोष्टी नेहमीच योग्य वाटतील असं नाही. पण हाच माझ्यात झालेला सर्वात मोठा बदल आहे, असं मला वाटतं'.

शर्वरी फिट राहण्यासाठी काय करते?

शर्वरीला तिच्या फिटनेस रूटीनबद्दल विचारल्यानंतर ती म्हणाली, 'मला वर्कआउट करताना व्यायामाचे वेगवेगळे प्रकार करायला आवडतात. माझं वेळापत्रक आणि मी कोणत्या गोष्टीची तयारी करत आहे, यानुसार मी स्ट्रेंथ ट्रेनिंग, बॉक्सिंग, कंडिशनिंग किंवा अगदी साधं धावनं असो सगळं असचं करते.

फिटनेसकडे केवळ दिसण्यात बदल घडवून आणण्याचा एक मार्ग म्हणून मी पाहत नाही. माझ्यासाठी फिटनेस म्हणजे शारीरिकदृष्ट्या मजबूत, उत्साही आणि मानसिकदृष्ट्या सतर्क राहणं. परफेक्ट रूटीन असण्यापेक्षा सातत्य अधिक महत्त्वाचं आहे'.

शर्वरी फिट राहण्यासाठी काय खाते?

व्यायामाबरोबर डाएट, योग्य आहाराचं महत्त्व सांगत शर्वरी म्हणाली, 'मी खाण्यापिण्याबाबत अतिशय कडक नियम पाळण्यावर विश्वास ठेवत नाही. मी शक्यतो सकस आणि पौष्टिक आहार घेण्याचा प्रयत्न करते आणि विशेषतः वर्कआउट करत असताना आहारातून पुरेसं प्रोटीन, भाज्या आणि चांगल्या प्रकारचे कार्बोहायड्रेट्स मिळतील याची काळजी घेते.

अन्नाचा आनंद घेणंही तितकंच महत्त्वाचं आहे,

त्यामुळे त्याबाबत खूप नियम लावून घेणं मला आवडत नाही. शेवटी, हे सगळं समतोल राखण्याबद्दल आणि कोणत्याही वेळी आपल्या शरीराला नेमकं काय हवं आहे, हे समजून घेण्याबद्दल आहे'.

ई-२० च्या पुढे जाताना

इथेनॉल मिश्रणामुळे २०१४-१५ ते मे २०२६ दरम्यान भारताने १.९१ लाख कोटी रुपयांहून अधिक परकीय चलनाची बचत आणि सुमारे ३१० लाख टन कच्च्या तेलाची आयात टाळल्याचा सरकारी दावा आहे. मात्र, त्याच वेळी 'ई-२०'मुळे (ए - २०) निर्माण होर्णा ?या वाहन, अन्न, पाणी आणि शेतीविषयक प्रश्नांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. ऊर्जा-सुरक्षेची किंमत अन्नसुरक्षा किंवा जलसुरक्षेने मोजावी लागू नये, एवढेच या वादाचे सार आहे.

मुख्य आर्थिःआर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन आणि आर्थिक व्यवहार विभागातील सल्लागार आकाश पुजारी यांनी जुन्या वाहनांसाठी 'ई-१०' पेट्रोलचा पर्याय पुन्हा उपलब्ध करून देण्याची सूचना केल्याने या प्रश्नाला नवे वळण मिळाले. त्यांची सूचना केवळ वाहनांच्या तांत्रिक सुसंगततेपुरती मर्यादित नाही.

इथेनॉलची मागणी वाढत गेल्यास ऊस आणि मक्यासारख्या पिकांच्या लागवडीकडे अधिक जमीन, पाणी आणि संसाधने वळतील; त्यातून अन्नधान्याच्या उपलब्धतेवर आणि किमतीवर परिणाम होऊ शकतो, अशी व्यापक चिंता त्यांनी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे, हा इशारा सरकारच्या धोरणावर टीका करर्णा ?या एखाद्या राजकीय पक्षाकडून नव्हे, तर सरकारच्या आर्थिक धोरणाच्या केंद्रस्थानी असलेल्या अधिकायांकडून आला आहे.

परकीय तेलावरची अवलंबित्वाची बेडी तोडताना देशांतर्गत पाणी, जमीन, अन्न आणि ग्राहक यांच्यावर नवी बेडी पडता कामा नये. इथेनॉलचा प्रत्येक थेंब भारताची ऊर्जा-सुरक्षा वाढवेल, पण त्या प्रत्येक थेंबामागील पाणी, जमीन, अन्न आणि पैसा यांचाही हिशेब ठेवला जाईल, तेव्हाच 'ई-२०' (ए - २०) हे केवळ इंधनधोरण न राहता खऱ्या अर्थाने शाश्वत विकासाचे धोरण ठरेल.

नागेश्वरन यांच्या सूचनेमुळे निर्माण झालेला सर्वांत मोठा राजकीय प्रश्न म्हणजे सरकारची अधिकृत भूमिका आणि मुख्य आर्थिक सल्लागारांची सूचना यांच्यातील संभाव्य ताण. केंद्र सरकारने ई-२० वरून ई-१० कडे परतण्याचा कोणताही प्रस्ताव नसल्याचे स्पष्ट केले आहे आणि ई-२० कडे संक्रमण व्यापक चाचण्या व उद्योगाशी सल्लामसलत करून झाल्याचे म्हटले आहे.

मात्र एखाद्या धोरणावर पुनर्विचार करण्याची मागणी म्हणजे धोरणाचा पराभव नसतो. धोरणे दगडावर कोरलेली नसतात. नवीन माहिती, नवीन तंत्रज्ञान, बदलती बाजारस्थिती किंवा अनपेक्षित परिणाम समोर आले तर त्यात सुधारणा करणे हेच सुशासनाचे लक्षण आहे. त्यामुळे नागेश्वरन यांच्या सूचनेकडे सरकारविरोधी बंड म्हणून पाहण्याऐवजी धोरणाच्या पुढील टप्प्याबाबतचा संस्थात्मक आत्मपरीक्षणाचा क्षण म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल. या प्रश्नाला घटनात्मक संदर्भही आहे. राज्यघटनेच्या कलम २१च्या व्यापक अर्थाने निरोगी पर्यावरणाचा अधिकार मान्य करण्यात आला आहे. कलम ४८-अ राज्याला पर्यावरणाचे संरक्षण करण्याची दिशा देते आणि कलम ५१-अ(ग) नागरिकांचे पर्यावरण रक्षणाचे मूलभूत कर्तव्य अधोरेखित करते. सर्वोच्च न्यायालयाने 'वेल्लोर सिटिझन्स वेल्फेअर फोरम विरुद्ध भारत संघ' या प्रकरणात शाश्वत विकास आणि सावधगिरीच्या तत्त्वांना भारतीय पर्यावरणीय न्यायशास्त्रात महत्त्वाचे स्थान दिले आहे.

याचा अर्थ विकास थांबवायचा असा नाही. उलट, विकासाचा लाभ वर्तमान पिढीला मिळवून देताना भविष्यातील पिढ्यांच्या संसाधनांवर अन्याय होऊ नये, एवढाच त्याचा अर्थ आहे. इथेनॉलने तेलाची आयात कमी केली, पण त्यासाठी भूजलाचा अतिवापर केला तर एक संकट सोडवून दुसरे संकट निर्माण होईल. पेट्रोलची आयात कमी झाली, पण अन्नधान्याच्या किमती वाढल्या तर ऊर्जा-सुरक्षेची व्याख्या अपुरी ठरेल. मग मार्ग कोणता? भारताने ई-२० तातडीने रद्द करावे, असा निष्कर्ष या सर्व चर्चेतून काढणे योग्य ठरणार नाही. त्याचप्रमाणे जुन्या वाहनधारकांच्या समस्या दुर्लक्षित करून ई-२०ला अंतिम आणि अपरिवर्तनीय धोरण मानणेही योग्य नाही. सर्वप्रथम, २०२३ पूर्वीच्या वाहनांसाठी संक्रमणकालीन ई-१० उपलब्धतेचा पर्याय तपासला पाहिजे.

दुसरे म्हणजे वाहननिहाय इंधन-सुसंगततेची स्पष्ट सार्वजनिक माहिती असावी. तिसरे म्हणजे जुन्या वाहनांसाठी प्रमाणित आणि सुरक्षित रेट्रोफिटिंग व्यवस्था निर्माण केली पाहिजे. चौथे म्हणजे पेट्रोलपंपावरील इंधनाच्या गुणवत्तेची स्वतंत्र आणि नियमित तपासणी व्हावी.

लोकसभेने नुकताच कर आकारणी आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६ मंजूर करताना देयक आणि निपटारा प्रणाली कायद्यात बदल करण्याचा प्रस्ताव स्वीकारला आहे. या बदलामुळे केंद्र सरकारला कोणते इलेक्ट्रॉनिक व्यवहार विनामूल्य ठेवायचे आणि कोणत्या व्यवहारांवर शुल्क आकारता येईल, याबाबत निर्णय घेण्याची अधिक मुभा मिळणार आहे. येणाऱ्या काळात यूपीआय व्यवहारांवर शुल्कआकारणी केली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सरकार भलेही हे शुल्क व्यापाऱ्यांना लागू असेल असे म्हणत आहे; पण अप्रत्यक्षपणे त्याचा भार ग्राहकांवरच टाकला जाईल हे निश्चित आहे.

'यूपीआय'चा संशयकल्लोळ

सुलभ, वेगवान आणि विनाशुल्क आर्थिक व्यवहार करण्याची सुविधा देत युनिफाईड पेमेंट इंटरफेस म्हणजेच यूपीआयने देशातील आर्थिक व्यवहारांची पद्धतच बदलून टाकली. छोट्या दुकानदारांपासून मोठ्या उद्योगांपर्यंत आणि शहरांपासून ग्रामीण :भागापर्यंत त्याचा विस्तार झाला. डिजिटल इंडियाच्या यशाचे उदाहरण म्हणून यूपीआयचे उदाहरण केंद्र सरकारमधील सर्व मंत्रीगण, पंतप्रधान आणि भाजपशासित राज्यातील सरकारे, समर्थक सातत्याने करतच असतात. पण आता यूपीआय आणि रुपेच्या काही व्यवहारांवर शुल्क आकारण्याचा मार्ग मोकळा करर्णा ?या कायद्यातील बदलामुळे काही प्रश्न निर्माण झाले असून त्यांची समर्पक उत्तरे नेहमीप्रमाणे सरकारकडून मिळत नाहीयेत. मुळात, ज्या व्यवस्थेचे यश सरकार अभिमानाने सांगत आले, तिच्या मूलभूत वैशिष्ट्यांमध्ये बदल करण्याची गरज का निर्माण झाली, हा यातील कळीचा प्रश्न आहे.

शाश्वततेचा प्रश्न की धोरणातील विसंगती?

यूपीआयचे व्यवहार ग्राहक आणि व्यार्पा ?यांसाठी विनाशुल्क असले तरी त्यामागील व्यवस्था विनाखर्च चालत नाही. बँका, भारतीय राष्ट्रीय देयक महामंडळ, देयक सेवा पुरवठादार आणि इतर संस्थांना तंत्रज्ञान, सुरक्षा, सर्व्हर, देखभाल आणि विस्तारासाठी मोठा खर्च करावा लागतो. पण यूपीआयची व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी सरकार दरवर्षी बँकांना मोठ्या प्रमाणावर म्हणजेच २००० कोटी रुपयांची आर्थिक मदत देत आहे. अशा परिस्थितीत बँकांना व्यवहारांवर शुल्क आकारण्याचा अधिकार देण्यामागील आर्थिक तर्क स्पष्टपणे समोर येणे आवश्यक आहे. सरकारच्या अनुदानातून ही व्यवस्था चालवायची आणि त्याच वेळी त्याच व्यवहारांवर शुल्क आकारण्याची मुभा द्यायची, या दोन्ही बाबींचा समन्वय कसा साधला जाणार, याचे समाधानकारक उत्तर सरकारने देणे गरजेचे आहे. उद्योगांच्या मते प्रत्यक्ष खर्च सरकारी अनुदानापेक्षा मोठा आहे. मात्र त्याचे उत्तर थेट शुल्कव्यवस्था निर्माण करण्यातच आहे, असे मानणे घाईचे ठरेल. कारण यूपीआयची लोकप्रियता मोठ्या प्रमाणावर 'विनाशुल्क व्यवहार' या वैशिष्ट्यावर उभी आहे. हीच बाब बदलली, तर त्याच्या वापरावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

सद्यस्थितीत दोन हजार रुपयांपेक्षा अधिक व्यवहार एकूण व्यवहारसंख्येच्या केवळ ४ ते ५ टक्के असले, तरी व्यवहारमूल्याच्या सुमारे ७० टक्के हिस्सा त्यांचा आहे. त्यामुळे छोट्या व्यवहारांना स्पर्श न करता मोठ्या व्यवहारांवर शुल्क लावण्याची

कल्पना विचारात घेता येऊ शकते. परंतु ही व्यवस्था प्रत्यक्षात कशी राबविली जाईल, हा अधिक महत्त्वाचा मुद्दा आहे.

यूपीआय व्यवहारांवरील शुल्काचा विषय प्रामुख्याने मर्चंट डिस्काऊंट रेट म्हणजेच एमडीआरभोवती फिरतो. हा असा महसूल असतो जो व्यापारी डिजिटल व्यवहार सुलभतेने पार पाडण्यासाठी बँका किंवा पेमेंट कंपन्यांना देतात. सध्या हा दर शून्य असल्यामुळे लहान दुकानदारांपासून ते मोठ्या ग्राहकांपर्यंत सर्वांनीच डिजिटल व्यवहारांचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार केला आहे. आता नव्या विधेयकानंतर सरकारचे म्हणणे आहे की, एमडीआर हा ग्राहकावर नव्हे, तर व्यार्पा ?यांवर लागू होणार असल्यामुळे सामान्य वापरकर्त्यांवर थेट परिणाम होणार नाही. हे तांत्रिकदृष्ट्या योग्य दिसत असले, तरी आर्थिक व्यवहार प्रत्यक्षातइतके सरळ नसतात. व्यार्पा ?यांच्या खर्चात वाढ झाली तर वस्तू किंवा सेवांच्या किमतीत तो खर्च समाविष्ट होण्याची शक्यता आहे. काही व्यापारी ग्राहकांना वेगळे शुल्कही आकारू शकतात. त्यामुळे 'ग्राहकाकडून शुल्क घेतले जाणार नाही' एवढे सांगणे पुरेसे ठरणार नाही. सरकारने अशा शुल्काचा अंतिम परिणाम ग्राहकांवर होणार नाही, यासाठी स्पष्ट आणि प्रभावी नियम तयार करणे आवश्यक आहे. विशेषत लहान व्यापारी आणि सेवा क्षेत्रातील व्यावसायिकांवर त्याचा अनावश्यक भार पडता कामा नये. यूपीआयने छोट्या व्यवहारांनाही डिजिटल केले आहे. पण शुल्क आकारणीमुळे या वर्गाला पुन्हा रोख व्यवहाराकडे वळण्याची वेळ आली, तर आतापर्यंत झालेल्या डिजिटःडिजिटल परिवर्तनाला धक्का बसू शकतो.

यूपीआय शुल्काचा विचार केवळ आर्थिक शाश्वततेसाठी होत असेल, तर त्याचे स्पष्ट आर्थिक गणित देशासमोर ठेवले पाहिजे. यूपीआय चालवण्यासाठी प्रत्यक्ष किती खर्च होतो, सरकारची सध्याची मदत किती आहे, भविष्यात किती गुंतवणूक आवश्यक आहे आणि शुल्काशिवाय कोणते पर्याय उपलब्ध आहेत, याची माहिती सार्वजनिक झाली पाहिजे. कारण यूपीआय ही केवळ सरकारी योजना नाही. ती देशाची डिजिटल पायाभूत सुविधा बनली आहे. तिच्याशी कोटय़वधी नागरिक आणि लाखो व्यापारी जोडलेले आहेत.

डिजिटल व्यवहार सातत्याने वाढत असताना प्रत्येक व्यवहाराचा खर्च सरकारनेच उचलणे दीर्घकाळ शक्य होणार नाही. पायाभूत सुविधांचा विस्तार, सायबर सुरक्षा आणि तंत्रज्ञानातील सुधारणा यासाठी मोठ्या गुंतवणुकीची आवश्यकता आहे. म्हणूनच यूपीआयला कायमस्वरूपी विनाशुल्क ठेवायचे असल्यास पर्यायी महसूल मॉडेल तयार करावे लागेल. मोठ्या व्यापारी व्यवहारांवर अत्यल्प शुल्क हा त्यापैकी एक पर्याय असू शकतो. मात्र त्यासाठी व्यवहारांचे प्रमाण, मूल्य, व्यार्पा ?याचा आकार आणि क्षेत्र यांचा विचार करून अत्यंत काळजीपूर्वक रचना करावी लागेल.

भारताने यूपीआयच्या माध्यमातून जगाला डिजिटल व्यवहाराचे एक प्रभावी मॉडेल दिले आहे. ब्राझीलची पिस यांसारखी व्यवस्था शुल्क आकारणीसह चालत असली, तरी भारताची परिस्थिती वेगळी आहे. भारतात यूपीआयने आर्थिक व्यवहारांचे मोठ्या प्रमाणावर लोकशाहीकरण केले आहे. त्यामुळे अन्य देशांच्या उदाहरणाचा आधार घेऊन भारतातही शुल्क लागू करणे पुरेसे कारण ठरू शकत नाही. तेव्हा सरकारने यूपीआयच्या आर्थिक शाश्वततेचा विचार जरूर करावा; पण त्याच वेळी त्याची सुलभता, कमी खर्च आणि सर्वसमावेशकता अबाधित ठेवायला हवी. विशेषत छोट्या व्यवहारांवर कोणताही अतिरिक्त भार पडता कामा नये.

यूपीआयचा विस्तार हा भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. त्याच्या टिकाऊ पणासाठी बदल आवश्यक असतील, तर ते बदल करता येतील. पण बदल करताना यूपीआयची मूळ ताकदच कमी होणार नाही, याची काळजी घेणे अधिक महत्त्वाचे आहे.

यूपीआय शुल्क आकारणीबाबत निर्माण झालेला मुख्य प्रश्न शुल्क आकारले जाईल की नाही, एवढाच नाही.

प्रश्न हा आहे की, व्यापाऱ्यांकडून आकारले जाणारे शुल्क अखेरीस ग्राहकांपर्यंत पोहोचणार नाही, याची हमी कोण देणार? भारताच्या डिजिटल देयक व्यवस्थेचे भविष्यातील धोरण कोण ठरवणार? जर हा निर्णय भारताच्या अंतर्गत आर्थिक गरजांमधून घेतला जात असेल, तर त्याचे कारण स्पष्टपणे सांगणे सरकारच्या हिताचे आहे. तसेच जर अमेरिका-भारत व्यापार चर्चेचा त्यावर कोणताही प्रभाव नसेल, तर तेही स्पष्ट केले पाहिजे.

श्रीमंतांमधील विषमता!

भारतातील श्रीमंतांच्या यादीतील टॉप १०८ श्रीमंतांकडे एकूण संपत्तीपैकी ४६ टक्के हिस्सा आहे. तर यादीतील तळाच्या १५२० श्रीमंतांकडे फक्त ९ टक्के संपत्ती आहे. म्हणजे श्रीमंतांमध्ये देखील आज प्रचंड विषमता आहे. भारत हा तरुणांचा देश असून, शिक्षणातील समस्यांमुळे हा वर्ग सध्या अस्वस्थ आहे. मात्र भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या वेगाने वाढत आहे. २०५० पर्यंत देशातील प्रत्येक पाचपैकी एक नागरिक हा ६० वर्षांवरील असेल. म्हणजेच ३४ कोटींपेक्षा अधिक लोक हे ज्येष्ठ असतील. त्यापैकी जवळपास ७० टक्के ज्येष्ठ नागरिक हे ग्रामीण भागात राहतील, अशी माहिती 'ट्रान्स्फॉर्म रुरल इंडिया' संस्थेच्या ताज्या अहवालातून पुढे आली आहे. जगातील प्रगत देश आधी श्रीमंत झाले आणि नंतर त्यांच्या लोकसंख्येत वयस्कर लोकांचे प्रमाण वाढले. परंतु भारत हा अजूनही विकसनशील देश असून, गरीब आणि कनिष्ठ मध्यम वर्गीयांची संख्या मोठी आहे. आर्थिक प्रगतीच्या टप्प्यावर असताना भारतात मात्र ज्येष्ठ नागरिकांची संख्या जलद गतीने वाढत असून, हा चिंतेचा विषय आहे.

एका ज्येष्ठ नागरिकामागे काम करणाऱ्या वयोगटातील व्यक्तींचे प्रमाण सातत्याने कमी होत आहे. २००१ मध्ये हे प्रमाण ८ टक्के होते तर आता ते ५ टक्क्यांवर आले आहे. याचा अर्थ असा की, येत्या काळात कमी कमावत्या व्यक्तींवर अधिक ज्येष्ठांची जबाबदारी येणार आहे. नोकरीधंद्यासाठी तरुणवर्ग गावातून शहरांमध्ये स्थलांतरित होत आहे. शिवाय आता विभक्त कुटुंबांचे (ठग्म्पब झीदह) प्रमाण वाढत चालले आहे. लोकांचे सरासरी आयुर्मान वाढले आहे. त्यामुळे घरातील वृद्धांची देखभाल करणारे हात कमी पडत आहेत. आज देशातील ९४ टक्के वृद्धांचा सांभाळ घरातील सदस्यच करतात आणि त्यांचा खर्चही उचलतात.

शिवाय भारतातील ६६ज्ञब मृत्यू मधुमेह, हृदयविकार आणि कर्करोग यासारख्या आजारांमुळे होत आहेत. दीर्घकालीन आजारांनी त्रस्त असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना लहान गावात नियमित सेवा मिळणे आवश्यक आहे. त्याकरिता ग्रामपंचायत, आशा सेविका, अंगणवाडी व स्वयंसहाय्यता गट आणि आयुष्मान आरोग्य मंदिरे यांना एकत्र जोडून, गावपातळीवर सेवाव्यवस्था उभारण्याची रास्त शिफारस या संस्थेच्या अहवालात करण्यात आली आहे. मुळात भारतातील सार्वजनिक आरोग्यावरील खर्चाचे प्रमाण हे प्रगत देशांच्या मानाने खूप कमी आहे.

सेवा अर्थव्यवस्थेत देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या २ टक्के गुंतवणूक केल्यास, १ कोटी १० लाख लोकांना रोजगार मिळू शकेल.

नैराश्याच्या विळख्यात भारत

भारतातील नैराश्यात १२३ टक्क्यांनी वाढ ही केवळ भारतातील आरोग्याची आकडेवारी नाही; तर आधुनिक भारतीय समाजाच्या अंतर्गत ताणतणावांचा आरसा आहे.

'द लॅन्सेट'मध्ये प्रसिद्ध झालेल्या ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज अभ्यासानुसार, १९९० ते २०२३ या ३३ वर्षांच्या कालावधीत भारतात नैराश्य आणि चिंताविकारांमध्ये तब्बल १२३ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

ही वाढ केवळ वैद्यकीय आकडेवारी नाही; ती आधुनिक भारतीय समाजातील सामाजिक ताण, आर्थिक अस्थिरता, शैक्षणिक स्पर्धा, डिजिटल एकाकीपणा आणि सामाजिक विषमतेची सामूहिक कहाणी आहे. विकासाच्या प्रत्येक घोषणेमागे मानसिकदृष्ट्या तुटत चाललेला माणूस उभा आहे.भारत सरकारच्या राष्ट्रीय मानसिक आरोग्य सर्वेक्षणानुसार, भारतातील सुमारे १०.६ टक्के प्रौढ नागरिक काही ना काही मानसिक विकारांनी ग्रस्त आहेत. जवळपास १५ कोटी भारतीयांना आयुष्यात कधीतरी मानसिक आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागतो.

२०१७ मध्ये भारतात सुमारे ४५ ते ४६ दशलक्ष लोक नैराश्याने ग्रस्त होते, तर चिंताविकारांचे प्रमाणही तितकेच गंभीर होते. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या आकडेवारीनुसार, आत्महत्यांचे प्रमाण सातत्याने वाढत असून त्यामागे नैराश्य, कौटुंबिक ताण, बेरोजगारी आणि सामाजिक असुरक्षितता ही हत्त्वाची कारणे आहेत.मानसिक आरोग्याचा प्रश्न संपूर्ण भारतात सारखा नाही. दक्षिणेकडील राज्यांमध्ये नैराश्याचे प्रमाण तुलनेने अधिक असल्याचे संशोधनात दिसते. केरळ, तामिळनाडू, तेलंगणा आणि कर्नाटक यांसारख्या राज्यांमध्ये उच्च शैक्षणिक स्पर्धा, शहरीकरण आणि बदलती सामाजिक रचना यामुळे मानसिक ताण वाढला आहे.दुसरीकडे बिहार, झारखंड, छत्तीसगड आणि उत्तर प्रदेशसारख्या राज्यांमध्ये मानसिक आरोग्य सेवांचा अभाव, दारिद्र्य आणि सामाजिक मागासलेपणा यामुळे अनेक समस्या नोंदवल्याच जात नाहीत. ग्रामीण भारतात दारिद्र्य, शेतीचे संकट, कर्जबाजारीपणा आणि बेरोजगारी यामुळे नैराश्य वाढते; तर शहरी भागात स्पर्धा, एकाकी जीवन, रोजगारातील अस्थिरता आणि डिजिटल संस्कृती मानसिक तणाव निर्माण करते.भारतीय शिक्षणव्यवस्था आज विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी मोठे आव्हान बनली आहे. स्मार्टफोन, इंटरनेट आणि अभ्यासाचे साधन नसलेल्या विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड, असुरक्षितता आणि नैराश्य वाढले. दुसरीकडे, शहरी मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांवर गुण, स्पर्धा परीक्षा आणि करिअर यशाचा प्रचंड दबाव निर्माण झाला.

'हायाबुसा'ची कामगिरी

लघुग्रहांचा शोध घेणाऱ्या अवकाशी मोहिमा अनेक कारणांसाठी आवश्यक असतात. एकतर असे लघुग्रह आपल्या ग्रहमालेत दुरून कुठून म्हणजे सौरमाले पलीकडून आले असतील तर आपल्या आकाशगंगा दीर्घिकेतील आपल्या सौरसंकुलापलीकडचा 'भू'भाग कसा असू शकतो याची माहिती मिळू शकते. समजा त्यावर अतिसूक्ष्म सजीव किंवा त्याचा जीवाश्म सापडला तरी अन्यत्र कुठे कोणी आहे का याचा तर्क करून मग त्या दिशेने संशोधन होऊ शकते.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे असा एखादा लघुग्रह किंवा अशनी पृथ्वीच्या जवळ येण्याच्या बेतात असेल किंवा संभाव्य धडक देणार असेल तर 'डार्ट'च्या प्रयोगाने केला तसा त्याचा मार्ग (म्हणचे कक्षा) बदलता येऊ शकते. कारण अंतराळात असे लाखो अशनी, लघुग्रह इतस्ततः फिरत असून त्यापैकी काहींचा धोका पृथ्वीसाठी कायमच असतो. साडेसहा कोटी वर्षांपूर्वी एका महाअशनीच्या धडकेमुळेच पृथ्वीवरचे सारे

डायनॉसॉर नष्ट झाले.

तेव्हा विविध प्रकारच्या अभ्यासासाठी लघुग्रह आणि अशनीचे जवळून निरीक्षण करणे गरजेचे ठरते. मागच्या लेखात उल्लेख केलेली जपानची 'हायाबुसा-२' ही मोहीम फार महत्त्वाची ठरते. 'हायबुसा-१' या यानाने 'इटोकावा' या लघुग्रहाची केवळ माहिती मिळवली. 'हायाबुसा-२' आता 'रायुग्यु' नावाच्या लघुग्रहावरची मातीही आणणार आहे!

सुरुवातीला हा 'रायुग्यु' कोण ते जाणून घेऊ. '१६२१७५-रायुग्यु' हा एक पृथ्वीनिकट लघुग्रह आहे. त्याचा शोध १० मे १९९९ रोजी 'लिंकन निअर अर्थ अ?स्टेरॉईड रिसर्च' या न्यू मेक्सिकोतील संस्थेने लावला. २८ सप्टेंबर २०१५ रोजी त्याचे 'रायुग्यु' असे नामकरण झाले. त्याचा अर्थ 'ड्रॅगन पॅलेस.' जपानी लोककथेत या नावाचा सागरतळाशी असलेल्या राजवाडय़ाचा उल्लेख येतो.

'रायुग्यु'चा जन्म एका लघुग्रह 'परिवारा'चा भाग म्हणून झाला. युलैलिया किंवा पॉलाना हे त्याचं कटुंब. जन्म वेळेला अत्यंत उष्णता सहन केलेला. हा लघुग्रह कोरडाठाक असून त्याला मॅग्नेटिक फिल्ड (चुंबकीय क्षेत्र) नाही. हा लघुग्रह सूर्यःसूर्याभोवती ०.९६ ते १.४१ खगोलीय एकक अंतरावरून लंबवतुळाकार फिरतो. तो पृथ्वीपासून जवळ असतो. त्याचे पृथ्वीपासूनचे अंतर ९५,४४३ किलोमीटर असते. म्हणजेच चंद्राच्या अंतराच्या तुलनेत ०.२३ इतके. मध्ये फुगीर आणि दोन्ही बाजूंनी निमुळता असा 'गोलगप्प्या'सारखा 'रायुग्यु'चा आकार (पुरीसारखा) गोल आहे. १००४` ८७६ घनमीटर असा त्याचा आकार असून तो सूर्याभोवती पृथ्वीच्या तुलनेत १.३० वर्षांत फेरी मारतो.

आता 'हायाबुसा-२' ही मोहीम या 'रायुग्यु'चा वेध कशासाठी घेतेय? एखाद्या 'निअर-अर्थ' किंवा पृथ्वीनिकट लघुग्रहाची तपासणी करणे. सुमारे ९०० मीटर व्यासाच्या 'रायुग्यु'च्या दिशेने 'हायाबुसा-२' हे यान ३ डिसेंबर २०१४ रोजी निघाले. २०१८ च्या जूनमध्ये त्याचा 'रायुग्यु'शी संपर्क झाला. 'हायाबुसा-२' यानाने त्यावर २ किलो वजनाच्या एका उपकरणाला इम्पॅक्टरद्वारे 'रायुग्यु' किंवा '?यग्यु'वर १४.५ मीटरचा खड्डा पडला. त्या वेळी त्यातून उडालेली प्रचंड धूळ 'हायाबुसा-२'ने लगेच पकडली. 'हायाबुसा-२' पुन्हा जेव्हा पृथ्वीची परिक्रमा करण्यासाठी जवळ आले तेव्हा त्याने एका कुपीमधून 'रायुग्यु'वरची गोळा केलेली दगड-माती पृथ्वीवर टाकली. वैज्ञानिकांनी या पॅरॅशूटद्वारे ऑस्ट्रेलियाच्या वाळवंटात पडलेल्या कुपीचा शोध घेऊन त्यातील दगड-मातीचे पृथःकरण केले. त्यांच्या रासायनिक चाचण्यांमधून असे लक्षात आले की, 'रायुग्यु' नावाच्या एका लघुग्रह किंवा अशनीवर सूक्ष्मजीवांची वाढ झालेली दिसली. विशेष म्हणजे 'रायुग्यु'वरच्या मातीमध्ये 'डीएनए' आणि 'आरएनए' असलेले 'न्यूक्लिओरा इड्'सुद्धा मिळाले!'हायाबुसा-२' अजूनही अंतराळात फिरत आहे. त्याचे इंधन शिल्लक असल्याने वैज्ञानिकांनी त्याला पुढचे काम दिले. ते 'टोरिफुने' आणि '१९९८ केवाय-२६' या पृथ्वीनिकटच्या आणखी दोन लघुग्रहांनाही उडती भेट द्यायची.

त्यापैकी 'टोरिफुने'जवळून १७ हजार किलोमीटर वेगाने हे यान गेले. त्या वेळी या लघुग्रहापासून ते अवघ्या ८०० मीटरवर होते. त्यामुळे 'टोरिफुने'चे कितीतरी फोचो 'हायाबुसा-२'ला घेता आले. हा 'टोरिफु'ने सुमारे ४५० मीटर व्यासाचा अशनी आहे.

नाचणीची भाकर रोज खाणे योग्य?

नाचणीला सुपरफूड मानले जाते, कारण ते वजन नियंत्रित ठेवण्यासाठी, रक्तातील साखर (शुगर) नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि पोटाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी अत्यंत गुणकारी आहे. मात्र, प्रश्न हा आहे की नाचणी रोज खाऊ शकतो का?

नाचणी हे एक असे पीक आहे, जे कमी पाण्यात आणि कठीण हवामानातही पिकवले जाऊ शकते.

यामध्ये कॅल्शियम, लोह, फॉस्फरस, पोटॅशिअम आणि मॅग्नेशिअम यांसारखी खनिजे चांगल्या प्रमाणात आढळतात.

हे घटक अनिमिया दूर करण्यासाठी, पोट दीर्घकाळ भरलेले ठेवण्यासाठी, हाडे मजबूत करण्यासाठी आणि रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी मदत करतात.

नाचणीला आपल्या संतुलित आहाराचा (बॅलन्स्ड डाएट) भाग बनवणे योग्य आहे, पण पूर्णपणे त्यावरच अवलंबून राहणे चुकीचे ठरते. कोणतेही एक धान्य संपूर्ण आहाराची जागा घेऊ शकत नाही. जर एखाद्या व्यक्तीने

फक्त नाचणी खाल्ली आणि इतर डाळी, फळे आणि भाज्या कमी केल्या, तर शरीरात आवश्यक पोषक तत्त्वांची कमतरता भासू शकते. म्हणूनच, नाचणीसोबत इतर तृणधान्यांचा आहारात समावेश करणे आणि पुरेशा प्रमाणात प्रोटीन तसेच भाज्या खाणे अधिक फायदेशीर ठरते.

गव्हाच्या पोळीच्या तुलनेत नाचणीमध्ये कॅल्शियम खूप जास्त असते, जे हाडे आणि दातांसाठी अत्यंत फायदेशीर आहे.

फायबर: यामुळे पोट दीर्घकाळ भरलेले राहते आणि वजन कमी करण्यास मदत होते.

डायबिटीज नियंत्रण: फायबर आणि कॉम्प्लेक्स कार्ब्स असल्यामुळे रक्तातील साखर (ब्लड शुगर) हळूहळू वाढते.

ग्लुटेनची ॲलर्जी असलेल्या लोकांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे. ज्या लोकांना किडनी स्टोनचा (विशेषतः ऑक्सलेट स्टोन) त्रास आहे, त्यांना नाचणी मर्यादित प्रमाणात खाण्याचा सल्ला दिला जातो. ज्यांची पचनसंस्था जास्त प्रमाणात फायबर सहन करू शकत नाही, त्यांनी कमी प्रमाणापासून सुरुवात करावी. आयुर्वेदानुसार नाचणीचे स्वरूप यरूक्ष' म्हणजेच कोरडे मानले जाते. त्यामुळे नाचणीचे सेवन करताना पुरेशा प्रमाणात पाणी पिणे अत्यंत आवश्यक आहे. पुरेसे पाणी प्यायल्याने पचन सुधारते आणि शरीर हायड्रेटेड राहते.

एका मध्यम आकाराच्या नाचणीच्या भाकरीत (४०–५० ग्रॅम) सुमारे ९५–१२० कॅलरीज असतात. भाकरीला तूप किंवा तेल लावल्यास कॅलरीज वाढू शकतात.

श्रावणात मांसाहार का करीत नाहीत?

या दरम्यान भगवान शंकराची पूजा केली जाते. या काळात मांसाहार, लसूण आणि कांद्यासारखे पदार्थ खाणे वर्ज्य मानले जाते. सर्वसाधारणपणे यामागे केवळ धार्मिक कारण सांगितले जात असले, तरी वैज्ञानिक आणि आरोग्याशी संबंधित दृष्टिकोनही दडलेला आहे.

मान्सून आणि पचनशक्तीवर होणारा परिणाम

श्रावण महिना पावसा ळ्यात येतो. या काळात हवेत जास्त दमटपणा असतो, ज्यामुळे सूक्ष्मजीव, बॅक्टेरिया आणि फंगस वाढण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होते.

या ऋतूत माणसांची पचनशक्ती कमकुवत झालेली असते. आशा काळात पचायला जड आणि मांसाहारी भोजन केल्यास गॅस, ॲसिडिटी, पोट फुगणे आणि अपचन यांसारख्या शारीरिक समस्या उद्भवतात. त्यामुळे या काळात हलका आहार घेणे आरोग्यासाठी अधिक फायदेशीर ठरते.

या काळात मटण, चिकन किंवा मासे योग्य तापमानात ठेवले नाहीत किंवा योग्य पद्धतीने शिजवले गेले नाहीत, तर ते लवकर खराब होतात. असे अन्न खाल्ल्याने पोटात इन्फेक्शन, फूड पॉयझनिंग आणि डायरियासारख्या आजारांची जोखीम अनेक पटीने वाढते.

प्राचीन काळात फ्रिफ्ज किंवा आधुनिक शीतकरणाची सुविधा नसल्यामुळे या आजारांपासून बचाव करण्यासाठी मांसाहार बंद केला जात होता. मान्सूनदरम्यान पचनक्षमता कमकुवत होत असल्याने आरोग्य तज्ज्ञदेखील ताजा, हलका आणि सहज पचणारा आहार घेण्याचा सल्ला देतात.

डोळ्यांतून वारंवार पाणी

अनेकांना अधूनमधून डोळ्यांतून पाणी येण्याची समस्या जाणवते. धूळ, धूर, तेजस्वी प्रकाश, थंड किंवा वेगवान हवा तसेच डोळ्यांत एखादी वस्तू गेल्यानेही डोळ्यांतून पाणी येऊ शकते. डोळ्यांमध्ये होणारी जळजळ किंवा थकवा यामुळेही अश्रू येऊ शकतात. काही वेळा डोळ्यांची स्वतःला स्वच्छ ठेवण्याची ही नैसर्गिक प्रक्रिया असते. मात्र, डोळ्यांतून वारंवार किंवा सतत पाणी येत असेल तर त्यामागे अन्य कारणेही असू शकतात. डोळे कोरडे पडणे अर्थात ड्राय आय सिंड्रोम हे त्यापैकी एक कारण आहे. डोळ्यांमध्ये पुरेशी आर्द्रता नसल्यामुळे जळजळ निर्माण होऊ शकते आणि त्याला प्रतिसाद म्हणून डोळ्यांतून अधिक अश्रू येऊ शकतात. ॲलर्जी, सायनसची समस्या आणि डोळ्यांमध्ये झालेला संसर्ग यामुळेही डोळ्यांतून जास्त पाणी येऊ शकते.

याशिवाय पापण्यांची सूज, पापणी आत किंवा बाहेर वळणे किंवा पापणीवरील केस डोळ्याला घासणे यामुळेही ही समस्या निर्माण होऊ शकते. काही लोकांमध्ये अश्रू बाहेर जाणाऱ्या नलिकेत अडथळा निर्माण



झाल्यामुळे अश्रू व्यवस्थित बाहेर पडत नाहीत आणि ते डोळ्यांत साचून बाहेर येतात. डोळ्याला झालेली दुखापत, काही औषधांचा परिणाम किंवा विशिष्ट वैद्यकीय उपचारांदरम्यानही ही समस्या उद्भवू शकते. डोळ्यांतून पाणी येण्याची समस्या वारंवार होत असेल किंवा अनेक दिवस कायम राहत असेल तर नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घेणे योग्य ठरते. डोळ्यांतून पाणी येण्यासोबत तीव्र वेदना, जास्त लालसरपणा, सूज, धुसर दिसणे किंवा प्रकाश सहन न होणे अशी लक्षणे दिसत असतील तर वैद्यकीय तपासणी करून घेणे आवश्यक आहे. डोळ्याला दुखापत झाल्यानंतर सतत पाणी येत असेल, डोळ्यांतून चिकट पदार्थ बाहेर पडत असेल किंवा डोळा उघडण्यास त्रास होत असेल, तरीही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. वैद्यकीय सल्ल्याशिवाय कोणतेही आय ड्रॉप किंवा औषध डोळ्यांत टाकणे टाळावे.

अति तिखट आरोग्यासाठी घातक

आपल्याकडे आजही अनेक घरांमध्ये जेवणात तिखट आणि मसालेदार पदार्थांना विशेष महत्त्व आहे. मिरची आणि विविध मसाल्यांमुळे पदार्थांची चव आणि सुगंध वाढतो. मात्र, अतिप्रमाणात तिखट पदार्थ खाल्ल्यास काही लोकांना आरोग्याशी संबंधित त्रास होऊ शकतात. विशेषतः पचनसंस्था संवेदनशील असलेल्या व्यक्तींनी तिखट पदार्थांचे सेवन करताना काळजी घेणे गरजेचे आहे.

मिरचीच्या तिखटपणासाठी प्रामुख्याने कॅप्साइसिन हे घटक कारणीभूत असते. मिरची खाल्ल्यानंतर हे शरीरातील काही

रिसेप्टर्स सक्रिय करते. त्यामुळे तोंड आणि घशात उष्णता किंवा जळजळ जाणवू शकते. मात्र, प्रत्येक व्यक्तीची तिखट पदार्थ सहन करण्याची क्षमता वेगवेगळी असते.अतिप्रमाणात मिरची किंवा तिखट मसाले खाल्ल्याने काही व्यक्तींना पोटात जळजळ, पोटदुखी किंवा अस्वस्थता जाणवू शकते. तिखट पदार्थांमुळे छातीत जळजळ आणि ॲसिडची समस्या वाढण्याची शक्यता असते.जास्त तिखट पदार्थांचा आतड्यांवरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे काही लोकांना जुलाब किंवा पोट बिघडण्याचा त्रास होऊ शकतो. ज्यांचे पोट आधीपासून संवेदनशील आहे, त्यांना हा त्रास अधिक जाणवू शकतो.

तिखट पदार्थ पूर्णपणे टाळण्याची गरज प्रत्येकाला नसते. मात्र, आपल्या शरीराची सहनशक्ती लक्षात घेऊन मिरचीचे प्रमाण ठरवणे महत्त्वाचे आहे. एकाच वेळी अतितिखट पदार्थ खाणे टाळावे. हॉट सॉस आणि पॅकेज्ड मसाल्यांचा वापरही मर्यादित ठेवणे योग्य ठरते. मिरची खाल्लया नंतर वारंवार पोट दुखी, जळजळ, ॲसिड रिफ्लक्स किंवा जुलाब होत असल्यास तिखट पदार्थांचे प्रमाण कमी करावे. त्रास वारंवार होत असेल किंवा वाढत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

इंटरनेटवर का वाढलंय ब्लू टी चं फॅड

वाढते वजन आणि पोटावरील अतिरिक्त चरबी ही जगभरातील कोट्यवधी लोकांसाठी एक मोठी आरोग्य समस्या बनली आहे. चुकीची जीवनशैली, आहारातील अनियमितता, बैठ्या कामाचे स्वरूप आणि ताणतणाव यांमुळे लठ्ठपणाचे प्रमाण दिवसेंदिवस वेगाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, वजन कमी करण्यासाठी आणि चरबी जाळण्यासाठी (ऋरीं ईीपळपस) बाजारात अनेक प्रकारचे हर्बल चहा, डिटॉक्स ड्रिंक्स आणि नवनवीन पेये सातत्याने प्रसिद्धीच्या झोतात येत असतात. गेल्या काही काळात 'ब्लू पी टी' (इश्रीश झशर ढशर) अर्थात 'बटरफ्लाय पी टी' किंवा मराठीत 'गोकर्णाच्या फुलांचा चहा' या पेयाने आरोग्य विश्वात आणि सोशल मीडियावर लोकांचे प्रचंड लक्ष वेधून घेतले आहे. उश्रळीीलर ींशीपरींशर या वनस्पतीच्या आकर्षक निळ्या रंगाच्या फुलांपासून बनवला जाणारा हा चहा केवळ दिसायलाच सुंदर नसून, वजन कमी करणे, रक्तातील साखर नियंत्रित ठेवणे आणि शरीरातील डिटॉक्सिफिकेशन करणे यांसारख्या अनेक दाव्यांमुळे प्रचंड लोकप्रिय होत आहे.

परंतु, कोणताही हर्बल चहा खरोखरच शरीरातील चरबी थेट जाळू शकतो का, यामागे काही शास्त्रीय आधार आहे की हा केवळ एक प्रचार आहे, हे समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. बऱ्याचदा लोक वजन कमी करण्याच्या घाईत कोणत्याही एका पेयावर किंवा आहारावर आंधळेपणाने विश्वास ठेवतात आणि मूळ जीवनशैलीतील बदलांकडे दुर्लक्ष करतात. आरोग्याच्या दृष्टीने विचार केल्यास, वजन व्यवस्थापन ही एक निरंतर आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे, जी केवळ एका घटकावर अवलंबून राहू शकत नाही. म्हणूनच, गोकर्णाच्या फुलांचा हा निळा चहा शरीरावर नेमका कसा परिणाम करतो, यामुळे वजन कमी होण्यास खरोखर मदत होते का, रक्तातील साखरेवर याचा काय परिणाम होतो आणि तो बनवण्याची योग्य पद्धत कोणती, या सर्व प्रश्नांचा सविस्तर आणि शास्त्रीय आढावा घेणे अत्यंत गरजेचे ठरते.

सध्या उपलब्ध असलेल्या वैज्ञानिक संशोधनानुसार, ब्लू पी टी प्यायल्याने शरीरातील चरबी थेट जळत किंवा वेगाने वजन कमी होते, असा कोणताही मजबूत किंवा ठोस पुरावा उपलब्ध नाही.

अँटीऑक्सिडंट्सची भूमिका : गोकर्णाच्या फुलांमध्ये 'एंथोसायनिन्स' नावाचे नैसर्गिक अँटीऑक्सिडंट्स आढळतात. परंतु, मानवी शरीरातील वजन किंवा चरबीच्या चयापचयावर त्यांचा कोणताही लक्षणीय आणि थेट परिणाम होतो का, हे सिद्ध करण्यासाठी अजून मोठ्या प्रमाणावर मानवी संशोधनाची गरज आहे.

कॅलरी–मुक्त पर्याय : जर तुम्ही साखर न घालता ब्लू पी टी पिल्यास हा चहा पूर्णपणे कॅलरी–मुक्त असतो. साखरेच्या गोड पेयांच्या जागी (उदा. कोल्ड ड्रिंक्स, पॅक केलेले ज्यूस, गोड चहा/कॉफी) या चहाचा वापर केल्यास दैनंदिन कॅलरीजचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे कालांतराने वजन नियंत्रणात राहण्यास अप्रत्यक्ष मदत होते.

जेवल्यानंतर चालणे गरजेचे

अनेकजण जेवण झाल्यानंतर लगेच बसतात किंवा झोपतात. विशेषतः रात्रीचे जेवण झाल्यानंतर आराम करण्याची सवय अनेकांना असते. मात्र, जेवल्यानंतर काही वेळ हलके चालणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते. यामुळे पचनक्रिया सुरळीत होण्यासोबतच रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यासही मदत होऊ शकते.



जेवण केल्यानंतर शरीरात पचनाची प्रक्रिया सुरू होते. यावेळी शरीरात अनेक बदल घडतात. अशा वेळी बराच वेळ एकाच जागी बसून राहिल्यास किंवा लगेच झोपल्यास काही लोकांना पोट जड होणे, गॅस, पोट फुगणे किंवा अस्वस्थ वाटणे अशा समस्या जाणवू शकतात. जेवल्यानंतर हलके चालल्याने शरीराची हालचाल वाढते. त्यामुळे पोट आणि आतड्यांमधून अन्न पुढे जाण्यास मदत होऊ शकते. परिणामी पचनक्रिया सुधारण्यासोबतच गॅस, पोट फुगणे आणि ढेकर येण्यासारख्या समस्या कमी होण्यास मदत होऊ शकते.

जेवल्यानंतर चालण्याचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत होऊ शकते. चालताना स्नायू ग्लुकोजचा वापर करतात. त्यामुळे विशेषतः रक्तातील साखरेशी संबंधित समस्या असलेल्या व्यक्तींना जेवणानंतरचा वॉक फायदेशीर ठरतो. याशिवाय नियमित चालण्यामुळे रक्तदाब आणि हृदयाच्या आरोग्यालाही फायदा होऊ शकतो. शारीरिक हालचालींमुळे कॅलरी खर्च होतात, त्यामुळे वजन नियंत्रणात ठेवण्यासही मदत मिळू शकते.

जेवण झाल्यानंतर साधारण १० ते ३० मिनिटांच्या आत हलक्या किंवा मध्यम वेगाने चालण्यास सुरुवात करता येते.

सुरुवातीला १० मिनिटांची हलकी वॉक पुरेसा आहे. जेवण झाल्यानंतर लगेच वेगाने चालणे किंवा जोरदार व्यायाम करणे टाळावे. सुरुवात नेहमी संथ गतीने करावी आणि शरीराला होणारा त्रास लक्षात घ्यावा.

उत्तम आरोग्यासाठी पाणी महत्वाचे

शरीरातील प्रत्येक पेशी, ऊती आणि अवयवांच्या योग्य कार्यासाठी पाणी आवश्यक आहे. शरीराचे तापमान नियंत्रित ठेवणे, पोषक घटक शरीराच्या विविध भागांपर्यंत पोहोचवणे आणि शरीरातील अनावश्यक पदार्थ बाहेर टाकणे यामध्ये पाण्याची महत्त्वाची भूमिका असते. दिवसभर श्वास घेणे, घाम येणे, लघवी आणि मलविसर्जन यामुळे शरीरातील पाणी कमी होत असते. त्याची भरपाई न झाल्यास डिहायड्रेशन म्हणजेच शरीरात पाण्याची कमतरता होऊ शकते.दिलेल्या माहितीनुसार, एका निरोगी प्रौढ व्यक्तीला दिवसभरात एकूण २.७ ते ३.७ लिटर फ्लुइडची गरज असू शकते. मात्र, यामध्ये केवळ पाणीच नाही तर दूध, चहा, कॉफी, इतर पेये आणि अन्नातून मिळणाया पाण्याचाही समावेश होतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने दररोज ३ ते ४ लिटर पाणीच प्यावे.

१४ दिवस साखर सोडून पाहा

साखर म्हणजे प्रत्येक अन्नपदार्थाचा अविभाज्य भाग झाली आहे. पण, तुम्हाला माहिती आहे का फक्त १४ दिवस साखर पूर्णपणे सोडली तरी शरीरात आश्चर्यकारक बदल घडतात? अमेरिकेतील प्रसिद्ध आरोग्यतज्ज्ञ डॉ. एरिक बर्ग यांच्या मते, अगदी अल्पकाळासाठी 'शुगर डिटॉक्स' केल्याने शरीर, त्वचा आणि मेंदूवर विलक्षण परिणाम दिसू लागतात. हे फक्त मिठाई किंवा डेझर्ट्स टाळण्याबद्दल नाही, कारण नाश्त्याचे सीरियल, फळांचे ज्यूस, बिस्किटं, सॉस, पांढरा ब्रेड, दही, मसाला ओट्स आणि अगदी काही नमकीन पदार्थांमध्येही साखर लपलेली असते. चला पाहूया फक्त दोन आठवड्यांत साखर सोडल्यावर शरीरात नेमकं काय घडतंष

साखर बंद केल्यावर शरीरात काय घडतं?

१. मेंदूतील 'क्रेविंग मॉन्स्टर' शांत होतो

साखर खाल्ल्यावर मेंदूत डोपामाइन नावाचं 'फील–गुड' केमिकल झपाट्याने वाढतं, म्हणूनच ती व्यसनासारखी वाटते. पण, फक्त दोन आठवडे साखर बंद केली की डोपामाइन रिसेप्टर्स स्थिर व्हायला लागतात, त्यामुळे गोड खाण्याची तीव्र इच्छा कमी होते, म्हणजे मन मजबूत झालं म्हणून नाही तर मेंदूच शांत होतो.

२. वारंवार भूक लागणं थांबतं

साखर खाल्ल्यानंतर इन्सुलिन वारंवार वाढतं आणि त्यामुळे शरीराला वारंवार भूक लागते. पण, साखर बंद केली की इन्सुलिनची पातळी संतुलित होते, शरीर जास्त वेळ ऊर्जावान राहतं आणि नाश्त्यानंतर थेट दुपारपर्यंत भूक लागत नाही.

३. ऊर्जा होते नैसर्गिक आणि टिकाऊ

साखरेमुळे मिळणारी ऊर्जा अल्पकाळ टिकते आणि नंतर अचानक कमी होते. पण, जेव्हा साखर सोडली जाते तेव्हा शरीर चरबी जाळून ऊर्जा निर्माण करायला शिकतं, जी अधिक स्थिर आणि दीर्घकाळ टिकणारी असते. दुपारच्या झोपेचा कंटाळा कमी होतो आणि दिवसभर उत्साह टिकतो.

४. वजन कमी होऊ लागतं, तेही न खाता त्रास न होता

डॉ. बर्ग सांगतात की, साखरेमुळे शरीरात पाणी धरलं जातं, त्यामुळे साखर सोडल्यावर सर्वात आधी ब्लोटिंग म्हणजे सूज कमी होते. इन्सुलिन कमी झाल्याने फॅट बर्निंग सुरू होतं, विशेषतः कंबरेभोवतीचा चरबीचा थर घटतो. भूक स्थिर राहिल्याने वजन आपोआप कमी होतं, डाएटिंगची गरजच राहत नाही.

५. त्वचा बनते तेजस्वी, जणू काही स्पा ट्रीटमेंट घेतल्यासारखी

साखर कोलेजन नष्ट करते आणि त्वचेवर ग्लायकेशन नावाची प्रक्रिया घडवते, ज्यामुळे चेहरा निस्तेज, कोरडा आणि वृद्ध दिसू लागतो. पण, साखर सोडल्यावर त्वचेचं दुरुस्तीचं काम सुरू होतं. दोन आठवड्यांत पिंपल्स कमी होतात, डोळ्यांखालील सूज कमी होते आणि चेई?यावर नैसर्गिक उजळपणा दिसू लागतो.

६. विचार होतो अधिक स्पष्ट, मेंदूचा धूसरपणा नाहीसा

साखरेमुळे येणाया शुगर क्रॅशमुळे अनेकांना 'ब्रेन फॉग' म्हणजे विचारांमध्ये धुसरपणा जाणवतो.

पण, साखर बंद केल्यावर मेंदूला चरबीपासून तयार होणारी केटोन ऊर्जा मिळते, त्यामुळे लक्ष केंद्रित होतं, स्मरणशक्ती सुधारते आणि मूड स्विंग्स कमी होतात.

७. शरीरातील सूज, वेदना आणि थकवा कमी होतो

साखर म्हणजे इन्फ्लेमेशनचं प्रमुख कारण. ती संधिवात, त्वचेवरील पुरळ आणि अंगदुखी वाढवते. पण, साखर टाळल्यावर रक्तातील सूज निर्माण करणारे घटक कमी होतात.

फक्त दोन आठवड्यांत डोकेदुखी, सांधेदुखी आणि सूज कमी झाल्याची जाणीव अनेकांना होते; जणू शरीरात एक नवीन शांतता निर्माण झाल्यासारखं वाटतं.

थोडक्यात सांगायचं तर साखर सोडणं म्हणजे शिक्षा नाही, तर शरीराला दिलेली सर्वांत मोठी भेट आहे. फक्त दोन आठवडे स्वतःवर प्रयोग करा आणि बदल स्वतः अनुभवा.

पदार्थ फ्रीजमध्ये ठेवत असाल तर सावधान..!

शिजवलेले, उरलेले अन्न खराब होण्यापासून वाचवणे, भाजीपाला आणि फळे दीर्घकाळ ताजी ठेवणे तसेच दुग्धजन्य पदार्थ सुरक्षित ठेवण्यासाठी आपण सर्रास फ्रीजचा वापर करतो. रेफ्रिजरेशनमुळे अन्नातील जीवाणूंची वाढ मंदावते आणि अन्नपदार्थांचे आयुष्य वाढण्यास मदत होते, यात शंका नाही. परंतु, अनेक लोकांचा असा गैरसमज असतो की एकदा अन्न फ्रीजमध्ये ठेवले की ते कायमस्वरूपी सुरक्षित राहते आणि कधीही खाण्यायोग्य असते. वास्तवात, फ्रीजमध्ये अन्न ठेवल्याने ते कायमस्वरूपी सुरक्षित राहत नाही. जर अन्न योग्य पद्धतीने झाकून ठेवले नाही, खूप दिवस फ्रीजमध्ये पडून राहिले, त्याच्या साठवणुकीचे तापमान योग्य नसेल किंवा वारंवार फ्रीजचे दार उघडझाप केल्याने तापमानात बदल होत राहिले, तर फ्रीजमधील अन्नसुद्धा दूषित होऊन विषबाधेसकारणीभूत ठरू शकते. अन्न फक्त फ्रीजमध्ये ठेवणे पुरेसे नसते, तर ते योग्य तापमानाला ठेवणे, कच्चे आणि शिजवलेले अन्न वेगळे ठेवणे आणि ठराविक मुदतीतच त्याचे सेवन करणे अत्यंत आवश्यक असते.

लोकसभेने नुकताच कर आकारणी आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६ मंजूर करताना देयक आणि निपटारा प्रणाली कायद्यात बदल करण्याचा प्रस्ताव स्वीकारला आहे. या बदलामुळे केंद्र सरकारला कोणते इलेक्ट्रॉनिक व्यवहार विनामूल्य ठेवायचे आणि कोणत्या व्यवहारांवर शुल्क आकारता येईल, याबाबत निर्णय घेण्याची अधिक मुभा मिळणार आहे. येणा-या काळात यूपीआय व्यवहारांवर शुल्कआकारणी केली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सरकार भलेही हे शुल्क व्यापा-यांना लागू असेल असे म्हणत आहे; पण अप्रत्यक्षपणे त्याचा भार ग्राहकांवरच टाकला जाईल हे निश्चित आहे.

'यूपीआय'चा संशयकल्लोळ

लोकसभेने नुकताच कर आकारणी आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६ मंजूर करताना देयक आणि निपटारा प्रणाली कायद्यात बदल करण्याचा प्रस्ताव स्वीकारला आहे. या बदलामुळे केंद्र सरकारला कोणते इलेक्ट्रॉनिक व्यवहार विनामूल्य ठेवायचे आणि कोणत्या व्यवहारांवर शुल्क आकारता येईल, याबाबत निर्णय घेण्याची अधिक मुभा मिळणार आहे. येणा–या काळात यूपीआय व्यवहारांवर शुल्कआकारणी केली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सरकार भलेही हे शुल्क व्यापा–यांना लागू असेल असे म्हणत आहे; पण अप्रत्यक्षपणे त्याचा भार ग्राहकांवरच टाकला जाईल हे निश्चित आहे.

सुलभ, वेगवान आणि विनाशुल्क आर्थिक व्यवहार करण्याची सुविधा देत युनिफाईड पेमेंट इंटरफेस म्हणजेच यूपीआयने देशातील आर्थिक व्यवहारांची पद्धतच बदलून टाकली. छोट्या दुकानदारांपासून मोठ्या उद्योगांपर्यंत आणि शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत त्याचा विस्तार झाला. डिजिटल इंडियाच्या यशाचे उदाहरण म्हणून यूपीआयचे उदाहरण केंद्र सरकारमधील सर्व मंत्रीगण, पंतप्रधान आणि भाजपशासित राज्यातील सरकारे, समर्थक सातत्याने करतच असतात. पण आता यूपीआय आणि रुपेच्या काही व्यवहारांवर शुल्क आकारण्याचा मार्ग मोकळा करणा?या कायद्यातील बदलामुळे काही प्रश्न निर्माण झाले असून त्यांची समर्पक उत्तरे नेहमीप्रमाणे सरकारकडून मिळत नाहीयेत. मुळात, ज्या व्यवस्थेचे यश सरकार अभिमानाने सांगत आले, तिच्या मूलभूत वैशिष्ट्यांमध्ये बदल करण्याची गरज का निर्माण झाली, हा यातील कळीचा प्रश्न आहे.

शाश्वततेचा प्रश्न की धोरणातील विसंगती?

यूपीआयचे व्यवहार ग्राहक आणि व्यापा?यांसाठी विनाशुल्क असले तरी त्यामागील व्यवस्था विनाखर्च चालत नाही. बँका, भारतीय राष्ट्रीय देयक महामंडळ, देयक सेवा पुरवठादार आणि इतर संस्थांना तंत्रज्ञान, सुरक्षा, सर्व्हर, देखभाल आणि विस्तारासाठी मोठा खर्च करावा लागतो. पण यूपीआयची व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी सरकार दरवर्षी बँकांना मोठ्या प्रमाणावर म्हणजेच २००० कोटी रुपयांची आर्थिक मदत देत आहे. अशा परिस्थितीत बँकांना व्यवहारांवर शुल्क आकारण्याचा अधिकार देण्यामागील आर्थिक तर्क स्पष्टपणे समोर येणे आवश्यक आहे. सरकारच्या अनुदानातून ही व्यवस्था चालवायची आणि त्याच वेळी त्याच व्यवहारांवर शुल्क आकारण्याची मुभा द्यायची, या दोन्ही बाबींचा समन्वय कसा साधला जाणार, याचे समाधानकारक उत्तर सरकारने देणे गरजेचे आहे. उद्योगांच्या मते प्रत्यक्ष खर्च सरकारी अनुदानापेक्षा मोठा आहे. मात्र त्याचे उत्तर थेट शुल्कव्यवस्था निर्माण करण्यातच आहे, असे मानणे घाईचे ठरेल. कारण यूपीआयची लोकप्रियता मोठ्या प्रमाणावर 'विनाशुल्क व्यवहार' या वैशिष्ट्यावर उभी आहे. हीच बाब बदलली, तर त्याच्या वापरावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

सद्यस्थितीत दोन हजार रुपयांपेक्षा अधिक व्यवहार एकूण व्यवहारसंख्येच्या केवळ ४ ते ५ टक्के असले, तरी व्यवहारमूल्याच्या सुमारे ७० टक्के हिस्सा त्यांचा आहे. त्यामुळे छोट्या व्यवहारांना स्पर्श न करता मोठ्या व्यवहारांवर शुल्क लावण्याची कल्पना विचारात घेता येऊ शकते. परंतु ही व्यवस्था प्रत्यक्षात कशी राबविली जाईल, हा अधिक महत्त्वाचा मुद्दा आहे.

यूपीआय व्यवहारांवरील शुल्काचा विषय प्रामुख्याने मर्चंट डिस्काऊंट रेट म्हणजेच एमडीआरभोवती फिरतो. हा असा महसूल असतो जो व्यापारी डिजिटल व्यवहार सुलभतेने पार पाडण्यासाठी बँका किंवा पेमेंट कंपन्यांना देतात. सध्या हा दर शून्य असल्यामुळे लहान दुकानदारांपासून ते मोठ्या ग्राहकांपर्यंत सर्वांनीच डिजिटल व्यवहारांचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार केला आहे.

परग्रहावरील वनस्पती हिरव्याच असतील का?

उत्क्रांतीच्या नियमानुसार जीव आपल्या पर्यावरणाशी जुळवून घेतात. त्यानुसारच दुस–या ग्रहावर जीवन उत्क्रांत झाले तर त्याची रचना आणि रंग पृथ्वीवरील जीवनापेक्षा अगदी वेगळे असू शकतात. पृथ्वीवर नजर टाकली की, आपल्याला सर्वत्र हिरवा रंग दिसतो. झाडांची पाने, गवत, शेवाळ आणि असंख्य वनस्पती! या हिरव्या रंगामागे आहे हरितद्रव्य, जे सूर्यप्रकाशातील ऊर्जा वापरून प्रकाश संश्लेषण प्रक्रियेद्वारे तयार होते. त्यामुळे आपल्या मनात सहज प्रश्न येतो, जर विश्वातील एखाद्या ग्रहावर वनस्पतींसारखे जीव असतील, तर तेही हिरवेच असतील का? खगोलजीवशास्त्रातील संशोधन सांगते की, असे असणे आवश्यक नाही. परग्रहावरील जीवनाचा रंग तेथील तारा आणि त्याच्या प्रकाशावर अवलंबून असू शकतो.

पृथ्वीवरील वनस्पती सूर्याच्या प्रकाशातील लाल आणि निळ्या तरंगलांबींची ऊर्जा मोठ्या प्रमाणावर शोषून घेतात, तर हिरवा प्रकाश तुलनेने अधिक परावर्तित करतात. म्हणून पाने आपल्याला हिरवी दिसतात, पण परग्रहावरील जीवनाला मिळणारा प्रकाश पृथ्वीवरील सूर्यप्रकाशासारखाच असेल याची खात्री नाही.

विश्वातील अनेक तारे सूर्यापेक्षा वेगळे आहेत. काही तारे अधिक उष्ण आणि निळसर प्रकाश देतात, तर काही तुलनेने थंड असून लाल किंवा अवरक्त किरणे अधिक प्रमाणात उत्सर्जित करतात. विशेषत लाल बटू तारे विश्वात अत्यंत सामान्य आहेत. त्यांच्याभोवती फिरणा–या ग्रहांवर जीवनासाठी योग्य परिस्थिती असेल, तर तेथील प्रकाश संश्लेषण करणा–या जिवांना उपलब्ध होणारी ऊर्जा पृथ्वीपेक्षा वेगळी असेल.

अशा परिस्थितीत तेथील जिवांना प्रकाश शोषण्यासाठी वेगवेगळ्या रंगद्रव्यांची आवश्यकता भासू शकते. उदाहरणार्थ, लाल किंवा अवरक्त प्रकाश अधिक उपलब्ध असेल, तर तेथील प्रकाश संश्लेषण करणा–या जिवांमध्ये त्या तरंगलांबींचे विकिरण शोषून घेणारी रंगद्रव्ये विकसित होऊ शकतात. त्यामुळे त्यांच्या

पृष्ठभागाचा रंग जांभळा, लाल, तपकिरी किंवा अगदी काळसर दिसण्याची शक्यता सैद्धांतिक दृष्ट्या नाकारता येत नाही.

यामागे उर्त्वांफांतीचा साधा नियम काम करतो. जीव आपल्या पर्यावरणाशी जुळवून घेतात. पृथ्वीवरही प्रकाश संश्लेषण करणारे सर्व जीव हिरवे नाहीत. काही शैवाल आणि सूक्ष्मजीव लाल, तपकिरी किंवा जांभळ्या रंगाचे असतात. त्यांच्या रंगामागे वेगवेगळी प्रकाशशोषक रंगद्रव्ये असतात. त्यामुळे दुसया ग्रहावर जीवन उत्क्रांत झाले तर त्याची रचना आणि रंग पृथ्वीवरील जीवनापेक्षा अगदी वेगळे असू शकतात.याहूनही महत्त्वाचे म्हणजे खगोलशास्त्रज्ञ आता परग्रहांवर जीवन शोधताना केवळ पाणी किंवा वातावरणातील वायूंचाच शोध घेत नाहीत. एखाद्या ग्रहाच्या पृष्ठभागावर मोठ्या प्रमाणावर प्रकाश संश्लेषण करणारे जीव असतील, तर त्यांच्या रंगद्रव्यांमुळे ग्रहाच्या परावर्तित प्रकाशात विशिष्टबदल दिसू शकतो. पृथ्वीवरील वनस्पतींच्या बाबतीत 'रेड एज' म्हणून ओळखला जाणारा एक प्रकाशीय संकेत दिसून येतो. भविष्यातील अधिक शक्तिशाली दुर्बिणी अशा वैशिष्ट्यांचा दूरून शोध घेऊ शकतील.

मात्र येथे एक मोठे आव्हान आहे. एखाद्या ग्रहाचा रंग पाहून तेथे जीवन आहे, असा थेट निष्कर्ष काढता येणार नाही. खनिजे, वातावरणातील रासायनिक प्रक्रिया किंवा इतर निर्जीव घटकही विशिष्ट रंग निर्माण करू शकतात. त्यामुळे संभाव्य जीवनाचा पुरावा मिळवण्यासाठी प्रकाशातील संकेतांसोबत वातावरणाची रासायनिक रचना, ग्रहाचे तापमान आणि त्याची इतर वैशिष्ट्ये यांचाही अभ्यास करावा लागेल.भविष्यात एखाद्या दूरच्या ग्रहाच्या प्रकाशात वैज्ञानिकांना हिरव्या नव्हे तर जांभळ्या किंवा गडद लाल रंगाची विशिष्ट खूण दिसली आणि त्यासोबत जीवनाशी संबंधित रासायनिक संकेतही आढळलेत अशी कल्पना करा! तो क्षण मानवाच्या इतिहासातील सर्वात मोठ्या शोधांपैकी एक ठरेल.

म्हणून परग्रहावरील वनस्पती हिरव्याच असतील, असे मानण्याचे कोणतेही वैज्ञानिक कारण नाही. हिरवा रंग हा जीवनाचा नियम नाही, तो पृथ्वीवरील उत्क्रांतीचा एक परिणाम आहे. विश्वातील वेगळ्या ता?यांच्या प्रकाशाखाली जीवनाने वेगळे रंग, वेगळी रसायने आणि कदाचित आपल्या कल्पनेपलीकडील जैविक रूपे धारण केली असतील.

कदाचित भविष्यातील दुर्बिणी आपल्याला दूरच्या जगांकडे पाहताना एक असा रंग दाखवतील, जो आजपर्यंत मानवाने कधीही पाहिलेला नाही आणि त्या रंगामागे परग्रहावरील जीवनाची पहिली खूण दडलेली असेल. त्यामुळे त्यांचा रंग हा केवळ सौंदर्याचा विषय नसून, त्या ग्रहाचे वातावरण, तायाचा प्रकाश आणि तेथील जीवनाच्या उत्क्रांतीचा महत्त्वाचा संकेत ठरू शकतो.

बर्नआऊट सिंड्रोम

बर्नआऊट सिंड्रोम ही ताणतणावामुळे येणारी मानसिक अवस्था विशेषत स्वभावाने अतिसंवेदनशील असणा–या, परिपूर्णतेचा ध्यास असणा–या व तशी इतरांकडून अपेक्षा असणा–या व्यक्तींना भेडसावणारी ही समस्या आहे. जी समुपदेशनातून नक्कीच सावरता येते.सीमा (नाव बदलले आहे) सकाळचे नऊ वाजून गेले तरी अजून अंथरूणातच होती. आई तिला हाका मारून मारून थकली होती आणि वैतागत किचनमध्ये तिचा ऑफिसचा डबा बनवायला गेली. 'सीमा, आता मी पंखा बंद करीन हं'' आईने निकराचं सांगितल्यावरही सीमा तशीच आळसावल्यासारखी होती. 'अगं, उठ आता. साडेनऊला तू निघतेस.''

गेल्या तीनेक महिन्यांपासून सीमाला ऑफिसचा भयंकर 'नोशिया' आल्यासारखं झालं होतं. 'मी स्वतः सिलेक्ट केलेली कंपनी, मनासारखा जॉब, पगारही वाईट नाही, पणष्ठ मला हल्ली ऑफिसचा विषय जरी डोक्यात आला तरी डोकं गरगरायला लागतं. ऑफिसचा रस्ता दिसायला लागला तर आपसूकच डोळे ओले होतात. जड जड वाटायला लागतं. कशीतरी मी स्वतला बजावत तिथे पोहोचते.''

सीमा समुपदेशनाला आल्यावर तिची समस्या सांगत होती. तिचं खाणं–पिणं आणि झोपेचं चक्र या तिच्या समस्यांमुळे अनियमित झालेलं होतं. त्यातच तिच्या मासिक पाळीचं चक्रही अनियमित होत असल्याने सीमा अजूनच ताणात होती. तिच्या समस्यांविषयी बोलताना कळलं की, एकप्रकारची नकारात्मकता तिला व्यापून गेली होती. त्यामुळे सीमाचा आत्मविश्वास तर गेलेला होताच शिवाय 'मी काहीही करू शकत नाही' हे कुठेतरी मनात बसून राहिलं होतं.

सीमाच्या या अवस्थेचं एक कारण म्हणजे तिच्या नोकरीमध्ये काही महिन्यांपासून बरेच बदल झालेले होते. त्यामुळे कामाचा एकंदर वाढता ताण तिला आला होताच, शिवाय वरिष्ठांबरोबर झालेल्या गैरसमजामुळे सीमाला ऑफिसमध्ये बरीच बोलणी, अपमान सहन करावा लागत होता जो तिला आता असह्य झालेला होता. तिच्या कार्यपद्धतीवर, क्षमतेवर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यामुळे तिला तो अपमान असह्य झाला आणि ती 'बर्नआऊट सिंड्रोम' या अवस्थेत गेली.

आता बर्नआऊट सिंड्रोम सोप्या शब्दांत सांगायचा झाला तर नोकरीच्या ठिकाणी येणारा ताण, जो बराच काळ व्यक्ती अनुभवत असते. ज्यामुळे तिला स्वतबद्दल तसेच नोकरीबद्दल नकारात्मकता येते आणि ती ते ठिकाण टाळायचा प्रयत्न करते. ज्यामध्ये व्यक्तीला तिला देण्यात आलेले काम हे ओझे वाटायला लागते. ही अवस्था म्हणजे मानसिक आजार नाही तर ती कामाच्या ठिकाणी असलेली मानसिक समस्या आहे, ज्यामध्ये समुपदेशनाच्या तसेच काही गंभीर केसेसमध्ये मानसोपचार उपलब्ध आहेत.

बर्नआऊट सिंड्रोम ही मानसिक अवस्था जशी नोकरीच्या ठिकाणी असलेल्या ताणामुळे होते ती सगळ्यांनाच अनुभवायला येते असं नाही. ज्या व्यक्ती स्वभावाने अतिसंवेदनशील असतात, ज्यांना परिपूर्णतेचा ध्यास असतो, त्या व्यक्तींना ही समस्या भेडसावू शकते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे असं बघितलं गेलेलं आहे की, या व्यक्ती कामाच्या ठिकाणी ब–याचदा एकटय़ाच असतात. इतरांशी असलेला दुरावा, एकलकोंडेपणा, कामात अति गढून जाणं, स्वतबद्दल कठोर असणं, बरेचसे अतार्किक विचार (माझी क्षमता दुस–याने वाखाणली पाहिजेच नाहीतर मी कमी आहे, मी जर काम वेळेत पूर्ण नाही केलं तर मी जबाबदार व्यक्ती नाही, माझ्यासाठी माझं काम हीच माझी ओळख आहे) यामुळेही या व्यक्ती या अवस्थेत जाऊ शकतात.

'जेन-झी'ची भाषा आणि मराठी

नुकतंच 'जंतर मंतर'वर 'जेन–झी'चं आंदोलन झालं. त्याचे पडसाद इतर राज्यांत, शहरांतही उमटले. ठिकठिकाणी झालेल्या या आंदोलनांत 'जेन–झी'ची पोलिसांना सामोरं जाण्याची, त्यांना प्रत्युत्तर देण्याची पद्धत, घोषणा अगदी अनोख्या होत्या. मुंबईत आंदोलकांना घेऊन जाणाऱ्या पोलिसांच्या गाडीसमोरच उभी राहणारी धीट मुलगी असो वा पुण्यात पोलिसांना 'लव यू' म्हणणारी किंवा बिहारमध्ये 'टीअर गॅस की व्यवस्था नहीं क्या?' असं पोलिसांनाच विचारणारी मुलं असोत; या आणि अशा वेगवेगळ्या पद्धतींनी 'जेन–झी'ने पोलिसांना सळो की पळो केलं.

या आंदोलनामुळे 'जेन–झी'चे काही स्लँग अत्यंत चर्चेत आले. जोश, उत्साह किंवा थट्टा करण्यासाठी वापरला जाणारा शब्दप्रयोग म्हणजे 'वास्ते गुना हुईया'. 'जेन झी'च्या स्लँगची आणखी काही उदाहरणं म्हणजे, षगी (आग) – भारी, (आजारी) (मृत) – खूप हसू आले, ग्रू (खाल्ले) – अप्रतिम केले (मारणे) – उत्पृष्ट काम करणे, (भूत) – संपर्प तोडणे. ही यादी आणखीही वाढवता येईल, पण इथं सांगायचा मुद्दा म्हणजे 'जेन–झी' वापरत असलेली हे सगळे शब्द इंग्रजीतील आहेत. या पिढीच्या वापरात असे मराठी शब्दप्रयोग – ज्याचा अर्थविस्तार किंवा अर्थपरिवर्तन झालं आहे – सहसा दिसत नाहीत.

याचं कारण 'जेन झी'तील अनेक जण इंग्रजी माध्यमात शिकलेले आहेत किंवा त्यांच्यावर इंग्रजी भाषेचा जबरदस्त प्रभाव आहे. दुसरं म्हणजे विविध समाज माध्यमांच्या प्रभावातून असे शब्दप्रयोग जगभरची 'जेन–झी' वापरत आहे.

या पिढीने असे शब्दप्रयोग मराठी भाषेतही करावेत असं वाटत असेल तर मराठी शाळा टिकायला हव्यात आणि पालकांनी आपल्या मुलांना मराठी माध्यमात शिकवायला हवं.

'जेन–झी'च्या आधीच्या पिढीने म्हणजे मिलेनियल्सने मराठीतले काही शब्द मूळ अर्थापेक्षा वेगळ्या अर्थाने वापरल्याचं दिसतं. ते शब्द म्हणजे 'लय', 'भारी', 'कडक' इ. पैकी आधीच्या 'लय भारी' या लेखात आपण 'लय' व 'भारी' या शब्दांची माहिती पाहिली होती. फिफा विश्वचषक सुरू असताना फिफाने त्यांच्या समाज माध्यमावर 'रोनाल्डोचा विषय लय हार्ड हाय' अशी पोस्ट प्रसारित केल्याचं आपल्याला आठवत असेल.

मराठीत 'कडक' शब्द तापट, प्रखर, टणक, तीव्र या अर्थाने

वापरला जातो. संस्पृतमधील 'कक्खट' शब्दांत अक्षरांत अदलाबदल होऊन आधी तो 'कटक' आणि मग 'कडक' झाला. संदर्भाने या 'कडक'च्या अर्थात कसा बदल होतो पहा : लापूड किंवा माती कडक आहे असे म्हणताना टणक हा अर्थ अभिप्रेत असतो. 'सरकार कृत्रिम उपायांनी नाणेबाजार कडक राखून ठेवते' या वाक्यात महाग (भाव, दर) असा अर्थ आहे. 'त्याचे वडील खूप कडक आहेत' इथे शिस्तीचे, तापट असा अर्थ आहे. 'त्यांची मुद्रा बरीच कडक दिसते' इथे कठोर, उग्र, रागीट असा अर्थ आहे. 'कडक भाषण', 'कडक लेख' किंवा 'कडक ऊन' या उदाहरणांमध्ये प्रखर असा अर्थ आहे. धान्य किंवा भाकरी कडक आहे म्हणजे वाळलेली, आर्द्रता नसलेली.

सणसणीत या अर्थानेही 'कडक' शब्द वापरला जातो. उदा. 'अधिका?याने त्याच्याविरुद्ध कडक रिपोर्ट लिहिला.'

लक्ष्मीच्या उग्र स्वरूपाचे सोंग घेऊन भिक्षेकरी स्वतःच्या पाटीवर आसूड ओढतो, त्याला कडकलक्ष्मी म्हटलं जातं. हा भिक्षेकरी पाठीवर आसूड ओढताना 'कडक' असा आवाज होतो, शिवाय मळवट भरलेलं त्याचं उग्र रूप यावरून त्याला 'कडकलक्ष्मी' म्हटलं गेलं असावं. एखादी स्त्री रागीट, तापट असेल तर तिलाही 'कडकलक्ष्मी' म्हटलं जातं. कडू औषध, तीव्र वासाची तपकीर, विडी, सिगरेट यांनाही 'कडक' विशेषण लावलं जातं. निकोप, दणकट माणूस किंवा जनावर यांनाही गावाकडे 'कडक' विशेषण लावण्याची पद्धत आहे.आज मराठीत, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात 'विषय लय कडक हाय'ऐवजी 'विषय लय हार्ड हाय' असं म्हटलं जातं, तेव्हा त्याचे कितीतरी अर्थ होतात.

औद्योगिकीकरणाला ब्रेक

महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये तब्बल ३६ हजारांपेक्षा जास्त उद्योगधंदे बंद झाल्याची माहिती लोकसभेच्या सभागृहातच संबंधित मंत्र्याने दिली आहे. एकीकडे देशात महाराष्ट्र सर्वात जास्त औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य आहे आणि गुंतवणूक करण्यासाठी सर्वोच्च प्राधान्य असलेले राज्य असल्याचा दावा करण्यात येत असतानाच, केंद्र सरकारने अधिकृतपणे दिलेल्या या माहितीमुळे औद्योगिकीकरणाला केवळ ब्रेक मिळाला आहे, असेच लक्षात येत नाही तर औद्योगिकीकरणाच्या तथाकथित दाव्यांचा फुगाही फुटला आहे. हा विषय राज्यातील विरोधी पक्ष जेव्हा स्वतःच्या अजेंड्याड्यावर घेतील आणि राज्य सरकारला जाब विचारतील तेव्हा अर्थात नेहमीप्रमाणे सरकारकडे काहीतरी उत्तर तयार असेलच. पण पाच वर्षांच्या कालावधीमध्ये ३६ हजार उद्योगधंदे बंद झाले आहेत, हे वास्तव मात्र नाकारता येणार नाही. ही आकडेवारी पाच वर्षांपासूनची आहे.

म्हणजेच ज्यावेळी कोविड महामारीतून सर्व अर्थव्यवस्था बाहेर येत होती, त्याचा तत्कालीक फटका अनेक उद्योगांना बसला होता. तसाच या उद्योगांना बसल्यामुळेच त्यांना आपला व्यवसाय बंद करावा लागला असे पण एक कारण देण्यात येत आहे. कोविड महामारीच्या कालावधीमध्ये संपूर्ण अर्थव्यवस्थेलाच मंदी आली होती आणि अनेक अनेक उद्योगांची परिस्थिती बिकट झाली होती. पण त्याचा तत्कालीन परिणाम म्हणून एवढे उद्योग निश्चितच बंद पडले नसतील.

या व्यतिरिक्त कामगारांच्या समस्या असोत किंवा अर्थव्यवस्थेला आलेली मरगळ असो किंवा मागणीचा अभाव असो या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणूनसुद्धा अनेक उद्योग बंद पडल्याची माहिती लोकसभेतच देण्यात आली आहे. केंद्रातील मोदी सरकारने सत्तेवर आल्यापासून छोट्या व मध्यम उद्योगांसाठी ज्या विविध योजना समोर आणल्या होत्या त्याचा लाभ उद्योजक घेत आहेत की नाहीत हेसुद्धा या निमित्ताने समोर आले आहे.

कारण बंद पडलेल्या ३६ हजार उद्योगांमध्ये १४ हजार पेक्षा जास्त एमएसएमई म्हणजेच सूक्ष्म, मध्यम आणि लघु उद्योगांचा समावेश आहे. सरकारची स्टार्ट अप इंडिया योजना असो किंवा स्किल इंडिया योजना असो, या सर्व योजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरण केल्यास दावा जरी केला जात असला तरी जेव्हा लघु आणि मध्यम उद्योग एवढा मोठ्या प्रमाणात बंद पडतात तेव्हा धोरण पातळीवर काहीतरी चुकत आहे हे मान्य करावेच लागते.

एवढे उद्योग बंद पडले हे निश्चित गंभीर आहेच; पण हे उद्योग बंद पडल्यामुळे किती लोकांवर बेरोजगाराची कु-हाड कोसळली याची

सुजाता बाबर

अधिकृत आकडेवारी मात्र सरकारकडे उपलब्ध नाही, हे विचित्र आहे. ढोबळमानाने अंदाज जरी करायचा झाला आणि प्रत्येक उद्योगात सरासरी किमान १० कर्मचारी कामाला होते, असे जरी म्हणले तरी सुमारे चार लाख जणांचा रोजगार गेला असा निष्कर्ष सहज काढता येतो.

या विषयातील एक अत्यंत गंभीर गोष्टही आहे की महाराष्ट्रातील औद्योगिकदृष्ट्या प्रगत आणि गुंतवणूक करण्यासाठी योग्य जे जिल्हे मानले जातात, त्याच जिल्ह्यातील उद्योग सर्वाधिक बंद पडले आहेत. उदाहरणार्थ मुंबईतील १२००० उद्योग, पुण्यातील ६००० उद्योग, ठाण्यातील ४००० उद्योग बंद पडले आहेत. पुणे जिल्ह्यातील चाकण एमआयडीसीतील अनेक उद्योजकांनी आपले स्थलांतर सातारा जिल्ह्यातील खंडाळा एमआयडीसीमध्ये करण्याचा निर्णय घेतल्याची बातमी ताजी आहे, तो संदर्भसुद्धा या ठिकाणी महत्त्वाचा आहे.

औद्योगिकदृष्ट्या प्रगत जिल्ह्यामध्ये अशाप्रकारे उद्योग बंद होण्याचे किंवा स्थानांतरित होण्याचे प्रमाण का वाढत चालले आहे याचा शोध सरकारला घ्यावाच लागेल. देशातील सर्वात प्रगत राज्य मानलेल्या महाराष्ट्रामध्ये आणि महाराष्ट्रातील सर्वात प्रगत जिल्हे असलेल्या मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक जिल्ह्यांमध्येच जर अशा प्रकारे उद्योगांची टाळेबंदी होत असेल, तर एकूण औद्योगिकीकरणाचे चित्र विदारक आहे हे मान्यच करावे लागेल. येत्या कालावधीमध्ये सरकार या विषयाचे निश्चितच स्पष्टीकरण देईल. काही वेळा अतिशय वेगळ्या कारणांमुळेसुद्धा उद्योगधंदे बंद होतात. पण ते प्रमाण खूपच कमी असते.

जेव्हा मालाला उठाव नाही, योग्य प्रकारे सुविधा उपलब्ध होत नाहीत व उद्योगधंद्याची परिस्थिती दिवाळखोरीपर्यंत येऊन पोहोचली आहे अशा कोणत्याही कारणाने जरी उद्योगधंदा बंद पडला असेल तर या कारणाच्या मुळापर्यंत जाऊन अशी परिस्थिती पुन्हा उद्भवणार नाही हे पाहण्याचे काम सरकारला करावेच लागेल.

दरवर्षी मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री जगाच्या कानाकोर्प ?यामध्ये फिरून लाखो, कोटी रुपयांचे करार करून महाराष्ट्रात उद्योग आणल्याचे दावे करत असतात. या परदेश दौं–यांमध्ये जे विविध करार केले जातात, त्यांचा सध्याचा स्टेटस काय आहे हेसुद्धा या निमित्ताने सरकारने जाहीर करायला हरकत नाही.

एखादा नवा उद्योग जेव्हा उभा राहत आहे, असे सरकार अभिमानाने सांगते, त्याच वेळी या उद्योगाच्या निमित्ताने किती रोजगार निर्मिती होणार आहे याचीसुद्धा माहिती दिली जाते. पण एखादा उद्योग बंद होतो तेव्हा किती जणांचा रोजगार जाणार आहे याबाबत सरकार काहीच खुलासा करत नाही हा विरोधाभाससुद्धा लक्षात घेण्यासारखा आहे.